# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**सत्र–३ VSC - I**

## वस्तुसंग्रहालय ओळख

**(Introduction to Museology)**

**सत्र–४ - VSC - II**

## संग्रहालय व्यवस्थापन

**(Museum Management)**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून

**बी.ए. भाग–२ इतिहास**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२५

बी. ए. भाग - २ इतिहास करिता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ३००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN - 978 - 93 - 49570 - 91 - 7

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ **अभ्यासमंडळ : इतिहास** ■

**अध्यक्ष – डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा

- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा

- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली

- **डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर

- **डॉ. तेजस मदन घारगे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी अॅण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई

- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्लॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळा पार्क, कोल्हापूर

- **डॉ. निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस्,
  कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०२५-२६ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार नवीन सुधारीत अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने बी. ए. भाग २ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी '**वस्तुसंग्रहालय ओळख**' या विषयाचे सत्र-३ आणि '**संग्रहालय व्यवस्थापन**' हे सत्र-४ साठीचे स्वयं अध्ययनाचे हे पुस्तक सन २०२५-२६ या वर्षात तयार केलेले आहे. सदर लेखनासाठी लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी आणि तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंअध्ययन प्रश्न आणि त्यांची उत्तरे दिली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

**वस्तुसंग्रहालय ओळख** या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये **वस्तुसंग्रहालय ओळख, वस्तुसंग्रहालय चळवळीचा इतिहास** आणि **संग्रहालय व्यवस्थापन** या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये **संग्रहालयाची पायाभूत रचना, भारतातील निवडक वस्तुसंग्रहालये** इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र अंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मा. कुलगुरू, प्र. कुलगुरू, कुलसचिव यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, उपकुलसचिव यांचे सहकार्य लाभले. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांने तसेच पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या सर्वांच्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार!


■ संपादक ■

**प्रोफेसर (डॉ.) सुरेश शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर.

**प्रोफेसर (डॉ.) चंद्रवदन नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
ता. कागल, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**वस्तुसंग्रहालय ओळख**
**संग्रहालय व्यवस्थापन**
**बी. ए. भाग -२, सत्र - ३ व ४**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखकांचे नाव | घटक क्रमांक | |
|---|---|---|
| | सत्र ३ | सत्र ४ |
| **प्रोफेसर (डॉ.) सुरेश शिखरे,**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक,<br>कोल्हापूर, जि. कोल्हापूर. | १ व २ | १ व २ |

■ संपादक ■

**प्रोफेसर (डॉ.) सुरेश शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर.

**प्रोफेसर (डॉ.) चंद्रवदन नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
ता. कागल, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | सत्र–३ : वस्तुसंग्रहालय ओळख | |
| १. | वस्तुसंग्रहालयाची ओळख | १ |
| २. | वस्तुसंग्रहालय चळवळीचा इतिहास | ३० |
| | सत्र–४ : संग्रहालय व्यवस्थापन | |
| १. | संग्रहालयाची पायाभूत रचना | ६० |
| २. | भारतातील निवडक वस्तुसंग्रहालये | ९७ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना :**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२५-२६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक १

# वस्तुसंग्रहालय ओळख

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ वस्तुसंग्रहालयाची संकल्पना, स्वरूप व व्याख्या

१.२.२ वस्तुसंग्रहालयांचे प्रकार व कार्ये

१.२.३ वस्तुसंग्रहालयांचे महत्व

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अध्ययनानंतर, विद्यार्थी खालील गोष्टी साध्य करू शकतील;

१) वस्तुसंग्रहालय म्हणजे काय, त्याचे मूळ स्वरूप आणि त्याच्या विविध व्याख्या स्पष्ट करता येतील.

२) जगातील विविध प्रकारच्या वस्तुसंग्रहालयांची माहिती व त्यांचे वर्गीकरण करता येईल.

३) वस्तुसंग्रहालये समाज आणि संस्कृतीसाठी कोणती महत्त्वाची कार्ये करतात हे स्पष्ट करता येईल.

४) ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक दृष्टिकोनातून वस्तुसंग्रहालये का महत्त्वाची आहेत, याचे विश्लेषण करता येईल.

५) आपल्या दैनंदिन जीवनात व समाजाच्या विकासात वस्तुसंग्रहालये कशा प्रकारे योगदान देतात, हे उदाहरणांसह स्पष्ट करता येईल.

## १.१ प्रास्ताविक :

मानवी जीवनामध्ये वस्तुसंग्रहालयास ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व मनोरंजनाच्या दृष्टीकोनातून अनन्यसाधारण महत्त्व आहे. वस्तुसंग्रहालये ही दोन संस्कृतींना जोडून ठेवणारी व वर्तमानात दिशादर्शक म्हणून कार्य करणारी संस्था आहे. वस्तुसंग्रहालये ही एक प्रकारची समाजाचा आरसा असतात. ज्यामध्ये मानवी जीवन संस्कृतीच्या विविध अंगांचे प्रतिबिंब उमटलेले असते. मानवी संस्कृतीच्या प्रगतीचा आलेख प्राप्त होत असल्याने वस्तुसंग्रहालये ही भावी पिढीला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारी एक ज्योत आहे. इतिहासविषयक संकल्पना बदलून आधुनिक विज्ञान, माहिती, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून इतिहास जसा घडला तसा जाणून घेण्याचा प्रयत्न होत आहे. इतिहास लेखनासाठी इतर साह्यकारी ज्ञानशाखातील एक साह्यकारी ज्ञानशाखा म्हणून वस्तूसंग्रहालयास ओळखले जाते. दुर्मिळ, मौल्यवान वस्तूंचा संग्रह, वस्तूंची नोंदणी, संरक्षण, संशोधन, प्रदर्शन व मनोरंजनातून लोकांची ज्ञानवृध्दी करणे इ. मुख्य कार्य वस्तुसंग्रहालय करत असल्यामुळे इतिहास विषयांच्या लेखनात त्याचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. २१ व्या शतकापासून वस्तुसंग्रहालय एक शास्त्र या स्वरूपात पुढे येत असून त्यास ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व मनोरंजनदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले आहे. संग्रहालयातील दुर्मिळ, कलापूर्ण व मौल्यवान भौतिक वस्तू ह्या इतिहासलेखनाची अस्सल साधने पुरावे म्हणून महत्त्वपूर्ण मानली जातात. मानवाचे सामाजिक परिवर्तन होण्यास, सामाजिक ऐक्य वाढण्यास व राष्ट्रीय एकात्मता वाढीसाठी वस्तुसंग्रहालयांची मदत होत आली आहे. वस्तुसंग्रहालय ही संज्ञा व्यापक स्वरूपाची असून त्यामध्ये प्राचीन काळापासूनच्या सांस्कृतिक अवशेषांचे संग्रह, जतन, संवर्धन, संशोधन, प्रदर्शन, मनोरंजन, लोकशिक्षण देण्याचे कार्य अविरतपणे चालत असते.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ वस्तुसंग्रहालयाची संकल्पना, स्वरूप व व्याख्या :

**अ) वस्तुसंग्रहालयाची संकल्पना :**

वस्तुसंग्रहालय म्हणजे मानवाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक किंवा कलात्मक वारशाचा संग्रह आणि जतन करणारी संस्था. ही ठिकाणे केवळ ऐतिहासिक वस्तूंचे संकलन व प्रदर्शन करण्यासाठी नसून संशोधन, शिक्षण आणि सांस्कृतिक जतनासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. वस्तुसंग्रहालये आपल्या भूतकाळाची झलक दाखवतात आणि त्यातून समाजाच्या प्रगतीची दिशा स्पष्ट होते. प्राचीन काळापासून वस्तुसंग्रहालये मानवी समाजाच्या ज्ञान आणि संस्कृतीच्या जतनासाठी कार्यरत आहेत. जगातील पहिली ज्ञात वस्तुसंग्रहालये सुमेरियन, इजिप्शियन आणि ग्रीक संस्कृतीत सापडतात. आजच्या काळात, ही संग्रहालये केवळ प्राचीन वस्तूंच्या जतनापुरती मर्यादित न राहता, विज्ञान, तंत्रज्ञान, कला आणि पर्यावरण यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये माहिती प्रदान करणारी केंद्रे बनली आहेत. वस्तुसंग्रहालय हे एक सार्वजनिक किंवा खाजगी संस्था असते, जिथे ऐतिहासिक, वैज्ञानिक, कलात्मक किंवा सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या वस्तूंचे संग्रहण, संवर्धन आणि प्रदर्शन केले जाते. वस्तुसंग्रहालयांची निर्मिती ही केवळ मनोरंजनासाठी किंवा ऐतिहासिक गोष्टींचे प्रदर्शन करण्यासाठी झाली नाही, तर ती समाजाच्या व्यापक हितासाठी झाली आहे. त्यांचे मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे आहेत:

**१) सांस्कृतिक वारसा जतन करणे :**

सांस्कृतिक वारसा जतन करणे हे कोणत्याही समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण ते आपली ओळख, परंपरा आणि इतिहास जिवंत ठेवते. भूतकाळातील मौल्यवान वस्तू, हस्तलिखिते, चित्रे आणि शिल्पे यांचे संवर्धन करून, आपण आपल्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन भावी पिढ्यांना घडवू शकतो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने जुनी हस्तलिखिते डिजिटायझेशनद्वारे सुरक्षित ठेवली जात आहेत, तर ऐतिहासिक वस्तू विशेष नियंत्रित वातावरणात जतन केल्या जातात. वस्तुसंग्रहालये, संशोधन केंद्रे आणि शैक्षणिक संस्था यामध्ये या वारशाचे प्रदर्शन व अध्ययन होत असते. यामुळे केवळ इतिहासाचे संरक्षण होत नाही, तर नव्या पिढीला त्यांच्या सांस्कृतिक मुळांची जाणीवही होते.

**२) शिक्षण आणि संशोधनाला मदत करणे :**

वस्तुसंग्रहालये शिक्षण आणि संशोधनासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थी, अभ्यासक आणि संशोधकांसाठी ती मौल्यवान माहितीचा स्रोत ठरतात. ऐतिहासिक दस्तऐवज, शिलालेख, हस्तलिखिते, शिल्पकला, चित्रे आणि वैज्ञानिक नमुने यांच्या माध्यमातून अभ्यासकांना भूतकाळाचा सखोल अभ्यास करता येतो. वस्तुसंग्रहालयांमध्ये विविध विषयांवरील संशोधनासाठी विशेष ग्रंथालये आणि प्रयोगशाळा उपलब्ध असतात. तसेच, शैक्षणिक उपक्रम, कार्यशाळा आणि प्रदर्शने आयोजित करून इतिहास, विज्ञान आणि कलांविषयी जनजागृती केली जाते. डिजिटल तंत्रज्ञानामुळे संशोधन अधिक सुलभ होत असून, अनेक संग्रहालये ऑनलाईन संग्रह आणि माहिती पुरवतात, ज्यामुळे जागतिक स्तरावर शिक्षणाला चालना मिळते.

**३) पर्यटन वाढवणे :**

वस्तुसंग्रहालये पर्यटन वाढवण्यास मोठी मदत करतात. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा पाहण्यासाठी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटक मोठ्या संख्येने संग्रहालयांना भेट देतात. प्रसिद्ध संग्रहालये, जसे की दिल्लीतील राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, आणि जयपूरमधील सिटी पॅलेस वस्तुसंग्रहालय, यामुळे भारताच्या समृद्ध इतिहासाचे आकर्षण वाढते. पर्यटकांच्या वाढीमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, हस्तकला विक्रेते आणि मार्गदर्शक यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. तसेच, संग्रहालयांतर्फे आयोजित विशेष प्रदर्शने आणि कार्यक्रम पर्यटन व्यवसायाला आणखी प्रोत्साहन देतात, ज्यामुळे सांस्कृतिक पर्यटनाचा विकास होतो.

**४) संवर्धन आणि जतन :**

संवर्धन आणि जतन हे वस्तुसंग्रहालयांचे एक अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. नाजूक, दुर्मिळ आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या वस्तूंचे योग्य देखभाल आणि संवर्धन करून त्यांना सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. यासाठी विशेष तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक पद्धती वापरल्या जातात, जसे की वस्तूंच्या संरक्षणासाठी नियंत्रित तापमान, आर्द्रता आणि प्रकाश यांचे व्यवस्थापन करणे. वस्तूंच्या दुरवस्थेपासून बचाव करण्यासाठी तज्ज्ञांनी त्यांची तपासणी केली जाते आणि त्यावर जतन प्रक्रिया केली जाते. या प्रक्रियेत शिल्पकला, चित्रे, हस्तलिखिते आणि अन्य पुरावे यांचे दुरुस्ती, रंगसंगती, आणि संरचनात्मक देखभाल केली जाते. डिजिटायझेशनचा वापर करून वस्तूंच्या प्रतिलिपी तयार केल्या जातात, ज्यामुळे त्यांची माहिती सुरक्षित राहते. यामुळे वस्तूंचा इतिहास आणि महत्त्व भविष्यातही जतन होतो आणि समाजाला ते उपलब्ध राहतात.

**५) समाजात ऐतिहासिक आणि वैज्ञानिक जाणीव निर्माण करणे :**

वस्तुसंग्रहालये समाजात ऐतिहासिक आणि वैज्ञानिक जाणीव निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. लोकांना त्यांच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक, आणि वैज्ञानिक वारशाबद्दल जागरूक करण्यासाठी संग्रहालये विविध प्रदर्शने, कार्यशाळा आणि शैक्षणिक उपक्रम आयोजित करतात. यामुळे नागरिकांना त्यांच्या इतिहासाची, संस्कृतीची आणि विज्ञानाची समज वाढते. वस्तुसंग्रहालये पुराणकाळातील कलेची, शास्त्रज्ञांची शोध, प्राचीन तंत्रज्ञान आणि विज्ञानाचा महत्त्व सांगतात. यामुळे समाजात इतिहास आणि विज्ञान यांविषयी एक सकारात्मक दृष्टिकोन तयार होतो, ज्यामुळे विदयार्थ्यांमध्ये शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन आणि शास्त्रशुद्ध विचारांची जाणीव होते. वस्तुसंग्रहालये केवळ ऐतिहासिक वस्तूच जतन करत नाहीत, तर त्या वस्तूंच्या माध्यमातून लोकांच्या विचारशक्तीला उत्तेजन देतात, त्यामुळे समाजात जागरूकता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो.

**ब) वस्तुसंग्रहालयांचे स्वरूप :**

वस्तुसंग्रहालये ही ऐतिहासिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक आणि कलात्मक महत्त्वाच्या वस्तूंचा संग्रह करणारी आणि त्यांना लोकांसमोर सादर करणारी संस्था आहेत. यामध्ये पुराणकाळातील शिलालेख, शिल्पकला, हस्तलिखिते, चित्रे, वैज्ञानिक उपकरणे आणि अन्य ऐतिहासिक वस्तू असतात. वस्तुसंग्रहालयांचे प्रमुख उद्दिष्ट

म्हणजे या वस्तूंचे जतन करणे, त्यांचे प्रदर्शन करणे, तसेच शैक्षणिक आणि संशोधनाच्या दृष्टीने उपयोग करणे. वस्तुसंग्रहालये इंटरेक्टिव्ह प्रदर्शन, कार्यशाळा आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करून लोकांना ऐतिहासिक आणि वैज्ञानिक ज्ञान मिळवून देतात. त्यामध्ये डिजिटल साधनांचा वापर करून ज्ञानाचे संवर्धन आणि प्रसार केला जातो. संग्रहालये पर्यटकांना शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक अनुभवही देतात. यामुळे वस्तुसंग्रहालये केवळ माहितीचा स्रोत नसून, लोकांसाठी शैक्षणिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक केंद्र ठरतात.

**१) प्राचीन कालखंड :**

भारतामध्ये प्राचीन काळात संग्रहालय सदृश्य अशा काही संस्थाचे अस्तित्व असल्याचे दिसते. प्राचीन भारतीय वाङ्मयामध्ये 'चित्रशाळा' विषयक उल्लेख मिळतात. याविषयी भवभूतीची उत्तर रामचरित, बाबा भट्ट यांचे अष्टांग संग्रह, श्री हर्ष यांचे नैषधचरित इ. ग्रंथात चित्रशाळा विषयक माहिती मिळते. गौतम बुध्द यांचा महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या पवित्र रक्षाअस्थीवरती बुध्दगगया, अमरावती, भारहूत, सांची इत्यादी ठिकाणी स्तूपाची निर्मिती केली गेली. यांच स्तूपावरती अनेक मूर्ती, शिलालेख कोरले गेले. हिंदू बौध्द, जैन धर्मीयांच्या मंदिर, गुहा आदी ठिकाणी धार्मिक शिल्पे व चित्रे रेखाटून त्यामधून लोकांना आपल्या धर्माविषयक माहिती व सांस्कृतिक परंपराचे ज्ञान प्राप्त करून दिले गेले. अशा प्रकारची प्राचीन काळातील वस्तुसंग्रहालय सदृश्य चित्रशाला, स्तूप, मंदिर, गुहा आदी ठिकाणी धार्मिक शिल्पे व चित्रे रेखाटून त्यामधून लोकांना आपल्या धर्मविषयक माहिती व सांस्कृतिक परंपराचे ज्ञान प्राप्त करून दिले गेले. इ. स. पू. ९ वे शतकातील तक्षशिला, इ. स. ५ वे शतकातील नालंदा, इ. स. ६ व्या शतकातील विक्रमशीला इ. विद्यापीठात धर्मगंज परिसर विकसित करून त्यामध्ये रत्नसागर, रत्नरंजित व रत्नोद्धती प्रकारातील भव्य स्वरूपाची ग्रंथालये निर्माण केली गेली होती.

**२) मध्ययुग कालखंड :**

सरदार, उमराव, श्रीमंत लोक, राजे रजवाडे यांना दुर्मिळ व शोभिवंत मौल्यवान, किंमती वस्तूंचा संग्रह करून त्यांचे प्रदर्शन भरवून स्वत:ची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी उपयोग करून घेतला. मुघल सम्राट अकबर, जहाँगीर तसेच सरदार मिर्झराजे जयसिंह, सवाई प्रतापसिंह यांनी तत्कालीन उत्कृष्ट चित्रकाराकडून अनेक चित्रकृतीची निर्मिती करून घेतली. छत्रपती शाहू महाराज यांनी सातारा येथे पशुपक्षी यांचा संग्रह केला. बाजीराव पेशवे, सवाई माधवराव पेशवे यांनी पुणे येथे विविध प्राण्यांचे संग्रहालय निर्माण केल्याचे उल्लेख प्राप्त होतात. अशा प्रकारची अवस्था ब्रिटिशाचे भारतात राज्य स्थापनेपूर्वीची वस्तुसंग्रहालयांची होती.

**३) आधुनिक कालखंड :**

ब्रिटिशांनी भारतामध्ये आपले साम्राज्य निर्माण करून राज्यकारभार करतानांच भारतातील कला वस्तूचा शोध घेवून त्यांचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊले उचलली. सर विल्यम जोन्स यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने इ. स. १७८४ मध्ये 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या पुढाकारातून संस्था संग्रहातील भारतीय संस्कृतीविषयक बहुमूल्य अशा कलापूर्ण, दुर्मिळ, वस्तूच्या माध्यमातून २ फेब्रुवारी १८१४ रोजी कलकत्ता येथे भारतातील पहिले 'भारतीय

वस्तुसंग्रहालय' नावाचे वस्तुसंग्रहालय स्थापन केले. या संग्रहालयाचा, भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र, कला संस्कृती, उद्योग, शिल्पकला आदि विभागांचा विकास करून त्याचे बहुउद्देशीय स्वरूपाच्या संग्रहालयात रूपांतर केले. इ. स. १८५७ च्या उठावानंतर भारतात ब्रिटनची राणी महाराणी व्हिक्टोरिया यांची सत्ता सुरू झाली. महाराणी व्हिक्टोरिया राणीच्या अर्धशतसांवत्सरीक उत्सवानिमित्त मुंबई येथे इ. स. १८५७ मध्ये व्हिक्टोरिया अँण्ड अल्बर्ड वस्तुसंग्रहालय स्थापन केले गेले. भारताचे व्हाईसरॉय जनरल लॉर्ड कॅनिंग यांच्या कारकिर्दीत इ. स. १८६१ साली भारतीय पुरातत्वीय संरक्षण संस्था स्थापन झाली. या संस्थेचे तत्कालीन संचालक सर अलेक्झांडर कनिंघ यांनी भारतीय पुरातत्वीय स्थळांचा शोध व सर्वेक्षण करून अनेक ठिकाणी उत्खनन केले. या उत्खनानातून प्राप्त अवशेष वस्तूचे प्रदर्शन वस्तुसंग्रहालय स्थापन करून प्रदर्शित केल्या. यामध्ये मद्रास येथे व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्युट म्युझियम (१८८७), उदकमण्डल येथे शासकीय म्युझियम (१८८८), म्हैसूर येथे म्हैसूर राज्य संग्रहालय (१८६५), एर्नाकुलम येथे प्राणी विज्ञान व वनस्पतीशास्त्र संग्रहालय (१८४७), महना येथे घासीदास स्मारक संग्रहालय (१८७५), जयपूर येथे गव्हर्मेंट सेंट्रल म्युझियम (१८७६), कच्छ येथे कच्छ म्युझियम (१८८७) व विल्वेस्टर म्युझियम (१८९०), बडोदा येथे बडोदा संग्रहालय (१८९४), व कलादान, भावनगर येथे बरटन म्युझियम, जम्मू येथे (१८९८) श्री. प्रतापसिंह राजकीय संग्रहालय, लखनऊ येथे (१८६३) स्टेट म्युझियम (१८९८), मथुरा येथे मथुरा म्युझियम (१८७४), नागपूर येथे स्टेट म्युझियम (१८७४), मुंबई येथे प्राकृतिक म्युझियम (१८६३), पुणे येथे लॉर्ड रे इंडस्ट्रीयल म्युझियम (१८८८) इ. वस्तुसंग्रहालये भारतात स्थापन झाली.

लार्ड कर्झनची भारताच्या व्हायसरॉय पदावरती नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी भारतीय पुरातत्त्वीय सर्वेक्षण संस्थेची पुर्नबांधणी करून सर जॉन मार्शल यांची संचालकपदी नियुक्ती केली. सर जॉन मार्शल यांनी संस्थेच्या माध्यमातून अनेक ठिकाणी उत्खनन करून प्राप्त वस्तू अवशेषाचे विशेषतः अनेक ठिकाणी स्थळीय वस्तुसंग्रहालय भारतात निर्माण केली. उत्खनात सापडलेल्या वस्तूंच्या संरक्षणार्थ उत्खनाच्याच ठिकाणी स्थापन केली गेलेली अशी एकूण ११ स्थळीय संग्रहालये स्थापन झाली. त्यामध्ये जूनागढ (१९०१), सारनाथ (१९०४), चम्पा (१९०८), जोधपूर (१९०९), खजुराहो (१९१०), वाराणसी (१९१०), नालंदा (१९१७), सांची (१९१९), हडप्पा (१९२१), मोहनजोदडो (१९२२), ग्वालियर (१९२२) या स्थळीय संग्रहालयांचा समावेश होतो. लॉर्ड कर्झन यांनी प्राचीन ऐतिहासिक वास्तू व वस्तूं यांचे जतन, संरक्षण व संवर्धन होण्याच्या दृष्टीकोनातून 'एन्शंट मोनुमेंटस् प्रिझरवेशन अॅक्ट' (Ancient Monuments Preservation Act) हा कायदा इ. स. १९०४ साली भारतात लागू केला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्ये विविध संस्थाने विलीन केली गेली. या संस्थानांनी आपल्या संग्रही असलेल्या विविध कलापूर्ण, दुर्मिळ, मौल्यवान वस्तूचे आपल्या राजमहालात संग्रहालयाची निर्मिती केली इ. स. १९५६ साली भारत सरकारने भारतातील वस्तुसंग्रहालयांच्या विकासासाठी 'सेन्ट्रल एड्वायझरी बोर्ड ऑफ म्युझियम' कमिटीची स्थापना केली. तसेच इ. स. १९५९ मध्ये प्राचीन ऐतिहासिक स्मारके आणि पुरातत्त्वीय स्थळे हा कायदा भारत सरकारने पास केला. भारतातील सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी व त्याची तस्करी रोखण्यासाठी इ. स. १९७२ साली "The Antiquarian and An Treasures Act" हा कायदा पास केला. विविध कायद्याच्या माध्यमातून भारत सरकारने आपल्या प्राचीन काळापासून सांस्कृतिक वारसाचे जतन,

संवर्धन, संरक्षण करून राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण केले. ब्रिटिश काळापासून ते इ. स. २००० सालापर्यंत भारतात विविध प्रकारातील सुमारे ६०० इतकी वस्तुसंग्रहालये निर्माण झाली आहेत.

**क) वस्तुसंग्रहालयाची व्याख्या :**

दुर्मिळ, अमूल्य, कलापूर्ण, मौल्यवान, सांस्कृतिक मूल्य असणाऱ्या विविध वस्तूंचा संग्रह ज्या ठिकाणी केलेला असतो त्या ठिकाणास सामान्यतः संग्रहालय असे संबोधले जाते. संग्रहालय हा दोन शब्दापासून बनला आहे. संग्रह + आलय = म्हणजेच संग्रह केलेल्या वस्तूंचे स्थान होय. मराठी शब्दकोशात 'प्राचीन दुर्मिळ वस्तूंचा संग्रह जेथे केला जातो, ते स्थान म्हणजे वस्तुसंग्रहालय होय' असा वस्तुसंग्रहालय शब्दाचा अर्थ दिला आहे, कौतुक भांडार, पुराण संग्रह, चिडियाघर, जादूघर इ. शब्दानी ओळखले जाणारे शब्द कालबाह्य झाले आहेत, वस्तुसंग्रहालय हा एक भारतीय देवनागरी शब्द असून विविध वस्तूचे संग्रह स्थळ म्हणून आधुनिक काळातील व्यवहारात वापरतात. वस्तुसंग्रहालयास इंग्रजी भाषेत 'म्युझियम' (Museum) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या म्युझियम (Museum) या शब्दाचे मूळ ग्रीक भाषेतील 'मोसियो' (Maseion) या शब्दामध्ये आढळून येते. ग्रीकमधील कला, साहित्य व विज्ञानविषयक मूसेस (Muses) एकत्रित रूपातील एकूण नऊ अधिष्ठात्री देव-देवतांचे प्रतिक म्हणून ओळखल्या जातात. कॅलियोप (Calliop) ही महाकाव्यांचे प्रतिक, क्लियो (Clio) इतिहास, इयूटर्न (Euterp) काव्यसंगीत, थेलिया (Thalia), हास्यनाट्य व लोकगीत, मेल्योने (Melpomehe) दुःख, टर्प सिचाय, सामूहिक गायन व नृत्य, ईरटो - प्रेमगीत व आनंदहास्य, पोलिन्मिया - धार्मिक पवित्रता व स्तुती गीत व युरेनिया ही अवकाश व ज्योतिष विद्याच्या प्रतिक म्हणून उपरोक्त नऊ अधिष्ठात्री देव-देवता होत्या. थोडक्यात उपरोक्त मुझेसच्या नऊ अधिष्टात्री देव-देवता ह्या विविध प्रकारांतील विविध लोककला, नृत्यकला, गायनकला, नाट्यकला, काव्य, संगीत, कलात्मक वस्तू, बुध्दिमत्ता व विज्ञानज्ञान इत्यादी बाबींशी जोडण्यात येतो. थोडक्यात विविध विषयांचा विविध प्रकारातील कलात्मक, दुर्मिळ, मौल्यवान वस्तुंचा ज्या ठिकाणी एकत्रित ठेवल्या जातात त्या ठिकाणांस 'वस्तुसंग्रहालय' असे म्हटले जाते. वस्तुसंग्रहालयांच्या उगमस्थानाकडे पाहिले असता वस्तुसंग्रहालय हे शास्त्र आहे. यांची जाणीव वस्तू संग्रहालयाच्या विषयक अनेक केलेल्या व्याख्या व त्याच्यामध्ये होत गेलेले बदलावरून दिसून येते, त्या पुढीलप्रमाणे :

**डॉ. जान्सन (इ. स. १८९०) :** 'मानवामध्ये ज्ञान व जिज्ञासा निर्माण करणाऱ्या वस्तूचे संग्रह स्थळ म्हणजे वस्तुसंग्रहालय होय.'

**बेईली नाथन (इ. स. १८३७) :** 'वस्तुसंग्रहालय म्हणजे एक दृश्य अभ्यासाचे ग्रंथालय आहे.'

**सर आशुतोश मुखर्जी (इ. स. १९१४) :** वस्तुसंग्रहालय ही एक अशी संस्था आहे की, 'जिच्यामध्ये वस्तूंचे संकलन करून सुरक्षित ठेवले जाते. ज्यांचा उपयोग जनसामान्यांना त्यांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीविषयक ज्ञान, आनंद मिळवून देण्याच्या हेतूने केला जातो.'

**सर एम . केन्याल (इ. स. १९२७) :** 'मानवी जीवनामध्ये ज्या गुणात्मक मूल्यमापनाची आवश्यकता असते, त्याच्याशी संबंधित प्रदर्शित केलेल्या वस्तूंना पाहून बघणाऱ्यांमध्ये सौंदर्यबोध, जिज्ञासा व आपल्या भूतकाळाविषयी आस्था निर्माण होते. अशा संग्रह स्थळांना 'वस्तुसंग्रहालय' असे म्हटले जाते.'

**आंतरराष्ट्रीय संग्रहालय परिषद (आयकॉम) (इ. स. १९५१) :** 'वस्तुसंग्रहालयांची संज्ञा अशा संस्थेस दिली जावू शकते, जिच्यामध्ये सांस्कृतिक व वैज्ञानिक कला वस्तूंचे संरक्षण करून मुख्यत: ज्ञान, शिक्षण व मनोरंजनाच्या उद्देशाने वस्तूंचे प्रदर्शन केले जाते.' Any permanent institution which conservs and displays for study, Education and Enjoyment, collection of objects of cultures of scientific significance.

**एस. टी. सत्यमूर्ति (इ. स. १९६३) :** 'वस्तूसंग्रहालयांस आधुनिक युगामध्ये असे व्याख्यानित केले जावू शकते. ज्या निसर्गाचा आविष्कार व मानवी संरचनेची उत्तम पद्धतीने व्याख्या करते व ज्यांच्या उपयोग ज्ञान मिळविण्याबरोबरच मानवी सांस्कृतीच्या प्रसार व प्रचार करण्यासाठी व सामान्य जनतेस संस्कारित करणाऱ्यांच्या हेतूने वस्तूचा संग्रह केला जावू शकतो.'

**ए. एस. विटलिन (इ. स. १९४९) :** 'आजच्या संदर्भामध्ये वस्तुसंग्रहालय शब्दापासून अशा संस्थेचा बोध होतो की, जिच्यामध्ये अनेक प्रकारच्या वस्तूंचा संग्रह पाहणाऱ्यांना शिक्षण व मनोरंजन देणेच्या उद्देशाने केला गेला आहे.'

**सर आर्थर किथ (इ. स. १९५०) :** 'वस्तुसंग्रहालय हे एक असे ग्रंथालय आहे की, ज्यांच्या कपाटामध्ये मानवी मेंदूकडून व्यक्त झालेले विचार मुद्रित, वस्तू रूपातून प्रकट नैसर्गिक कार्याचे मूळ रूप प्रामाणिकपणे संग्रहीत केले जाते.'

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ :**

**बहूपर्यायी प्रश्न :**

१) वस्तुसंग्रहालय म्हणजे काय?

अ) केवळ मनोरंजनाचे ठिकाण

ब) मानवी सांस्कृतिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक किंवा कलात्मक वारशाचा संग्रह आणि जतन करणारी संस्था

क) फक्त प्राचीन वस्तू विकण्याचे ठिकाण ड) फक्त चित्रकला प्रदर्शन करणारे ठिकाण

२) जगातील पहिली ज्ञात वस्तुसंग्रहालये कोणत्या संस्कृतींमध्ये सापडतात?

अ) रोमन, जर्मन आणि फ्रेंच संस्कृती ब) सुमेरियन, इजिप्शियन आणि ग्रीक संस्कृती

क) चीनी, जपानी आणि कोरियन संस्कृती ड) भारतीय, पर्शियन आणि अरेबिक संस्कृती

३) वस्तुसंग्रहालयाचे मुख्य उद्देश खालीलपैकी कोणता नाही?

अ) सांस्कृतिक वारसा जतन करणे ब) शिक्षण आणि संशोधनाला मदत करणे

क) पर्यटन वाढवणे ड) वस्तूंची विक्री करणे

४) प्राचीन भारतीय वाङ्मयात 'चित्रशाळा' विषयक उल्लेख कोणत्या ग्रंथात मिळतात?

अ) रामायण आणि महाभारत | ब) उत्तर रामचरित, अष्टांग संग्रह, नैषधचरित

क) अर्थशास्त्र आणि मनुस्मृती | ड) नाट्यशास्त्र आणि कामसूत्र

५) छत्रपती शाहू महाराजांनी कोठे पशुपक्षी यांचा संग्रह केला होता?

अ) पुणे ब) सातारा क) कोल्हापूर ड) नागपूर

६) भारतातील पहिले 'भारतीय वस्तुसंग्रहालय' कलकत्ता येथे कधी स्थापन झाले?

अ) २ फेब्रुवारी १८१४ ब) १५ ऑगस्ट १९४७

क) २६ जानेवारी १९५० ड) १ मे १८५७

७) मुंबईतील 'व्हिक्टोरिया अँण्ड अल्बर्ड वस्तुसंग्रहालय' सध्या कोणत्या नावाने ओळखले जाते?

अ) राष्ट्रीय संग्रहालय ब) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय

क) नेहरू विज्ञान केंद्र ड) भाऊ दाजी लाड संग्रहालय

८) भारतीय पुरातत्वीय संरक्षण संस्था कधी स्थापन झाली?

अ) १८५७ ब) १८६१ क) १८७४ ड) १९०४

९) 'एन्शंट मोन्युमेंटस् प्रिझरवेशन अॅक्ट' हा कायदा भारतात कधी लागू झाला?

अ) १८९० ब) १९०४ क) १९१७ ड) १९२२

१०) आंतरराष्ट्रीय संग्रहालय परिषदने १९५१ मध्ये वस्तुसंग्रहालयाची व्याख्या करताना कोणत्या उद्देशांवर भर दिला?

अ) फक्त मनोरंजन ब) ज्ञान, शिक्षण आणि मनोरंजन

क) केवळ ऐतिहासिक वस्तूंचे जतन ड) पर्यटन आणि व्यापार

### १.२.२ वस्तुसंग्रहालयांचे प्रकार व कार्ये :

भारतामध्ये १९ व्या शतकात ऐतिहासिक, कला आणि स्थळीय संग्रहालय असे प्रकार अस्तित्वात होते. २० व्या शतकापासून वस्तुसंग्रहालयांचे स्थापनेचे उद्दिष्ट व निकष इ. तत्त्वानुसार वर्गीकरण करण्यास सुरूवात झाली. यातून संग्रहालयांतील वस्तूंना प्राधान्य, विषय, निर्मिती व उद्देश इ. निकषांवरती वस्तुसंग्रहालयांकडे पाहिले जाऊ लागल्याने वस्तुसंग्रहालयांचे विविध प्रकार अस्तित्वात आले, ते खालीलप्रमाणे :

**(अ) वस्तुसंग्रहालयाचे प्रकार :**

**१) ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय :**

ऐतिहासिक प्रकाराच्या संग्रहालयामध्ये दुर्मिळ व महत्त्वपूर्ण ऐतिहासिक अभिलेख, तैलचित्रे, छायाचित्रे, नाणी, शस्त्रास्त्रे, पत्रे, नकाशे, प्रतिकृती, निवासस्थाने इ. प्रकारच्या वस्तूंच्या माध्यमातून वैशिष्ट्यपूर्ण दालनाची मांडणी केलेली असते. तसेच पुरातत्त्वीय स्थळे, ऐतिहासिक स्मारके, युद्धभूमी आणि महत्वपूर्ण व्यक्ती यांच्या आठवणी म्हणून ही ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयांची उभारणी केलेली असते. उदा. नॅचरल हिस्ट्री म्युझियम,

दार्जिलिंग, पं. बंगाल (१९०३), व्हिक्टोरिया मेमोरियल वस्तुसंग्रहालय, कलकत्ता, पं.बंगाल (१९०६), पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय, लालकिल्ला, नवी दिल्ली (१९०९), नॅचरल हिस्ट्री म्युझियम, त्रिवेंद्रम्, केरळ (१९३५), टिपू सुलतान वस्तुसंग्रहालय, श्रीरंगपट्टनम्, कर्नाटक (१९५९), फोर्टसेन्ट जॉर्ज वस्तुसंग्रहालय, मद्रास, तामिळनाडू (१९८४), नॅशनल हेरीटेज पिझवेशन सोसायटी म्युझियम, बुंदी, राजस्थान इत्यादी.

**२) पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय :**

उत्खननात प्राप्त विविध पुरावशेषांचा पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालयात समावेश असतो. अश्मयुगी काळापासूनचे विविध पुराअवशेष, दगडी हत्यारे, मणी, नाणी, मातीची भांडी, शिलालेख, ताम्रपट, ताडपत्रावरील ग्रंथ, प्राचीन शिल्पकृती इ. उत्खननीय अवशेषांचा समावेश असतो. अशा प्रकारच्या संग्रहालयातील दालनात विषयांनुसार, काळानुसार प्रदर्शन केलेला असते. उत्खनन स्थळाच्या ठिकाणीच स्थापन केलेल्या स्थळीय वस्तुसंग्रहालयांना पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय म्हणून ओळखले जाते. हडप्पा, मोहेंजोदडो, तक्षशिला, नालंदा अशी काही स्थळीय संग्रहालय भारतात स्थापन केली आहे. उदा. आर्किऑलॉजिकल म्युझियम, मथुरा-उत्तरप्रदेश (१८७४), म्युझियम ऑम ॲन्टिक्किरिज, भावनगर-गुजरात (१८८४), गर्व्हमेंट सेंट्रल म्युझियम, जयपूर-राजस्थान (१८८७), आर्किऑलॉजिकल म्युझियम, रेड फोर्ट-दिल्ली (१९०९), ऑर्किऑलॉजिकल म्युझियम, खजुराहो-मध्यप्रदेश (१९१०), आर्किऑलॉजिकल म्युझियम, विजापूर-कर्नाटक (१९१२), आर्किऑलॉजिकल म्युझियम, अमरावती-आंध्र प्रदेश (१९५१), लोकल आर्किऑ लॉजिकल म्युझियम, चित्रदुर्ग-कर्नाटक (१९५१), आर्किऑलॉजिकल म्युझियम, नागार्जुन कोंडा, आंध्र प्रदेश (१९५२), आर्किऑलॉजिकल म्युझियम, बौध्दगया-बिहार (१९५६), आर्किऑलॉजिकल म्युझियम, हळ्ळेबिड-कर्नाटक (१९६१), हरियाणा प्रांतीय पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय, गुरूकुल झांझर, हरियाणा (१९६१), आर्किऑलॉजिकल म्युझियम, अहर-राज्यस्थान (१९६२), आर्किऑलॉजिकल म्युझियम, कलकत्ता-पं. बंगाल (१९६२) इत्यादी.

**३) कला वस्तुसंग्रहालय :**

मानवानी वेगवेगळ्या कालखंडात निर्माण केलेल्या विविध कलाकुसरीच्या हस्तकला इत्यादी प्रकारातील वस्तुसंग्रहालयात समावेश असतो. यामध्ये चित्रकला, मूर्तीकला, नक्षीकाम, भरतकाम, औद्योगिक कला, हस्तकला आदिवासी कला, पुरातत्त्वीय कला अवशेष, इ. प्रामुख्याने समावेश केला जातो.

**४) विज्ञान व तंत्रज्ञान वस्तुसंग्रहालय :**

मानवी जीवनाच्या विकासातील विविध टप्पे, गतकाळात मानवाने आपले जीवनमान सुसह्य करण्यासाठी लावलेले विविध शोध आणि विविध क्षेत्रातील ज्ञान, शोध, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात मानवाने केलेली प्रगती याविषयीची माहिती ही वस्तूरूपाने, मॉडेल रूपाने, यंत्र रूपाने, उपकरणे रूपाने, विषयानुसार विज्ञान व तंत्रज्ञानविषयक संग्रहालयांच्या दालनात समाविष्ठ केली जातात. उदा. विजयवाडा विज्ञान केंद्र, विजयवाडा-आंध्र प्रदेश (१८८७), नॅचरल हिस्ट्री म्युझियम, दार्जिलिंग-हिमाचल प्रदेश (१९०३), हेरास इन्स्टिट्यूट ऑम इंडियन हिस्ट्री ॲन्ड कल्चर, मुंबई-महाराष्ट्र (१९२६), म्युझियम ऑम द सेंट्रल ग्लास ॲन्ड सिरॅमिक रिसर्च इन्स्टिट्युट, कलकत्ता-पं. बंगाल (१९३०), हेल्थ म्युझियम, हैद्राबाद-आंध्र प्रदेश (१९४८), राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय, कलकत्ता- पं. बंगाल (१९५६), विश्वेश्वरैय्या इंडस्ट्रियल ॲन्ड टेक्नॉलॉजी म्युझियम,

बंगलोर-कर्नाटक (१९६५), ट्राईबल रिसर्च इन्स्टिटट्यूट म्युझियम, भुवनेश्वर-ओरिसा (१९७२), नेहरू विज्ञान केंद्र, पॉण्डेचरी (१९७७), रमन ताराघर संग्रहालय, नागपूर-महाराष्ट्र (१९९२), नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई-महाराष्ट्र (१९८५) ईत्यादी.

**५) औद्योगिक वस्तुसंग्रहालय :**

मानवाने विज्ञान क्षेत्रामध्ये लावले शोध हे प्रत्यक्षात व्यवहारामध्ये कोणत्या उद्योगामध्ये कशा पध्दतीने उपयोग केला जातो. 'ॲप्लीकेशन ऑम  सायन्सम याचे दिग्दर्शन औद्योगिक प्रकारच्या वस्तुसंग्रहालयांच्या माध्यमातून समाजाच्या ज्ञानवृध्दीसाठी संग्रहालयांच्या दालनात मांडले जातात. उदा. महात्मा फुले औद्योगिक वस्तुसंग्रहालय (लॉर्ड रे इंडस्ट्रीयल म्युझियम), पुणे (१८७४), गव्हर्मेंट इंडस्ट्रियल ॲन्ड कमर्शिअल म्युझियम, कलकत्ता-पं. बंगाल (१९३९), परमनंट इक्झिबिशन ऑफ बिल्डिंग मटेरियल म्युझियम, नवी दिल्ली (१९४०), कॅलिको म्युझियम ऑफ टेक्स्टाईल, अहमदाबाद (१९४९), म्युझियम ऑफ सेंट्रल ग्लास ॲन्ड सिरॅमिक रिसर्च इन्स्टिटट्यूट, पं.बंगाल (१९४९), हॉयवे म्युझियम, ट्रान्सपोर्ट भवन, नवी दिल्ली (१९६०), कॉन्टेल इंडस्ट्रीयल म्युझियम, गुवाहाटी-आसाम (१९८०), सेंट्रल इंडस्ट्रियल म्युझियम, मद्रास-तामिळनाडू (१९८०)इत्यादि.

**६) वैद्यकिय वस्तुसंग्रहालय :**

मानवी शरीररचना, शरीराचे कार्य, अवयव, मानवी आरोग्य, मानवी शरीरास उत्पन्न होणाऱ्या व्याधी. तसेच मानवी शरीर वैधिक शास्त्रज्ञ झालेली प्रगती, शोध, औधषे अशा विविध प्रकारच्या मानवी शरीर, अवयवविषयक दुष्य स्वरूपातील माहिती ही प्रतिकृती तक्ते. पोस्टर, इ. प्रदर्शन माध्यमातून वैद्यकिय प्रकारच्या संग्रहालयात वैद्यकियशास्त्राचे अभ्यासक, विद्यार्थी, सामान्यजन यांच्या ज्ञान वाढीसाठी प्रदर्शित केलेले असते. उदा. ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई (१८४५), स्टॅन्ले मेडिकल कॉलेज (१९२५), सेठ गोवर्धनदास मेडिकल कॉलेज, बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे (१९४६) इत्यादी.

**७) बाल वस्तुसंग्रहालय :**

लहान मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी त्याच्यात ज्ञानवृध्दी, बौध्दिक आकलन, संस्कार, नैतिकता रुजवण्याचे एक मनोरंजनक व शैक्षणिक जडणघडणीचे माध्यम म्हणून बाल वस्तुसंग्रहालये स्थापन केली जातात. अशा संग्रहालयाच्या माध्यमातून थोर व्यक्तीचे जीवन चित्रण, वैज्ञानिक तत्त्वे, सृष्टी विज्ञान, गती, गुरुत्वाकर्षण, जीव-विकास व नाश नैसर्गिक, वैज्ञानिक तत्त्वे, कला व विधा, कलाकुसरीच्या वस्तू, हस्तकला, चित्रकला, इतिहास संस्कृती याविषयक परिणामकारक, मार्मिक व सोप्या पध्दतीने मुलांची शैक्षणिक जडणघडण होण्याच्या दृष्टीकोन पुढे ठेवून प्रतीकृती, तक्ते, पोस्टर, प्रदर्शन इ. दृष्य स्वरूपातून बाल संग्रहालयाच्या दालनाची मांडणी केली जाते. उदा. बाल संग्रहालय, अमरेली-गुजरात (१९५२), नॅशनल चिल्ड्रन म्युझियम, नवी दिल्ली (१९५६), बाल संग्रहालय, लखनौ-उत्तर प्रदेश (१९५७), मोतीलाल नेहरू बाल संग्रहालय, (१९६८), नेहरू बाल संग्रहालय, कलकत्ता-पं. बंगाल (१९७२)इत्यादी.

**८) मंदिर वस्तुसंग्रहालय :**

प्राचीन काळापासून धार्मिक ठिकाणे, मंदिर ही त्या-त्या लोकांच्या श्रध्देची व धार्मिक गरजा पुरविणारी

एक संस्था मानली जाते. धार्मिक मंदिरे, चर्च, मठ, आश्रम या ठिकाणांस लोक श्रध्देने विविध कलापूर्ण वस्तू अर्पण करत. त्यामुळे या ठिकाणी विविध प्रकारच्या कलापूर्ण, मौल्यवान वस्तूंचा संग्रह होत असतो. अशा मंदिराच्या अनुशंगाने संग्रहीत झालेल्या वस्तूच्या माध्यमातून भारतातील विविध मंदिर वस्तुसंग्रहालये स्थापन झाली. त्यामध्ये प्रामुख्याने बृहद्रीश्वर मंदिर, तंजावर (राजराजा संग्रहालय), श्रीरंगम मंदिर संग्रहालय, मिनाक्षी-सुंदरेश्वर मंदिर संग्रहालय मदुराई, फोर्ट जॉर्ज म्युझियम मद्रास, सेंट्रल शिख म्युझियम अमृतसर, बिर्ला टपल म्युझियम भोपाळ, श्री वेंकटेश्वरा म्युझियम तिरूपती, दिंगबर जैन म्युझियम सोंगिर आणि गणेश मूर्ती संग्रहालय सारसबाग, पुणे. इत्यादीचा समावेश होतो.

**९) सृष्टीविज्ञान वस्तुसंग्रहालय :**

प्राणी, वनस्पती, भूगर्भ रचना, भूस्तर, भूकंप आदी नैसर्गिक हुबेहूब देखाव्यातून दर्शन घडवण्याच्या हेतूने उत्कृष्ठ आभासचित्राच्या माध्यमातून सृष्टी विज्ञान वस्तुसंग्रहालये स्थापन केली जातात. अशी सृष्टी विज्ञानविषयक स्वतंत्र अशी दालने तसेच स्वतंत्रपणे सृष्टी विज्ञान वस्तुसंग्रहालय स्थापन केली जातात. उदा. महाराजा महाविद्यालय एर्नाकुलम, मद्रास ख्रिश्चन कॉलेज मद्रास आणि प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई इत्यादी.

**१०) वन आणि कृषी वस्तुसंग्रहालय :**

वन आणि कृषी वस्तुसंग्रहालयाच्या माध्यमातून जंगलातील दुर्मिळ बहुगुणी विविध वनस्पती, झाडांचे विविध प्रकार, वन्यजीव, पशुपक्षी व शेती उदयोगांशी निगडीत विविध उपकरणे, कृषी औजारे, कृषी बी-बियाणे, किटक प्रकार, विज्ञान तंत्रज्ञानाची जोड देवून शेती उद्योगांची प्रगती. कृषी मालांचे प्रदर्शन, विविध दालनाचे प्रदर्शन वन व कृषी प्रकाराच्या वस्तुसंग्रहालयांत प्रदर्शित केले जाते. भारतातील वन व कृषी प्रकारातील वस्तुसंग्रहालये पुढीलप्रमाणे, ग्रास फॉरेस्ट म्युझियम कोईम्बतूर, तामिळनाडू (१९०२), फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट म्युझियम, डेहराडून (१९१४), फॉरेस्ट स्कूल म्युझियम शिवपूर, म. प्रदेश (१९४६) आणि आसाम फॉरेस्ट म्युझियम, गुवाहाटी-आसाम (१९४८).

**११) सैनिक व संरक्षण वस्तुसंग्रहालय :**

जगातील प्रत्येक देशाच्या भूमीचे व संपत्तीचे संरक्षण करणे हे प्रत्येक देशाच्या सरकारबरोबरच नागरिकांचे आद्य कर्तव्य असते. प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्राचे बाह्य शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी भूदल, नौदल, हवाईदल इ. सैन्यदलाची उभारणी करून त्यांस विविध नवनवीन शस्त्रास्त्रे देश संरक्षणासाठी निर्मिती केलेली विविध साधने प्रधान करते. अशा राष्ट्र संरक्षणासाठी विकसित केलेले विविध शस्त्रास्त्रे, साधने यांच्यात झालेली प्रगती मुख्यतः सैनिक संरक्षण प्रकारच्या वस्तुसंग्रहालयाच्या माध्यमातून प्रदर्शित केली जात. अशा संग्रहालयामध्ये संरक्षण हत्याराचे विविध प्रकार, त्यात झालेला विकास व आधुनिक तंत्रज्ञानाची शस्त्रास्त्रे, विविध युध्द पध्दती प्रकाराच्या प्रतिकृती, कालबाह्य झालेले विविध यंत्रे, शस्त्रास्त्रे इ. विविध घटकांचा समोवश केला जातो. उदा. नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी म्युझियम, खडकवासला-पुणे (१९५५), एअर फोर्स म्युझियम, पालम-नवी दिल्ली (१९६०), आणि सेंट्रल पोलिस म्युझियम, नवी दिल्ली (१९९१).

**१२) विद्यापीठ महाविद्यालय व शैक्षणिक वस्तुसंग्रहालय :**

भारतामध्ये वेगवेगळ्या राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालये व शाळांमधून विद्यार्थ्यांना विविध विषयांचे वेगवेगळ्या माध्यमांचा वापर करून शिक्षण दिले जाते. प्रयोग, प्रात्यक्षिक, दृक-श्राव्य इ. साधनांचा वापर विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक संस्थांना वस्तुसंग्रहालयाची आवश्यकता असते. म्हणून अनेक शाळा महाविद्यालये तसेच विद्यापीठांनी शैक्षणिक दृष्टिकोन पुढे ठेवून वस्तुसंग्रहालयांची निर्मिती केली. उदा. झूलॉजी अॅन्ड बॉटनी म्युझियम, महाराजा कॉलेज, इरनाकुल-केरळ (१८७४), अॅर्थोपॉलॉजिकल म्युझियम, लखनऊ युनिव्हर्सिटी, उत्तर प्रदेश (१९११), आंध्र मेडिकल कॉलेज म्युझियम, विशाखापट्टणम-आंध्र प्रदेश (१९२३), मराठी हिस्ट्री म्युझियम, डेक्कन कॉलेज, पुणे-महाराष्ट्र (१९३९), जिऑलॉजी अॅन्ड जिऑग्राफी म्युझियम, पंजाब युनिर्व्हसिटी, चंदगड (१९४७), अँथ्रोपॉलॉजी म्युझियम, गुवाहाटी युनिव्हर्सिटी, आसाम (१९४८), आर्किऑलॉजिकल म्युझियम, हरी सिंह गौर युनिव्हर्सिटी सागर, मध्य प्रदेश (१९८५) आणि मंडनापल्ले कॉलेज म्युझियम, गुंठर-आंध्र प्रदेश (१९९८).

**१३) स्थापत्त्य वस्तुसंग्रहालय :**

स्थापत्त्य वस्तुसंग्रहालयामध्ये प्रामुख्याने इमारत उभारणीसाठी लागणाऱ्या वस्तू, इमारत बांधणी तंत्रे, बांधकाम तंत्रज्ञानातील प्रगती, इमारत प्रतिकृती, इमारत बांधणीसाठी वापरले जाणारे साहित्य यांचे नमुने इ. स्थापत्यशास्त्रविषयक माहिती प्रदर्शित केली जाते. भारतामध्ये राष्ट्रीय इमारती संघटन केंद्र, निर्माण भवन, नवी दिल्ली येथे स्थापत्त्य वस्तुसंग्रहालयांची निर्मिती करण्यात आली.

**१४) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय :**

राष्ट्रीय प्रकारचे वस्तुसंग्रहालय स्थापन करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य मानले जाते. भारत सरकारने दिल्ली येथे राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय निर्माण केले. कलकत्ता येथील भारतीय वस्तुसंग्रहालय व हैद्राबाद येथील सालरजंग वस्तुसंग्रहालयांस राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयांचा दर्जा दिला. राष्ट्रीय प्रकारातील वस्तुसंग्रहालये ही केंद्रशासनाच्या पुरातत्त्वीय विभागाच्या अधिपत्याखाली येत असल्यामुळे त्याचे कार्य केंद्रीय पुरातत्त्वीय विभाग यांच्या अधिपत्याखाली कार्य चालते. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयात प्रामुख्याने प्राचीन काळापासूनच ते आधुनिक काळापर्यंतची राष्ट्रीय ओळख असलेल्या विविध विद्या, कलाविषयक प्रातिनिधीक वस्तूचे संरक्षण व प्रदर्शन शास्त्रीय पध्दतीने केलेले असते.

**१५) प्रादेशिक वस्तुसंग्रहालय :**

प्रादेशिक वस्तुसंग्रहालये प्रामुख्याने प्रादेशिक विभागातील स्थानिक वैशिष्ट्यपूर्ण गोष्टीसंबंधी माहित व प्रादेशिक कला, संस्कृतीबाबत माहिती प्रदर्शित केली जाते. देखावे, हवामान, भूप्रदेश, वनस्पती, पशुपक्षी, कृषी प्रेक्षणीय, धार्मिक व ऐतिहासिक स्थळे, संस्कृती इ. माहिती प्रादेशिक प्रकारच्या वस्तुसंग्रहालयातून प्रदर्शित केली जाते. उदा. कच्छ म्युझियम भूज, गुजरात (१८७७), एस. पी. एस. गव्हर्मेंट म्युझियम श्रीनगर (१८९८), धार डिस्ट्रीक म्युझियम धार-मध्यप्रदेश (१९०२), गव्हर्मेंट म्युझियम, अलवार-राजस्थान (१९०८), स्टेट म्युझियम, जमुनाबाग-मध्य प्रदेश (१९२२), सेंट्रल म्युझियम इदोर-मध्य प्रदेश (१९२९), स्टेट म्युझियम,

भारतपूर-राजस्थान (१९३७), मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर-महाराष्ट्र (१९४५), सेंट्रल म्युझियम, भोपाळ-मध्य प्रदेश (१९४९), गया म्युझियम, गया बिहार (१९५२), ११) सेंट्रल म्युझियम, पिलानी-राजस्थान (१९५४), सेंट्रल म्युझियम, जयपूर राजस्थान (१९६०), महाराज जीवाजीराव म्युझियम, ग्वाल्हेर-मध्यप्रदेश (१९६४) आणि तुलसी संग्रहालय, सतना-मध्यप्रदेश (१९७७).

**१६) स्थानिक वस्तुसंग्रहालय :**

स्थानिक वस्तुसंग्रहालय ही त्या-त्या ठराविक भागातील पुरातन अवशेष, इतिहास, कला, शिल्प, मानववंशशास्त्र, निसर्ग इतिहास इ. प्रकारातील त्या स्थानिक प्रदेशातील वस्तूंच्या माध्यमातून त्या राज्याच्या विशिष्टतेनुसार स्थानिक संस्कृतीच्या ऐतिहासिक कला वस्तूचे जतन, संवर्धन व प्रदर्शन करण्याचे कार्य स्थानिक प्रकारच्या वस्तूसंग्रहालयाच्या माध्यमातून केले जाते. अशा प्रकारची संग्रहालये स्थानिक व जिल्हा पातळीवरती, नगरपालिका, महानगरपालिका व स्वायत्त संस्था यांच्या माध्यमातून मुंबई, अलाहाबाद, पुणे, कोल्हापूर, कलकत्ता, बडोदा, अहमदाबाद, अहमदनगर इ. ठिकाणी स्थापन झाली आहेत.

**१७) मानववंशशास्त्रीय वस्तुसंग्रहालय :**

पृथ्वीवरती मानव प्राण्यांची वर्गवारी वेगवेगळ्या वंश गटामध्ये केली जाते. प्राचीन मानववंशाचा विकास कशा पध्दतीने झाला, यांच्या अध्ययनासाठी, अभ्यासासाठी व माहितीसाठी मानववंशशास्त्रीय प्रकारातील वस्तुसंग्रहालय स्थापन केली जातात. अशा संग्रहालयामध्ये प्रामुख्याने विविध मानवी वंश प्रकार गट जीवाच्या उत्पत्तीपासून आधुनिक काळातील मानववंशात होत आलेल्या उत्क्रांती व स्थित्यंतरविषयक पुरावे, त्याचे पोषाख, आहार, वस्त्र, अलंकार, दागदागिने, शस्त्रास्त्रे, राहणीमान इ. महत्त्वपूर्ण संग्रह प्रदर्शित केलेला असतो. भारतात अशा प्रकारातील वस्तुसंग्रहालये प्रामुख्याने मद्रास, मुंबई, नागपूर, पुणे, बडोदा इ. ठिकाणी निर्माण करण्यात आली.

**१८) वैयक्तिक स्मारक वस्तुसंग्रहालय :**

थोर व्यक्तींची कार्य इतिहासाला, मानवी जीवनाला प्रेरणा देणारे ठरते. अशा व्यक्तीच्या जीवनाशी निगडीत घटना, कार्यस्थळ, जन्मस्थळ, वास्तव्य स्थळ ही मानवी समाजाला सतत प्रेरणादायी ठरतात. थोर व्यक्तीच्या कार्याची आठवण भावी पिढीस सतत राहावी व थोर व्यक्तीच्या कार्याचा आदर्श हा भावी पिढीने घ्यावा. व्यक्तीकार्याचा सन्मान व्हावा आणि थोर व्यक्तीच्या जडण-घडणीतील विविध पैलूंचे दर्शन भावी पिढीस होत राहावे व्यक्तीची स्मारके बांधली व उभारली जातात. उदा. राणा प्रताप म्युझियम, उदयपूर-राजस्थान (१८८७), व्हिक्टोरिया ज्युबली म्युझियम, विजयवाड-आंध्र प्रदेश (१८८७), वॉटसन म्युझियम, राजकोट-गुजरात (१८८८), सरदार व्ही. पटेल म्युझियम, सुरत-गुजरात (१८९०), भुरीसिंग म्युझियम, चम्भा-हिमाचल प्रदेश (१९०४), टिपू सुलतान म्युझियम, श्रीरंगपट्टणम् तामिळनाडू (१९०८), इंडियन वॉर मेमोरियन म्युझियम, नवी दिल्ली (१९१८), छोटूराम म्युझियम, संगरिया-राजस्थान (१९३७), महात्मा गांधी हिंदी संग्रहालय, काल्पी-उत्तर प्रदेश (१९५०), गांधी स्मारक संग्रहालय, नवी दिल्ली (१९५०), प्रभास पटाण म्युझियम, पाटण-गुजरात (१९५१), गांधी स्मारक संग्रहालय, साबरमती-गुजरात (१९५२), गंगा गोल्डन ज्युबली म्युझियम, बिकानेर राजस्थान (१९५४), नेताजी म्युझियम, कलकत्ता-पं. बंगाल (१९५७), रविंद्र

भारती म्युझियम, कलकत्ता-पं.बंगाल (१९६१), महाराजा फत्तेसिंह म्युझियम, बडोदा-गुजरात (१९६१), नेहरू मेमोरियल म्युझियम, नवी दिल्ली (१९६४), गांधी स्मारक संग्रहालय, आगाखान महल, पुणे-महाराष्ट्र (१९७२), महात्मा फुले स्मारक संग्रहालय, फुलेवाडा, पुणे-महाराष्ट्र (१९७२) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्युझियम ॲन्ड मेमोरियल, सिंबायोसीस सोसायटी, पुणे (१९९६) इत्यादीचा समावेश होतो.

**१९) महाराजा वस्तुसंग्रहालय :**

भारत देशास स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ५५० पेक्षा अधिक देशी संस्थानाचे विलीनीकरण भारतीय गणराज्यात केले गेले. ब्रिटिश काळात मिळणारे तनखे (पैसे) संस्थान विलीनीकरण नंतर बंद झाल्यामुळे संस्थानिकांना आर्थिक चणचण भासू लागली. आपली आर्थिक चणचण दूर करण्यासाठी काही संस्थानिकांनी आपल्या संपत्तीची व संग्रही असणाऱ्या दुर्मिळ कलाकृतींची विक्री केली. तर काही संस्थानिकांनी व त्यांच्या वारसदारानी, उत्तराधिकाऱ्यांनी आपल्या संग्रहीत असलेल्या दुर्मिळ कलाकृतीची विक्री न करता त्या वस्तूंचे संग्रहालये उभारली. अशा प्रकारच्या संग्रहालयांस 'महाराजा संग्रहालय' म्हणून ओळखली जाते. उदा. महाराज सवाई मानसिंह संग्रहालय, सिटी पॅलेस, जयपूर-राजस्थान (१९५१), महाराज म त्तेसिंग संग्रहालय, बडोदा-गुजरात (१९६१), महाराज जिवाजीराव शिंदीया संग्रहालय, ग्वाल्हेर-मध्यप्रदेश (१९६४), महाराजा बनारस विद्यामंदिर संग्रहालय, वाराणसी-उत्तर प्रदेश (१९६०) आणि श्री भवानी चित्र वस्तुसंग्रहालय, औंध-महाराष्ट्र (१९६८).

**२०) विशेष वस्तुसंग्रहालय :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विशेष वस्तुसंग्रहालये निर्माण केली गेली. अशा विशेष संग्रहालयामध्ये प्रामुख्याने, सी. बी. आय. संग्रहालय, हवाई दल संग्रहालय, राष्ट्रीय तिकीट संग्रहालये, कृषी संग्रहालय, परिवहन संग्रहालय इ. समावेश होतो. त्याचबरोबर राष्ट्रीय खेळ संग्रहालय, संरक्षण विषय संग्रहालय, व्यक्तीचित्रण संग्रहालय, ग्राम संग्रहालय, मि रते संग्रहालय अशा विविध संग्रहालयांचा समावेश विशेष प्रकारातील वस्तू संग्रहालयात होतो.

**२१) भारतातील कला संग्रहालये/कला दालने :**

कला हे मानवाच्या उत्कट भावनांचे प्रतिबिंब असून ती मौखिक अथवा लिखीत स्वरूपात अस्तित्वात अथवा प्रतीत होते. भारतामध्ये कला व कलेवर प्रेम करणाऱ्या कलाकारांची मोठी परंपरा लाभलेली आहे. आधुनिक काळात कलाक्षेत्राविषयी स्वंतत्र अभ्यास व प्राचीन परंपरा प्रतीत करणारी व प्राचीन इतिहासविषयी प्रमुख माहिती साधन म्हणून कार्य करणारी कलाविशेष साधने आज विविध कला दालनांत ठेवण्यात आलेली आहेत. भारतामध्ये प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन इतिहासावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण असून भूतकाळांतील संबंधित कला आधुनिक कलाकारांना कलेविषयी प्राचीन परंपरा व मार्गदर्शन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. कला दालनांतील वस्तू अथवा चित्रे भलेही निर्जीव असले तरी इतिहासकारांनी वास्तविक बोलत असतांस परंतु त्यासाठी काय? कसे? कोठे? कशासाठी? का? इ. प्रश्नांचा भडीमार त्या वस्तूला इतिहासकाराकरवी केल्याशिवाय त्यातून इतिहास प्रतीत होऊ शकत नाही. कला ही तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक विचारांना प्रतिबिंबीत करण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम असलेले आढळते. परिणामी इतिहासाला समजून घेण्यासाठी अत्यंत मुलभूत कामगिरी बजावते. भारतातील कला

दालनांची सुरुवात ब्रिटीश कालखंडात झालेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात विविध कला दालने अस्तित्वात आली. उदा.

**१) ॲकडमी ऑफ फाईन आर्टस्, कोलकत्ता :**

सन १९३३ मध्ये हे कला दालन अस्तित्वात आले असून भारतातील महत्त्वपूर्ण आहे. नामवंत कलाकार व परदेशातील कलाकारांचे कलाअविष्कार या दालनांत प्रदर्शित होतात, कला दालनामध्ये रविंद्रनाथ टागोर कृत 'गर्ल विथ अ पिचर' व 'अ विन्टरस इव्हिनिंग' इ. पेंटींग्ज असून त्याचबरोबर जामिनी रॉय, एम. एम. हुसेन, नंदलाल बोस यांच्यादेखील विविध पेंटींग्ज जतन करून ठेवल्या आहेत.

**२) शासकीय वस्तुसंग्रहालय व कला दालन, छत्तीसगड :**

कला दालन सार्वजनिकपणे १९६८ मध्ये करण्यात आले असून यांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये शिल्पाकृती विभाग, पेंटींग्ज विभाग, वास्तुशैली विभाग असे एकूण ३ विभाग स्वतंत्र असून प्रत्येक विभाग प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक व समकालीन इतिहासांची माहिती प्रदर्शित आहे. या शासकीय कलादालनांतील प्रमख विभाग पेंटींग असून त्यामध्ये तत्कालीन काळातील प्रसिध्द चित्रकार राजा रवि वर्मा, अमृता शेटगील, जामिनी रॉय, रविंद्रनाथ टागोर, नंदलाल बोस, अबानिंद्रनाथ टागोर इ.च्या कलाकृती जतन करण्यात आलेल्या आहेत.

**३) शासकीय वस्तुसंग्रहालय, चेन्नई :**

या संग्रहालयांस मद्रास संग्रहालय असे देखील संबोधले जाते. भारतातील सर्वात जुने असणारे द्वितीय क्रमांकाचे वस्तुसंग्रहालय असून सन १८५१ मध्ये स्थापन करण्यात आले, यांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्रसिध्द फुटबॉलपटूच्या भेटीच्या शिल्पाकृती यामध्ये आढळतात. त्याचबरोबर राजा रवि वर्मा यांच्या चित्रकृती, तंजावर, मुघल, मुघल व समकालीन पेंटींग्ज यामध्ये संविर्धत करण्यात आलेल्या आहेत.

**४) भारतीय वस्तुसंग्रहालय, कोलकत्ता :**

सन १८१४ मध्ये हे संग्रहालय स्थापन करण्यात आलेले असून यांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे भारतांच्या चित्राकृतीचा इतिहास जतन करण्यात आला आहे. हे वस्तुसंग्रहालय ६ विभागात विभाजीत असून त्यामध्ये कलादालनाचे ४ विभागांत स्वतंत्र विभाजन करण्यांत आलेले आहे. कलादालनामध्ये मुघल पेंटींग, बेंगाल पेटींग, सजावट कलाकृती, वस्तू कलाकृती व साऊथ ईस्ट आशियन गॅलरी इ. समावेश असून अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**५) जहाँगिर आर्ट गॅलरी, मुंबई :**

जहाँगीर आर्ट गॅलरी सन १९५२ मध्ये स्थापन झालेले असून हे खाजगी कला दालन आहे. यामध्ये प्रसिद्ध भारतीय चित्रकार जामिनी रॉय ते अर्पिता सिंग इ. कलाकारांच्या कलाकृतीचे जतन करण्यात आलेले आहे. देशातील व परदेशातील नामवंत कलाकारांच्या कलाकृतीचे प्रदर्शन आजतागायत या ठिकाणी भरविले जाते. जहाँगीर आर्ट गॅलरी, मुंबई ही सर्वाधिक लोकप्रिय आर्ट गॅलरी असून कला प्रेमींसाठी अत्यंत माहिती देणारे संग्रहालय आहे.

**६) नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, बंगलोर :**

भारतातील नवे कला दालन असून यांचे उद्घाटन सन २००९ मध्ये बंगलोर मध्ये झाले. या कला दालनामध्ये ५०० पेंटींग्ज असून त्यामध्ये पारंपारिक ते आधुनिक कलाकृतींचा समावेश आहे. यामध्ये राजा रवि वर्मा अमरीता शेरगील, जामिनी रॉय यांच्या चित्रकलाकृतीचे जतन करण्यात आलेले असून त्याची कालानुक्रमे मांडणी कला दालनामध्ये करण्यात आलेली आहे.

**७) नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, मुंबई :**

हे कला दालन १९९६ मध्ये लोकांसाठी सार्वजनिक करण्यात आले असून यामध्ये वेगवेगळ्या नामवंत कलाकारांच्या कलाकृती, शिल्पाकृती, वास्तुकृती आणि विविध संस्कृत्यांच्या चित्राकृती जतन करण्यात आलेल्या आहेत. हे कला दालन कुलाबा या ठिकाणी स्थित आहे.

**८) नॅशनल गॅलरी ऑफ आर्ट, न्यू दिल्ली :**

भारतीय सांस्कृतिक मंत्रालयम द्वारे २९ मार्च १९५४ रोजी दिल्ली येथील जहाँगिर हाऊसमध्ये कलादालन स्थापन करण्यात आले. देशातील व परदेशातील विविध कलाकारांच्या माध्यमातून तयार केलेल्या सुमारे १४००० पेंटींग्जचे कला दालन उभारलेले असून त्यामध्ये नामवंत चित्रकार थॉमस डॅनियल, राजा रवि वर्मा, जामिनी रॉय, अमृता शेर गिल यांच्या चित्राकृतीचा समावेश होतो. हे जगातील सर्वाधिक माठ कला दालन आहे. या कला दालनामध्ये १९५७ च्या उठावांच्या कलाकृती संवर्धित केलेल्या असून आधुनिक कालखंडापर्यंत विविध कलाकृतींचे प्रदर्शन या ठिकाणी करण्यात आलेले आहे.

**९) नॅशनल म्युझियम, न्यु दिल्ली :**

सन १९४९ मध्ये हे वस्तुसंग्रहालय अस्तित्वात आले. यामध्ये भारतातील सर्वात जुन्या कलाकृती संवर्धित व जतन करण्यात आलेल्या आहेत. या कलादालनामध्ये मुघल, राजस्थानी, शिख, डेक्कन, काश्मीरी चित्रकारांच्या चित्राकृती असलेल्या आढळतात. इ. स. १० वे शतक ते २० च्या शतकापर्यंतच्या विविध कलाकृती यामध्ये असलेल्या आढळतात.

**१०) व्हिक्टोरिया मेमोरियल कोलकत्ता :**

व्हिक्टोरिया मेमोरियल कोलकत्ता हे कलादालन सन १९२१ मध्ये सार्वजनिक स्वरूपांत सुरू करण्यात आले. यामध्ये विभिन्न कला दालन असून त्यामध्ये भारतीय, परदेशी पेंटींग्ज, कलकत्ता गॅलरी, रॉयल गॅलरी, भारतीय पेटींग्ज असे स्वतंत्र विभाग कलादालनांचे असलेले आढळतात. रॉयल गॅलरी ही व्हिक्टोरिया राणीला अर्पित करण्यात आली असून परदेशी नामवंत चित्रकार चार्लस डॉयली, जॉन झॉफनी, विल्यम हेजस, विल्यम सिम्पसन इ. चित्र कलाकृती संवर्धित व जतन करण्यात आलेल्या आहेत.

**११) आकृती आर्ट गॅलरी :**

आकृती आर्ट गॅलरी ही भारतीय आधुनिक ऑर्ट गॅलरी असून ती कोलकत्ता व न्यु दिल्ली या दोन भागातून चालविली जाते. यामध्ये पेंटींग्ज, शिल्पाकृती, प्रिंटमेकींग्ज, व्हिडिओ आर्ट. या माध्यमातून प्रदर्शित

केले जाते. कलाप्रेमींसाठी ऑनलाईन स्वरूपांत एखादी कलाकृती विकत घेण्याची परवानगी असून ती केवळ ऑनलाईनच खरेदी करता येते. याचा प्रमुख उपदेश प्रमुख समकालीन कलाकृतीना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवणे असा आहे.

**१२) जवाहरलाल कला केंद्र, जयपूर :**

जवाहरलाल कला केंद्रांच्या विविध शाखा असून ३ जयपूर या ठिकाणी स्थित आहे. यांची बांधणी राजस्थान सरकारद्वारा करण्यात आलेली असून त्यामागचा प्रमुख उद्देश राजस्थानी कला व हस्तकौशल्य कारागिरी संवर्धित व जतन करणे होय.

**ब) वस्तुसंग्रहालयांचे कार्य :**

वस्तुसंग्रहालये केवळ ऐतिहासिक वस्तूंचे प्रदर्शन करणारी ठिकाणे नाहीत, तर ती समाजाच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांच्या कार्यपद्धतीचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येते–

**१) संग्रह आणि संवर्धन :**

संग्रह आणि संवर्धन हे वस्तुसंग्रहालये आणि सांस्कृतिक संस्थांच्या कार्यामध्ये महत्त्वाचे घटक आहेत. ऐतिहासिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या वस्तू गोळा करणे आणि त्यांचे योग्य प्रकारे संवर्धन करणे आवश्यक आहे, जेणेकरून त्या वस्तू भविष्यातही जतन राहतील आणि त्यांचा अभ्यास केला जाऊ शकतो.

**२) संग्रह :**

प्रक्रियेत विविध प्रकारच्या ऐतिहासिक वस्तूंचे संकलन केले जाते. यामध्ये पुराणकाळातील शिलालेख, हस्तलिखिते, चित्रकला, शिल्पकला, पुरातत्त्वीय अवशेष, तसेच वैज्ञानिक महत्त्व असलेल्या उपकरणांचा समावेश होतो. या वस्तू संग्रहित केल्यावर त्यांचा अभ्यास, शोधनिर्मिती आणि प्रदर्शने करण्यात मदत होते.

**३) संवर्धन :**

प्रक्रियेत वस्तूंच्या स्थितीचे बारकाईने निरीक्षण केले जाते आणि त्यांची संरक्षणासाठी आवश्यक पद्धती वापरली जातात. नाजूक आणि दुर्मिळ वस्तू जसे की हस्तलिखिते, चित्रे आणि शिल्पे विशेष काळजी घेऊन जतन केली जातात. तंत्रज्ञानाच्या मदतीने वस्तूंचे डिटेल्ड रेकॉर्ड तयार केले जाते, त्यांना नियंत्रित वातावरणात ठेवले जाते आणि कोणत्याही प्रकारच्या हानीपासून बचाव केला जातो. संग्रह आणि संवर्धनामुळे नंतरच्या पिढ्यांसाठी त्या वस्तूंचा इतिहास सुरक्षित राहतो आणि त्यावर आधारित अभ्यासही केला जाऊ शकतो, ज्यामुळे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ज्ञानाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचतो.

**४) प्रदर्शन :**

हे वस्तुसंग्रहालयांचे एक महत्त्वाचे कार्य आहे, ज्याद्वारे विविध ऐतिहासिक आणि वैज्ञानिक महत्त्वाच्या वस्तू लोकांसमोर सादर केली जातात. या प्रदर्शने लोकांना इतिहास, विज्ञान आणि संस्कृतीच्या महत्त्वाच्या पैलूंशी जोडतात. प्रदर्शने केवळ वस्तूंचे प्रदर्शन नाही, तर त्या वस्तूंच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक संदर्भाची माहितीही दिली जाते. प्रदर्शनाद्वारे लोकांना एखाद्या विशिष्ट काळ, क्षेत्र किंवा घटनेविषयी सखोल

माहिती मिळते. उदाहरणार्थ, प्राचीन शिलालेख, मूर्तिकला, हस्तलिखिते, पुरातत्त्वीय अवशेष आणि वैज्ञानिक उपकरणे प्रदर्शित केली जातात. यामुळे जनतेला या वस्तूंचा महत्त्व आणि त्यांचे ऐतिहासिक, सांस्कृतिक, आणि वैज्ञानिक मूल्य समजते. प्रदर्शन केवळ ज्ञानाचा प्रसार करत नाही, तर ते सांस्कृतिक संवर्धनासाठी महत्त्वाचे ठरते. ते विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना प्रेरणा देतात, तसेच सामान्य लोकांसाठीही शिक्षणाचे एक साधन बनतात. विविध प्रदर्शने आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील आयोजित केली जातात, ज्यामुळे सांस्कृतिक आणि वैज्ञानिक आदानप्रदानाची संधी मिळते आणि जागतिक समुदायात संवाद वाढतो.

**५) शिक्षण :**

हे वस्तुसंग्रहालयांचे आणखी एक अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. विद्यार्थ्यांना, अभ्यासकांना आणि सर्व लोकांना ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक ज्ञान मिळावे यासाठी संग्रहालये विविध प्रकारचे विशेष प्रदर्शन आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करतात. या कार्यक्रमांद्वारे विद्यार्थी आणि अभ्यासक यांना वस्तूंचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याची संधी मिळते, ज्यामुळे ते सखोल आणि सजीव ज्ञान मिळवू शकतात. संग्रहालये कार्यशाळा, सेमिनार्स, व्याख्याने आणि विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करतात. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहास, कला, विज्ञान आणि संस्कृतीबद्दल जास्त गती मिळते आणि त्यांचा अभ्यास अधिक आकर्षक बनतो.

शैक्षणिक कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या उत्सुकतेला उत्तेजन देतात आणि त्यांना प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे ज्ञान प्राप्त करण्याची संधी मिळवतात. संग्रहालये विद्यार्थ्यांना जिज्ञासू बनवण्यासाठी इंटरेक्टिव्ह तंत्रज्ञान, शैक्षणिक साहित्य आणि डिजिटल साधनांचा वापर करतात. यामुळे त्यांना केवळ माहिती मिळत नाही, तर त्या ज्ञानाचा उपयोग त्यांच्याच क्षेत्रात कसा होईल, हे समजते. या शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना ऐतिहासिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो, तसेच त्यांच्या सामान्य ज्ञानाची वाढ होते.

**६) संशोधन :**

हे वस्तुसंग्रहालयांचे एक अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे, जे ऐतिहासिक आणि वैज्ञानिक अध्ययनासाठी संशोधकांना आवश्यक साधने उपलब्ध करून देते. संग्रहालये या प्रकारच्या संशोधनासाठी महत्त्वाचे केंद्र बनतात, कारण त्यांच्याकडे दुर्मिळ आणि ऐतिहासिक वस्तू असतात, ज्यांचा अभ्यास करून संशोधक इतिहास, विज्ञान, संस्कृती आणि इतर शास्त्रांमध्ये नवीन माहिती शोधू शकतात. संशोधनासाठी संग्रहालये विविध साधने आणि संसाधने पुरवतात. त्यामध्ये ऐतिहासिक वस्तू, शिलालेख, चित्रे, शास्त्रीय उपकरणे, तसेच इतर अनेक प्राचीन नमुने समाविष्ट असतात. संशोधकांना या वस्तूंचा प्रत्यक्ष निरीक्षण करून, त्या वस्तूंवरील डेटा संकलित करण्याची आणि विविध सिद्धांतांची पडताळणी करण्याची संधी मिळते. यामुळे त्यांच्या अध्ययनाची गुणवत्ता आणि सखोलता वाढते. याशिवाय, संग्रहालये संशोधकांना ग्रंथालये, डिजिटल आर्काइव्हस, इतर संदर्भ साहित्य आणि तज्ञ मार्गदर्शनही उपलब्ध करतात. संशोधन केंद्र आणि कार्यशाळांचे आयोजन करून, संशोधकांना त्यांच्या अध्ययनासाठी आवश्यक सर्व साधनांचा वापर करून, अधिक प्रभावीपणे ज्ञान मिळवण्याची संधी दिली जाते. यामुळे केवळ इतिहासाच्या वस्तूंची माहिती मिळत नाही, तर त्या वस्तूंच्या संदर्भात नवीन संशोधन आणि साक्षात्कारही होतो.

**७) मनोरंजन :**

हा वस्तुसंग्रहालयाचा एक महत्त्वाचा घटक आहे, जो पर्यटकांना शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक अनुभव देण्यावर लक्ष केंद्रित करतो. संग्रहालये केवळ ऐतिहासिक आणि वैज्ञानिक माहितीच देत नाहीत, तर त्या माहितीला आकर्षक आणि उत्साही पद्धतीने सादर करून, पर्यटकांना एक दिलचस्प आणि मनोरंजनपूर्ण अनुभव प्रदान करतात. मनोरंजनात्मक अनुभवांची निर्मिती करण्यासाठी, संग्रहालये इंटरेक्टिव्ह तंत्रज्ञानाचा वापर करतात, जसे की 3D प्रदर्शने, व्हर्च्युअल रिअलिटी (VR), ऑडिओ-व्हिज्युअल शो आणि गेमिफिकेशन तंत्र. यामुळे लोकांचा सहभाग वाढतो आणि ते केवळ माहितीच मिळवत नाहीत, तर त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतात. उदा. पुराणकाळातील दृश्यमान चित्रपट किंवा 3D मॉडेल्सद्वारे ऐतिहासिक घटनेकडे अधिक रंगीबेरंगी दृष्टिकोनात पाहता येतो. तसेच, संग्रहालये विशेष कार्यशाळा, संगीत व नृत्य प्रदर्शने, कला प्रदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतात, ज्यामुळे पर्यटकांसाठी एक समृद्ध, आकर्षक आणि आनंददायक अनुभव तयार होतो. यामुळे मनोरंजन आणि शिक्षण यांचा योग्य समतोल साधला जातो, ज्यामुळे पर्यटकांना एकत्रित अनुभव मिळतो आणि ते संग्रहालयात अधिक वेळ घालवतात.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ :**

**बहूपर्यायी प्रश्न :**

१) १९ व्या शतकात भारतात वस्तुसंग्रहालयांचे कोणते प्रकार अस्तित्वात होते?

अ) विज्ञान, तंत्रज्ञान आणि औद्योगिक ब) ऐतिहासिक, कला आणि स्थळीय

क) वैद्यकीय, बाल आणि सैनिक ड) वन, कृषी आणि मानववंशशास्त्रीय

२) पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालयात प्रामुख्याने कोणत्या वस्तूंचा समावेश होतो?

अ) तैलचित्रे आणि शस्त्रास्त्रे ब) दुर्मिळ वनस्पती आणि वन्यजीव

क) अश्मयुगीन दगडी हत्यारे, मातीची भांडी आणि शिलालेख

ड) आधुनिक तंत्रज्ञानाची उपकरणे

३) खालीलपैकी कोणते वस्तुसंग्रहालय 'कला वस्तुसंग्रहालय' या प्रकारात मोडते?

अ) नॅचरल हिस्ट्री म्युझियम, दार्जिलिंग ब) विजयवाडा विज्ञान केंद्र

क) जहांगीर आर्ट गॅलरी, मुंबई ड) महात्मा फुले औद्योगिक वस्तुसंग्रहालय, पुणे

४) 'ॲप्लीकेशन ऑफ सायन्स'चे दिग्दर्शन कोणत्या प्रकारच्या वस्तुसंग्रहालयात केले जाते?

अ) कला वस्तुसंग्रहालय ब) सृष्टीविज्ञान वस्तुसंग्रहालय

क) औद्योगिक वस्तुसंग्रहालय ड) वैद्यकीय वस्तुसंग्रहालय

५) बाल वस्तुसंग्रहालये स्थापन करण्यामागचा मुख्य उद्देश काय आहे?

अ) फक्त ऐतिहासिक वस्तू जतन करणे

ब) लहान मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना ज्ञानवृद्धी, बौद्धिक आकलन आणि संस्कार प्रदान करणे

क) केवळ मनोरंजन उपलब्ध करून देणे  ड) वैज्ञानिक संशोधनाला प्रोत्साहन देणे

६) बृहद्रीश्वर मंदिर, तंजावर हे कोणत्या प्रकारच्या वस्तुसंग्रहालयाचे उदाहरण आहे?

अ) ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय  ब) मंदिर वस्तुसंग्रहालय

क) सृष्टीविज्ञान वस्तुसंग्रहालय  ड) वैयक्तिक स्मारक वस्तुसंग्रहालय

७) वस्तुसंग्रहालयाचे कोणते कार्य लोकांना इतिहास, विज्ञान आणि संस्कृतीच्या महत्त्वाच्या पैलूंशी जोडते?

अ) संग्रह  ब) संवर्धन  क) प्रदर्शन  ड) संशोधन

८) भारतातील पहिले 'भारतीय वस्तुसंग्रहालय' कलकत्ता येथे स्थापन करणारे ब्रिटिश संस्थेचे नाव काय होते?

अ) रॉयल एशियाटिक सोसायटी

ब) ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल

क) भारतीय पुरातत्वीय संरक्षण संस्था  ड) व्हिक्टोरिया अँण्ड अल्बर्ड सोसायटी

९) 'आकृती आर्ट गॅलरी'चे प्रमुख उद्दीष्ट काय आहे?

अ) केवळ प्राचीन कलाकृतींचे प्रदर्शन करणे

ब) प्रमुख समकालीन कलाकृतींना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे

क) आंतरराष्ट्रीय कलाकारांच्या कलाकृती विकत घेणे

ड) ऐतिहासिक वस्तूंचे जतन करणे

१०) महाराजा वस्तुसंग्रहालये कशामुळे अस्तित्वात आली?

अ) ब्रिटिशांच्या राजवटीमुळे

ब) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संस्थानांनी आपल्या संग्रही असलेल्या दुर्मिळ कलाकृतींची विक्री न करता त्यांची संग्रहालये उभारल्यामुळे

क) केवळ नवीन कलाकृती प्रदर्शित करण्यासाठी

ड) सरकारी अनुदानामुळे

### १.२.३ वस्तुसंग्रहालयांचे महत्व :

मानवी जीवनात वस्तुसंग्रहालयास ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक दृष्टिकोणातून अनन्यसाधारण महत्त्व असून आजच्या माहिती तंत्रज्ञान युगात याचे महत्त्व वाढीस लागलेले आहे. वस्तुसंग्रहालय एक प्रकारचा आरसा आहे की, ज्यामध्ये मानवी जीवनाच्या विविध अंगांचे प्रतिबिंब पडते आणि म्हणूनच

बॅनर्जी ए. आर. यांनी आपल्या 'द म्युझियम ॲण्ड द एज्युकेशन सिस्टीम' या लेखात सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक भूमिकेच्या पलिकडे जाऊन एका आढळ स्फूर्ती केंद्राचा उल्लेख केला आहे. राष्ट्राच्या दृष्टीने संस्कृती फार महत्त्वाची असते. राजकीय व्यक्ती किंवा सामान्य व्यक्ती काळाच्या ओघात नष्ट होतात, परंतु सांस्कृतिक जडण – घडण चालूच असते. ही सांस्कृतिक जडण – घडण जतन व संवर्धन करण्याचे कार्य वस्तुसंग्रहालये पार पाडतात. संग्रहालयाची भूमिका अधोरेखीत करताना बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड नमूद करतात. कोणत्याही देशाच्या संस्कृतीची किंमत जर आपल्याला अजमावयाची असेल तर त्या देशातील ललित कलाकडे आपण लक्ष द्यावे. संगीत, शिल्पकला, चित्रकला आदि गोष्टी राष्ट्राच्या संस्कृतीची चिन्हे आहेत व त्यांच्यापासून राष्ट्राला प्रकाश व चैतन्य प्राप्त होते. आणि हे कार्य वस्तुसंग्रहालयांच्या माध्यमातून होते. वस्तुसंग्रहालये नसती तर प्रा. आर्थर मार्विक यांनी वर्णन केल्याप्रमाणे ज्या राष्ट्राला आपला इतिहास माहित नसतो अशा राष्ट्राची स्थिती स्मृतिभ्रंश झालेल्या माणसासारखी होते.

वस्तुसंग्रहालयांच्या माध्यमातून मानवाच्या कष्ट साध्य प्रगतीचा आलेख प्राप्त होत असल्याने वस्तुसंग्रहालय हे भावी पिढीला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारी ज्योत आहे. श्री राजा केळकर वस्तुसंग्रहालयांचे महत्त्व विषद करताना म्हणतात, ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय राष्ट्राचे सांस्कृतिक धन आहे, गत जीवनाचा वैभवशाली वारसा आहे. अशा या अविस्मरणीय स्मृतिरेखा आणि मंगल चिन्हे जतन करून ठेवणे आपले पवित्र कर्तव्य आहे. याच दृष्टिकोणातून त्यांनी केळकर वस्तुसंग्रहालयाची निर्मिती केली. इतिहासलेखनात वस्तुसंग्रहालयास साधनात्मक महत्त्व आहे. इतिहासाचे पूर्वीच स्वरुप मर्यादित होते. परंपरागत इतिहासकार समाजाचा एकजिनसीपणा, एकसारखेपणा गृहीत धरून भूतकाळाच्या सहाय्याने वर्तमान काळापासून जाणून घेण्याचा प्रयत्न करत होता. मात्र २१ व्या शतकात इतिहासातील संकल्पनात बदल आल्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून इतिहास जसा घटला तसा जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे वस्तुसंग्रहालयांचे महत्त्व वाढले आहे.

आधुनिक फ्रेंच तत्वज्ञ अन्तोनिओ ग्रामशीच्या (१८९१-१९३७) तळागाळातल्यांचा इतिहास (History from Below) या इतिहासाच्या बदलत्या संकल्पनेने इतिहासाला नवे रुप दिले आणि सर्वागिण इतिहासांचे (History in totality) स्वरुप जगापुढे ठेवले. अगदी दैनंदिन व्यवहार, पेहराव ते खाद्यपदार्थापर्यंत सर्वाना इतिहास लेखनात समाविष्ठ करून घेता आले पाहिजे असा प्रवाह सुरु केला. म्हणजेच स्थानिक इतिहासापासून ते सांस्कृतिक इतिहासाला महत्त्व दिले. फ्रेंचविदूषी व्हॅलरी स्टील आपल्या "Paris Fashion" या ग्रंथात सांस्कृतिक इतिहासाविषयी असे नमूद करतात की, Fashion Culture is not the same as Fashion. It involves new social values, new farms of communications, ultimately new values and new attitudes. समाज एकजिनसी नाही, एकसारखा नाही, त्यात विविधता आहे हे ग्राह्य माणून नव इतिहासकार वर्तमानकालीन वास्तवाच्या आधारे भूतकाळ उलगडून दाखविण्याचा प्रयत्न करतो. सर्वसाधारण लोक, वर्ग, जात, टोळ्या, गट आणि इतर सर्व लोक, लोक-समुदाय ज्यांची परंपरागत इतिहासाने नोंद (लिखित स्वरुपात) इतिहासात सर्वार्थाने दुर्लक्षित राहिली आहे. या सर्व तत्सम वार्णींच्या अभ्यासाचा आणि संशोधनाचा अंतर्भाव नव इतिहासात होतो. त्यामुळे हा इतिहास भौतिक व मौखिक साधनांचा आधार घेऊन लिहिला जाऊ शकतो. यामध्ये भौतिकसाधने महत्त्वाची आहेत.

इतिहासलेखन कागदपत्राशिवाय करता येत नाही हे जरी खरे असले तरी इतिहास लेखन करताना कागदपत्रांच्यामध्ये ज्या मोकळ्या जागा राहतात त्या भरून काढण्याचे काम भौतिक (पुरातत्वीय) व मौखिक साधने करतात. भौतिक साधनामध्ये भांडी, शिल्पाकृती, अलंकार, बांगड्या, पोषाख, खापराचे तुकडे व इतर अनेक पुरातत्वीय साधने तत्कालिन समाज व सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकण्यास मदत करतात. या सर्व वस्तू जतन व संवर्धन करण्याचे कार्य वस्तुसंग्रहालयातून होते, त्यासाठी वस्तुसंग्रहालये महत्त्व आहे. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्या मते, कोणत्याही सुसंस्कृत राष्ट्राच्या रित्राचा सांगोपांग विचार करावयाचा म्हटला म्हणजे तो अनेक दृष्टीने केला पाहिजे. धर्म, नीती, विद्या, समाज, व्यापार, कृषी, कलाकौशल्य, कायदेकानून, राजकारण व तत्सिद्यर्थ केलेल्या अंत:स्थ व बहिःस्थ खटपटी इतक्या सर्वांच्या प्रगतीचा किंवा निर्गतीचा कालक्रमाने तथाकथित, बांधेसूद, पद्धतशीर व सप्रमाण विचार केला जाऊन तो पुन्हा आत्मिक व भौतिकरित्या झाला म्हणजे राष्ट्राचे चरित्र समन कळले असे होते.

विश्वासाहर्त साधनाच्या शिवाय इतिहासलेखन अशक्य आहे यासंदर्भात अनेक महत्त्वाच्या साधनांचे संवर्धन व जोपासणा झाल्यामुळे इतिहास लेखनात एक साधन म्हणून महत्त्व आहे. अभ्यासात वस्तुसंग्रहालयांचे महत्त्व विषद करताना डॉ. श्री. व्यं, केतकर असे नमूद करतात की, आजच्या उपलब्ध ग्राह्य वस्तूचे व्यवस्थित संग्रहण व अभ्यास झाला पाहिजे. प्राकृतापासून संस्कृत व संस्कृतापासून प्राकृत, त्याचप्रमाणे ग्राम्य वस्तूपासून नागर वस्तू आणि नागर वस्तूपासून पुन्हा त्यांच्या ग्राम्य प्रतिकृती या क्रिया भांडी, उपकरणे, गृहरचना, वेश या सर्वामध्ये पाहावयास सापडतील. जे मूळ प्राकृत आहे त्याच्या संस्कृत रुपांतरावरून प्राकृत ग्रंथ पुन्हा तयार होण्याची प्रक्रिया झालेली आहे. संस्कृत व प्राकृत वाङ्मयाचा संयुक्त अभ्यास झाला पाहिजे. त्याचप्रमाणे नागर आणि चित्रकला यांचा अभ्यास होण्यासाठी वस्तुसंग्रहालयास महत्त्व आहे.

**वस्तुसंग्रहालयांचे शैक्षणिक महत्त्व :**

मनुष्याला आपल्या अंगच्या कला, अभिरुची वाढविण्यासाठी व लेखक, कवी, कलाकार व शास्त्रज्ञ इ. व्यक्तीना आपल्या विषयाची आवड, व्याप्ती आणि संशोधन वृत्ती व्यापक करण्यासाठी वस्तुसंग्रहालये परिणामकारक साधन आहे. याशिवाय संग्रहालयातून कलेचा इतिहास कळतो. याच्या माध्यमातून शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दृकश्राव्य स्वरुपात शिक्षण मिळते. त्यामुळे संग्रहालय ही सरळ शिक्षण देणारी एक संस्थाच आहे. प्रदर्शित केलेल्या वस्तू आणि भेट देणाऱ्या व्यक्तीत एक प्रकारे संवाद साधण्याचे कार्य होते. यांच्या माध्यमातून प्रेक्षकांचे/पर्यटकांचे मनोरंजन, विद्यार्थ्यांचे कुतुहल व जिज्ञासा वाढीस लागण्यास मदत होते. शिक्षण प्रभावी व परिणामकारक करण्यासाठी स्वाध्याय पद्धत ही सर्वात चांगली पद्धत आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना देण्याचे महत्त्वाचे कार्य शिक्षकाला करावे लागते. त्यांच्या आशा-आकांक्षा विस्तारित करण्यासाठी नेहमीच्या पद्धतीपेक्षा वेगळा मार्ग, विविध पद्धतीतून शिक्षणाची प्रगती करावी लागते. यामध्ये वस्तुसंग्रहालये विशेष उपयोगी ठरत आहेत. संग्रहालयाच्या शैक्षणिक महत्त्वाविषयी तत्कालिन मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळ गंगाधर खेर यांनी नमूद केले आहे की, पूर्वी वस्तुसंग्रहालय म्हणजे प्राचीन अवशेष राखून ठेवणारी व ज्यामध्ये विद्वान शास्त्रज्ञांनाच रस आहे व त्या वस्तूची मांडणी शास्त्रीय पद्धतीने झाली आहे अशी वास्तू होती. परंतु आधुनिक वस्तुसंग्रहालय म्हणजे शिक्षण देणारी एक संस्थाच आहे. वस्तुसंग्रहालय म्हणजे विद्यापीठच होय की, ज्याच्यामार्फत विद्यादानाचे कार्य केले जाते. वस्तुसंग्रहालयांचे महत्त्व विविध दृष्टीकोनांमध्ये विचारले जाऊ

शकते. मानवाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक, शैक्षणिक, आणि मनोरंजनात्मक जीवनात त्याचे अनन्यसाधारण स्थान आहे. त्याच्या महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे मांडता येतील:

**१) ऐतिहासिक महत्त्व :** वस्तुसंग्रहालय मानवी जीवनाच्या ऐतिहासिक विकासाचे आरसा आहेत. त्यामधून भूतकाळातील घटनांचे आणि संस्कृतीचे प्रतिबिंब दिसते. वस्तुसंग्रहालये समाजाच्या सांस्कृतिक जडण-घडणीची जपणूक करतात, ज्यामुळे ती सांस्कृतिक व वारसा मूल्ये भविष्यातील पिढ्यांसाठी जतन होतात. श्री राजा केळकर वस्तुसंग्रहालयासारखी वस्तूंची संरक्षित करणे आणि त्या माध्यमातून इतिहास शिकवणे हे महत्त्वाचे आहे. यामुळे आपल्याला इतिहासाची विविध अंगे आणि त्याच्या बदलांवर दृष्टिकोन मिळतो.

**२) संस्कृतिक महत्त्व :** वस्तुसंग्रहालये राष्ट्राच्या संस्कृतीचे प्रतीक आहेत. बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या मते, ललित कला, शिल्पकला, चित्रकला या माध्यमातून राष्ट्राची संस्कृती जपली जाते. यामुळे राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक अस्मिता दृढ होते. याचे उदाहरण म्हणजे वस्तूसंग्रहालयातील विविध कलाकृती, ज्या संस्कृतीच्या वादळात बुडत जाऊ नयेत म्हणून संरक्षण केली जातात.

**३) शैक्षणिक महत्त्व :** वस्तुसंग्रहालये शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी एक शैक्षणिक संसाधन आहेत. त्या विद्यार्थ्यांना दृकश्राव्य रूपात इतिहास, कला आणि संस्कृती शिकवण्याचा प्रभावी साधन ठरतात. विद्यार्थ्यांना वस्तुसंग्रहालयात भेट देऊन इतिहास व कला अधिक जवळून जाणून घेता येतात. बाळ गंगाधर खेर यांच्या मते, आधुनिक वस्तुसंग्रहालय हे शिक्षण देणारी संस्था आहे, जी विदयार्थ्यांना विविध क्षेत्रांतील ज्ञान आणि तंत्रज्ञान देण्यास मदत करते.

**४) सामाजिक आणि सांस्कृतिक विकास :** वस्तुसंग्रहालये समाजातील विविध गटांच्या इतिहासाला एकसारखा दर्जा देतात. प्राचीन अवशेषांचे समावेश करून विविध समाजांच्या इतिहासाचे अध्ययन करणारा नव इतिहास दृष्टिकोन समोर येतो. यामुळे समाजातील विविधता आणि ऐतिहासिक बदल एकत्रित समजले जातात, जे समाजाचा विकास सांगणारे असतात.

**५) मनोरंजन आणि कुतूहल वाढविणे :** वस्तुसंग्रहालयांमध्ये जाऊन व्यक्तींच्या कुतूहलाची पूर्तता होते. प्रेक्षकांना इतिहास, कला, आणि संस्कृतीसंबंधी मनोरंजनात्मक रूपांतरण अनुभवायला मिळते. हे एक प्रकारे संवाद साधण्याचे माध्यम ठरते, जे समज, ज्ञान आणि कलेच्या क्षेत्रात जिज्ञासा वाढवते.

**६) वस्तूसंग्रहालयांचा सांस्कृतिक संवर्धनात्मक दृष्टीकोन :** वस्तुसंग्रहालये पुरातत्त्वीय वस्तू, शिल्पकला, बांगड्या, भांडी इत्यादी गोष्टी जतन आणि संवर्धन करतात. यामुळे त्या वेळच्या संस्कृती आणि समाजाचा अभ्यास आणि समज सुलभ होतो.

थोडक्यात, वस्तुसंग्रहालये ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक दृष्टिकोनांमध्ये महत्त्वाची भूमिका पार पडतात. त्यांचा वापर केल्याने एक वृहद आणि विस्तृत शैक्षणिक संदर्भ आणि सामाजिक संवाद वाढतो.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ :**

**बहूपर्यायी प्रश्न :**

१) मानवी जीवनात वस्तुसंग्रहालयास कोणत्या दृष्टिकोणातून अनन्यसाधारण महत्त्व आहे?

अ) केवळ आर्थिक ब) केवळ राजकीय

क) ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक

ड) केवळ वैज्ञानिक

२) कोणत्या विचारवंताने वस्तुसंग्रहालयास 'स्मृतिभ्रंश झालेल्या माणसासारखे' होण्यापासून राष्ट्राला वाचवणारे माध्यम म्हटले आहे?

अ) एम. आर. बॅनर्जी ब) महाराज सयाजीराव गायकवाड

क) प्रा. आर्थर मार्विक ड) श्री राजा केळकर

३) श्री राजा केळकर वस्तुसंग्रहालयांचे महत्त्व विषद करताना काय म्हणतात?

अ) वस्तुसंग्रहालय हे फक्त मनोरंजनाचे ठिकाण आहे

ब) ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय राष्ट्राचे सांस्कृतिक धन आहे, गत जीवनाचा वैभवशाली वारसा आहे

क) वस्तुसंग्रहालये फक्त परदेशी पर्यटकांसाठी आहेत

ड) वस्तुसंग्रहालये कालबाह्य झाली आहेत

४) आधुनिक फ्रेंच तत्वज्ञ अन्तोनिओ ग्रामशी यांच्या कोणत्या संकल्पनेने इतिहासाला नवे रूप दिले?

अ) जागतिक इतिहास ब) तळागाळातल्यांचा इतिहास

क) आर्थिक इतिहास ड) राजकीय इतिहास

५) इतिहासलेखनात कागदपत्रांच्यामध्ये राहणाऱ्या मोकळ्या जागा भरून काढण्याचे काम कोणती साधने करतात?

अ) केवळ शिलालेख ब) फक्त जुनी पुस्तके

क) भौतिक (पुरातत्वीय) व मौखिक साधने ड) सरकारी अहवाल

६) श्री. व्यं. केतकर यांच्या मते, नागर आणि चित्रकला यांचा अभ्यास होण्यासाठी कशाला महत्त्व आहे?

अ) ग्रंथालये ब) वस्तुसंग्रहालये क) अभ्यासिका ड) संशोधन केंद्रे

७) बा. गं. खेर यांच्या मते, आधुनिक वस्तुसंग्रहालय म्हणजे काय?

अ) केवळ प्राचीन अवशेष राखून ठेवणारी वास्तू

ब) शिक्षण देणारी एक संस्था

क) फक्त कलाप्रदर्शन केंद्र ड) केवळ पर्यटन स्थळ

८) वस्तुसंग्रहालये सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाची का आहेत?

अ) कारण ती फक्त मनोरंजन करतात

ब) कारण ती राष्ट्राच्या संस्कृतीचे प्रतीक आहेत आणि राष्ट्रीय एकात्मता व सांस्कृतिक अस्मिता दृढ करतात

क) कारण ती फक्त नवीन तंत्रज्ञान प्रदर्शित करतात

ड) कारण ती फक्त दुर्मिळ वस्तू विकतात

९) वस्तुसंग्रहालयांचे कोणते कार्य विद्यार्थ्यांना कुतूहल आणि जिज्ञासा वाढविण्यात मदत करते?

अ) केवळ वस्तूंचा संग्रह करणे ब) प्रदर्शनाद्वारे प्रेक्षकांशी संवाद साधणे

क) फक्त वस्तूंचे जतन करणे ड) केवळ संशोधन करणे

१०) 'द म्युझियम ॲण्ड द एज्युकेशन सिस्टीम' या लेखात एम. आर. बॅनर्जी यांनी वस्तुसंग्रहालयाचा उल्लेख कशाप्रकारे केला आहे?

अ) केवळ मनोरंजनाचे साधन ब) फक्त ऐतिहासिक स्थळ

क) सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक भूमिकेच्या पलीकडे जाऊन एका आढळ स्फूर्ती केंद्राचा

ड) केवळ पर्यटन वाढवणारी संस्था

## १.३ सारांश :

प्राचीन काळापासून मानवाने आपल्या कागदपत्राच्या व वास्तूचे जतन व संवर्धन करण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला दिसतो. भारताला प्रदीर्घ असा ऐतिहासिक-सांस्कृकि वारसा लाभलेला आहे. या ऐतिहासिक-सांस्कृतिक वारस्याकडे मात्र गांभीर्यातने न पाहिल्याने त्याचा काळाच्या ओघात विनाश घडून गेलेला दिसतो. यासाठी नैसर्गिक व मानवनिर्मित घटक कारणीभूत आहेत. भारतात ब्रिटिशांच्या आगमनानंतर या घटकांच्या जतन व संवर्धनासाठी त्यांनी जाणीवपूर्वक विशेष प्रयत्न केले. यातून भारतात भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणम खात्याची निर्मिती झाली. यांच्या माध्यमातून ऐतिहासिक कागदपत्रे, चित्रकलाकृती व स्मारकांच्या जतन व संवर्धनासाठी विविध उपाय योजला राबविल्या गेलेल्या दिसतात. २०व्या शतकात जतन व संवर्धनाच्या अनेक नवनवीन आधुनिक पद्धतीचा शोध लागल्याने नवीन तांत्रिक चिकित्सा पद्धती विकसित झालेल्या आहेत. पारंपरिक पद्धतीच्या ऐवजी वैज्ञानिक ज्ञानावर आधारीत जतन व संवर्धनाच्या नविन पद्धतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कागदपत्रे, चित्रकलाकृती व स्मारकांच्या विविध पैलूवर प्रकाश टाकून त्यांचे चिकित्सक पद्धतीने विश्लेषण करून त्यावर जतन व संवर्धनाच्या प्रक्रिया केल्या जातात. ब्रिटिशांनी सुरुवात केलेल्या या प्रयत्नांच्या म लस्वरूप अनेक स्मारकांचे जतन व संवर्धन झालेले आहे तर जो ऐतिहासिक दस्तऐवज उपलब्ध झालेला होता त्याचेही चांगल्या प्रकारे जतन झालेले दिसते.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**ॲन्टिक्विरिज :** पुरातन वस्तूंचा अभ्यास करणारे किंवा संग्रह करणारे लोक. ऐतिहासिक वस्तू, कलाकृती, हस्तलिखिते इत्यादी शोधणे, त्यांचे जतन करणे आणि त्यांचा अभ्यास करणे हे त्यांचे कार्य असते.

**विन्टरस इव्हिनिंग :** हिवाळ्यातील संध्याकाळ. याचा उपयोग सामान्यतः थंड, शांत आणि लवकर अंधार पडणाऱ्या हिवाळ्यातील सायंकाळचे वर्णन करण्यासाठी केला जातो.

**3D प्रदर्शने :** अशी प्रदर्शने जिथे वस्तू किंवा प्रतिमा त्रिमिती स्वरूपात (लांबी, रुंदी आणि उंची) सादर केल्या जातात. यामुळे दर्शकांना वस्तू अधिक वास्तववादी आणि खोलीत पाहण्याचा अनुभव मिळतो.

**व्हर्च्युअल रिअलिटी :** एक तंत्रज्ञान जे वापरकर्त्याला संगणकाद्वारे तयार केलेल्या आभासी जगात पूर्णपणे विसर्जित करते. यामध्ये विशेष हेडसेट वापरून वापरकर्ता त्या आभासी वातावरणात संवाद साधू शकतो आणि हालचाल करू शकतो, जणू काही तो तिथेच आहे.

**ऑडिओ–व्हिज्युअल :** ध्वनी (ऑडिओ) आणि दृश्य (व्हिज्युअल) या दोन्ही घटकांचा समावेश असलेले. यामध्ये चित्रमि ती, सादरीकरणे किंवा इतर मीडिया यांचा समावेश असतो जिथे पाहणे आणि ऐकणे हे दोन्ही अनुभव एकत्र मिळतात.

**गेमिफिकेशन तंत्र :** गेमिंगचे घटक आणि डिझाइन तंत्रे गैर–गेमिंग संदर्भांमध्ये (उदा. शिक्षण, व्यवसाय) वापरणे. हे तंत्र लोकांना विशिष्ट कार्येकरण्यास प्रोत्साहित करण्यासाठी किंवा त्यांना गुंतवून ठेवण्यासाठी वापरले जाते.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे :**

१) ब, २) ब, ३) ड, ४) ब, ५) ब, ६) अ, ७) ब, ८) ब, ९) ब, १०) ब

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे :**

१) ब, २) क, ३) क, ४) क, ५) ब, ६) ब, ७) क, ८) ब, ९) ब, १०) ब

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे :**

१) क, २ क, ३) ब, ४) ब, ५) क, ६) ब, ७) ब, ८) ब, ९) ब, १०) क

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**ब) टीपा लिहा.**

१) संग्रहालयाच्या व्याख्या सांगा

२) भारतातील कला दलाने

३) पुरातत्व वस्तुसंग्रहालय

**क) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) वस्तुसंग्रहालयाची व्याख्या, स्वरूप स्पष्ट करा.

२) संग्रहालयाचे महत्व विशद करा.

३) संग्रहालयाचे प्रकार विशद करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) डॉ. बोरकर रघुनाथ, संग्रहालयशास्त्र, पिंपळापुरे बुक, नागपूर.

२) डॉ. शुक्ल जी. व डॉ. पांडे वि., संग्रहालय विज्ञान, मोतीलाल बनारसीराम, नवी दिल्ली.

३) गणेशन आर., संग्रहालाय दर्पण, पिलग्रिम पब्लिशिंग, वाराणसी, २००६

४) निगम एम. एल., फंडामेंटल्स ऑफ म्युझिओलॉजी, देवी प्रकाशन, हैद्राराबाद, १९९५

५) जैन संजय., म्युझियम एव म्युझिओलॉजी एक परिचय, कनिष्क प्रकाशन बडोदा, २००१

६) Mookerjee, Asutosh, The Histroy of the Indian Museum, Trustees of the Indian Museum, Calcutta, 1914

७) Choudhary. R. D., Museums of India and their Maladies, agam Kala Prakshan Publication, Delhi, 1998

८) Agarwal , Usha., Museums in India, Sundeep Publication, Delhi, 2000

९) Gary Edson and Davin Dean : The Handbook for Museums, Routledge, 1994.

१०) Shobita Punja Museums of India, Guidebook Co. Ltd., 1990.

११) Burdhan, Anand (2017), Colonial Museum: An Inner History, Research India Press, Delhi

१२) Desvaltees, Andre, Francas Mairesse Arrond Cown (2010), Key concept in Museology ICOM²-2010, Paris.

१३) Dwivedi, V P, Museums and Museology: New Horizons. -gam Kala Prakashan

१४) Guha-Thakurta, Tapati. (2004). Objects, Histories: Institution of Art in Colonial India, New York: Columbia University Press.

१५) Mathur, Saloni. (2007). India by Design: Colonial History and Cultural Display. Berkley: University of California

१६) Munsuri, Shahida. Museums, Museology and New Museology. India: Readworthy Press Corporation, 2018.

१७) Burdhan, Anand (2017), Museological Pedagogy : Colonial Politics versus People's Museography, Research India Press

१८) Bedekar. V. H. New Museology, Museum Association of India, New Delhi.

❑❑❑

घटक २

# वस्तुसंग्रहालय चळवळीचा इतिहास

## (History of Museum Movement)

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ जागतिक

  २.२.२ ब्रिटीश भारत

  २.२.३ समकालीन भारत

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अध्ययनानंतर, विद्यार्थी खालील गोष्टी साध्य करू शकतील–

१) प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत जागतिक वस्तुसंग्रहालय चळवळीचा विकास कसा झाला, हे स्पष्ट करता येईल.

२) ब्रिटिश राजवटीत भारतात वस्तुसंग्रहालये कशी स्थापन झाली आणि त्यांचा उद्देश काय होता, हे सांगता येईल.

३) स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील वस्तुसंग्रहालय चळवळीत झालेले बदलस्पष्ट करता येतील.

४) वस्तुसंग्रहालय चळवळीला दिशा देणाऱ्या प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्था व संबंधित कायद्यांची माहिती देता येईल.

५) प्राचीन काळातील संग्रहांचे स्वरूप आणि आधुनिक काळातील संग्रहालयांची शैक्षणिक व सामाजिक भूमिका यांतील फरक स्पष्ट करता येईल.

६) भारताच्या समृद्ध वारशाचे जतन आणि प्रचार करण्यात वस्तुसंग्रहालय चळवळीने बजावलेली भूमिका आणि त्याचे महत्त्व समजावून सांगता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

प्रथम घटकमध्ये आपण वस्तुसंग्रहालयाची व्याख्या, स्वरूप, प्रकार व महत्व इत्यादि गोष्टींची चर्चा केली. या घटकमध्ये आपण वस्तुसंग्रहालयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणार आहोत. वस्तुसंग्रहालयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासल्याशिवाय आपणास वस्तूसंग्रहालय महत्व समजणार नाही त्यामुळे त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. जगभरामध्ये वस्तुसंग्रहालयाचा विकास कसा होत गेला, त्याचे स्वरूप कसे-कसे बदलत गेले हे समजल्याशिवाय आपणास संग्रहालयशास्त्र समजून घेता येणार नाही. वस्तूचा संग्रहकरण्याची प्रवृत्ती अश्मयुगकाळापासून मानवात विकसीत झाली. अन्नाच्या शोधात असणारा मानव विविध प्राण्यांची शिकार करून अन्नमिळवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची दगडी हत्यारे जवळ बाळगत असे. मानवाची संग्रहकरण्याची ही प्रथमावस्था होती. मानवास लाभलेली आंतरिक सौंदर्यात्मक नैसर्गिक मानसिक गुणांमुळे त्यास सुंदर, दुर्मिळ, मौल्यवान वस्तू व अवशेषाबद्दलच्या कुतूहलापोटी तो वस्तूंचा संग्रह करत आला आहे. प्रस्तुत घटकात आपण संग्रहालयाचा जागतिक विकास, ब्रिटिशकालीन भारतातील विकास आणि समकालीन भारतातील संग्रहालय विकास अभ्यासणार आहोत.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ जागतिक :

**प्राचीन कालखंडातील वस्तुसंग्रहण व संग्रहालयांची संकल्पना :**

मानवाची वस्तू संग्रह करण्याची प्रवृत्ती प्राचीन काळापासून विकसित होत आली आहे. प्रारंभी तो

अन्नाच्या शोधात भटकंती करत असे, शिकार करून उपजीविका चालवत असे. या प्रक्रियेत त्याने विविध प्रकारची हत्यारे तयार करून त्यांचा संग्रह केला. नैसर्गिक सौंदर्यदृष्टीमुळे त्याला सुंदर, दुर्मिळ व मौल्यवान वस्तूंचे कुतूहल वाटत आले. धार्मिक व सामाजिक संस्थांमार्म त या वस्तूंचे संकलन करून त्यांचे संरक्षण करण्यात आले. मंदिरांचा उपयोग मौल्यवान वस्तूंच्या सुरक्षिततेसाठी केला जात असे.

**१) मेसोपोटेमियन आणि इजिप्शियन संस्कृतीतील संग्रहालये :**

मेसोपोटेमिया ही जगातील पहिल्या विकसित सभ्यतांपैकी एक होती. येथे सुमेरियन, असिरियन व बॅबिलोनियन संस्कृती विकसित झाल्या. लेखन, गणित, वास्तुकला, प्रशासन यांसारख्या क्षेत्रात मोठी प्रगती झाली. इतिहासात संग्रहालय संकल्पनेचा उगम याच काळात झाल्याचे आढळते. इजिप्तमध्ये मंदिरांच्या जवळ मानवाच्या मनोरंजनासाठी पशुवस्तुसंग्रहालये उभारण्यात आली. इ.स.पू. १४०० मध्ये इजिप्तच्या राजकन्या ह्यूर हिने 'गार्डन ऑफ अक्लमेशन' नावाचे उद्यान निर्माण केले, जिथे दुर्मिळ प्राण्यांचा संग्रह केला गेला.

**२) बॅबिलोन आणि चीनमधील संग्रहालये :**

इ. स. पू. ६ व्या शतकात बॅबिलोनच्या राजकुमारी एनिगल्डी हिने प्राचीन वस्तूंचे एक संग्रहीत केंद्र उभारले. तिच्या संग्रहात शिलालेख, जुन्या राजवटींच्या विजयगाथा, विधी, सांस्कृतिक माहिती यांसारख्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वस्तू होत्या. चीनमध्ये इ.स.पू. १२ व्या शतकात चौ राजवंशातील सम्राट वेन यांनी 'गार्डन ऑफ इंटेलिजन्स' नावाचे पशुवस्तुसंग्रहालय स्थापन केले.

**३) ग्रीक आणि रोमन संस्कृतीतील संग्रहालये:**

ग्रीक तत्त्वज्ञ रिस्टॉटल यांनी अथेन्समध्ये प्राण्यांच्या अध्ययनासाठी प्राणीवस्तुसंग्रहालय स्थापन केले. इ. स. पू. २८० मध्ये ग्रीक सम्राट टोलॉमी सोटर याने अलेक्झांड्रिया शहरात म्युजेस (Muses) या देवतेच्या प्रीत्यर्थ एक मंदिर बांधले व त्याठिकाणी विद्यापीठ आणि वस्तुवस्तुसंग्रहालय स्थापन केले. येथे चार लाखांहून अधिक मौल्यवान वस्तू संग्रहित करण्यात आल्या. त्यामध्ये दुर्मिळ हस्तलिखिते, खगोलशास्त्रीय साधने, शल्यचिकित्सेसाठी आवश्यक यंत्रे आणि जैविक वस्तूंचा समावेश होता.प्राचीन रोममध्ये युद्धस्मारक संग्रहालयांची संकल्पना उदयास आली. रोमन सम्राट आणि जनरल यांनी जिंकलेल्या प्रदेशांतील सांस्कृतिक व ऐतिहासिक ठेवा आपल्या साम्राज्यात आणून सार्वजनिक प्रदर्शनासाठी ठेवला. यामुळे संग्रहालयांची संकल्पना अधिक विकसित होत गेली.

**मध्ययुगीन कालखंड आणि संग्रहालय चळवळ :**

**१) मध्ययुगातील धार्मिक प्रभाव आणि संग्रहालये :**

मध्ययुगात युरोपमध्ये धर्माच्या प्रभावामुळे राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक जीवनावर मोठा प्रभाव पडला. या कालखंडात मंदिर बांधणीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. राजे, सरदार तसेच सामान्य नागरिकदेखील धर्माच्या प्रभावाखाली येऊन मौल्यवान व किंमती वस्तू मंदिरांना दान करत असत. परिणामी, युरोपमधील मंदिरे केवळ धार्मिक स्थळे न राहता वस्तुसंग्रहालयांचे स्वरूप प्राप्त करू लागली. मध्ययुगीन

युरोपमध्ये थडग्यांच्या स्थळांना देखील वस्तुसंग्रहालयाचे स्वरूप प्राप्त झाले होते. तत्कालीन धर्मगुरू, प्रवर्तक व संत यांनी राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनावर मोठा प्रभाव टाकला होता. त्यांच्या मृत्यूनंतर, त्यांच्या कार्याची आणि विचारधारेची आठवण भावी पिढ्यांसाठी कायम राहावी म्हणून त्यांच्या समाधीस्थळांचे जतन केले जाऊ लागले. त्यामुळे मृत अवशेषांचे संरक्षण करणाऱ्या स्थळांना देखील वस्तुसंग्रहालयासारखे महत्त्व प्राप्त झाले.

**२) व्हॅटिकन म्युझियम : कलेचा अनमोल खजिना :**

व्हॅटिकन म्युझियम हे युरोपमधील सर्वात प्रसिद्ध व ऐतिहासिक संग्रहालयांपैकी एक आहे. या संग्रहालयाची स्थापना १५०६ मध्ये पोप जूलियस द्वितीय यांनी केली. पुनर्जागरण काळातील ते महत्त्वाचे कला व धार्मिक वारसा जतन करणारे केंद्र बनले. या संग्रहालयाने केवळ ख्रिश्चन धर्माचा इतिहास संरक्षित केला नाही, तर ग्रीक, रोमन व पुनर्जागरणकालीन कलेच्या उत्कृष्ट नमुन्यांचे जतन करून सांस्कृतिक आणि कलात्मक महत्त्वाचे केंद्र म्हणून स्वतःला सिद्ध केले. व्हॅटिकन म्युझियममध्ये ग्रीक आणि रोमन काळातील उत्कृष्ट शिल्पकृतींचा मोठा संग्रह आहे. पुनर्जागरण काळातील सर्वात मोठे चित्रकलेचे संग्रह येथे आढळतात. यामध्ये रामे लच्या भिंतीवरील चित्रे आणि इतर प्रसिद्ध पुनर्जागरण कलाकारांची चित्रे आहेत. सिस्टीन चॅपेल हे व्हॅटिकन म्युझियमचा सर्वात प्रसिद्ध भाग आहे. या चॅपेलमध्ये मायकेलएंजेलोने छतावर रंगवलेल्या भव्य चित्रांमुळे ते जगप्रसिद्ध झाले आहे. या छतावरील चित्रांमध्ये "Creation of Adam" ही सर्वात प्रसिद्ध कलाकृती आहे.

**३) पुनर्जागरण आणि संग्रहालय चळवळ :**

इ. स. १६ व्या शतकात पुनर्जागरण कालखंड सुरू झाला. यामुळे युरोपच्या राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक जीवनात मोठ्या प्रमाणावर बदल होऊ लागले. ज्ञानार्जन करण्याची प्रेरणा निर्माण झाली आणि ऐतिहासिक वस्तू संग्रहित करण्याची प्रक्रिया सुरू झाली. यामुळे वस्तुसंग्रहालय चळवळीला चालना मिळाली. इ. स. १६८२ मध्ये ब्रिटिश पुरावस्तुसंग्राहक एलियास एशमोल यांनी आपल्या संग्रही असलेल्या मौल्यवान वस्तू ऑक्सफोर्ड विद्यापीठाला भेट दिल्या. त्यावर आधारित विद्यापीठाने 'स्कूल ऑफ नॅचरल हिस्ट्री' विभागाची स्थापना केली. त्यानंतर १६८३ मध्ये ऑक्सफोर्ड विद्यापीठाने 'अश्मोलियन संग्रहालय' स्थापन केले. हे संग्रहालय जगातील पहिले सार्वजनिक संग्रहालय मानले जाते. यामुळे शैक्षणिक व संशोधनात्मक दृष्टिकोनातून संग्रहालय चळवळीला अधिक चालना मिळाली.

**४) संग्रहालय चळवळीचा विस्तार (१७ व १८ वे शतक) :**

युरोपमध्ये १७ व्या आणि १८ व्या शतकात संग्रहालय चळवळीने मोठी प्रगती केली. शैक्षणिक व वैज्ञानिक संशोधनाच्या उद्देशाने संग्रहालयांची संकल्पना विकसित झाली. अनेक विद्यापीठांनी ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक वस्तू जतन करण्यासाठी स्वतंत्र संग्रहालये स्थापन केली.याच काळात ब्रिटीश म्युझियम (१७५३) आणि लूव्ह्र म्युझियम (१७९३) यांसारखी प्रसिद्ध संग्रहालये स्थापन करण्यात आली. विशेषतः वसाहतवादी काळात ब्रिटिश, फ्रेंच आणि इतर युरोपियन साम्राज्यांनी आशिया, आफ्रिका आणि अमेरिका खंडांमधून मौल्यवान वस्तू जप्त करून आपल्या संग्रहालयांमध्ये ठेवल्या. ब्रिटिश म्युझियममध्ये भारत, इजिप्त, चीन व आफ्रिकेतील ऐतिहासिक वस्त्र, शिल्पे आणि हस्तलिखिते मोठ्या प्रमाणावर संग्रहित आहेत.

**५) आधुनिक संग्रहालय चळवळ (१९ व २० वे शतक) :**

इ. स. १९ व्या शतकाच्या अखेरीस संग्रहालयांची संकल्पना अधिक व्यापक झाली. यापूर्वी संग्रहालये ही केवळ विशिष्ट वर्गापुरती मर्यादित होती. मात्र, २० व्या शतकात संग्रहालये सार्वजनिक केली जाऊ लागली आणि सर्वसामान्य जनतेसाठी खुली करण्यात आली. द्वितीय महायुद्धानंतर संग्रहालये लोकाभिमुख आणि संवादात्मक झाली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून परस्परसंवादी प्रदर्शन भरवले जाऊ लागले. विज्ञान, इतिहास, मानवाधिकार, लोकशाही आणि पर्यावरण यासारख्या विषयांवर आधारित प्रदर्शन आयोजित केली जाऊ लागली. विविध देशांनी आपली स्थानिक संस्कृती आणि कलांचा प्रचार करण्यासाठी नवीन संग्रहालये उघडली. यामध्ये 'म्युझियम ऑफ मॉडर्न आर्ट' न्यूयॉर्क हे प्रसिद्ध आधुनिक संग्रहालय आहे.

**६) संग्रहालय चळवळीचा जागतिक प्रभाव:**

वस्तुसंग्रहालये केवळ ऐतिहासिक वस्तू जतन करणारी ठिकाणे नसून, ती सांस्कृतिक आणि वैज्ञानिक ज्ञान प्रसारित करणारी केंद्रे बनली आहेत. संग्रहालयांमुळे इतिहास व पुरातत्त्वशास्त्र यांचे अध्ययन अधिक सुकर झाले. आज जगभरात हजारो सार्वजनिक व खाजगी संग्रहालये अस्तित्वात आहेत आणि त्यांचा प्रभाव शिक्षण, कला, विज्ञान व समाजशास्त्राच्या विविध क्षेत्रांवर पडत आहे.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ :**

**बहूपर्यायी प्रश्न :**

१) प्राचीन काळातील मानवाची वस्तू संग्रह करण्याची प्रवृत्ती कशाच्या शोधातून विकसित झाली?

अ) सौंदर्य वस्तू ब) दुर्मिळ वस्तू

क) मौल्यवान वस्तू ड) हत्यारे

२) इजिप्तमध्ये इ. स. पू. १४०० मध्ये राजकन्या ह्यूर हिने 'गार्डन ऑफ अक्लमेशन' नावाचे उद्यान कशासाठी निर्माण केले होते?

अ) दुर्मिळ वनस्पतींच्या संग्रहासाठी ब) दुर्मिळ प्राण्यांच्या संग्रहासाठी

क) प्राचीन हस्तलिखितांच्या संग्रहासाठी ड) खगोलशास्त्रीय साधनांच्या संग्रहासाठी

३) बॅबिलोनच्या राजकुमारी एनिगल्डी हिने इ. स. पू. ६ व्या शतकात कशाचे संग्रहीत केंद्र उभारले होते?

अ) पशुवस्तुसंग्रहालय ब) वनस्पतींचे नमुने

क) प्राचीन ऐतिहासिक व सांस्कृतिक वस्तू ड) शस्त्रे आणि उपकरणे

४) चीनमध्ये इ.स.पू. १२ व्या शतकात चौ राजवंशातील सम्राट वेन यांनी स्थापन केलेल्या पशुवस्तुसंग्रहालयाचे नाव काय होते?

अ) गार्डन आफ अक्लमेशन ब) गार्डन ऑफ इंटेलिजन्स

क) गार्डन ऑफ नॉलेज   ड) गार्डन ऑफ हेरिटेज

५) ग्रीक सम्राट टोलॉमी सोटर यांनी अलेक्झांड्रिया शहरात म्युजेस देवतेच्या प्रीत्यर्थ बांधलेल्या मंदिरात किती लाखांहून अधिक मौल्यवान वस्तू संग्रहित केल्या होत्या?

अ) दोन लाखाहून अधिक   ब) तीन लाखाहून अधिक

क) चार लाखाहून अधिक   ड) पाच लाखाहून अधिक

६) मध्ययुगीन युरोपमध्ये मंदिरे कशाचे स्वरूप प्राप्त करू लागली?

अ) विद्यापीठे   ब) रुग्णालये   क) वस्तुसंग्रहालये   ड) बाजारपेठा

७) व्हॅटिकन म्युझियमची स्थापना कोणत्या पोपनी केली होती?

अ) पोप लिओ दशम   ब) पोप जूलियस द्वितीय

क) पोप पॉल तृतीय   ड) पोप सिक्स्टस चतुर्थ

८) "Creation of Adam" ही प्रसिद्ध कलाकृती व्हॅटिकन म्युझियममधील कोणत्या ठिकाणी आहे?

अ) राफेलच्या भिंतीवरील चित्रे   ब) सिस्टीन चॅपेल

क) ग्रीक आणि रोमन शिल्पकृती संग्रह   ड) ऐतिहासिक हस्तलिखिते कक्ष

९) जगातील पहिले सार्वजनिक संग्रहालय कोणते मानले जाते?

अ) ब्रिटिश म्युझियम   ब) लूव्ह्र म्युझियम

क) अश्मोलियन संग्रहालय   ड) व्हॅटिकन म्युझियम

१०) कोणत्या शतकानंतर संग्रहालये केवळ विशिष्ट वर्गापुरती मर्यादित न राहता सर्वसामान्य जनतेसाठी खुली केली जाऊ लागली?

अ) १६ व्या शतकापासून   ब) १७ व्या शतकापासून

क) १८ व्या शतकापासून   ड) २० व्या शतकापासून

## २.२.२ ब्रिटीश भारत :

**ब्रिटिश राजवटीत भारतातील वस्तुसंग्रहालयांची वाटचाल :**

भारताची प्राचीन संपत्ती, समृद्ध संस्कृती, ऐतिहासिक वारसा परकीय लोकांना नेहमीच आकर्षित करत आला आहे. इ. स.१७ व्या शतकापूर्वीच पोर्तुगीज, फ्रेंच, डच, स्पॅनिश, इंग्रज व्यापाऱ्यांनी भारतात आपले पाय रोवले आणि विविध ठिकाणी वसाहती स्थापन केल्या. या सगळ्यांमध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी सर्वाधिक प्रभावी ठरली. त्यांनी भारतातील बहुतांश भूभागावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून स्थानिक समाज, धर्म, संस्कृती आणि परंपरांचा सखोल अभ्यास केला. ब्रिटिश अधिकाऱ्यांना भारतीय मंदिरांमध्ये, राजवाड्यांमध्ये आणि ऐतिहासिक वास्तूंमध्येसंग्रहित असलेल्या मौल्यवान वस्तूंचे ऐतिहासिक व कलात्मक महत्त्व लवकरच

समजले. युरोपमध्ये ऐतिहासिक वस्तूंच्या जतनाला आणि त्यांच्या प्रदर्शनाला मोठे महत्त्व होते. त्यामुळे भारतातही वस्तुसंग्रहालये स्थापन करण्यास ब्रिटिशांनी विशेष प्रोत्साहन दिले. त्यांनी भारतीय संस्कृतीचा अभ्यास व वसाहती साम्राज्याला बळकट करण्यासाठी ऐतिहासिक, पुरातत्त्वीय, कलात्मक वस्तू संकलित करण्यास सुरुवात केली.

**भारतातील प्राचीन वस्तुसंग्रहणाची परंपरा :**

भारताचा सांस्कृतिक वारसा समृद्ध असून, त्याचे जतन विविध स्वरूपांत शतकानुशतके होत आले आहे. प्राचीन भारतीय शिल्पकला, चित्रकला, धातुकाम, स्थापत्यशास्त्र व हस्तकला यांचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. ही कलाकृती व पुरातन अवशेष संरक्षित करण्यासाठी वस्तुसंग्रहालयांची संकल्पना उदयास आली. प्राचीन भारतात 'चित्रशाळा' संकल्पना अस्तित्वात होती, जिथे राजवाड्यांमध्ये चित्रकला, शिल्पकला व ऐतिहासिक सामग्रीचे प्रदर्शन होत असे. अशोक, हर्षवर्धन व विक्रमादित्य यांच्या दरबारात कलांना मोठे प्रोत्साहन दिले जात असे. तसेच, हस्तलिखिते, ताम्रपट, ग्रंथ विद्यापीठांत जतन केले जात. धार्मिक स्थळे सांस्कृतिक वारशाची केंद्रे होती. स्तूपांवरील कोरीव काम, अजंठा-वेरूळची गुहाचित्रे, खजुराहो व महाबलिपुरमची मंदिरे प्राचीन कला आणि स्थापत्यशास्त्राची उत्तम उदाहरणे आहेत.

**मध्ययुगीन भारतातील वस्तुसंग्रहणाची परंपरा :**

मध्ययुगीन भारतात राजे व श्रीमंत व्यक्ती मौल्यवान वस्तू, दुर्मिळ रत्ने, चित्रे आणि ऐतिहासिक साधनांचे संग्रहण करीत. मुघल सम्राट अकबराने हमजानामा या चित्रसंग्रहाची निर्मिती केली, तर जहांगीरने चित्रकलेला विशेष प्रोत्साहन दिले. त्याच्या दरबारातील उस्ताद मंसूर, बिशनदास यांसारख्या चित्रकारांनी रेखाटलेली उत्कृष्ट चित्रे आजही विविध संग्रहालयांत जतन आहेत. राजपूत राजांनीही चित्रकला व पारंपरिक कलांचे जतन केले. जयपूर वस्तुसंग्रहालयात आजही या चित्रशैलीचे नमुने पाहायला मिळतात. मराठा राजांनी शस्त्रसंग्रह, ऐतिहासिक अवशेष आणि प्राणी संगोपनावर भर दिला. छत्रपती शाहू महाराजांनी साताऱ्यात प्राणिसंग्रह तयार केला होता, तर पेशवा बाजीरावांनी पुण्यात भव्य प्राणीवस्तुसंग्रहालय उभारले होते. सवाई माधवराव पेशव्यांच्या दरबारात सिंह, वाघ, चित्ते, गेंडा, तसेच पोपट, मोर व जलचर प्राणीही होते. हा समृद्ध प्राणिसंग्रह राजसत्तेच्या प्रतिष्ठेचे प्रतीक मानला जात असे. मध्ययुगीन भारतातील या वस्तुसंग्रहणाच्या परंपरांनी पुढे जाऊन आधुनिक वस्तुसंग्रहालयांच्या संकल्पनेस प्रेरणा दिली.

**एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगालचे महत्त्वपूर्ण कार्य :**

भारतीय संस्कृतीचा अभ्यास व संशोधन, मानवनिर्मित तसेच नैसर्गिक वस्तूंचे संशोधन व दस्तऐवजीकरण, संशोधनात्मक वस्तू, कलाकृतींचे संकलन व जतन, या संस्थेच्या सदस्यांनी संशोधनासाठी दुर्मिळ व मौल्यवान वस्तू  जमा करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे वस्तुसंग्रहालय स्थापनेची संकल्पना अधिक दृढ झाली. पुढे डॉ. नाथानिल वॉलिच यांनी इ. स. १७९६मध्ये भारतात वस्तुसंग्रहालय स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला. ही संकल्पना पुढे नेऊनइ.स. १८१४ मध्ये 'इंडियन म्युझियम' (कोलकाता)ची स्थापना करण्यात आली. हे भारतातील पहिले आधुनिक वस्तुसंग्रहालय होते, ज्यामध्ये ऐतिहासिक, पुरातत्त्वीय, सांस्कृतिक महत्त्वाच्या वस्तूंचे जतन व प्रदर्शन केले जाऊ लागले. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात स्थापन झालेल्या या

वस्तुसंग्रहालयांनी भारतीय इतिहास आणि संस्कृतीच्या अभ्यासाला एक नवी दिशा दिली, तसेच पुढे भारतभर अनेक वस्तुवस्तुसंग्रहालये स्थापन होण्यास प्रेरणा मिळाली.

**भारतातील पहिले औपचारिक वस्तुवस्तुसंग्रहालय :**

भारतामध्ये पहिले औपचारिक वस्तुसंग्रहालय म्हणून 'भारतीय वस्तुसंग्रहालय' (Indian Museum) ओळखले जाते. हे वस्तुसंग्रहालय २ फेब्रुवारी १८१४ रोजी कोलकाता येथे 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल' या संस्थेच्या प्रयत्नातून स्थापन करण्यात आले. या संग्रहालयाच्या स्थापनेत ब्रिटिश व भारतीय विद्वानांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासनाने भारतातील पुरातत्त्वीय, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वस्तूंचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने वस्तुसंग्रहालय स्थापनेची संकल्पना मांडली. त्या आधी विविध मंदिरांमध्ये, राजवाड्यांमध्ये अथवा वैयक्तिक संग्रहात मौल्यवान वस्तू साठवून ठेवल्या जात होत्या. परंतु या वस्तूंचे योग्य प्रकारे संवर्धन, संशोधन आणि प्रदर्शन करण्याच्या दृष्टीने औपचारिक वस्तुसंग्रहालय आवश्यक होते. हे वस्तुसंग्रहालय स्थापन करण्यासाठी डॉ. नाथानिल वॉलिच यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. शिवाय वॉलिच यांची पहिले अध्यक्ष म्हणून नियुक्त झालेली होती. ब्रिटिश अधिकारी व भारतीय विद्वान यांच्यासह काही प्रतिष्ठित व्यक्तींनीही या संग्रहालयासाठी मौल्यवान ऐतिहासिक व सांस्कृतिक वस्तू दान केल्या. यामध्ये कर्नल स्टुअर्ट, डॉ. टिलर, जनरल मॅकेन्झी, बाबू राजकमल सेन, काली किशेन बहादूर महाराज, राधाकांत देव, मथुरानाथ मलिक, शिवचंद्रदास, महारानी बेगम सम्बु इत्यादींचा समावेश होता. या संग्रहालयामध्ये प्राचीन शिल्पकला, चित्रकला, हस्तलिखिते, नैसर्गिक इतिहासाशी संबंधित वस्तू, नाणी, जीवाश्म,पुरातत्त्वीय अवशेष यांचा समृद्ध संग्रह होता. हे वस्तुसंग्रहालय संशोधन व शिक्षणाचे प्रमुख केंद्र म्हणून विकसित झाले. भारतीय इतिहास, संस्कृती आणि कलांचा अभ्यास करण्यासाठी हे वस्तुसंग्रहालय महत्त्वपूर्ण ठरले.

**विश्वस्त मंडळाची स्थापना व भारतीय वस्तुसंग्रहालयाचा विकास (१८६५) :**

ब्रिटिश काळात वस्तुसंग्रहालयाच्या विस्तार व प्रभावी व्यवस्थापनासाठी इ. स. १८६५ मध्ये 'विश्वस्त मंडळ' स्थापन केले. या मंडळाने संग्रहालयाच्या भविष्यातील विकासासाठी महत्त्वपूर्ण धोरणे व वित्तपुरवठ्याची व्यवस्था केली. विश्वस्त मंडळाच्या निर्णयानुसार, कलकत्त्यात भारतीय वस्तुसंग्रहालयासाठी स्वतंत्र इमारत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. इ. स. १८७५ मध्ये संग्रहालयाचे स्थलांतर नवीन वास्तूत करण्यात आले, ज्यामुळे अधिक प्रशस्त जागा मिळाली आणि हे एक संशोधन व ऐतिहासिक अभ्यासाचे प्रमुख केंद्र बनले. भारतीय वस्तुसंग्रहालयाच्या स्थापनेने भारतात वस्तुसंग्रहालय चळवळीला गती मिळाली. पुढील काळात देशभरात विविध वस्तुसंग्रहालये उभारली गेली. ऐतिहासिक वस्तूंचे जतन अधिकसंघटित व शास्त्रशुद्ध पद्धतीने होऊ लागले. भारतीय वस्तुसंग्रहालयाने आजही भारतीय संस्कृती, कला व इतिहासाचे अमूल्य संकलन जपले आहे. हे वस्तुसंग्रहालय पुरातत्त्व, शिल्पकला, ऐतिहासिक साधने, प्राचीन हस्तलिखिते यांचे जतन व अभ्यासाचे प्रमुख केंद्र बनले आहे.

**दुर्मिळ वस्तूंचे जतन व संवर्धन – कायदे व तरतुदी :**

भारताच्या समृद्ध ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करण्यासाठी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने

विविध कायदे व नियम लागू केले. भारतातील मौल्यवान आणि दुर्मिळ वस्तूंची नासधूस टाळण्यासाठी तसेच ऐतिहासिक वास्तू आणि स्मारकांचे जतन करण्यासाठी काही महत्त्वाचे कायदे अस्तित्वात आले.

**१) बंगाल रेग्युलेशन अॅक्ट १८१० :**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने इ. स. १८१० मध्ये 'बंगाल रेग्युलेशन अॅक्ट' लागू केला. हा कायदा भारतातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणासाठी महत्त्वाचा टप्पा ठरला. या कायदयामध्ये पुढील महत्त्वपूर्ण तरतुदी होत्या. कलम १९ अंतर्गत भारतातील सार्वजनिक इमारती, ऐतिहासिक अवशेष व प्राचीन वास्तूंची हानी करण्यास कायदेशीर बंदी घालण्यात आली.ऐतिहासिक वारसा व सांस्कृतिक स्थळांचे जतन करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी असलेल्या मंदिरं, १ किल्ले व स्मारकांचे संरक्षण अनिवार्य करण्यात आले.या कायद्यामुळे प्राचीन इमारतींचे अनधिकृत पद्धतीने पाडकाम, त्यातील दुर्मिळ वस्तूंची चोरी व विक्री रोखणे शक्य झाले. बंगाल रेग्युलेशन अॅक्टच्या अंमलबजावणीमुळे भारतातील विविध ऐतिहासिक स्थळांचे व्यवस्थित संरक्षण व देखभाल सुरू झाली. ब्रिटिश प्रशासनाने या कायद्याच्या आधारावर भारतातील वारसा स्थळांच्या जतन व संवर्धनासाठी पुढील कायदे आणि धोरणे तयार करण्यास सुरुवात केली. हा कायदा भारतात ऐतिहासिक वास्तू व सांस्कृतिक वारसा जपण्यासाठीचा एक महत्त्वाचा प्रारंभबिंदू ठरला. पुढे, ब्रिटिश आणि नंतर स्वतंत्र भारताच्या सरकारनेही वारसा संवर्धनासाठी अधिक व्यापक कायदे लागू केले.

**२) ऐतिहासिक वास्तूंचे संरक्षण : गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्जचे आदेश १८१३ :**

गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज यांनी इ.स. १८१३ मध्ये भारतातील ऐतिहासिक वास्तूंच्या संरक्षणास महत्त्व दिले. भारतातील समृद्ध ऐतिहासिक वारसा नष्ट होऊ नये म्हणून त्यांनी काही ठोस पावले उचलली. तेहपूर सिक्री, रामबाग व सिकंदरा येथील ऐतिहासिक वास्तूंचे संरक्षण करण्याचे आदेश ब्रिटिश प्रशासनाला देण्यात आले. या आदेशांनुसार ब्रिटिश अधिकाऱ्यांनी ऐतिहासिक स्थळांच्या देखभालीसाठी विशेष यंत्रणा उभारण्यास सुरुवात केली. प्रशासनावर प्राचीन मंदिरं, मशिदी, राजवाडे व किल्ल्यांच्या संवर्धनाची कायदेशीर जबाबदारी सोपवण्यात आली. ऐतिहासिक स्थळांच्या होणाऱ्या नाशावर नियंत्रण ठेवण्यासाठी ब्रिटिश सरकारने नव्या धोरणांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. वॉरन हेस्टिंग्ज यांच्या आदेशांमुळे ब्रिटिश अधिकाऱ्यांमध्ये भारतीय संस्कृतीच्या वारशाबाबत जागरूकता निर्माण झाली.यामुळे भारतातील अनेक ऐतिहासिक स्थळांचे जतन व संवर्धन शक्य झाले.

**३) ब्रिटिश धोरणांमधील बदल आणि संरक्षणाची वाढती गरज :**

ब्रिटिश सत्तेच्या प्रारंभिक काळात भारताच्या ऐतिहासिक वारशाचे संवर्धन करण्याऐवजी शोषण करण्याकडे अधिक कल होता. प्राचीन मंदिरे, राजवाडे, हस्तलिखिते व दुर्मिळ वस्तू मोठ्या प्रमाणावर ब्रिटनला नेल्या जात होत्या. यामुळे भारतीय संस्कृती व परंपरांवर विपरीत परिणाम झाला. स्थानिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर ब्रिटिश धोरणांना तीव्र विरोध होऊ लागला. यामुळे ब्रिटिश अधिकाऱ्यांना भारताच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याच्या दिशेने विचार करावा लागला. बंगाल रेग्युलेशन अॅक्ट (१८१०), गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्जचे आदेश (१८१३) यामुळे ऐतिहासिक वास्तू व दुर्मिळ वस्तूंच्या संरक्षणाच्या कायदेशीर प्रक्रियेला सुरुवात झाली. भारतातील मंदिरे, किल्ले, स्मारके व पुरातत्त्वीय अवशेषांचे महत्त्व ओळखून

ब्रिटीशांनी संवर्धनासाठी अधिकृत कायदे लागू करण्यास सुरुवात केली. भारतीय वस्तुसंग्रहालय (१८१४), इतर संस्थांच्या स्थापनेमुळे पुरातत्त्वीय संशोधनाला अधिक प्रमाणात चालना मिळाली. ब्रिटिश प्रशासनाच्या प्रारंभिक शोषणाच्या धोरणात हळूहळू बदल होत गेला. वाढत्या दबावामुळे भारतीय ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करण्यासाठी अधिक कायदेशीर उपाययोजना राबवण्यात आल्या.

**व्हिक्टोरिया कालखंड :**

इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामानंतर ब्रिटिश सरकारने ईस्ट इंडिया कंपनीचा भारतावरील राजकीय कारभार संपुष्टात आणला. भारतावर थेट इंग्लंडच्या महाराणी व्हिक्टोरिया यांचे राज्य प्रस्थापित केले. यामुळे भारताचे प्रशासन अधिक केंद्रीयकरण झाले. ब्रिटिश सरकारने भारताच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाच्या व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित केले. ब्रिटिश साम्राज्याचा भारतातील प्रभाव वाढत असतानाच, वस्तुसंग्रहालयांची संकल्पना अधिक प्रबळ झाली. महाराणी व्हिक्टोरियाच्या अर्धशताब्दी व सुवर्णमहोत्सवी राज्यारोहण उत्सवाच्या निमित्ताने ब्रिटिश प्रशासनाने भारतात वस्तुसंग्रहालये स्थापन करण्याचा संकल्प केला. या संग्रहालयांच्या स्थापनेमागील हेतू फक्त ऐतिहासिक व पुरातत्त्वीय वस्तूंचे जतन करणे नव्हते, तर भारतीय जनतेच्या मनात ब्रिटिश राज्याच्या वैभवाची कल्पना चिरंतन राहावी हाही उद्देश होता.संग्रहालयांमध्ये भारतीय कला, संस्कृती, ऐतिहासिक वस्तू, तसेच ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या गौरवशाली कामगिरीचे प्रदर्शनही केले जाऊ लागले. या कालखंडात सुरू झालेली प्रमुख वस्तुसंग्रहालय यामध्ये व्हिक्टोरिया मेमोरियल (कोलकाता, १९२१) मद्रास सरकारी वस्तुसंग्रहालय (चेन्नई, १८५१) यांचा उल्लेख करता येईल. व्हिक्टोरियन काळात भारतातील वस्तुसंग्रहालये केवळ ऐतिहासिक वस्तूंचे जतन करणारी स्थळे न राहता, ब्रिटिशांच्या राजकीय व सांस्कृतिक प्रभावाचे प्रतीक बनली. भारतीय कलावस्तू, ऐतिहासिक दस्तऐवज व पुरातत्त्वीय अवशेषांचे मोठ्या प्रमाणावर संकलन होऊन संग्रहालयांचे महत्त्व वाढले. याच संग्रहालयांनी पुढे भारताच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अभ्यासाला आधार दिला आणि स्वतंत्र भारताच्या वस्तुसंग्रहालयव्यवस्थेचा पाया रचला.

**व्हिक्टोरिया काळातील प्रमुख वस्तुसंग्रहालये :**

इ. स. १८५८ ते १९४७ या काळात ब्रिटिशांनी भारतात अनेक वस्तुसंग्रहालये स्थापन केली. या संग्रहालयांचा मुख्य उद्देश भारतीय संस्कृती, पुरातत्त्वीय अवशेष, निसर्गशास्त्र आणि ऐतिहासिक वारसा जतन करणे हा होता. तसेच, ही वस्तुसंग्रहालये ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या सामर्थ्याचे आणि गौरवाचे प्रतीक म्हणूनही वापरण्यात आली.

**अ) महाराष्ट्र आणि उत्तर भारतातील वस्तुसंग्रहालये:**

१) व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट वस्तुसंग्रहालय, मुंबई (१८५७) महाराणी व्हिक्टोरियाच्या अर्धशतकपूर्तीच्या सन्मानार्थ स्थापन केले. भारतातील कलात्मक व ऐतिहासिक वस्तू, प्राचीन शिल्पकृती, तसेच ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या आठवणींचे संग्रहणयेथे करण्यात आले.

२) लखनऊ स्टेट म्युझियम (१८६३) उत्तर प्रदेशातील सर्वांत महत्त्वाचे ऐतिहासिक व पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय. प्राचीन मूर्तिशास्त्र, हस्तलेखन, वस्त्रकला, तसेच ऐतिहासिक हत्यारे व शिलालेखांचा संग्रह आहे.

३) नागपूर स्टेट म्युझियम (१८६३) महाराष्ट्रातील प्रथम प्रादेशिक वस्तुसंग्रहालय. मुख्यतः विदर्भाच्या इतिहासाशी संबंधित पुरातत्त्वीय व निसर्गशास्त्रीय वस्तूंचा संग्रह.

४) प्राकृतिक म्युझियम मुंबई (१८६३) भारतातील निसर्गशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र व भूशास्त्राशी संबंधित दुर्मिळ वस्तूंचे जतन करणारे पहिले वस्तुसंग्रहालय.

५) लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्युझियम पुणे (१८६५) औद्योगिक क्रांतीशी संबंधित वस्तूंचा संग्रह. महाराष्ट्रातील पारंपरिक हस्तकला, तंत्रज्ञान व औद्योगिक उत्पादनांचे प्रदर्शन.

**ब) दक्षिण भारतातील वस्तुसंग्रहालये :**

१) व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटयुट म्युझियम, मद्रास (चेन्नई) (१८८७) ब्रिटिश औद्योगिक आणि वैज्ञानिक संशोधन प्रगतीचे द्योतक. भारतीय पारंपरिक हस्तकला आणि तंत्रज्ञानावर भर.

२) म्हैसूर स्टेट म्युझियम (१८६५) कर्नाटकमधील पहिले औपचारिक वस्तुसंग्रहालय. स्थानिक राजवंशांचा इतिहास, शस्त्रास्त्रे आणि चित्रकला यांचा समृद्ध संग्रह.

३) प्राणी विज्ञान व वनस्पतीशास्त्र वस्तुसंग्रहालय, एर्नाकुलम (१८७४) दक्षिण भारतातील पहिले नैसर्गिक इतिहास वस्तुसंग्रहालय. भारतातील समुद्री आणि वनस्पतीशास्त्रीय जतनासाठी महत्त्वाचे केंद्र.

**क) मध्य व पश्चिम भारतातील वस्तुसंग्रहालये:**

१) महंत घासीदास स्मारक वस्तुसंग्रहालय, छत्तीसगड (१८७५) छत्तीसगडच्या आदिवासी संस्कृतीवर आधारित दुर्मिळ वस्तूंचा संग्रह. पुरातत्त्वीय अवशेष व लोककला यांचा समृद्ध संग्रह आहे.

२) जयपूर गव्हर्मेंट सेंट्रल म्युझियम, राजस्थान (१८७६) जयपूरच्या राजवंशीय वारशाचे प्रतिनिधित्व करणारे महत्त्वाचे वस्तुसंग्रहालय. राजस्थानी चित्रकला, हस्तकला, ऐतिहासिक पोशाख व मूर्तिशास्त्र यांचा समावेश आहे.

३) कच्छ म्युझियम, गुजरात (१८८७) कच्छच्या संस्कृती, हस्तकला आणि पुरातत्त्वीय महत्त्वाच्या वस्तूंचे जतन.

४) बडोदा वस्तुसंग्रहालय आणि कलादालन (१८९४) भारतीय व युरोपीय कलेच्या दुर्मिळ कलाकृतींचा संग्रह.वैज्ञानिक आणि ऐतिहासिक वस्त्रसंग्रहणाचे केंद्र.

५) बरटन म्युझियम, भावनगर (१८९८) स्थानिक राजवंशांचा इतिहास व हस्तकलेचे संरक्षण हा हेतु होता.

**ड) जम्मू आणि काश्मीरातील वस्तुसंग्रहालय :**

१) श्री प्रतापसिंह राजकीय वस्तुसंग्रहालय, जम्मू (१८९८) काश्मीरच्या राजघराण्याच्या इतिहासावर आधारित मौल्यवान वस्तू व ऐतिहासिक कागदपत्रांचे संग्रह आहे.

**इ) इतर महत्त्वाची वस्तुसंग्रहालये :**

१) व्हिक्टोरिया जुबली म्युझियम, उदयपूर राजस्थान (१८८७) महाराणा प्रताप यांचे हत्यारसंग्रह, राजपूत कला व मूर्तिशास्त्र यांचे जतन केले आहे.

२) विल्चेस्टर वस्तुसंग्रहालय, गुजरात (१८९०) भारतीय व युरोपियन वस्त्रसंस्कृतीवर आधारित दुर्मिळ वस्तू व ऐतिहासिक नोंदींचे संग्रह आहे.

३) मथुरा म्युझियम, उत्तर प्रदेश (१८७४) भारतीय मूर्तिकलेच्या जतनासाठी प्रसिद्ध. गुप्तकालीन व कुशाणकालीन शिल्पकलेचा समृद्ध संग्रह आहे.

**पुरातत्त्व संशोधन आणि वस्तुसंग्रहण :**

भारताचा समृद्ध ऐतिहासिक वारसा, अनेक प्राचीन स्थळे, शिल्पकला, अवशेषांमध्ये प्रतिबिंबित होतो. या वारशाच्या संवर्धनासाठी ब्रिटिश प्रशासनाने पुरातत्त्वीय संशोधन व वस्तुसंग्रहण यावर विशेष भर दिला. पुरातत्त्वीय संशोधनामुळे भारतातील ऐतिहासिक वारसा केवळ अभ्यासाच्या कक्षेत आला नाही, तर संग्रहालयांमधून तो जनतेसाठीही सुलभ झाला.

**भारतीय पुरातत्त्वीय संरक्षण संस्थाचे स्थापना :**

इ. स. १८६१ मध्ये भारताचे व्हायसरॉय लॉर्ड कॅनिंग (१८५८-१८६२) यांच्या कार्यकाळात 'भारतीय पुरातत्त्वीय संरक्षण संस्था' (Archaeological Survey of Indiaa ASI) ची स्थापना करण्यात आली. या संस्थेच्या स्थापनेमागील मुख्य उद्दिष्ट भारतातील प्राचीन स्थळांचे संशोधन, उत्खनन, संवर्धन करणे हे होते. ब्रिटिश अधिकारी सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांची संस्थेच्या पहिल्या संचालकपदी नियुक्ती करण्यात आली. सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांनी भारतातील पुरातत्त्वीय अवशेषांचा सखोल अभ्यास केला. प्राचीन बौद्ध स्थळे, मंदिरांचे भग्नावशेष, ऐतिहासिक वास्तूंच्या उत्खननाला प्रोत्साहन दिले. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतातील अनेक महत्त्वाच्या पुरातत्त्वीय स्थळांची नोंदणी व संवर्धन करण्यात आले.

**पुरातत्त्वीय उत्खनन व शोधकार्य:**

इ. स. १८७३ मध्ये मध्यप्रदेशातील भारहूत येथे प्रथम पुरातत्त्वीय उत्खनन सुरू करण्यात आले. भारहूत येथे प्राचीन बौद्ध स्तूप व त्यासोबत अनेक महत्त्वपूर्ण शिल्पकृती सापडल्या. ह्या उत्खननात मिळालेल्या अनेक वस्तू भारतीय वस्तुसंग्रहालय (कोलकाता) व अन्य संग्रहालयांमध्ये ठेवण्यात आल्या. सांची स्तूप (मध्यप्रदेश) बौद्ध धर्माशी संबंधित प्राचीन अवशेष मिळाले. मथुरा व सारनाथ (उत्तर प्रदेश) गुंफालेखन, बौद्ध व जैन पंथाचे शिल्पकलेचे अवशेष मिळाले. मोहनजोदडो व हडप्पा (सिंध व पंजाब, पाकिस्तान) सिंधू संस्कृतीचे पहिले पुरावे उजेडात आले.

**वस्तुसंग्रहालयांमध्ये पुरातत्त्वीय अवशेषांचे जतन :**

उत्खननातून प्राप्त झालेले ऐतिहासिक अवशेषभारतीय वस्तुसंग्रहालय (कोलकाता) व इतर संग्रहालयांमध्ये ठेवण्यात आले. या संग्रहालयांमध्ये प्राचीन काळातील शिल्पकृती, नाणी, हस्तलिखिते, वस्त्रांची जतन केली

गेली. भारतीय पुरातत्त्वीय संरक्षण संस्थेच्या मदतीने अनेक स्मारकांचे संवर्धन करण्यात आले, जे आजही भारतीय इतिहासाचा महत्त्वाचा भाग आहेत.

**दुर्मिळ वस्तूंच्या जतन व संवर्धनासाठी केलेले कायदे :**

भारतातील पुरातत्त्वीय, ऐतिहासिक, सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी ब्रिटिश प्रशासनाने विविध कायदे लागू केले. यामुळे दुर्मिळ ऐतिहासिक वस्तू व स्थळांच्या संरक्षणासाठी अधिकृत यंत्रणा उभी राहिली. ब्रिटिश सरकारने पुरातत्त्वीय संशोधनाला चालना देण्यासाठी विशेष कायदे, आदेश आणि नियमावली लागू केली, ज्यामुळे भारताच्या समृद्ध वारशाचे व्यवस्थित दस्तऐवजीकरण होऊ शकले.

१) इ. स. १८७३ मध्ये ब्रिटिश सत्तेने भारतातील प्रांतीय सरकारांना एक अधिकृत आदेश जारी केला. या आदेशाच्या माध्यमातून स्थापत्यकलेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या वस्तू व ऐतिहासिक स्थळांचे संरक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. भारतभर असलेल्या ऐतिहासिक स्मारकांचे दस्तऐवजीकरण करण्याची प्रक्रिया यामुळे अधिक सुसूत्र झाली. हा आदेश लागू झाल्यानंतर ब्रिटिश अधिकाऱ्यांनी पुरातत्त्वीय महत्त्व असलेल्या वास्तू, प्राचीन शिल्पे, नाणी, हस्तलिखिते व ऐतिहासिक अवशेषांचे दस्तऐवजीकरण सुरू केले. पुढे, या आदेशामुळेच भारतीय वस्तुसंग्रहालयांमध्ये दुर्मिळ ऐतिहासिक वस्तूंच्या संकलनास गती मिळाली.

२) ब्रिटिश व्हॉइसरॉयलॉर्ड लिटन (१८७६-१८८०) यांनी पुरातत्त्वीय सर्वेक्षण संस्थेचे संचालक सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांच्या शिफारशीनुसार 'इंडियन ट्रेजर ट्रोव्ह ॲक्ट' १८७८ हा कायदा लागू केला. या कायद्यानुसार १००० रुपयांपेक्षा अधिक मूल्य असलेल्या पुरातत्त्वीय वस्तू, शिल्पे अथवा अवशेष सापडल्यास सरकार त्यावर हक्क सांगू शकते व त्या वस्तू जप्त करू शकते.

३) एखाद्या व्यक्तीला गुप्तधन सापडल्यास, त्याचा मालकी हक्क सरकारकडे हस्तांतरित करण्याचा अथवा ते धन त्या व्यक्तीला परत देण्याचा अधिकार सरकारला असेल. प्राचीन नाणी, मूर्ती, हस्तलिखिते व पुरातत्त्वीय अवशेषांचे संरक्षण करण्यासाठी या कायद्यामुळे अधिकृत मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली. भारत भरातील वस्तुसंग्रहालये आणि संशोधन संस्थांमध्ये ऐतिहासिक वस्तूंच्या संकलनास मोठी मदत मिळाली.

४) भारतीय उपखंडातील प्राचीन मूर्ती, नाणी, पुरातत्त्वीय अवशेषांचे अधिक व्यापक दस्तऐवजीकरण व संरक्षण करण्यात गती मिळाली. देशभरात स्थापन झालेल्या अनेक वस्तुसंग्रहालयांमध्ये ऐतिहासिक वस्तूंचे शास्त्रोक्त पद्धतीने जतन करण्यात आले. सरकारी देखरेखीखाली ऐतिहासिक स्थळांवरील अवशेषांचे उत्तम संवर्धन होऊ लागले, ज्यामुळे अनेक प्राचीन स्मारकांचा नाश टाळला गेला. पुरातत्त्वीय संशोधन व अभिलेख संकलनाला चालना मिळाली. ज्यामुळे भारतीय इतिहासाचा अधिक सखोल अभ्यास करता येऊ लागला.

**लॉर्ड कर्झन व जॉन मार्शल यांचा कालखंड आणि वस्तुसंग्रहालयांचा विकास :**

इ. स. १८९९ मध्ये लॉर्ड कर्झन भारताच्या व्हॉइसरॉयपदी नियुक्त झाले. भारतीय संस्कृती व ऐतिहासिक वारशाचे संवर्धन करणे हे त्यांच्या कारकीर्दीतील एक महत्त्वाचे ध्येय होते. याच काळात जॉन मार्शल यांची भारतीय पुरातत्त्वीय सर्वेक्षण संस्थेच्या संचालकपदी नियुक्ती करण्यात आली. या दोघांनी मिळून भारतीय पुरातत्त्वीय संशोधन आणि वस्तुसंग्रहालयांच्या जतन व संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली. भारतीय

संस्कृती व पुरातत्त्वीय वारशाच्या संरक्षणासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. भारतीय पुरातत्त्वीय सर्वेक्षण संस्थेची पुनर्बांधणी केली व पुरातत्त्वीय उत्खनन, संशोधन आणि वस्तुसंग्रहालये यांना गती दिली. पुरातत्त्वीय स्थळांचे संवर्धन करण्यासाठी कायदे तयार करण्यात आले आणि ऐतिहासिक वास्तूंच्या नूतनीकरणावर भर दिला. जॉन मार्शल यांनी भारतीय पुरातत्त्वीय सर्वेक्षण संस्थेच्या पहिल्या वैज्ञानिक पद्धतीने उत्खनन करणाऱ्या संचालकांपैकी एक म्हणून काम पाहिले. त्यांनी उत्खननात सापडलेल्या ऐतिहासिक वस्तू त्याच वातावरणात ठेवून अभ्यास करण्याच्या संकल्पनेला महत्त्व दिले. मार्शल यांनी 'स्थळीय वस्तुसंग्रहालये' स्थापन करण्याची संकल्पना प्रथम मांडली. यामुळे पुरातत्त्वीय अवशेष त्या-त्या उत्खनन स्थळीच जतन करता येऊ लागले. हडप्पा व मोहनजोदडो येथील उत्खननाचे नेतृत्व त्यांनी केले, ज्यामुळे सिंधू संस्कृतीचा शोध लागला व भारताच्या इतिहासाला नवीन दिशा मिळाली.

**२) भातातील स्थळीय वस्तुसंग्रहालयांची स्थापना:**

स्थळीय वस्तुसंग्रहालये ही अशा प्रकारची वस्तुसंग्रहालये होती जी थेट पुरातत्त्वीय स्थळीच उभारण्यात आली. यामुळे उत्खननात सापडलेले अवशेष मूळ ठिकाणीच प्रदर्शित करता आले. महत्त्वाची स्थळीय वस्तुवस्तुसंग्रहालये म्हणून आपण पुढील वस्तुसंग्रहालयांचा उल्लेख करू शकतो. यामध्ये;

१) जूनागढ (१९०१) गुजरातमधील ऐतिहासिक अवशेषांचे वस्तुसंग्रहालय.

२) सारनाथ (१९०४) गौतम बुद्धांनी पहिले धर्मचक्र प्रवर्तन केलेल्या स्थळाचा इतिहास जतन करणारे वस्तुसंग्रहालय.

३) चंपा (१९०८) प्राचीन भारतीय व्यापार आणि संस्कृतीसंबंधी महत्त्वपूर्ण वस्तूंचा वस्तुसंग्रहालय.

४) जोधपूर (१९०९) राजस्थानी ऐतिहासिक वारशाचे संवर्धन.

५) खजुराहो (१९१०) प्राचीन मंदिरांच्या शिल्पकलेचा संग्रह.

६) वाराणसी (१९१०) हिंदू आणि बौद्ध संस्कृतीशी संबंधित अवशेषांचे वस्तुसंग्रहालय.

७) नालंदा (१९१७) भारतातील प्राचीन विद्यापीठ आणि त्याच्या अवशेषांशी संबंधित वस्तूंचे संग्रहण.

८) सांची (१९१९) बौद्ध स्तूप आणि त्यासंबंधी पुरातत्त्वीय अवशेषांचे वस्तुसंग्रहालय.

९) हडप्पा (१९२१) सिंधू संस्कृतीच्या उत्खननात सापडलेल्या वस्तूंचे संग्रहण.

१०) मोहनजोदडो (१९२२) हडप्पासंबंधी महत्त्वपूर्ण पुरातत्त्वीय अवशेष.

११) ग्वालियर (१९२२) ऐतिहासिक किल्ल्याशी संबंधित अवशेषांचे संग्रहण.

इ. स. १९०१ ते १९२८ या कालखंडात भारतातील स्थळीय व अन्य वस्तुसंग्रहालयांची संख्या वाढून ६२ झाली. यामुळे भारतीय इतिहास व संस्कृतीच्या जतनासाठी एक मजबूत पायाभरणी तयार झाली.

**प्राचीन स्मारक संरक्षण कायदा आणि भारतीय वस्तुसंग्रहालयांचे संरक्षण :**

इ. स. १९०४ मध्ये लॉर्ड कर्झनने "Ancient Monuments Preservation Act - 1904" (प्राचीन स्मारक संरक्षण कायदा) लागू केला. हा कायदा भारतातील ऐतिहासिक स्मारकांचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने एक क्रांतिकारी पाऊल ठरला. ब्रिटिश सत्तेखाली भारतातील अनेक ऐतिहासिक वास्तू व पुरातत्त्वीय स्थळे दुर्लक्षित होती. काही महत्त्वाच्या ऐतिहासिक ठिकाणांचा नाश होत होता अथवा त्यांचा दुरुपयोग केला जात होता. यामुळेचया कायद्याद्वारे ऐतिहासिक वारशाचे संस्थात्मक संरक्षण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.या कायद्यामुळे भारतातील अनेक संरक्षित व असंरक्षित ऐतिहासिक स्मारकांना संरक्षण मिळाले. कायद्याच्या अंमलबजावणीनंतर भारतातील महत्त्वाची ऐतिहासिक स्मारके केंद्र सरकारच्या ताब्यात आली. या स्थळांच्या देखभालीसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्यात आला. पूर्वी अनेक ऐतिहासिक वास्तू प्रांतीय सरकारांच्या ताब्यात होत्या, मात्र त्यांचे योग्यरित्या संरक्षण होत नव्हते.या कायद्यामुळे प्रांतीय सरकारांना ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनासाठी कठोर उपाययोजना लागू करण्यास भाग पाडण्यात आले. काही ब्रिटिश व परदेशी संशोधक भारतातील मौल्यवान ऐतिहासिक अवशेष परदेशात पाठवत होते. या कायद्याने ऐतिहासिक वस्तूंची तस्करी रोखण्यासाठी कठोर निर्बंध घातले व परवानगीशिवाय वस्तू बाहेर नेण्यास मनाई केली. याआधी अनेक ठिकाणी पुरातत्त्वीय उत्खनन अनियंत्रितपणे होत असे. हा कायदा पुरातत्त्वीय उत्खनन, संशोधन व वस्तूंच्या संवर्धनासाठी अधिकृत मान्यता देणारा पहिला कायदा ठरला.

**इंग्लंडला भारतीय पुरातत्त्वीय अवशेष नेण्यावर निर्बंध :**

लॉर्ड कर्झनने भारतीय संस्कृती व ऐतिहासिक वारशाच्या संरक्षणासाठी कठोर भूमिका घेतली. इ. स. १९०१ मध्ये ब्रिटिश संशोधक सर ऑरेल स्टीन यांनी भारतातील मौल्यवान पुरातत्त्वीय अवशेष इंग्लंडला पाठवण्याचा प्रयत्न केला. त्याकाळी भारतीय पुरातत्त्वीय वारसा परदेशात नेण्याची प्रथा वाढीस लागली होती. अनेक ब्रिटिश अधिकारी व इतिहासकार भारतीय वस्तू युरोपियन संग्रहालयांत व खासगी संग्रहांमध्ये पाठवत होते. लॉर्ड कर्झनने यास तीव्र विरोध केला आणि ऐतिहासिक वारसा देशातच जतन करण्यावर भर दिला. या धोरणामुळे भारतीय वस्तुवस्तुसंग्रहालये समृद्ध झाली व अनेक मौल्यवान वस्तू देशातच संरक्षित राहिल्या.

**प्राचीन स्मारक संरक्षण कायद्याचा भारतातील वस्तुसंग्रहालयांवर प्रभाव :**

या कायद्याच्या अंमलबजावणी नंतर भारतातील वस्तुसंग्रहालयेव ऐतिहासिक स्मारकांचे अधिक व्यापक संरक्षण सुरू झाले. सरकारी नियंत्रणाखाली अधिक संरक्षित स्मारके व वस्तुसंग्रहालये आली. भारतातील पुरातत्त्वीय संशोधनाला एक अधिकृत आधार मिळाला व उत्खननाच्या प्रक्रियेत शिस्त आणली गेली. भारतीय वारशाचे महत्त्व ओळखले गेले आणि त्यास परदेशात पाठवण्यावर निर्बंध आले. भारतात स्थळीय वस्तुसंग्रहालयांची संकल्पना अधिक दृढ झाली. भारतातील वस्तुसंग्रहालयांचा विकास हा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक बदलांशी निगडित आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश राजवटीत संग्रहालयांची संकल्पना विकसित होत असताना, स्वातंत्र्यानंतर ती अधिक व्यापक व संशोधनाधारित झाली. या प्रवासात वस्तुसंग्रहालये केवळ ऐतिहासिक वस्तूंचे जतन करणारी स्थळे न राहता संशोधन केंद्रे, पर्यटनस्थळे व सांस्कृतिक शिक्षणाचे महत्त्वाचे माध्यम बनली.

**भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा प्रभाव :**

इ. स. १९२८ ते १९४७ हा काळ भारतातील राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक घडामोडींमध्ये मोठ्या बदलांचा साक्षीदार ठरला. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा प्रभाव केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्याने भारतीय संस्कृती व वारशाच्या जतनाची जाणीवही वाढवली. स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात भारतीय जनतेला आपल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचे महत्त्व अधोरेखित झाले. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या क्रांतिकारकांनी केवळ विदेशी सत्ता दूर करण्याचा विचार केला नाही, तर भारताची संस्कृती व परंपरा टिकवण्यावरही भर दिला. या काळात भारतीय संस्कृतीचे जतन करण्यासाठी विविध प्रयत्न झाले. ब्रिटिश सत्तेखालील वस्तुसंग्रहालये व ऐतिहासिक स्थळे नव्याने तपासली जाऊ लागली. त्यातील मौल्यवान ऐतिहासिक अवशेष, शिल्पकला, हस्तलिखिते व प्राचीन ग्रंथ यांचे पुनरावलोकन करून त्यांचे योग्य संवर्धन करण्याचा प्रयत्न झाला. भारतीय अभ्यासकांनी व संशोधकांनी भारतीय इतिहासाच्या मूळ स्वरूपाचा अभ्यास करून तो जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

स्वातंत्र्यलढ्याच्या प्रभावामुळे भारतीय नागरिकांमध्ये आपल्या संस्कृतीबद्दल अभिमानाची भावना निर्माण झाली. विविध राज्यांनी व संस्थांनी ऐतिहासिक स्मारकांचे पुनरुज्जीवन करण्यास सुरुवात केली. यामुळे राष्ट्रीयत्वाची भावना अधिक दृढ झाली. स्वातंत्र्यानंतर वस्तुसंग्रहालये, ऐतिहासिक स्थळे व पुरातत्त्वीय अवशेषांचे महत्त्व वाढले, तसेच भारतीय संस्कृतीचा वारसा टिकवण्यासाठी सरकार व नागरिकांनी संयुक्तपणे प्रयत्न सुरू केले.एकंदरीत, भारतीय स्वातंत्र्यलढ्याने देशाला केवळ स्वातंत्र्य मिळवून दिले नाही, तर आपल्या सांस्कृतिक ओळखीचे रक्षण करण्यासाठी एक नवीन दिशा दिली, जी आजही प्रेरणादायी ठरते.

**कार्नेगी कॉर्पोरेशनची मदत आणि वस्तुसंग्रहालयांचे सर्वेक्षण १९३६ :**

भारतीय वस्तुसंग्रहालयांच्या विकासात १९३६ मध्ये न्यूयॉर्कमधील कार्नेगी कॉर्पोरेशनच्या मदतीने मोठी भूमिका पार पाडली. या संस्थेने भारतातील वस्तुसंग्रहालयांचे सर्वेक्षण करण्यासाठी आर्थिक सहाय्य प्रदान केले. यामुळे देशातील संग्रहालयांच्या स्थितीचा आढावा घेऊन त्यांच्या व्यवस्थापनासाठी ठोस उपाययोजना सुचवता आल्या. या सर्वेक्षणासाठी एम. पी. मार्खम व एच. हरग्रीप्स या तज्ज्ञांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी भारतातील विविध संग्रहालयांचा अभ्यास करून त्यांची सखोल माहिती संकलित केली. त्यांच्या अभ्यासाचा भाग म्हणून १०५ संग्रहालयांची माहिती संकलित करून ती प्रकाशित करण्यात आली. या अहवालामुळे संग्रहालयांच्या व्यवस्थापनात सुधारणा करण्यास मदत झाली.या सर्वेक्षणामुळे संग्रहालयांच्या जतन व संवर्धन प्रक्रियेत वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारला जाऊ लागला. संग्रहालयांमध्ये असलेल्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व कलात्मक वस्तूंचे जतन करण्यासाठी योग्य धोरणे तयार करण्यात आली. या अभ्यासातून मिळालेल्या निष्कर्षांमुळे संग्रहालयांची रचना, कार्यपद्धती आणि प्रदर्शनाचे स्वरूप अधिक प्रभावी करण्यास मदत झाली.

कार्नेगी कॉर्पोरेशनच्या या मदतीमुळे भारतीय वस्तुसंग्रहालय व्यवस्थापनाच्या आधुनिक प्रक्रियांना चालना मिळाली. त्यामुळे वस्तुसंग्रहालये ही केवळ ऐतिहासिक अवशेष ठेवण्याची जागा न राहता, लोकांना आपल्या संस्कृतीशी जोडणारे महत्त्वाचे केंद्र बनली. या सर्वेक्षणाने वस्तुसंग्रहालय क्षेत्रातील भविष्यातील

संशोधन व विकासाच्या दृष्टीने मोठी भूमिका बजावली. भारतीय वस्तुसंग्रहालयांच्या प्रशासकीय सुधारण्यात एम. पी. मार्खम व एच. हरग्रीप्स यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी भारतीय पुरातत्त्वीय सर्वेक्षण संस्थेच्या अंतर्गत सर्व वस्तुसंग्रहालयांना एकत्र आणण्याचा प्रस्ताव दिला. या प्रस्तावामुळे देशभरातील संग्रहालयांचे व्यवस्थापन अधिक संघटित व प्रभावी बनवता आले. त्यांच्या शिफारसीनुसार, भारतीय पुरातत्त्वीय सर्वेक्षण संस्थेच्या अंतर्गत एक नवीन विभाग स्थापन करण्यात आला, जो संग्रहालयांच्या देखरेखीचे कार्य पाहणार होता. या नव्या विभागामुळे वस्तुसंग्रहालय व्यवस्थापन अधिक नियोजनबद्ध झाले आणि वस्तुसंग्रहालयांच्या संशोधन, संरक्षण आणि व्यवस्थापन प्रक्रियांमध्ये सुधारणा झाली. यामुळे ऐतिहासिक अवशेष आणि कलात्मक वस्तूंचे अधिक प्रभावी संवर्धन होऊ लागले. या सुधारणा केवळ प्रशासकीय पातळीवरच नव्हत्या, तर त्यांनी भारतीय सांस्कृतिक वारशाच्या संवर्धनासही गती दिली. संग्रहालयांचे दस्तऐवजीकरण, ऐतिहासिक वस्तूंचे वर्गीकरण व त्यांच्या योग्य जतनासाठी आधुनिक तंत्रांचा अवलंब करण्यास सुरुवात झाली.

**भारतीय वस्तुसंग्रहालय व्यवस्थापनातील एक मैलाचा दगड–भारतीय वस्तुसंग्रहालय परिषद (१९४४) :**

भारतातील वस्तुसंग्रहालयांच्या अधिक चांगल्या व्यवस्थापनासाठी व त्यांच्या विकासाला गती देण्यासाठी इ.स. १९४४ मध्ये 'भारतीय वस्तुसंग्रहालय परिषद' (Indian Museum Association) ची स्थापना करण्यात आली. भारतीय पुरातत्त्वीय अभ्यासक व वस्तुसंग्रहालय व्यवस्थापनात आस्था असलेल्या तज्ज्ञांनी या संस्थेची संकल्पना मांडली. या संस्थेचा मुख्य उद्देशभारतीय संग्रहालयांच्या विकासाला चालना देणेहा होता. भारतातील विविध संग्रहालयांना एकत्र आणून त्यांचे संशोधन, व्यवस्थापन व प्रशासन अधिक शास्त्रीय आणि प्रणालीबद्ध करण्यावर भरदिला गेला. परिषदेमार्फत संग्रहालयांतील ऐतिहासिक वस्तूंचे जतन व संवर्धन अधिक वैज्ञानिक पद्धतीने करण्यासाठी नव्या तंत्रांचा अवलंबकरण्यात आला. यामुळे वस्तुसंग्रहालये केवळ ऐतिहासिक अवशेष संग्रहित करणारी केंद्रे न राहता, संशोधन व शैक्षणिक अभ्यासासाठी महत्त्वाची संसाधने बनली. शिवाय, भारतीय संस्कृती व इतिहासाशी संबंधित वस्तूंचे दस्तऐवजीकरण करण्यासही मोठे प्रोत्साहन मिळाले. ऐतिहासिक दस्तऐवज, हस्तलिखिते, शिल्पकृती व कलात्मक वस्तू यांचे व्यवस्थित वर्गीकरण करून वस्तुसंग्रहालय व्यवस्थापन अधिक आधुनिक व उपयुक्त बनवण्याचा प्रयत्न झाला. भारतीय वस्तुसंग्रहालय परिषदेच्या स्थापनेमुळे देशातील संग्रहालयांना अधिक संघटित व वैज्ञानिक दृष्टिकोन मिळाला. त्यामुळे भारतीय ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाच्या संवर्धनाला अधिक बळकटी मिळाली, जी आजही भारतीय वस्तुसंग्रहालय व्यवस्थापनाच्या मूलभूत तत्वांपैकी एक मानली जाते.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ :**

**बहूपर्यायी प्रश्न :**

१) ब्रिटिश राजवटीत भारतात वस्तुसंग्रहालये स्थापन करण्यास ब्रिटिशांनी प्रोत्साहन का दिले?

अ) भारतीय लोकांना मनोरंजन मिळावे म्हणून

ब) भारतीय संस्कृतीचा अभ्यास व वसाहती साम्राज्याला बळकट करण्यासाठी

क) युरोपियन वस्तूंचे प्रदर्शन करण्यासाठी

ड) भारतीय राजांना संतुष्ट ठेवण्यासाठी

२) प्राचीन भारतात 'चित्रशाळा' संकल्पना कशाशी संबंधित होती?

अ) धान्याचा संग्रह

ब) राजवाड्यांमध्ये चित्रकला, शिल्पकला व ऐतिहासिक सामग्रीचे प्रदर्शन

क) धार्मिक विधींची जागा

ड) शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण केंद्र

३) मुघल सम्राट अकबरने कशाची निर्मिती केली?

अ) शस्त्रसंग्रह ब) दुर्मिळ रत्नांचा संग्रह क) हम्जानामा चित्रसंग्रह ड) प्राणीसंग्रहालय

४) भारतातील पहिले आधुनिक वस्तुसंग्रहालय 'इंडियन म्युझियम' (कोलकाता) कोणत्या वर्षी स्थापन करण्यात आले?

अ) १७९६ ब) १८१० क) १८१४ ड) १८६१

५) 'इंडियन म्युझियम' (कोलकाता) च्या स्थापनेत कोणी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि पहिले अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले?

अ) सर अलेक्झांडर कनिंगहॅम ब) लॉर्ड कर्झन

क) डॉ. नाथानिल वॉलिच ड) जॉन मार्शल

६) 'बंगाल रेग्युलेशन ॲक्ट' १८१० चे कलम १९ कशाशी संबंधित होते?

अ) नवीन इमारतींच्या बांधकामावर बंदी

ब) ऐतिहासिक अवशेष व प्राचीन वास्तूंची हानी करण्यास कायदेशीर बंदी

क) मौल्यवान वस्तूंच्या विक्रीला परवानगी

ड) शिकार करण्यावर निर्बंध

७) इ.स. १८६१ मध्ये स्थापित 'भारतीय पुरातत्त्वीय संरक्षण संस्थेमचे (ASI) पहिले संचालक कोण होते?

अ) लॉर्ड कॅनिंग ब) लॉर्ड लिटन

क) सर अलेक्झांडर कनिंगहॅम ड) जॉन मार्शल

८) 'इंडियन ट्रेजर ट्रोव्ह ॲक्ट' १८७८ नुसार किती रुपयांपेक्षा अधिक मूल्य असलेल्या पुरातत्त्वीय वस्तू सापडल्यास सरकार त्यावर हक्क सांगू शकते?

अ) ५०० रुपये ब) १००० रुपये

क) २००० रुपये ड) ५००० रुपये

९) जॉन मार्शल यांनी कोणत्या प्रकारच्या वस्तुसंग्रहालये स्थापन करण्याची संकल्पना प्रथम मांडली?

अ) प्रादेशिक वस्तुसंग्रहालये    ब) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालये

क) स्थळीय वस्तुसंग्रहालये    ड) खाजगी वस्तुसंग्रहालये

१०) भारतीय वस्तुसंग्रहालयांच्या विकासात १९३६ मध्ये कोणत्या संस्थेने आर्थिक सहाय्य प्रदान केले होते?

अ) फोर्ड फाउंडेशन    ब) रॉकमे लर फाउंडेशन

क) कार्नेगी कॉर्पोरेशन    ड) बिल अँड मेलिंडा गेट्स फाउंडेशन

### २.२.३ समकालीन भारत :

**समकालीन भारतातील संग्रहालय चळवळ:**

भारतीय स्वातंत्र्यानंतर संग्रहालयांचे स्वरूप व महत्त्व अधिक व्यापक झाले. यापूर्वी केवळ ऐतिहासिक अवशेष जतन करणाऱ्या या संस्थांना आता भारतीय संस्कृती व वारशाच्या संवर्धनाची मुख्य केंद्रे म्हणून ओळख मिळाली. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश प्रशासनाच्या आधिपत्याखाली असलेली वस्तुसंग्रहालये आता स्वतंत्र भारताच्या राष्ट्रीय गौरवाचा भाग बनली.

१) भारतीय पुरातत्त्वीय सर्वेक्षण संस्थेने वस्तुसंग्रहालय व्यवस्थापन अधिक प्रभावी बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. संग्रहालयांमधील ऐतिहासिक व सांस्कृतिक वस्तूंच्या संवर्धनासाठी आधुनिक तंत्रांचा अवलंब करण्यात आला.

२) भारतातील महत्त्वाच्या संग्रहालयांना राष्ट्रीय संग्रहालयाचा दर्जा देऊन त्यांचे शास्त्रीय व्यवस्थापन सुरू करण्यात आले. यामुळे ते केवळ ऐतिहासिक वस्तू संग्रहित करणारी स्थळे न राहता, शैक्षणिक व संशोधन केंद्रे म्हणून विकसित झाली.

३) संग्रहालयांमध्ये संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम व प्रदर्शन यांचे आयोजन केले गेले. यामुळे इतिहास, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र व कलासंस्कृती यांच्या अभ्यासाला चालना मिळाली.

स्वातंत्र्यानंतर भारतीय संग्रहालयांची संकल्पना केवळ ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या स्थळांपुरती मर्यादित राहिली नाही, तर ती संशोधन, शिक्षण व सांस्कृतिक जतनाची महत्त्वपूर्ण केंद्रे बनली.त्यामुळे संग्रहालयांना अधिक वैज्ञानिक दृष्टिकोन प्राप्त झाला. भारतीय संस्कृतीच्या संवर्धनाला एक नवी दिशा मिळाली.

**नव्या संग्रहालयांची स्थापना (१९५०–१९७०) :**

भारतीय स्वातंत्र्यानंतर संग्रहालयांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. १९५० ते १९७० या कालखंडात अनेक महत्त्वाच्या संग्रहालयांची स्थापना झाली, ज्यामुळे ऐतिहासिक, वैज्ञानिक व कलात्मक वारशाच्या जतनाला चालना मिळाली. या संग्रहालयांनी केवळ ऐतिहासिक वस्तूंचे संरक्षण केले नाही, तर भारतीय संस्कृतीचा वारसा नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे कार्यही केले.

**महत्त्वाची वस्तुसंग्रहालये:**

**१) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, नवी दिल्ली :** भारतातील सर्वात महत्त्वाच्या संग्रहालयांपैकी एक असलेल्या

राष्ट्रीय संग्रहालयाची स्थापना १९४९ मध्ये झाली. येथे पुरातत्त्वीय अवशेष, ऐतिहासिक दस्तऐवज, हस्तकला आणि विविध ऐतिहासिक वस्तूंचा समृद्ध संग्रह आहे.

**२) प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई (सध्याचे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय):** मुंबईतील हे वस्तुसंग्रहालय भारतीय तसेच जागतिक कलासंस्कृतीचे महत्त्वपूर्ण केंद्र आहे. येथे भारताच्या मध्ययुगीन आणि आधुनिक इतिहासाशी संबंधित दुर्मिळ वस्तू संग्रहित आहेत.

**३) भारतीय विज्ञान वस्तुसंग्रहालय, कोलकाता :** हा भारतातील पहिला वैज्ञानिक संग्रहालयांपैकी एक असून विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील संशोधनाला चालना देणारे केंद्र आहे. येथे विविध वैज्ञानिक उपकरणे, संशोधन नमुने आणि तांत्रिक प्रदर्शन आयोजित केली जातात.

**४) सालारजंग वस्तुसंग्रहालय, हैदराबाद :** सालारजंग वस्तुसंग्रहालय हे भारतातील सर्वात मोठ्या वैयक्तिक संग्रहांपैकी एक आहे. १९५१ मध्ये स्थापन झालेल्या या संग्रहालयात विविध देशांतील चित्रे, वस्त्रे, हस्तलिखिते आणि ऐतिहासिक वस्तूंचा अनमोल संग्रह आहे.

या संग्रहालयांच्या स्थापनेमुळे भारतीय इतिहास, संस्कृती व विज्ञानाच्या संवर्धनाला अधिक गती मिळाली. त्यांच्यामुळे लोकशिक्षण आणि ऐतिहासिक संशोधनाला नवी दिशा मिळाली. भारताचा सांस्कृतिक वारसा जपण्याच्या प्रयत्नांना अधिक बळकटी मिळाली.

**स्वातंत्र्योत्तर काळातील वस्तुसंग्रहालयांचा विकास :**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर देशातील वस्तुसंग्रहालयांच्या विकासाला वेग आला. संशोधन, ऐतिहासिक वारशाचे जतन, शिक्षण व पर्यटन यांना चालना देण्यासाठी वस्तुसंग्रहालये महत्त्वाची ठरली. विशेषतः संस्थानिक राजवटींचे विलिनीकरण, राष्ट्रीय व राज्यस्तरीय संग्रहालयांची स्थापना, पुरातत्त्वीय कायद्यांचे पुनर्रचना यामुळे वस्तुसंग्रहालयांची संख्या आणि गुणवत्ता वाढली.

**संस्थानिक राजवटींचे विलिनीकरण आणि वस्तुसंग्रहालयांचा विकास :**

इ. स. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतर, देशभरातील ५६५ देशी संस्थानांचे भारतात विलिनीकरण करण्यात आले. यामुळे संस्थानिक राजे-महाराजे आणि नवाब यांचे स्वायत्त प्रशासन संपले. त्यांच्या सर्व अधिकारांचे हस्तांतरण भारत सरकारकडे झाले. या प्रक्रियेसाठी सरदार वल्लभभाई पटेल व व्ही. पी. मेनन यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विलिनीकरणानंतर संस्थानिकांच्या राजवाडे, किल्ले व खाजगी संग्रह यांचे भविष्यातील उपयोग ठरवण्याची आवश्यकता निर्माण झाली. या प्रक्रियेत काही राजवाडे व महाल यांना संग्रहालयांमध्ये रूपांतरित करण्यात आले, ज्यामुळे ते सार्वजनिक वारसास्थळे बनले.

**संस्थानिक वारशाचे संग्रहालयांमध्ये रूपांतर:**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर अनेक राजघराण्यांनी स्वतःच्या कलेचा व सांस्कृतिक वारशाचा संग्रह जतन करण्यासाठी वस्तुसंग्रहालये स्थापन केली. संस्थानिकांच्या महालांमध्ये असलेल्या ऐतिहासिक वस्त्रप्रकार, दागिने, शस्त्रास्त्रे आणि दुर्मिळ हस्तलिखिते यांचे संवर्धन करण्यात आले. या संग्रहालयांनी भारताच्या राजेशाही

काळातील समृद्ध वारशाचे दर्शन घडवले. संस्थानिकांना सरकारकडून राजकीय भत्ता अथवा खाजगी पेन्शन (Privy Purse) म्हणून दरमहा भत्ते दिले जात होते. मात्र, इंदिरा गांधी सरकारने १९७१ मध्ये हे भत्ते पूर्णपणे बंद करून संस्थानिक सवलतीही रद्द केल्या. यामुळे बऱ्याच संस्थानिकांनी स्वतःच्या खाजगी संग्रहाचे वस्तुसंग्रहालयांमध्ये रूपांतर करून त्या ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यास सुरुवात केली.

**संस्थानिक वस्तुसंग्रहालयांचे महत्त्व:**

संस्थांनिकांच्या वस्तुसंग्रहालयांमुळे भारताच्या राजेशाही संस्कृतीचा अभ्यास करण्यास मदत झाली. संस्थानिक कालखंडातील कला, शिल्पे व सांस्कृतिक वारसा लोकांसाठी खुले झाले. अनेक राजवाडे आज ऐतिहासिक पर्यटन स्थळे बनली आहेत, ज्यामुळे संस्कृतीच्या संवर्धना सोबतच पर्यटन क्षेत्रालाही चालना मिळाली. संस्थानिक राजवटींच्या विलिनीकरणामुळे भारतीय इतिहासाचा एक महत्त्वाचा टप्पा संपला, पण त्याचबरोबर त्यांच्या समृद्ध वारशाचे संरक्षण आणि संवर्धन वस्तुसंग्रहालयांमधून पुढे सुरू राहिले.

इ. स. १९७१ मध्ये राजकीय भत्ता अथवा खाजगी पेन्शनबंद केल्यानंतर संस्थानिकांना मिळणारा आर्थिक आधार समाप्त झाला. परिणामी, अनेक राजवाड्यांची देखभाल करणे कठीण झाले. त्यामुळे संस्थानिकांनी आपले राजवाडे हॉटेल्स किंवा वस्तुसंग्रहालयांमध्ये रूपांतरित करण्याचा मार्ग निवडला. यामुळे या ऐतिहासिक वास्तूंचे संरक्षण होण्यास मदत झाली व त्यांचा सांस्कृतिक व आर्थिक दृष्टिकोनातून योग्य उपयोग होऊ लागला. उदा.

**१) सिटी पॅलेस वस्तुसंग्रहालय जयपूर :** जयपूर राजघराण्याने सिटी पॅलेसचा एक भाग वस्तुसंग्रहालय म्हणून विकसित केला. येथे महाराजा सवाई मानसिंग यांच्या कारकिर्दीशी संबंधित राजेशाही पोशाख, अस्त्र-शस्त्रे व हस्तकला वस्तूसंरक्षित आहेत.

**२) उम्मेद भवन वस्तुसंग्रहालय जोधपूर :** उम्मेद भवन राजवाड्याचा काही भाग संग्रहालयामध्ये रूपांतरित करण्यात आला. येथे मारवाड राजघराण्याचा इतिहास, दुर्मिळ वस्त्रसंग्रह व राजेशाही जीवनशैलीशी संबंधित वस्तूपाहायला मिळतात.

**३) जयविलास पॅलेस वस्तुसंग्रहालय ग्वाल्हेर :** शिंदे घराण्याच्या जयविलास पॅलेसचा काही भाग संग्रहालयात बदलण्यात आला, जिथे प्राचीन फर्निचर, युरोपियन कलाकृती आणि राजेशाही वाहनांचा मोठा संग्रह आहे.

**४) चौमहल्ला पॅलेस वस्तुसंग्रहालय हैदराबाद :** हैदराबादच्या निजामांनी चौमहल्ला पॅलेसचा एक भाग वस्तुसंग्रहालय म्हणून विकसित केला. येथे निजामांच्या दरबारातील शाही पोशाख, तलवारी, आलिशान फर्निचरचे प्रदर्शन आहे.

**संस्थानीक संग्रहालयांचे महत्त्व :**

संस्थांनिकांच्या वस्तुसंग्रहालयांनी संस्थानिक जीवनशैली, शाही परंपरा व सांस्कृतिक वारशाचे संवर्धन

केले. ऐतिहासिक वास्तूंचे पर्यटन स्थळांमध्ये रूपांतर झाल्यामुळे पर्यटन व अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. लोकांना संस्थानिक इतिहास व त्याच्या समृद्ध वारशाची जवळून ओळख होऊ लागली. राजवाड्यांचे वस्तुसंग्रहालयांमध्ये रूपांतर केल्यामुळे भारतीय संस्कृती, इतिहास व संस्थानिक परंपरांचे दस्तऐवजीकरण व जतन शक्य झाले.

**वस्तुसंग्रहालयांमध्ये ऐतिहासिक वारशाचे जतन:**

संस्थानिक राजवाड्यांचे वस्तुसंग्रहालयांमध्ये रूपांतर झाल्यामुळे भारतीय ऐतिहासिक वास्तू व सांस्कृतिक वारशाचे संरक्षण शक्य झाले. संस्थानिकांनी आपल्या पूर्वजांचा ऐतिहासिक ठेवा लोकांसमोर सादर करण्यासाठी वस्तुसंग्रहालये स्थापन केली.

**वारसा संवर्धनाचे महत्त्व:**

ऐतिहासिक वस्तूंच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीची समृद्ध परंपरा पुढील पिढ्यांसाठी उपलब्ध झाली. संशोधक, विद्यार्थी व इतिहासप्रेमी यांना प्राचीन भारताचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वपूर्ण स्रोत मिळाले. या संग्रहालयांमुळे पर्यटनाला चालना मिळाली व स्थानिक अर्थव्यवस्थेला मदत झाली. ऐतिहासिक घटनांचा सखोल अभ्यास आणि संशोधनासाठी आवश्यक असलेले दस्तऐवज संरक्षित राहिले. राजवाड्यांचे वस्तुसंग्रहालयांमध्ये रूपांतर केल्यामुळे भारताचा ऐतिहासिक वारसासंवर्धित व संरक्षित राहिला. यामुळे भारतीय संस्कृतीच्या समृद्धतेचे दर्शन होत असून, ती पुढील पिढ्यांसाठी अमूल्य ठेवा ठरत आहे.

**वस्तुवस्तुसंग्रहालय परिषद १९५५ :**

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने भारतीय संस्कृती व ऐतिहासिक वारशाच्या जतनाला महत्त्व देऊन वस्तुसंग्रहालयांच्या विकासासाठी ठोस पावले उचलली. यासाठी इ. स. १९५५ मध्ये तज्ज्ञांची परिषद बोलावण्यात आली, ज्यामध्ये नव्या वस्तुसंग्रहालयांची स्थापना व जुन्या वस्तुसंग्रहालयांच्या फेररचनेवर चर्चा करण्यात आली. भारतीय संस्कृती, कला, परंपरा व ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यासाठी राष्ट्रीय, राज्य, प्रादेशिक व स्थानिक पातळीवर वस्तुवस्तुसंग्रहालये स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली.

**१) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालये :** भारतीय संस्कृतीचा व्यापक वारसा जतन करण्यासाठी राष्ट्रीय वस्तुसंग्रहालये उभारण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. यामुळे देशातील विविध राजवंश, शिल्पकला, पेंटिंग्स, ऐतिहासिक हत्यारे आणि वस्त्रसंग्रह एका ठिकाणी पाहता येतात. उदा. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, नवी दिल्ली (इ. स. १९४९) येथे भारतातील विविध संस्कृतींशी संबंधित पुरातत्त्वीय अवशेष आणि ऐतिहासिक वस्तू संग्रहित आहेत.

**२) राज्य वस्तुसंग्रहालये :** प्रत्येक राज्याच्यासंस्कृती, इतिहास आणि परंपरांचे दर्शन घडवणाऱ्या संग्रहालयांची निर्मितीकरण्याची गरज ओळखली गेली. उदा. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई येथे मराठा इतिहासाशी संबंधित शस्त्रसामग्री, वस्त्रप्रकार, प्राचीन शिल्पे पाहायला मिळतात.

**३) प्रादेशिक वस्तुसंग्रहालये :** विशिष्ट प्रदेशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांवर प्रकाश

टाकणारी वस्तुसंग्रहालये उभारण्याची शिम ।रस करण्यात आली. यामध्ये त्या भागातील विशेष परंपरा, हस्तकला व लोकजीवनाचे प्रदर्शन केले जाते. उदा. बिहार म्युझियम, पाटणा येथे बिहारच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचा संग्रह आहे.

**४) स्थानिक वस्तुसंग्रहालये :** स्थानिक वारसा व जीवनशैली दर्शवणाऱ्या लहान संग्रहालयांची निर्मिती करण्यावर भरदेण्यात आला. यामुळे त्या भागातील लोकसंस्कृती जतन करण्यास मदत झाली. उदा. जयपूर सिटी पॅलेस वस्तुसंग्रहालय जयपूरच्या राजघराण्याशी संबंधित मौल्यवान वस्तू व कलाकृती येथे संरक्षित आहेत.

**सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑम म्युझियम्स १९५६ :**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारतीय संस्कृतीचे जतन व वस्तुसंग्रहालयांच्या विकासासाठी सरकारने ठोस उपाययोजना केल्या. या उद्देशाने इ. स. १९५६ मध्ये 'सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ म्युझियम्स'ची स्थापना करण्यात आली.

**सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ म्युझियम्सची उद्दिष्टे :**

सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ म्युझियम्स ही भारतातील वस्तुसंग्रहालयांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणारी सल्लागार समिती होती. तिच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होता. यामध्ये वस्तुसंग्रहालयांच्या विकासासाठी धोरणे ठरवणे व त्यांच्या अंमलबजावणीस मदत करणे. नवीन वस्तुसंग्रहालये स्थापन करणे व विद्यमान संग्रहालयांचे आधुनिकीकरण करण्यासाठी मार्गदर्शन करणे. संशोधन व शिक्षणाला चालना देण्यासाठी वस्तुसंग्रहालये अधिक व्यावसायिक बनवण्याच्या उपाययोजना सुचवणे.

**सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑम म्युझियम्सचे महत्त्व :**

सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ म्युझियम्सच्या शिफारसीनुसार भारत सरकारने संग्रहालयांसाठी विविध आर्थिक योजना राबवल्या. वस्तुसंग्रहालयांचे संवर्धन, संशोधन व व्यवस्थापन अधिक प्रभावी झाले. संग्रहालयांना केवळ ऐतिहासिक वस्तू जतन करणारी ठिकाणे न ठेवता शैक्षणिक, पर्यटन व सांस्कृतिक केंद्रे म्हणून विकसित करण्यात आले. वस्तुसंग्रहालये पर्यटकांसाठी आकर्षण केंद्रे बनली, ज्यामुळे सांस्कृतिक वारशाच्या संवर्धनास मदत झाली. सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑम म्युझियम्समुळे भारतीय वस्तुसंग्रहालय प्रणाली अधिक आधुनिक, अभ्यासपूर्ण व जागतिक दर्जाची बनली, ज्याचा मोठा फायदा भारतीय इतिहास व संस्कृतीच्या संवर्धनासाठी झाला.

**प्राचीन स्मारक व पुरातत्त्वीय स्थळ संरक्षण कायदा १९५९ :**

भारताचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा अत्यंत समृद्ध असून, पुरातत्त्वीय स्थळे आणि प्राचीन स्मारके यांचा भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे स्थळे केवळ ऐतिहासिक नोंदी नसून, ते भारतीय संस्कृतीचा आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण व जतन करण्यासाठी भारत सरकारने 'प्राचीन ऐतिहासिक स्मारक व पुरातत्त्वीय स्थळ संरक्षण कायदा, १९५९' लागू केला. या कायद्याचा उद्देश प्राचीन स्थळे, वास्तू, ऐतिहासिक अवशेषांचे योग्य प्रकारे संवर्धन व संरक्षण करणे हा होता.

१) या कायद्यामुळे अनधिकृत उत्खनन रोखले गेले. ऐतिहासिक स्थळांचे जतन व संवर्धन अधिक प्रभावी झाले. पुरातत्वीय संशोधन व उत्खनन यासाठी परवानगीची सक्ती करण्यात आली. त्यामुळे ऐतिहासिक स्थळांचे मूळ स्वरूप कायम ठेवण्यास मदत झाली.

२) महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना 'राष्ट्रीय स्मारक' म्हणून मान्यता देण्यात आली. यामुळे सरकारतर्फे विशेष संरक्षण व निधी देण्यास मदत झाली. ताजमहाल, कोणार्क सूर्य मंदिर, अजंठा, वेरूळ लेणी यासारख्या स्थळांचे संरक्षण बळकट झाले.

३) कायद्यामुळे मूळ सौंदर्य आणि ऐतिहासिक वास्तूंचा संरक्षक दर्जा कायम ठेवण्यास मदत झाली. जुन्या मंदिरांवरील कोरीव काम, गुंफा व ऐतिहासिक वास्तू यांचे संवर्धन शक्य झाले. कोणत्याही ऐतिहासिक स्थळाच्या संरचनात्मक बदलांवर कायदेशीर निर्बंध घालण्यात आले.

४) ऐतिहासिक वस्तू नष्ट करणाऱ्या अथवा नुकसान करणाऱ्या व्यक्तींना तीन महिने कारावास अथवा ५,००० पर्यंत दंडाची शिक्षा देण्याची तरतूद आहे. ऐतिहासिक स्मारकांवर कोणत्याही प्रकारचा गैरवापर अथवा अतिक्रमण केल्यास कायदेशीर कारवाईची तरतूद आहे.

**सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ म्युझियम्सची परिषद व महत्व १९६६ :**

भारताच्या सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणासाठी व वस्तुसंग्रहालयांच्या विकासासाठी 'सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ म्युझियम्स'ची स्थापना करण्यात आली. ६ जानेवारी १९६६ रोजी पुणे येथे एक विशेष परिषद आयोजित करण्यात आली, ज्यात पुढील महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

१) या परिषदेत वस्तुसंग्रहालये ही केवळ ऐतिहासिक वस्तूंचे संग्रहण करणारी ठिकाणे न राहता, लोकांसाठी ज्ञान, शिक्षण व मनोरंजनाची केंद्रे असावीत, अशी मागणी करण्यात आली. यामुळे वस्तुसंग्रहाल यांना संशोधन व लोकशिक्षणाचा भाग म्हणून अधिक महत्त्वप्राप्त झाले.

२) 'इंडियन ट्रेड युनियन ॲक्ट (१९२६)' व 'मनोरंजन कर' यापासून वस्तुसंग्रहालयांना सूट देण्याचा निर्णय सरकारने घेतला. यामुळे वस्तुसंग्रहालयांचा आर्थिक भार कमी झाला व त्यांचा विकास अधिक सुलभ झाला.

**दुर्मिळ वस्तूं संरक्षण व तस्करी विरोधी कायदा १९७२ :**

भारत हा समृद्ध ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाने परिपूर्ण देश आहे. मात्र, अनेक दशकांपासून प्राचीन मूर्ती, नाणी, हस्तलिखिते, कलाकृतींची चोरी व तस्करी मोठ्या प्रमाणावर होत होती. अनेक मौल्यवान वस्तूपरदेशी बाजारात विकल्या जात होत्या.याला आळा घालण्यासाठी व ऐतिहासिक वारसाचे संरक्षण करण्यासाठी "Antiquities and Art Treasures Act, 1972" हा कायदा लागू करण्यात आला.

**१) कायद्याची गरज व उद्दीष्टे :**

इ. स. १९७२ पूर्वी अनेक मौल्यवान ऐतिहासिक वस्तू अनधिकृतरीत्या परदेशात पाठविण्यात आल्या

होत्या. या तस्करीला आळा घालण्यासाठी भारत सरकारने हा कायदा आणला. भारतीय ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे. भारतीय वस्तूंची तस्करी रोखण्यासाठी कठोर नियम लागू करणे. पुरातन वस्तूंच्या विक्री, खरेदी व निर्यातीवर नियंत्रण ठेवणे. ऐतिहासिक वस्तूंच्या जतनासाठी आणि नोंदणीसाठी प्रक्रिया निश्चित करणे.

**२) दुर्मिळ/पुरातनवस्तूची व्याख्या:**

कायद्यानुसार खालील वस्तूंना 'दुर्मिळ / पुरातनकालीन म्हणून मान्यता देण्यात आली. इतिहासास महत्त्व असलेल्या कोणत्याही वस्तू. गुंफा अथवा ऐतिहासिक वास्तूंमधील कोरीव शिल्पे व अवशेष. यामध्ये नाणी, शिल्पे, चित्रे व कोरीव लेख. वैज्ञानिक, साहित्यिक, सांस्कृतिक, धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे हस्तलिखिते व हस्तकला इत्यादींचा समावेश होता. ७५ वर्षांपेक्षा जुनी कोणतीही ऐतिहासिक नोंद अथवा कागदपत्र.

**३) कायद्याचा परिणाम व फायदे :**

१) पुरातन वस्तूंच्या विक्री, खरेदी अथवा निर्यातीसाठी अधिकृत परवाना अनिवार्य करण्यात आला. परिणामी, भारतीय ऐतिहासिक वस्तूंच्या तस्करीला मोठ्या प्रमाणावर आळा बसला.

२) पुरातन वस्तूंचे नोंदणीकरण सक्तीचे केल्यामुळे वस्तुसंग्रहालयांचे संरक्षण अधिक प्रभावी झाले. अनेक महत्त्वाच्या वस्तूराष्ट्रीय व राज्य संग्रहालयांमध्ये ठेवण्यात आल्या.

३) ऐतिहासिक नोंदी, प्राचीन ग्रंथ व हस्तकलेच्या जतनासाठी सरकारने विशेष प्रयत्न केले. मंदिरे आणि ऐतिहासिक स्थळांमधील मूर्ती व शिल्पकला यांचे संरक्षण सुनिश्चित करण्यात आले.

**वस्तुसंग्रहालयांच्या विभागणीचे नवे स्वरूप :**

स्वातंत्र्यानंतर भारतात वस्तुसंग्रहालयांच्या पुनर्रचनेला गती मिळाली. यामुळे संग्रहालयांचे कार्यक्षेत्र वाढले आणि त्यांची वर्गवारी अधिक स्पष्ट झाली. वस्तुसंग्रहालये केवळ ऐतिहासिक वस्तूंचे जतन करणारी ठिकाणे न राहता, शिक्षण, संशोधन व विज्ञानाच्या प्रचारासाठी महत्त्वाचे केंद्र बनली.

**१) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालये :** भारतातील संस्कृती, परंपरा, इतिहास व वारशाचे संरक्षण आणि सादरीकरण करण्यासाठी राष्ट्रीय वस्तुसंग्रहालये स्थापन करण्यात आली. उदा. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, नवी दिल्ली येथे मौर्य, गुप्त, मुघल, ब्रिटिश काळातील ऐतिहासिक वस्तूंचे जतन करण्यात आले आहे.

**२) राज्य वस्तुसंग्रहालये :** प्रत्येक राज्याच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक व कलात्मक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणारी वस्तुसंग्रहालये आहेत. उदा. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई येथे महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा प्रदर्शित केला आहे.

**३) पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालये :** उत्खननातून सापडलेल्या ऐतिहासिक वस्तूंच्या जतनासाठी ही वस्तुसंग्रहालये

महत्त्वाची भूमिका बजावतात. उदा. सारनाथ वस्तुसंग्रहालय, वाराणसी येथे सम्राट अशोकाच्या काळातील शिल्पकृती, बौद्ध अवशेष आणि स्तूपाचे अवशेष ठेवण्यात आले आहेत.

**४) कला वस्तुसंग्रहालये :** चित्रकला, हस्तकला, शिल्पकला आणि वास्तुकलेच्या संरक्षणासाठी विशेषतः कला वस्तुसंग्रहालये स्थापन करण्यात आली. उदा. सालारजंग वस्तुसंग्रहालय, हैदराबाद येथे जगभरातील दुर्मिळ चित्रे, मूर्ती आणि हस्तकलेच्या वस्तूंचा समावेश आहे.

**५) विज्ञान व तंत्रज्ञान वस्तुसंग्रहालये :** विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीस चालना देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी विज्ञान वस्तुसंग्रहालये स्थापन करण्यात आली. उदा. नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई येथे वैज्ञानिक प्रयोग, अंतराळ तंत्रज्ञान, ऊर्जा व नवनवीन संशोधन यासंदर्भात माहिती दिली जाते.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ :**

**बहूपर्यायी प्रश्न :**

१) स्वातंत्र्यानंतर भारतीय संग्रहालयांना कोणत्या भूमिकेत ओळख मिळाली?

अ) केवळ मनोरंजनाची केंद्रे

ब) केवळ ऐतिहासिक अवशेष जतन करणाऱ्या संस्था

क) भारतीय संस्कृती व वारशाच्या संवर्धनाची मुख्य केंद्रे

ड) परकीय वस्तूंचे प्रदर्शन करणारी ठिकाणे

२) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय नवी दिल्ली, याची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

अ) १९४७ ब) १९४९ क) १९५० ड) १९५१

३) सध्याच्या छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचे जुने नाव काय होते?

अ) भारतीय विज्ञान वस्तुसंग्रहालय ब) सालारजंग वस्तुसंग्रहालय

क) प्रिन्स ऑम वेल्स म्युझियम ड) व्हिक्टोरिया मेमोरियल

४) सालारजंग वस्तुसंग्रहालय हैदराबाद हे कशासाठी ओळखले जाते?

अ) भारतातील पहिले वैज्ञानिक संग्रहालय ब) भारतातील सर्वात मोठे वैयक्तिक संग्रह

क) केवळ पुरातत्त्वीय अवशेषांचा संग्रह ड) भारतीय हस्तकलेचे विशेष प्रदर्शन

५) भारतीय स्वातंत्र्यानंतर किती देशी संस्थानांचे भारतात विलिनीकरण करण्यात आले?

अ) ४०० ब) ५०० क) ५६५ ड) ६००

६) संस्थानिकांना मिळणारे राजकीय भत्ता (Privy Purse) इंदिरा गांधी सरकारने कोणत्या वर्षी पूर्णपणे बंद केले?

अ) १९६५ ब) १९६९ क) १९७१ ड) १९७५

७) जयपूर सिटी पॅलेस वस्तुसंग्रहालय कशाचे उदाहरण आहे?

अ) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय ब) राज्य वस्तुसंग्रहालय

क) स्थानिक वस्तुसंग्रहालय (संस्थानिक राजवाड्यांचे रूपांतर)

ड) पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय

८) भारतीय वस्तुसंग्रहालयांच्या विकासासाठी १९५५ मध्ये बोलावलेल्या परिषदेतील मुख्य शिम ारस काय होती?

अ) केवळ राष्ट्रीय वस्तुसंग्रहालये उभारणे

ब) राष्ट्रीय, राज्य, प्रादेशिक व स्थानिक पातळीवर वस्तुसंग्रहालये स्थापन करणे

क) खाजगी संग्रहालयांना प्रोत्साहन देणे

ड) केवळ विज्ञान संग्रहालये स्थापन करणे

९) 'सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ म्युझियम्स'ची स्थापना कोणत्या वर्षी करण्यात आली?

अ) १९४९ ब) १९५५ क) १९५६ ड) १९६६

१०) "Antiquities and Art Treasures Act, 1972" हा कायदा कोणत्या प्रमुख उद्देशाने लागू करण्यात आला?

अ) नवीन वस्तूंच्या खरेदी-विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी

ब) ऐतिहासिक वस्तूंची तस्करी रोखण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी

क) फक्त सरकारी संग्रहालयांना वस्तू जमा करण्याचा अधिकार देण्यासाठी

ड) जुन्या इमारतींच्या नूतनीकरणाला चालना देण्यासाठी

## २.३ सारांश :

वस्तुसंग्रहालय चळवळ जगभरात प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. प्राचीन ग्रीस, रोम, इजिप्त आणि चीनमध्ये राजे व विद्वान महत्त्वाच्या वस्तू संकलित करून जतन करीत. युरोपमध्ये पुनर्जागरण काळात वैज्ञानिक जिज्ञासा वाढल्याने आधुनिक वस्तुसंग्रहालये विकसित झाली. १७५३ मध्ये स्थापन झालेले 'ब्रिटीश म्युझियम' आणि १७९३ मधील 'लूव्ह म्युझियम' ही जगातील प्रख्यात संग्रहालये आहेत. औद्योगिक क्रांतीनंतर विविध देशांमध्ये राष्ट्रीय संग्रहालयांची स्थापना झाली. भारतामध्ये वस्तुसंग्रहालय चळवळीची सुरुवात ब्रिटीश काळात झाली. १७८४ मध्ये 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल' स्थापन झाली, ज्यामुळे भारताच्या पुरातत्त्वीय आणि ऐतिहासिक वारशाचा अभ्यास सुरू झाला. १८१४ मध्ये कोलकात्यात पहिले भारतीय वस्तुसंग्रहालय (Indian Museum) स्थापन करण्यात आले. यानंतर मुंबई (१८५७), मद्रास (१८५१) आणि लखनौ (१८६३) येथे संग्रहालये स्थापन झाली.१८६१ मध्ये 'भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण' (ASI) स्थापन झाले, ज्यामुळे ऐतिहासिक स्थळे व वस्तूंचे जतन करण्यात मदत झाली. ब्रिटिशांनी १८७८ मध्ये 'इंडियन ट्रेझर्स ट्रोव्ह ॲक्ट' लागू केला, ज्यामुळे मौल्यवान ऐतिहासिक वस्तूंचे संरक्षण सुनिश्चित करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर

भारतात वस्तुसंग्रहालय चळवळीने वेग घेतला. १९४९ मध्ये दिल्लीतील राष्ट्रीय संग्रहालयाची स्थापना झाली. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (मुंबई), इंडियन म्युझियम (कोलकाता) आणि सरकारी संग्रहालये विविध राज्यांत स्थापन झाली. डिजिटलायझेशन आणि तंत्रज्ञानामुळे संग्रहालये अधिक सुलभ आणि आकर्षक बनली आहेत. भारत सरकारच्या संग्रहालय आधुनिकीकरण योजनाममुळे संग्रहालये इंटरएक्टिव्ह प्रदर्शन, 3D मॉडेल्स आणि आभासी प्रदर्शने यांसारख्या तंत्रज्ञानाने समृद्ध होत आहेत. त्यामुळे भारतीय वारसा नवीन पिढीसाठी सहज उपलब्ध होत आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**गार्डन ऑफ अक्लमेशन :** अनुकूलनाचे उद्यान किंवा परिचित करण्याचे उद्यान असे याचा अर्थ होतो. हे असे उद्यान असते जिथे विविध वनस्पती आणि प्राणी ठेवले जातात, जेणेकरून ते नवीन वातावरणाशी जुळवून घेऊ शकतील किंवा त्यांना विशिष्ट वातावरणात वाढवण्यासाठी/जतन करण्यासाठी मदत केली जाते. ऐतिहासिकदृष्ट्या, इजिप्तमध्ये अशी उद्याने अस्तित्वात होती जिथे इजिप्तमध्ये न दिसणारे प्राणी ठेवले जात होते.

**गार्डन ऑफ इंटेलिजन्स :** बुद्धीचे उद्यान किंवा ज्ञानाचे उद्यान असे याचा अर्थ होतो. हे एक रूपक आहे, जे ज्ञान, शिकणे आणि बुद्धीच्या वाढीसाठी असलेल्या जागेचे किंवा वातावरणाचे प्रतीक असू शकते. चीनमध्ये 'चौ' घराण्यातील राजा 'वेन' याने असे पशुसंग्रहालय उभे केले होते, जे एक प्रकारचे ज्ञान किंवा अभ्यासाचे केंद्र होते. हा शब्द हावर्ड गार्डनरच्या बहुबुद्धी सिद्धांताशी संबंधित असू शकतो, जिथे विविध प्रकारच्या बुद्धिमत्तांचा विकास होतो.

**अश्मोलियन संग्रहालय :** हे ऑक्सफर्ड विद्यापीठाचे कला आणि पुरातत्व संग्रहालय आहे. हे जगातील पहिले विद्यापीठाचे संग्रहालय मानले जाते. या संग्रहालयात कलाकृती, प्राचीन वस्तू, हस्तलिखिते आणि विविध संस्कृतींच्या वस्तूंचा मोठा संग्रह आहे.

**खाजगी पेन्शन :** खाजगी पेन्शन म्हणजे सरकारी किंवा सार्वजनिक क्षेत्राव्यतिरिक्त, एखाद्या खाजगी कंपनी किंवा संस्थेद्वारे कर्मचाऱ्याला निवृत्तीनंतर मिळणारे नियमित उत्पन्न.

**प्रिव्ही पर्स :** प्रिव्ही पर्स म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी भारतातील संस्थानांच्या शासकांना, तसेच स्वातंत्र्यानंतर त्यांच्या राजघराण्यांना भारत सरकारने त्यांच्या वैयक्तिक खर्चासाठी दिलेले विशेष अनुदान. हे अनुदान शासकांना त्यांच्या शाही दर्जा आणि गरजा पूर्ण करण्यासाठी दिले जात असे.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे :**

१) ड, २) ब, ३) क, ४) ब, ५) क, ६) क, ७) ब, ८) ब, ९) क, १०) ड

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे :**

१) ब, २) ब, ३) क, ४) क, ५) क, ६) ब, ७) क, ८) ब, ९) क, १०) क

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे :**

१) क, २) ब, ३) क, ४) ब, ५) क, ६) क, ७) क, ८) ब, ९) क, १०) ब

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**ब) टिपा लिहा.**

१) प्राचीन कालखंडातील वस्तुसंग्रहण व संग्रहालयाची संकल्पना

२) मध्ययुगीन कालखंड आणि संग्रहालय चळवळ

३) व्हिक्टोरिया काळातील प्रमुख वस्तुसंग्रहालये

४) दुर्मिळ वस्तूंच्या जतन व संवर्धनासाठी केलेले कायदे

५) कार्नेगी कॉर्पोरेशनची मदत आणि वस्तुसंग्रहालयांचे सर्वेक्षण १९३६

६) संस्थानिक राजवटींचे विलिनीकरण आणि वस्तुसंग्रहालयांचा विकास

**क) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) जागतिक वस्तुसंग्रहलयाचा उदय व विकास स्पष्ट करा.

२) ब्रिटिश राजवटीत भारतातील वस्तुसंग्रहालयांची वाटचालीची चर्चा करा.

३) प्राचीन स्मारक संरक्षण कायदा आणि भारतीय वस्तुसंग्रहालयांचे संरक्षण यावर चर्चा करा.

४) समकालीन भारतातील संग्रहालय चळवळीची चर्चा करा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) डॉ. बोरकर रघुनाथ, संग्रहालयशास्त्र, पिंपळापुरे बुक, नागपूर.

२) डॉ. शुक्ल जी. व डॉ. पांडे वि., संग्रहालय विज्ञान, मोतीलाल बनारसी राम, नवी दिल्ली.

३) गणेशन, आर., संग्रहालाय दर्पण, पिलग्रिम पब्लिशिंग, वाराणसी, २००६

४) निगम. एम. एल., फंडामेंटल्स ऑफ म्युझिओलॉजी, देवी प्रकाशन, हैद्राराबाद, १९९५

५) जैन, संजय., म्युझियम एव म्युझिओलॉजी एक परिचय, कनिष्क प्रकाशन बडोदा, २००१

६) Mookerjee, Asutosh, The Histroy of the Indian Museum, Trustees of the Indian Museum, Calcutta, 1914

7) Choudhary R. D., Museums of India and their Maladies, agam Kala Prakshan Publication, Delhi, 1998

8) Agarwal , Usha., Museums in India, Sundeep Publication, Delhi, 2000

9) Gary Edson and Davin Dean : The Handbook for Museums, Routledge, 1994.

10) Shobita Punja Museums of India, Guidebook Co. Ltd., 1990.

11) Burdhan, Anand (2017), Colonial Museum : An Inner History, Research India Press, Delhi

12) Desvaltees, Andre, Francas Mairesse Arrond Cown (2010), Key concept in Museology ICOM² - 2010, Paris.

13) Dwivedi, V P, Museums and Museology : New Horizons. Agam Kala Prakashan

14) Guha-Thakurta, Tapati. (2004). Objects, Histories: Institution of Art in Colonial India, New York : Columbia University Press.

15) Mathur, Saloni. (2007). India by Design : Colonial History and Cultural Display. Berkley : University of California

16) Munsuri, Shahida. Museums, Museology and New Museology. India : Readworthy Press Corporation, 2018.

17) Burdhan, Anand (2017), Museological Pedagogy : Colonial Politics versus People's Museography, Research India Press

18) Bedekar. V. H, New Museology, Museum Association of India, New Delhi.

❑❑❑

घटक १

# संग्रहालयाची पायाभूत रचना

## (Infrastructure of Museum)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ संग्रहालय पायाभूत सुविधा
- १.२.२ संग्रहालयाची प्रशासकीय रचना व भूमिका/जबाबदाऱ्या
- १.२.३ संग्रहालय व्यवस्थापन व सुरक्षा

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर, विद्यार्थी खालील गोष्टी साध्य करू शकतील-

१) संग्रहालयाच्या यशस्वी कार्यासाठी आवश्यक असलेल्या विविध पायाभूत सुविधांची ओळख करून घेऊन त्यांचे महत्त्व स्पष्ट करणे.

२) संग्रहालयाच्या प्रशासकीय रचनेतील विविध पदांची आणि त्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्यांचे विश्लेषण करणे.

३) व्यवस्थापन प्रक्रियांचे ज्ञान प्राप्त करणे : संग्रहालयाच्या दैनंदिन व्यवस्थापनात समाविष्ट असलेल्या प्रक्रिया आणि पद्धतींचे सखोल ज्ञान मिळवणे.

४) संग्रहालयातील वस्तूं आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी वापरल्या जाणाऱ्या विविध सुरक्षा प्रणाली आणि धोरणांचे मूल्यांकन करणे.

५) नैसर्गिक आपत्त्या किंवा इतर अनपेक्षित घटनांमध्ये संग्रहालयातील वस्तू आणि संरचनेचे संरक्षण करण्यासाठी तयार केलेल्या संकटालीन व्यवस्थापन योजनांची माहिती करून घेणे.

६) संग्रहालयाच्या पायाभूत सुविधा, प्रशासन, व्यवस्थापन आणि सुरक्षेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा कसा उपयोग केला जातो, हे ओळखणे आणि त्याचे फायदे स्पष्ट करणे.

## १.१ प्रास्ताविक :

वस्तुसंग्रहालय हे केवळ ऐतिहासिक, सांस्कृतिक किंवा वैज्ञानिक वस्तूंचे प्रदर्शन केंद्र नसते, तर ते ज्ञान, शिक्षण व मनोरंजनाचे जिवंत माध्यम असते. या संस्थेचे प्रभावी कार्य अनेक घटकांवर अवलंबून असते, ज्यामध्ये तिची पायाभूत सुविधा व व्यवस्थापन प्रणाली प्रमुख आहेत. एका सक्षम वस्तुसंग्रहालयासाठी केवळ आकर्षक वस्तूंचा संग्रह पुरेसा नसतो, तर त्या वस्तूंचे जतन, प्रदर्शन व अभ्यागतांपर्यंत पोहोचवण्यासाठी योग्य व अद्ययावत पायाभूत सुविधांची गरज असते. या पायाभूत सुविधांमध्ये वस्तुसंग्रहालयाची इमारत, तिची रचना, प्रदर्शनी दालनं, संग्रह कक्ष, संवर्धन प्रयोगशाळा व अभ्यागतांसाठी आवश्यक असलेल्या सार्वजनिक सुविधांचा समावेश होतो. या भौतिक संरचनेसोबतच, वस्तुसंग्रहालयाचे व्यवस्थापन देखील तितकेच महत्त्वाचे आहे. यात संस्थेची प्रशासकीय रचना, विविध विभागांच्या भूमिका व जबाबदाऱ्या, आर्थिक नियोजन, सुरक्षा व्यवस्थापन व लोकांशी असलेला संवाद यांचा समावेश होतो. आजच्या आधुनिक युगात, वस्तुसंग्रहालयांना केवळ पारंपरिक भूमिका न घेता, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून आपले कार्य अधिक व्यापक व आकर्षक करावे लागते. माहिती तंत्रज्ञान, आधुनिक सुरक्षा प्रणाली व प्रभावी विपणन धोरणे यांचा योग्य समन्वय साधून वस्तुसंग्रहालय जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करू शकतात व अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचू शकतात. या घटकामध्ये आपण वस्तुसंग्रहालयासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा, त्यांची रचना व महत्त्व यांचा अभ्यास करणार आहोत. तसेच, संस्थेचे प्रभावी व्यवस्थापन कसे केले जाते, विविध विभागांच्या जबाबदाऱ्या काय असतात व सुरक्षा व्यवस्थापनाचे महत्त्व काय आहे, यावर देखील प्रकाश टाकणार आहोत.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ संग्रहालय पायाभूत सुविधा

संग्रहालयाचे प्रभावी कामकाज, त्याचे उद्दिष्ट साध्य करणे व अभ्यागतांना दर्जेदार अनुभव देणे यासाठी योग्य व कार्यक्षम पायाभूत सुविधा अनिवार्य असते. संग्रहालयाचे स्वरूप, आकार व उद्दिष्टानुसार या सुविधा आखल्या जातात. खाली संग्रहालयासाठी अत्यावश्यक असलेल्या विविध सुविधा सविस्तरपणे दिल्या आहेत:

**१) इमारत व जागा:**

संग्रहालयाची इमारत केवळ वास्तूशास्त्रीयदृष्ट्या सुंदर असणे पुरेसे नाही, तर ती कार्यक्षम व सुरक्षित देखील असली पाहिजे.

**२) प्रदर्शन दालनं :**

संग्रहालयातील प्रदर्शन दालनं म्हणजे त्या संस्थेचे हृदय असते. येथे संग्रहालयातील वस्तू अभ्यागतांसमोर आकर्षक व समजण्यास सोप्या पद्धतीने मांडल्या जातात. त्यामुळे दालनांचे नियोजन व रचना अत्यंत काळजीपूर्वक केली पाहिजे. प्रदर्शन दालनं प्रशस्त व व्यवस्थित रचना केलेली असावीत. वस्तूंच्या प्रकारानुसार व त्यांच्या महत्त्वानुसार दालनांचे आकारमान, फर्निचर, मांडणी यांचा विचार करणे आवश्यक आहे. उदा. दिल्लीतील राष्ट्रीय संग्रहालयातील विविध गॅलरी (मंदिर कला गॅलरी, चित्रकला गॅलरी) विशिष्ट थीमवर आधारित असून त्या विषयाच्या अनुकूल रचनेत मांडलेल्या आहेत.

**३) प्रकाश योजना :**

हा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. योग्य प्रकाशयोजना केल्यामुळे वस्तू अधिक उठून दिसतात व अभ्यागतांचे लक्ष केंद्रित होते. विशेषतः चित्रे, हस्तलिखिते किंवा नाजूक वस्तूंना जास्त प्रकाशामुळे हानी होऊ शकते. म्हणून LED प्रकाश, नियंत्रित लक्स पातळी व दिशादर्शक प्रकाशाचा वापर केला जातो. उदा. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात प्राचीन मूर्ती व चित्रांसाठी मृदू व लक्षवेधी प्रकाश योजना वापरलेली आहे.

**४) तापमान व आर्द्रता नियंत्रण :**

तापमान व आर्द्रता नियंत्रणदेखील अत्यंत आवश्यक आहे, विशेषतः संवेदनशील वस्तू जसे की कापड, हस्तलिखिते, लाकडी मूर्ती इत्यादींसाठी. या वस्तूंना जास्त उष्णता किंवा आर्द्रतेमुळे नुकसान होण्याची शक्यता असते. म्हणून आधुनिक संग्रहालयांमध्ये HVAC (Heating, Ventilation, and Air Conditioning) प्रणालीचा वापर करून स्थिर तापमान (साधारण २०-२२ अंश सेल्सियस) व आर्द्रता (४५-५५%) राखली जाते. उदा. हैदराबादमधील सालारजंग संग्रहालयात हस्तलिखिते व मिनिएचर चित्रकलेसाठी विशेष हवामान नियंत्रण वापरले जाते.

**५) थीम व कलात्मक सजावट :**

थीम व कलात्मक सजावटयामुळे प्रदर्शन अधिक सुसंगत व अर्थपूर्ण बनते. प्रत्येक दालनात विशिष्ट

विषयानुसार वस्तूंची मांडणी केली जाते व सजावट त्या थीमला पूरक असते. उदा. एखाद्या ऐतिहासिक युद्धावर आधारित प्रदर्शनात त्या कालखंडाशी संबंधित सजावट, ध्वनीफिती, प्रतिकृती यांचा समावेश करून त्या काळाचा अनुभव अभ्यागतांना दिला जातो. अशा प्रकारे, योग्य रचना, प्रकाश योजना, हवामान नियंत्रण व थीम आधारित सजावट यांच्या समन्वयाने प्रदर्शन दालनं प्रभावी बनतात व संग्रहालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक भूमिकेला बळकटी मिळते.

**६) संग्रहण कक्ष :**

संग्रहालयातील संग्रहण कक्ष म्हणजे ज्या ठिकाणी प्रदर्शित न केलेल्या किंवा भविष्यातील प्रदर्शनासाठी राखीव ठेवलेल्या वस्तू सुरक्षितरीत्या जतन केल्या जातात. या कक्षांचे व्यवस्थापन अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध असावे लागते, कारण संग्रहातील अनेक वस्तू अत्यंत नाजूक, ऐतिहासिक व अमूल्य असतात. प्रथम, संग्रहण कक्ष स्वतंत्र व योग्य संरक्षित क्षेत्र असले पाहिजे. हा भाग सर्वसाधारण अभ्यागतांपासून दूर असतो व केवळ अधिकृत कर्मचारी किंवा संशोधकांनाच नियंत्रित प्रवेश दिला जातो. या कक्षांचे दरवाजे, भिंती व छत आगरोधक (fire-proof) व जलरोधक (water-proof) असणे अत्यावश्यक असते. उदा. पुण्याच्या राजा दिनकर केळकर संग्रहालयात दुर्मिळ हस्तलिखिते व कलाकृतींचे स्वतंत्र संग्रहण कक्ष आहेत, जे विशेष सुरक्षा यंत्रणांनी संरक्षित आहेत.

दुसरे महत्त्वाचे घटक म्हणजे नियंत्रित तापमान व आर्द्रता. संग्रहण कक्षात वस्तूंच्या संरक्षणासाठी तापमान सामान्यतः १८-२२ अंश सेल्सियस व आर्द्रता ४५-५५% राखली जाते. या नियंत्रणासाठी एचव्हीएसी (HVAC) यंत्रणा वापरण्यात येते. काही काचेच्या वस्तू, रंगीत कापड किंवा कागदाचे साहित्य यांना अधिक संवेदनशीलतेने हाताळले जाते. उदा. दिल्लीतील राष्ट्रीय संग्रहालयात प्राचीन पांडुलिपी व शिल्पकृतींसाठी तापमान व आर्द्रता यांचे सातत्याने निरीक्षण केले जाते.

तिसरे म्हणजे वस्तूंचे वर्गीकरण व सहज शोधता येण्याजोगी रचना. सर्व वस्तू त्यांच्या प्रकार, वयोमान, साहित्य, व मूळ स्थान यानुसार नीट वर्गीकृत करून संचयित करणे आवश्यक आहे. प्रत्येक वस्तूला एक विशिष्ट ओळख क्रमांक (accession number) दिला जातो व डिजिटल डेटाबेसमध्ये तिची नोंद केली जाते. यामुळे एखादी वस्तू हवी असताना ती लवकर व अचूकपणे मिळवता येते. उदा. सालारजंग संग्रहालयातसर्व वस्तूंची बारकोड स्कॅनिंगद्वारे नोंद ठेवली जाते, ज्यामुळे वस्तूंचे व्यवस्थापन अत्यंत सोयीचे झाले आहे.

**७) संवर्धन प्रयोगशाळा :**

संग्रहालयातील वस्तूंचे दीर्घकालीन संरक्षण व जतन करण्यासाठीसंवर्धन प्रयोगशाळाही एक अत्यंत महत्त्वाची सुविधा असते. या प्रयोगशाळेमध्ये वस्तूंचे तांत्रिक विश्लेषण, जतन (Preservation) व पुनर्संचयितीकरण (Restoration) केले जाते. प्रत्येक वस्तूचे ऐतिहासिक, कलात्मक व सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन संवर्धनाच्या प्रक्रिया ठरवल्या जातात. प्रथम, संवर्धन प्रयोगशाळेमध्ये वस्तूंचे जतन, पुनर्संचयितीकरण व दुरुस्तीसाठी सुविधा असतात. जुनी हस्तलिखिते, चित्रे, वस्त्रप्रावरणे, धातूच्या मूर्ती, लाकडी शिल्पे किंवा फर्निचर यामध्ये काळाच्या ओघात विविध नुकसान होत असते. उदा. पाण्यामुळे कागद खराब होतो, धातू गंजतो, रंग फिकट होतो इत्यादी.

या समस्यांवर उपचार करण्यासाठी प्रयोगशाळेमध्ये वस्तूंची स्वच्छता, बळकटीकरण, रंग दुरुस्ती, संरक्षक आवरण देणे यासारख्या तांत्रिक प्रक्रिया केल्या जातात. उदा. दिल्लीच्या इंदिरा गांधी नॅशनल सेंटर फॉर आर्ट्‌समध्ये प्राचीन चित्रकलेच्या संवर्धनासाठी विशेष तज्ञ कार्यरत आहेत.

संवर्धन प्रयोगशाळेमध्ये विशिष्ट उपकरणे असणे आवश्यक आहे. यात मायक्रोस्कोप्स (Microscopes) वापरून वस्तूंच्या सूक्ष्म दोषांचे परीक्षण केले जाते. रासायनिक स्वच्छता साधने व एक्स-रे, अल्ट्राव्हायोलेट स्कॅनर सारखी विश्लेषण साधने वापरून वस्तूंच्या आतील स्थितीचा अभ्यास केला जातो. तसेच, आघातमुक्त हाताळणीसाठी विशेष उपकरणांचा वापर केला जातो. उदा. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI)च्या प्रयोगशाळांमध्ये पेंटिंग्ज व मूर्तींच्या सखोल विश्लेषणासाठी ॲनालिटिकल उपकरणे वापरली जातात.

प्रशिक्षित संवर्धन तज्ज्ञांसाठी स्वतंत्र कार्यक्षेत्र उपलब्ध असले पाहिजे. या तज्ज्ञांना वस्तूंच्या इतिहासाची, साहित्यिक गुणधर्मांची व रासायनिक प्रतिक्रिया प्रक्रियेची सखोल माहिती असते. ते संवेदनशील वस्तू हाताळताना सावधगिरी बाळगतात व नैतिक संवर्धनाच्या तत्त्वांनुसार काम करतात. उदा. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयामध्ये प्रशिक्षित संवर्धन तज्ज्ञांची स्वतंत्र टीम आहे, जी भारतीय व विदेशी वस्तूंचे संवर्धन करते.

**८) प्रशासकीय कार्यालये :**

संग्रहालयाच्या यशस्वी संचालनासाठी केवळ प्रदर्शन व वस्तूंचे जतन पुरेसे नसते, तर प्रभावी प्रशासकीय व्यवस्था असणेही तितकेच आवश्यक आहे. यासाठी संग्रहालयात स्वतंत्र व व्यवस्थित प्रशासकीय कार्यालये असावी लागतात. प्रशासकीय कार्यालयांमध्ये मुख्यत्वे संचालक, क्युरेटर, लेखापाल, जनसंपर्क अधिकारी व अन्य सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र कार्यालयीन जागा असते. संचालक संग्रहालयाच्या सर्वांगीण धोरणात्मक कामकाजाचे नेतृत्व करतो. क्युरेटर विविध प्रदर्शनांचे नियोजन, संशोधन व वस्तूंचे व्यवस्थापन करतो. लेखापाल संग्रहालयाच्या आर्थिक व्यवहारांची जबाबदारी सांभाळतो, तर जनसंपर्क अधिकारी प्रसार माध्यमांशी संबंध ठेवून संग्रहालयाची प्रतिमा जतन करतो. उदा. दिल्लीतील राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालयात प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र व सुसज्ज कार्यालयीन विभाग आहेत, ज्यामुळे कामकाज अधिक गतिमान होते.

याशिवाय, संग्रहालयात बैठकीच्या खोल्या असणे अत्यंत आवश्यक आहे. येथे प्रशासकीय बैठकांद्वारे महत्त्वाचे निर्णय घेतले जातात, नवीन प्रकल्प आखले जातात व आंतरराष्ट्रीय सहकार्याची रणनीती ठरवली जाते. या बैठकीच्या खोल्यांमध्ये आधुनिक उपकरणे जसे की प्रोजेक्टर, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधा इत्यादी असावी लागतात, जे कामकाज अधिक प्रभावी बनवते. उदा. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात बैठकीच्या स्वतंत्र खोल्या व सेमिनार हॉल उपलब्ध आहेत.

**९) दस्तऐवज ठेवण्याचे विभाग :**

दस्तऐवज ठेवण्याचे विभाग हेही प्रशासकीय कार्यालयांचा महत्त्वाचा भाग आहेत. येथे वस्तूंची नोंदी,

खरेदी-विक्रीची कागदपत्रे, आर्थिक अहवाल, दैनंदिन कारभाराचे दस्तऐवज यांचे सुरक्षित व सुयोग्य जतन केले जाते. या विभागात योग्य फाइलिंग सिस्टीम, टायर सेफ्टी यंत्रणा व संगणकीकरण सुविधा असणे अनिवार्य आहे. उदा. सालारजंग संग्रहालय, हैदराबाद येथे दस्तऐवज डिजिटल फॉरमॅटमध्येही साठवले जातात, जेणेकरून शोध प्रक्रिया सोपी व जलद होते.

**१०) शैक्षणिक जागा :**

संग्रहालये केवळ वस्तू जतन करणारी संस्था नसून, शिक्षणाचा प्रभावी केंद्रबिंदू देखील असतात. यासाठी संग्रहालयामध्ये विविध शैक्षणिक जागा तयार केल्या जातात, ज्या अभ्यागतांचे ज्ञान वाढवण्यास व त्यांना संग्रहालयाशी जोडण्यास मदत करतात. संग्रहालयामध्येव्याख्याने, कार्यशाळा व चर्चा सत्रे घेण्यासाठी स्वतंत्र सभागृह किंवा कार्यशाळा खोल्या असाव्यात. येथे संशोधक, इतिहासकार, कलाकार व इतर तज्ञ विविध विषयांवर सादरीकरणे करतात. अभ्यागत, विद्यार्थी व अभ्यासक यांना संग्रहालयातील वस्तूंबाबत अधिक सखोल माहिती मिळवण्याची संधी मिळते. उदा. दिल्लीतील राष्ट्रीय संग्रहालयात व्याख्यानमालेसाठी स्वतंत्र सभागृह असून तेथे नियमित चर्चासत्रे आयोजित केली जातात. संग्रहालयात मुलांसाठी विशेष शैक्षणिक गॅलरीज व हस्तकला वर्गासाठी जागा असावी. बालगोपाळांना संग्रहालयातील वारसा व संस्कृतीचे महत्त्व पटवून देण्यासाठी चित्रकला, हस्तकला, शिल्पकला यांसारख्या कार्यशाळा घेण्यात येतात. उदा. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात मुलांसाठी 'चिल्ड्रेन्स क्रिएटिव्ह सेंटर' आहे, जिथे खेळत-शिकत मुलांना भारतीय वारशाची ओळख करून दिली जाते.

आजच्या डिजिटल युगात संग्रहालयात डिजिटल शिक्षणासाठी आवश्यक तंत्रज्ञान सुविधा असणे अत्यावश्यक आहे. सभागृह व कार्यशाळा खोल्यांमध्ये प्रोजेक्टर, स्मार्ट बोर्ड्स, ऑडिओ-व्हिज्युअल उपकरणे असावीत, ज्यामुळे दृश्य व श्राव्य साधनांच्या मदतीने शिकवणे अधिक प्रभावी होते. काही संग्रहालयांमध्ये व्हर्चुअल रिॲलिटी (VR) किंवा ऑगमेंटेड रिॲलिटी (AR) च्या साहाय्याने जुने काळजीपूर्वक पुन्हा उभे करण्याचे प्रयत्न केले जातात. उदा. भारतीय रेल्वे संग्रहालय, दिल्ली येथे रेल्वे इतिहासाचे शिक्षण देण्यासाठी प्रोजेक्टर व डिजिटल डिस्प्लेचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

**११) सार्वजनिक सुविधा :**

संग्रहालयातील अभ्यागतांचा अनुभव अधिक सोयीस्कर व आनंददायी करण्यासाठी सार्वजनिक सुविधा आवश्यक असतात. या सुविधा केवळ अभ्यागतांची सोय वाढवत नाहीत, तर संग्रहालयाची एक सकारात्मक प्रतिमा निर्माण करतात.

१) महिला, पुरुष व दिव्यांग व्यक्तींसाठी स्वतंत्र व स्वच्छतागृहे उपलब्ध असावीत. यामुळे दीर्घ फेरफटक्यानंतर अभ्यागतांना सुविधा मिळते व संपूर्ण संग्रहालयाचा स्वच्छतेचा दर्जा टिकून राहतो. उदा. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, दिल्ली येथे स्वच्छ व सुलभ प्रवेश असलेली स्वच्छतागृहे अनेक ठिकाणी उपलब्ध आहेत.

२) ही सार्वजनिक सुविधांपैकी एक महत्त्वाची गरज आहे. जिथे अभ्यागत आपली जड बॅग्स, छत्र्या, जॅकेट्स इत्यादी सुरक्षित ठेवू शकतात. यामुळे प्रदर्शन दालनांमध्ये अवजड सामान न नेता अभ्यागत अधिक

मोकळेपणाने व सुरक्षेची काळजी न करता मि रू शकतात. उदा.प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई येथे आधुनिक व सुरक्षित क्लोकरूम सेवा पुरवली जाते.

३) मोठ्या संग्रहालयांमध्ये फेरफटका मारताना अभ्यागत थकतात, त्यामुळे विश्रांतीसाठी मोकळ्या जागा, आरामदायक खुर्च्या किंवा बेंचेस असणे गरजेचे आहे. हे ठिकाण शांत, स्वच्छ व नीटनेटके असावे. उदा. सालारजंग संग्रहालय, हैदराबाद येथे प्रत्येक प्रमुख गॅलरीजवळ विश्रांतीसाठी बसण्याची सोय केलेली आहे.

४) अभ्यागतांना अल्पोपहार, थोडी विश्रांती व संवादाची संधी मिळावी म्हणून संग्रहालयात एक स्वच्छ व दर्जेदार उपहारगृह असते. उदा. इंडियन म्युझियम, कोलकाता येथे उपहारगृह आहे जिथे स्थानिक खाद्यपदार्थही उपलब्ध आहेत.

५) विक्री केंद्र हे संग्रहालयाचा एक महत्त्वाचा भाग असते. येथे स्मृतिचिन्हे, पुस्तके, पोस्टर्स, हस्तकला वस्तू व अन्य संग्रहालयाशी संबंधित साहित्य विकले जाते. यामुळे अभ्यागतांना त्यांच्या भेटीची आठवण म्हणून काही वस्तू घेऊन जाण्याची संधी मिळते. उदा. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबईयेथे एक विक्री केंद्र आहे जे शालेय साहित्यापासून ते कलात्मक वस्तूंपर्यंत सर्वकाही पुरवते.

**१२) मालाची चढ-उतार व हाताळणी क्षेत्र :**

वस्तुसंग्रहालयातील मालाची चढ-उतार व हाताळणी क्षेत्र हे एक अत्यंत महत्त्वाचे परंतु अनेकदा पडद्यामागे असलेले कार्यक्षेत्र आहे. नव्याने संग्रहात आणलेल्या मौल्यवान वस्तूंची सुरक्षित हाताळणी व मोठ्या वस्तूंचे स्थलांतर सुरळीतपणे पार पाडण्यासाठी या क्षेत्राची रचना काळजीपूर्वक करणे आवश्यक असते. हे क्षेत्र केवळ वस्तूंच्या वाहतुकीसाठीचा मार्ग नसून, त्या वस्तूंच्या सुरक्षिततेची पहिली पायरी असते. उदा. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात जेव्हा कोणतीही नवीन कलाकृती किंवा ऐतिहासिक वस्तू संग्रहात दाखल होते, तेव्हा ती थेट प्रदर्शनात न ठेवता मालाची चढ-उतार व हाताळणी क्षेत्रात आणली जाते. येथे, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या देखरेखेखाली तिची प्राथमिक तपासणी केली जाते. वस्तूच्या पॅकिंगची काळजीपूर्वक तपासणी करून, तिला हळूवारपणे बाहेर काढले जाते.

**१३) नव्याने संग्रहात आणलेल्या वस्तूंच्या सुरक्षित हाताळणीसाठी स्वतंत्र क्षेत्र :**

या क्षेत्रात तापमान व आर्द्रता नियंत्रित ठेवण्याची सोय असणे आवश्यक आहे, जेणेकरून नवीन वस्तू वातावरणातील बदलांमुळे खराब होणार नाहीत. धूळ व इतर हानिकारक कणांपासून संरक्षण करण्यासाठी हे क्षेत्र हवेशीर व स्वच्छ ठेवले जाते. वस्तू अनपॅक करताना व तिची नोंदणी करताना तिला कोणत्याही प्रकारचे नुकसान पोहोचू नये, यासाठी मऊ पृष्ठभाग व आवश्यक उपकरणे (उदा. हातमोजे, विशिष्ट प्रकारचे चाकू) उपलब्ध असतात. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयामध्ये यासाठी एक विशिष्ट कक्ष तयार करण्यात आला आहे, जिथे नवीन वस्तूंची छायाचित्रे घेणे, तिची प्राथमिक माहिती नोंदवणे व तिला तात्पुरते सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था आहे.

**१४) मोठ्या वस्तूंचे स्थलांतर करताना संरक्षणासाठी विशेष संरचना :**

अनेक वस्तुसंग्रहालयांमध्ये मोठ्या आकाराच्या कलाकृती किंवा ऐतिहासिक वस्तू असतात, ज्यांचे

स्थलांतर करणे एक मोठे आव्हान असते. यासाठी मालाची चढ-उतार व हाताळणी क्षेत्रात विशेष संरचना असणे आवश्यक आहे. उदा. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयामध्ये मोठ्या मूर्ती किंवा फर्निचरसारख्या वस्तू हलवण्यासाठी क्रेन किंवा हायड्रोलिक लिफ्टचा वापर केला जातो. या उपकरणांना जोडण्यासाठी मजबूत आधार व वस्तू सुरक्षितपणे बांधण्यासाठी विशेष पट्ट्या व साखळ्या उपलब्ध आहेत. तसेच, वस्तूंच्या आकाराप्रमाणे संरक्षणासाठी तयार केलेले लाकडी किंवा धातूचे फ्रेमवर्क या क्षेत्रात ठेवण्याची व वापरण्याची सोय असते, ज्यामुळे वाहतुकीदरम्यान वस्तूंना कोणत्याही प्रकारचा धक्का किंवा खरचट येऊ नये.

**१५) वाहतूक साधनांसाठी सोयीस्कर प्रवेशद्वारे :**

मालाची चढ-उतार व हाताळणी क्षेत्राला जोडणारी प्रवेशद्वारे मोठी व वाहतूक साधनांना (उदा. ट्रक, व्हॅन) सहजपणे ये-जा करता येतील अशा आकाराची असावी लागतात. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या मागील बाजूस यासाठी मोठे प्रवेशद्वार आहे, जेणेकरून मोठ्या ट्रकमधूनही वस्तू सहजपणे आत आणता येतात. या प्रवेशद्वारांजवळ उतार व सपाट पृष्ठभाग असणे आवश्यक आहे, ज्यामुळे वस्तूंची चढ-उतार करणे सोपे व सुरक्षित होते. पावसाळ्यात किंवा इतर खराब हवामानात वस्तूंचे संरक्षण करण्यासाठी या प्रवेशद्वारांवर शेडची व्यवस्था असणेही महत्त्वाचे आहे.

**१६) सुरक्षा नियंत्रण कक्ष :**

वस्तुसंग्रहालयाचा सुरक्षा नियंत्रण कक्षहा संस्थेच्या संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेचा केंद्रबिंदू असतो. हे एक असे समर्पित क्षेत्र आहे जिथून संपूर्ण संग्रहालयाच्या परिसरावर चोवीस तास नजर ठेवली जाते, ज्यामुळे मौल्यवान वस्तू, अभ्यागत व कर्मचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित केली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज हा कक्ष कोणत्याही धोक्याची शक्यता ओळखतो व त्यावर त्वरित कार्यवाही करण्यासाठी आवश्यक यंत्रणा पुरवतो. उदा. नवी दिल्लीतील राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाच्या तळमजल्यावर एक आधुनिक सुरक्षा नियंत्रण कक्ष स्थापित करण्यात आला आहे. या कक्षात मोठ्या स्क्रीनवर संपूर्ण संग्रहालयाच्या आतील व बाहेरील भागांचे थेट दृश्य सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे प्रक्षेपित केले जाते. प्रशिक्षित सुरक्षा कर्मचारी सतत या दृश्यांचे निरीक्षण करतात व कोणत्याही संशयास्पद हालचाली किंवा धोक्याची शक्यता त्वरित ओळखतात.

**१७) संपूर्ण संग्रहालयाच्या सुरक्षा व्यवस्था नियंत्रित करणारे केंद्र :**

सुरक्षा नियंत्रण कक्ष हा केवळ सीसीटीव्ही फुटेज पाहण्याचे ठिकाण नाही, तर तो संपूर्ण सुरक्षा प्रणालीचे व्यवस्थापन केंद्र आहे. येथे प्रवेश नियंत्रण प्रणाली, अलार्म प्रणाली व इतर सुरक्षा उपकरणांचे नियंत्रण ठेवले जाते. कोणत्या कर्मचाऱ्याला कोणत्या भागात प्रवेश आहे, याची नोंद याच कक्षातून ठेवली जाते. कोणत्याही दरवाजाचे किंवा खिडकीचे सेन्सर सक्रिय झाल्यास, त्याची सूचना त्वरित नियंत्रण कक्षाला मिळते, ज्यामुळे तातडीने योग्य कारवाई करणे शक्य होते. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयात, प्रत्येक प्रदर्शनी दालन, संग्रह कक्ष व प्रवेशद्वारांवर लावलेल्या सेन्सर्सचे नियंत्रण याच कक्षातून केले जाते.

**१) CCTV प्रणालीचे नियंत्रण व नोंद :**

सुरक्षा नियंत्रण कक्षातील कर्मचाऱ्यांसाठी अनेक मॉनिटर्सची व्यवस्था असते, ज्यावर वेगवेगळ्या

भागांतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे थेट प्रक्षेपण दिसते. या प्रणालीमध्ये रेकॉर्डिंगची सोय देखील असते, ज्यामुळे भूतकाळातील फुटेज तपासणे शक्य होते. कोणत्याही चोरीच्या प्रयत्नात किंवा आपत्कालीन परिस्थितीत घटनेचा क्रम समजून घेण्यासाठी ही नोंदणी अत्यंत महत्त्वाची ठरते. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयातील प्रत्येक कॅमेऱ्याचे फुटेज एका सुरक्षित सर्व्हरवर नियमितपणे जतन केले जाते, जेणेकरून आवश्यकतेनुसार त्याचा वापर करता येईल.

**२) अग्निशमन प्रणाली :**

आग लागल्यास त्वरित नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन प्रणाली अत्यंत आवश्यक आहे. वस्तुसंग्रहालयात स्मोक डिटेक्टर, हीट डिटेक्टर व स्प्रिंकलर सिस्टीम स्थापित केलेली असते. धूर किंवा उष्णता जाणवल्यास अलार्म वाजतो व स्प्रिंकलर आपोआप सुरू होऊन आग विझवण्यास मदत करतात. सालारजंग वस्तुसंग्रहालयात आग विझवण्यासाठी पाण्याची फवारणी करणारी स्प्रिंकलर प्रणाली व काही संवेदनशील वस्तूंसाठी रासायनिक अग्निशमन प्रणालीचा वापर केला जातो, ज्यामुळे वस्तूंना कमीतकमी नुकसान पोहोचते. तसेच, अग्निशमन यंत्रे (Fire Extinguishers) संग्रहालयाच्या विविध भागांमध्ये सहज उपलब्ध असतात.

**३) पर्यावरण नियंत्रण प्रणाली :**

वस्तुसंग्रहालयातील पर्यावरण नियंत्रण प्रणाली ही संग्रहातील मौल्यवान व संवेदनशील वस्तूंचे दीर्घकाळ जतन करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. तापमान, आर्द्रता व प्रकाश यांसारख्या घटकांमध्ये होणारे बदल वस्तूंच्या भौतिक व रासायनिक संरचनेवर नकारात्मक परिणाम करू शकतात. त्यामुळे, या प्रणालीद्वारे एक स्थिर व अनुकूल वातावरण राखणे महत्त्वाचे आहे. उदा. कोलकाता येथील भारतीय संग्रहालयात विविध प्रकारच्या कलाकृती व ऐतिहासिक वस्तूंचा मोठा संग्रह आहे. या संग्रहातील लाकडी वस्तू, वस्त्रे व चित्रे वातावरणातील बदलांसाठी अत्यंत संवेदनशील आहेत. त्यामुळे, संग्रहालयात एक अत्याधुनिक पर्यावरण नियंत्रण प्रणाली स्थापित करण्यात आली आहे, जी प्रत्येक दालनातील तापमान व आर्द्रता विशिष्ट मर्यादेत ठेवते.

**४) तापमान व आर्द्रता नियंत्रण :**

तापमान व आर्द्रता पातळीतील मोठे बदल वस्तूंचे आकुंचन व प्रसरण घडवू शकतात, ज्यामुळे त्यांमध्ये तडे जाऊ शकतात किंवा त्या कमजोर होऊ शकतात. उच्च आर्द्रता बुरशी व कीटकांच्या वाढीसाठी अनुकूल असते, तर कमी आर्द्रता काही वस्तू सुकून भंगुर बनवू शकते. भारतीय संग्रहालयात, प्रत्येक दालनासाठी वस्तूंच्या प्रकारानुसार विशिष्ट तापमान (उदा. २०$^{o}$C ते २५$^{o}$C) व आर्द्रता (उदा. ४५% ते ५५% सापेक्ष आर्द्रता) राखली जाते. यासाठी सेंट्रलाइज्ड एअर कंडिशनिंग सिस्टीम व ह्युमिडिफायर्स/डीह्युमिडिफायर्सचा वापर केला जातो. नियमितपणे या पातळींची नोंद घेतली जाते व आवश्यकतेनुसार समायोजन केले जाते.

**५) प्रकाश नियंत्रण :**

प्रकाशातील अतिनील (Ultraviolet) व अवरक्त (Infrared) किरणे वस्तूंच्या रंगांना फिकट करू शकतात व त्यांच्या रासायनिक बंधांना कमजोर करू शकतात. विशेषतः वस्त्रे, कागद व रंगांवर यांचा वाईट

परिणाम होतो. त्यामुळे, वस्तुसंग्रहालयांमध्ये प्रकाशाची तीव्रता व प्रकार नियंत्रित करणे महत्त्वाचे आहे. भारतीय संग्रहालयातील प्रदर्शनी दालनांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा प्रवेश कमी केला जातो व कृत्रिम प्रकाशासाठी विशेष फिल्टर्स (UV filters) वापरले जातात. प्रकाशाची तीव्रता (measured in lux) प्रत्येक प्रकारच्या वस्तूसाठी शिम ारसीनुसार ठेवली जाते. उदा. नाजूक कागदी वस्तू व वस्त्रे कमी प्रकाशात, तर धातूच्या वस्तू थोड्या जास्त प्रकाशात प्रदर्शित केल्या जातात.

**६) खेळती हवा ठेवण्याची व फिल्टरेशन प्रणाली :**

हवेतील धूळ, प्रदूषण व इतर हानिकारक कण वस्तूंच्या पृष्ठभागावर जमा होऊन त्यांचे नुकसान करू शकतात. सल्फर डायऑक्साइड व नायट्रोजन ऑक्साइडसारखे प्रदूषक रासायनिक क्रिया करून वस्तूंची झीज घडवू शकतात. भारतीय संग्रहालयात, एक प्रभावी वेंटिलेशन व फिल्टरेशन प्रणाली स्थापित केली आहे. या प्रणालीद्वारे बाहेरील दूषित हवा आत येण्यापासून रोखली जाते व आतील हवा नियमितपणे फिल्टर केली जाते. हवेतील धूळ व हानिकारक कण शोषून घेण्यासाठी उच्च कार्यक्षमतेचे एअर मि ल्टर्स वापरले जातात. तसेच, योग्य वायुवीजनामुळे दमट हवा बाहेर टाकली जाते व ताज्या हवेचा पुरवठा सुनिश्चित केला जातो, ज्यामुळे बुरशीच्या वाढीस प्रतिबंध होतो.

**७) माहिती तंत्रज्ञान :**

आजच्या डिजिटल युगात, माहिती तंत्रज्ञान वस्तुसंग्रहालयाच्या दैनंदिन कामकाजाचा व अभ्यागतांशी असलेल्या संबंधांचा एक अविभाज्य भाग बनले आहे. प्रभावी IT पायाभूत सुविधांमुळे संग्रहालयाला केवळ आतील व्यवस्थापन सुधारण्यात मदत होते, तर ते जगाला आपला संग्रह व ज्ञान ऑनलाइन उपलब्ध करून देण्यातही महत्त्वाची भूमिका बजावते. उदा. बंगळूरु येथील विश्वेश्वरय्या औद्योगिक व तंत्रज्ञान वस्तुसंग्रहालयाने आपल्या कामकाजात व अभ्यागत अनुभवात IT चा प्रभावीपणे वापर केला आहे. त्यांच्याकडे एक अद्ययावत संग्रह व्यवस्थापन प्रणाली, माहितीपूर्ण वेबसाइट, ऑनलाइन तिकीट विक्रीसाठी अभ्यागत व्यवस्थापन प्रणाली व अभ्यागतांसाठी विनामूल्य वाय-फायची सोय उपलब्ध आहे.

**८) संग्रह व्यवस्थापन प्रणाली :**

वस्तुसंग्रहालयातील प्रत्येक वस्तूची तपशीलवार नोंद ठेवणे, तिची माहिती अद्ययावत करणे व तिचे स्थान निश्चित करणे हे एक मोठे व गुंतागुंतीचे काम आहे. संग्रह व्यवस्थापन प्रणाली (CMS) हे काम सोपे व कार्यक्षम बनवते. VITM मध्ये प्रत्येक वस्तूची माहिती (उदा. नाव, निर्मितीचा काळ, निर्माता, भौतिक स्वरूप, इतिहास व सध्याचे स्थान) एका डिजिटल डेटाबेसमध्ये नोंदवली जाते. यामुळे कोणत्याही वस्तूची माहिती त्वरित मिळवणे, तिच्या देखभालीचा व प्रदर्शनाचा मागोवा घेणे शक्य होते. ही प्रणाली क्युरेटर व संग्रह व्यवस्थापकांसाठी एक महत्त्वाचे साधन आहे.

**९) वेबसाइट व ऑनलाइन प्रवेश :**

वस्तुसंग्रहालयाची वेबसाइट हे केवळ संस्थेची माहिती (उदा. इतिहास, उद्देश, वेळापत्रक, संपर्क) देण्यासाठीचे माध्यम नाही, तर ते जगाला आपला डिजिटल संग्रह दाखवण्याचे व शैक्षणिक संसाधने उपलब्ध

करून देण्याचे प्रभावी साधन आहे. (VITM) ची वेबसाइट त्यांच्या संग्रहातील निवडक वस्तूंचे उच्च दर्जाचे फोटो व माहिती पुरवते. यासोबतच, ऑनलाइन प्रदर्शन, शैक्षणिक व्हिडिओ व इंटरॅक्टिव्ह क्टिव्हिटीज देखील उपलब्ध आहेत, ज्यामुळे दूर असलेले लोकही संग्रहालयाशी जोडले जातात व ज्ञान प्राप्त करू शकतात.

**१०) अभ्यागत व्यवस्थापन प्रणाली :**

अभ्यागत व्यवस्थापन प्रणालीमुळे तिकीट विक्रीची प्रक्रिया जलद व सुलभ होते. (VITM) मध्ये अभ्यागत ऑनलाइन तसेच काउंटरवर डिजिटल पद्धतीने तिकीट खरेदी करू शकतात. यामुळे रांगेत उभे राहण्याचा वेळ वाचतो व संग्रहालयाला अभ्यागतांच्या संख्येचा व वेळेचा डेटा मिळतो, ज्यामुळे व्यवस्थापनाला सोयीचे होते. या प्रणालीद्वारे अभ्यागतांसाठी विशेष कार्यक्रम व ऑफर्स देखील व्यवस्थापित करता येतात.

**११) इंटरनेट व वाय–फाय :**

वस्तुसंग्रहालयातील कर्मचारी व अभ्यागतांसाठी जलद व विश्वसनीय इंटरनेट व वाय–फायची सोय आजकाल आवश्यक झाली आहे. कर्मचाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामांसाठी, संशोधनासाठी व संपर्कासाठी इंटरनेटची गरज भासते. (VITM) मध्ये कर्मचाऱ्यांसाठी उच्च वेगाचे इंटरनेट उपलब्ध आहे. त्याचबरोबर, अभ्यागतांना त्यांच्या भेटी दरम्यान माहिती शोधण्यासाठी किंवा अनुभव शेअर करण्यासाठी विनामूल्य वाय–फायची सोय पुरवली जाते, ज्यामुळे त्यांचा अनुभव अधिक समृद्ध होतो.

**१८) इतर आवश्यक सुविधा :**

वस्तुसंग्रहालयाच्या प्रभावी कार्यासाठी केवळ विशिष्ट तांत्रिक व सुरक्षा प्रणालीच नव्हे, तर काही मूलभूत परंतु अत्यावश्यक सुविधांची उपलब्धता देखील महत्त्वाची असते. या सुविधा कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामाकाजाला व अभ्यागतांच्या सोयीला मदत करतात, ज्यामुळे संपूर्ण संस्थेचे कामकाज सुरळीत चालते. उदा. नवी दिल्लीतील राष्ट्रीय कला वस्तुसंग्रहालय हे आधुनिक व समकालीन भारतीय कलाकृतींचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. या संग्रहालयात कलाकृतींच्या जतनासाठी व अभ्यागतांच्या सोयीसाठी आवश्यक असलेल्या सर्व मूलभूत सुविधांची उत्तम व्यवस्था आहे.

**१) विद्युत पुरवठा :**

वस्तुसंग्रहालयातील प्रकाश व्यवस्था, पर्यावरण नियंत्रण प्रणाली, सुरक्षा प्रणाली, IT उपकरणे व इतर सर्व कार्यांसाठी पुरेसा व स्थिर वीजपुरवठा अत्यंत आवश्यक आहे. वीजपुरवठ्यात खंड आल्यास संग्रहातील वस्तूंना धोका निर्माण होऊ शकतो व अभ्यागतांना गैरसोयीचे होऊ शकते. महत्त्वाच्या प्रणालींसाठी जनरेटरची (Generator) बॅकअप व्यवस्था देखील आहे, ज्यामुळे वीज गेल्यावरही कामकाज थांबू नये. ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर करून विजेची बचत करण्यावरही भर दिला जातो.

**२) पाणी पुरवठा व निचरा व्यवस्था :**

वस्तुसंग्रहालयात स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सोय, बागकाम व आग विझवणारी प्रणाली यांसाठी नियमित व पुरेसा पाणी पुरवठा आवश्यक असतो. त्याचप्रमाणे, वापरलेल्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी एक चांगली निचरा व्यवस्था असणेही महत्त्वाचे आहे, जेणेकरून सांडपाणी किंवा पावसाचे पाणी

साठून राहू नये. इमारतीच्या बांधकामात योग्य निचरा व्यवस्था केलेली आहे, ज्यामुळे पाणी साठण्याची समस्या उद्भवत नाही.

**३) लिफ्ट व रॅम्प :**

वस्तुसंग्रहालये अनेक मजल्यांची असू शकतात व त्यामध्ये विविध वयोगटातील व शारीरिक क्षमता असलेले अभ्यागत येत असतात. दिव्यांग व्यक्ती (विशेषत: व्हीलचेअर वापरणारे) व वृद्ध अभ्यागतांना इमारतीत सहजपणे फिरता यावे यासाठी लिफ्ट व रॅम्पची सोय असणे अत्यंत आवश्यक आहे. ज्यामुळे सर्व अभ्यागतांना कोणताही अडथळा न येता संपूर्ण संग्रहालय पाहता येते.

**४) फर्निचर व उपकरणे :**

वस्तुसंग्रहालयाच्या कार्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांसाठी आरामदायक व फर्निचर (टेबले, खुर्च्या), प्रयोगशाळांमध्ये संशोधनासाठी आवश्यक उपकरणे (मायक्रोस्कोप, रासायनिक उपकरणे), प्रदर्शनी दालनांमध्ये वस्तू प्रदर्शित करण्यासाठी डिस्प्ले केसेस, स्टँड्स व प्रकाश योजना, तसेच अभ्यागतांसाठी बसण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. प्रदर्शनी दालनांमध्ये कलाकृतींना योग्य प्रकारे दर्शवण्यासाठी विविध प्रकारचे डिस्प्ले युनिट्स व प्रकाश योजना वापरल्या जातात. अभ्यागतांना थकवा येऊ नये यासाठी विश्रांतीसाठी सोमे  व बेंच ठेवलेले आहेत.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ :**

**बहूपर्यायी प्रश्न :**

१) संग्रहालयातील प्रदर्शन दालनांचे प्रमुख कार्य काय असते?

अ) वस्तूंचे सुरक्षित जतन करणे ब) वस्तू आकर्षक व समजण्यास सोप्या पद्धतीने मांडणे

क) कर्मचाऱ्यांसाठी कार्यालयीन जागा उपलब्ध करणे

ड) अभ्यागतांसाठी विश्रांतीची सोय करणे

२) नाजूक वस्तूंसाठी संग्रहालयात कोणत्या प्रकारच्या प्रकाशयोजनेचा वापर करणे योग्य असते?

अ) जास्त तीव्रतेचा प्रकाश ब) नैसर्गिक प्रकाश थेट वस्तूवर पडेल अशा प्रकारे

क) LED प्रकाश, नियंत्रित लक्स पातळी व दिशादर्शक प्रकाश

ड) रंगीत व झगमगता प्रकाश

३) संवेदनशील वस्तू जसे की कापड व हस्तलिखिते यांच्या संरक्षणासाठी संग्रहालयात तापमान आणि आर्द्रता पातळी साधारणतः किती राखली जाते?

अ) ३०-३५ अंश सेल्सियस तापमान व ६०-७०% आर्द्रता

ब) १५-१८ अंश सेल्सियस तापमान व ३०-४०% आर्द्रता

क) २०-२२ अंश सेल्सियस तापमान व ४५-५५% आर्द्रता

ड) २५-२८ अंश सेल्सियस तापमान व ५०-६०% आर्द्रता

४) संग्रहालयातील संग्रहण कक्षाचा प्रमुख उद्देश काय असतो?

अ) अभ्यागतांना वस्तू खरेदी करण्याची सोय उपलब्ध करणे

ब) प्रदर्शित न केलेल्या किंवा भविष्यातील प्रदर्शनासाठी राखीव वस्तू सुरक्षित ठेवणे

क) कर्मचाऱ्यांसाठी बैठका आयोजित करणे

ड) शैक्षणिक कार्यक्रम घेणे

५) वस्तूंचे दीर्घकालीन संरक्षण व जतन करण्यासाठी संग्रहालयात कोणती अत्यावश्यक सुविधा असते?

अ) विक्री केंद्र  ब) उपहारगृह  क) संवर्धन प्रयोगशाळा  ड) प्रशासकीय कार्यालय

६) संग्रहालयाच्या यशस्वी संचालनासाठी कोणती व्यवस्था असणे आवश्यक आहे?

अ) केवळ आकर्षक प्रदर्शन दालनं  ब) केवळ मौल्यवान वस्तूंचा संग्रह

क) प्रभावी प्रशासकीय व्यवस्था  ड) मोठे शैक्षणिक जागा

७) अभ्यागतांना संग्रहालयातील वारसा व संस्कृतीचे महत्त्व खेळत-शिकत समजावे यासाठी कोणत्या शैक्षणिक जागेची आवश्यकता असते?

अ) सभागृह  ब) कार्यशाळा खोल्या

क) मुलांसाठी विशेष शैक्षणिक गॅलरीज व हस्तकलावर्गासाठी जागा

ड) डिजिटल शिक्षण केंद्र

८) दिव्यांग व्यक्ती व वृद्ध अभ्यागतांना संग्रहालयात सहजपणे मि रता यावे यासाठी कोणती सुविधा आवश्यक आहे?

अ) प्रशस्त पायऱ्या  ब) केवळ माहिती फलक

क) लिफ्ट व रॅम्प  ड) फिरण्यासाठी मोठे खुले आवार

९) नव्याने संग्रहात आलेल्या वस्तूंची प्राथमिक तपासणी व नोंदणी कोठे केली जाते?

अ) प्रदर्शन दालनात  ब) संग्रहण कक्षात

क) मालाची चढ-उतार व हाताळणी क्षेत्रात  ड) प्रशासकीय कार्यालयात

१०) वस्तुसंग्रहालयाच्या संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेचा केंद्रबिंदू कोणता असतो?

अ) प्रवेशद्वार  ब) प्रत्येक दालनातील सुरक्षा रक्षक

क) सुरक्षा नियंत्रण कक्ष  ड) स्वागत कक्ष

## १.२.२ संग्रहालयाची प्रशासकीय रचना व भूमिका/जबाबदाऱ्या :

वस्तुसंग्रहालयाचा प्रशासकीय आराखडा हा संस्थेच्या सुव्यवस्थित कार्यासाठी व ध्येयपूर्तीसाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. हा आराखडा विविध पदे, त्यांची रचना व वेगवेगळ्या विभागांच्या योजनांवर आधारित असतो. वस्तुसंग्रहालयाचा आकार, प्रकार व उद्दिष्टांनुसार या आराखड्यात बदल होऊ शकतो, परंतु काही प्रमुख पदे व विभाग साधारणपणे सर्वच वस्तुसंग्रहालयांमध्ये आढळतात.

वस्तुसंग्रहालयाच्या प्रशासकीय रचनेत अनेक महत्त्वाची पदे असतात, ज्यांच्या विशिष्ट जबाबदाऱ्या संस्थेचे कामकाज सुरळीतपणे चालवण्यासाठी आवश्यक असतात. या पदांवरील व्यक्ती त्यांच्या कौशल्याने व ज्ञानाने वस्तुसंग्रहालयाच्या विकासात व व्यवस्थापनात महत्त्वपूर्ण योगदान देतात. खाली प्रमुख पदे व त्यांच्या जबाबदाऱ्यांचे विस्तृत वर्णन केले आहे:

**१) संचालक :**

संचालकहे वस्तुसंग्रहालयाचे सर्वोच्च प्रशासकीय प्रमुख असतात. ते संस्थेच्या धोरणांची अंमलबजावणी करतात, व्यवस्थापनाचे नेतृत्व करतात व विश्वस्त मंडळ व कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय साधतात. संचालकांची भूमिका संस्थेची दृष्टी निश्चित करणे, निधी उभारणी करणे व बाह्य संबंध जपणे ही असते.

**संचालकाची कार्य :**

१) वस्तुसंग्रहालयाच्या दीर्घकालीन उद्दिष्टांची रूपरेषा तयार करणे व संस्थेसाठी धोरणे निश्चित करणे. विश्वस्त मंडळाच्या (Board of Trustees) मार्गदर्शनाखाली हे धोरण ठरवले जाते.

२) वस्तुसंग्रहालयाच्या सर्व विभागांवर व कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे. संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे चालावे यासाठी आवश्यक निर्देश देणे व समन्वय साधणे.

३) वस्तुसंग्रहालयाच्या वार्षिक अर्थसंकल्पाची योजना करणे, निधी उभारणीसाठी प्रयत्न करणे व खर्चावर नियंत्रण ठेवणे. आर्थिक व्यवस्थापनाच्या दृष्टीने संचालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

४) सरकारी संस्था, देणगीदार, इतर वस्तुसंग्रहालय व समुदाय यांच्याशी सकारात्मक संबंध प्रस्थापित करणे व जपणे. संस्थेची प्रतिमा व सहकार्यासाठी हे आवश्यक असते.

५) संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांचे नेतृत्व करणे, त्यांना प्रेरणा देणे व त्यांच्या कामाचे योग्य मार्गदर्शन करणे.

**२) उपसंचालक :**

उपसंचालक हे संचालकांना त्यांच्या कामात मदत करतात व विशिष्ट विभागांची जबाबदारी सांभाळू शकतात. संचालकांच्या अनुपस्थितीत ते संस्थेचे कामकाज पाहू शकतात. उपसंचालक प्रशासन, शैक्षणिक कार्यक्रम किंवा संग्रह व्यवस्थापन यांसारख्या विशिष्ट क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करू शकतात.

**३) क्युरेटर/संग्रहपाल :**

हे वस्तुसंग्रहालयातील संग्रहांचे तज्ज्ञ असतात. ते विशिष्ट कला प्रकार, ऐतिहासिक कालखंड किंवा

वैज्ञानिक क्षेत्रातील वस्तूंचे संशोधन, संपादन, प्रदर्शन व जतन यासाठी जबाबदार असतात. क्युरेटर हे प्रदर्शनांची संकल्पना व मांडणी करतात व संग्रहाच्या शैक्षणिक मूल्यावर लक्ष ठेवतात. मोठ्या वस्तुसंग्रहालयांमध्ये अनेक क्युरेटर असू शकतात, जे आपापल्या विशेष प्राविण्यानुसार काम करतात.

**क्युरेटर कार्य :**

१) वस्तुसंग्रहालयातील प्रदर्शनांची संकल्पना तयार करणे, वस्तूंची निवड करणे, प्रदर्शनाची मांडणी करणे व माहिती फलक तयार करणे. प्रदर्शने आकर्षक व माहितीपूर्ण बनवण्याची जबाबदारी क्युरेटरची असते.

२) संग्रहातील वस्तूंचा सखोल अभ्यास करणे, त्यांच्या इतिहासाची, उत्पत्तीची व सांस्कृतिक महत्त्वाची माहिती मिळवणे. हे संशोधन प्रदर्शने व प्रकाशनांसाठी आधारभूत असते.

३) संग्रहातील वस्तूंची नियमित तपासणी करणे, त्यांच्या जतनासाठी आवश्यक उपाययोजना सुचवणे व संवर्धन विभागाशी समन्वय साधणे. नवीन वस्तूंच्या संपादनात सक्रिय भूमिका घेणे.

४) संग्रहावर आधारित शैक्षणिक कार्यक्रमांच्या निर्मितीमध्ये व अंमलबजावणीमध्ये योगदान देणे.

**४) संग्रह व्यवस्थापक/जतन सहाय्यक :**

हे संग्रहातील वस्तूंच्या प्रत्यक्ष देखभाली व जतनासाठी जबाबदार असतात. ते वस्तूंचे योग्य वातावरणात (तापमान, आर्द्रता, प्रकाश) जतन करतात, त्यांची नियमित तपासणी करतात व आवश्यकतेनुसार संवर्धनाच्या कामात मदत करतात. वस्तूंची नोंदणी व त्यांच्या हालचालींचा मागोवा घेणे हे देखील त्यांचे महत्त्वाचे काम आहे.

**संग्रहपाल कार्य :**

संग्रहालय प्रशासनातील संग्रहपाल विभाग हा संस्थेच्या हृदयस्थानी असतो. संग्रहातील वस्तूंचे व्यवस्थापन, त्यांची काळजी घेणे व त्याद्वारे ज्ञान व संस्कृतीचा प्रसार करणे ही या विभागाची प्रमुख जबाबदारी असते. या विभागात कार्यरत असलेले क्युरेटर हे त्यांच्या विशिष्ट क्षेत्रातील तज्ञ असतात व संग्रहाच्या विकासात व व्यवस्थापनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यांच्या प्रमुख भूमिका व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत:

१) संग्रहपाल विभागातील क्युरेटर संग्रहातील प्रत्येक वस्तूचा सखोल अभ्यास करतात. वस्तूचा इतिहास, तिची निर्मिती, वापर, सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व, तसेच ती कोणत्या कालखंडातील आहे याची माहिती मिळवतात व ती अद्ययावत ठेवतात. यासाठी ऐतिहासिक कागदपत्रे, संदर्भ ग्रंथ व इतर तज्ञांशी सल्लामसलत केली जाते. हे संशोधन प्रदर्शनांची योजना आखण्यासाठी, माहिती म लक तयार करण्यासाठी व शैक्षणिक कार्यक्रमांसाठी आधारभूत ठरते.

२) संस्थेच्या ध्येयांनुसार संग्रहाचा विस्तार करणे ही संग्रहपाल विभागाची महत्त्वाची जबाबदारी आहे. यासाठी नवीन वस्तू खरेदी करणे, देणग्या स्वीकारणे किंवा दीर्घकालीन कर्जाऊ तत्वावर वस्तू मिळवणे यांचा समावेश होतो. प्रत्येक संपादनाची प्रक्रिया नैतिक व कायदेशीर मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून केली जाते.

क्युरेटर वस्तूची गुणवत्ता, तिचे महत्त्व व संस्थेच्या संग्रहात तिची उपयुक्तता या निकषांवर आधारित संपादनासाठी शिफारस करतात.

३) संग्रहातील वस्तूंना आकर्षक व माहितीपूर्ण पद्धतीने लोकांसमोर मांडणे हे संग्रहपाल विभागाचे प्रमुख कार्य आहे. क्युरेटर प्रदर्शनांची संकल्पना तयार करतात, कोणत्या वस्तू प्रदर्शित करायच्या याची निवड करतात व प्रदर्शनाची मांडणी कशी असावी याची योजना आखतात. ते माहिती फलक, ऑडिओ गाईड व इतर इंटरॅक्टिव्ह घटकांच्या निर्मितीमध्ये सक्रिय भूमिका घेतात, ज्यामुळे अभ्यागतांना वस्तूंची अधिक चांगली माहिती मिळते व अनुभव समृद्ध होतो. प्रदर्शनांचे नियोजन व अंमलबजावणी करताना क्युरेटर डिझायनर, शिक्षण विभाग व विपणन विभागासोबत समन्वय साधतात.

४) संग्रहातील वस्तूंचे दीर्घकाळ जतन व संवर्धन करणे ही संग्रहपाल विभागाची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. क्युरेटर वस्तूंच्या योग्य देखभालीसाठी मार्गदर्शन करतात व जतन विभागासोबत समन्वय साधून आवश्यक उपाययोजना करतात. वस्तूंचे नियमित निरीक्षण करणे, त्यांना योग्य वातावरणात (तापमान, आर्द्रता, प्रकाश) ठेवणे व त्यांच्या हाताळणीसाठी योग्य मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे यात समाविष्ट आहे. नाजूक व मौल्यवान वस्तूंसाठी विशेष काळजी घेतली जाते.

५) संग्रहातील वस्तूंची सत्यता व उत्पत्तीची खात्री करणे हे संग्रहपाल विभागाचे एक महत्त्वपूर्ण कार्य आहे. क्युरेटर त्यांच्या ज्ञानाचा व संशोधनाचा उपयोग करून वस्तूची खरी ओळख व इतिहास तपासतात. आवश्यक असल्यास बाहेरील तज्ज्ञांची मदत घेतली जाते. वस्तूंचे प्रमाणीकरण संस्थेच्या विश्वासार्हतेसाठी व संग्रहाच्या शैक्षणिक मूल्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असते.

**५) शिक्षण अधिकारी :**

हे शैक्षणिक कार्यक्रम, कार्यशाळा व अभ्यागतांसाठी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करतात.

**शैक्षणिक अधिकारी कार्य :**

१) वस्तुसंग्रहालयाच्या संग्रहावर आधारित विविध शैक्षणिक कार्यक्रमांची योजना तयार करणे. यात शालेय विद्यार्थ्यांसाठी, कुटुंबांसाठी व प्रौढांसाठी विशेष उपक्रमांचा समावेश असतो.

२) तयार केलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन व अंमलबजावणी करणे. व्याख्याने, कार्यशाळा, मार्गदर्शित भेटी व इंटरॅक्टिव्ह क्टिव्हिटीज आयोजित करणे.

३) कार्यक्रमांसाठी आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य (उदा. पुस्तिका, वर्कशीट, ऑनलाइन संसाधने) तयार करणे.

४) स्थानिक शाळा व समुदायासोबत समन्वय साधून शैक्षणिक उपक्रम राबवणे.

**६) सार्वजनिक कार्यक्रम विभाग :**

वस्तुसंग्रहालयाचा शिक्षण व सार्वजनिक कार्यक्रम विभाग समाजामध्ये ज्ञान व संस्कृतीचा प्रभावीपणे

प्रसार करण्यासाठी कार्यरत असतो. हा विभाग वेगवेगळ्या वयोगटांतील व स्तरांतील लोकांसाठी आकर्षक व माहितीपूर्ण उपक्रम आयोजित करतो, ज्यामुळे अभ्यागतांचा संग्रहाशी असलेला संबंध अधिक दृढ होतो व शिकण्याची प्रक्रिया आनंददायी बनते. या विभागाच्या प्रमुख भूमिका व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत:

**१) शैक्षणिक उपक्रमांची योजना व अंमलबजावणी :** हा विभाग शालेय विद्यार्थी, कुटुंबे व प्रौढांसाठी विविध शैक्षणिक कार्यक्रमांची योजना आखतो व त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करतो. शालेय गटांसाठी त्यांच्या अभ्यासक्रमावर आधारित भेटी व मनोरंजक ॲक्टिव्हिटीज, कुटुंबांना एकत्र शिकण्याचा व आनंद घेण्याचा अनुभव देणारे कार्यक्रम, तसेच प्रौढांसाठी विशिष्ट विषयांवरील माहितीपूर्ण सेमिनार व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. या कार्यक्रमांचा मुख्य उद्देश संग्रहालयातील मौल्यवान ज्ञान सोप्या व आकर्षक पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचवणे हा असतो.

**२) मार्गदर्शित भेटी :** शिक्षण विभागातील प्रशिक्षित मार्गदर्शक वस्तुसंग्रहालयातील विविध दालनांची व तेथील वस्तूंची माहिती अभ्यागतांना देतात. ते प्रत्येक वस्तूचा इतिहास, तिचे महत्त्व व त्यामागील मनोरंजक कथा सांगतात, ज्यामुळे अभ्यागतांना त्या वस्तूंचा संदर्भ अधिक चांगल्या प्रकारे समजतो. वेगवेगळ्या वयोगटांतील व आवडीच्या अभ्यागतांसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या मार्गदर्शित भेटींची सोय उपलब्ध केली जाते.

**३) व्याख्याने व चर्चासत्रे :** हा विभाग विविध ज्ञानशाखांमधील तज्ज्ञ व्यक्तींना वस्तुसंग्रहालयात निमंत्रित करतो व त्यांची माहितीपूर्ण व्याख्याने व चर्चासत्रे आयोजित करतो. यामुळे अभ्यागतांना त्या विशिष्ट विषयांवर सखोल ज्ञान मिळते व त्यांना एक नवीन व व्यापक दृष्टिकोन प्राप्त होतो. हे कार्यक्रम सामान्य लोकांसाठी तसेच विशिष्ट अभ्यास गटांसाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.

**४) सामुदायिक सहभाग :** शिक्षण विभाग स्थानिक समुदायासोबत सक्रियपणे भागीदारी करतो. परिसरातील शाळा, विविध सामाजिक संस्था व स्थानिक कलाकारांच्या मदतीने अनेक उपक्रम आयोजित केले जातात, ज्यामुळे वस्तुसंग्रहालय केवळ एक वस्तूंचे प्रदर्शन केंद्र न राहता समुदायाचा एक जिवंत व सक्रिय भाग बनते. यामुळे स्थानिक लोकांचा वस्तुसंग्रहालयावरील आपुलकीचा भाव वाढतो.

**५) ऑनलाइन शिक्षण व कार्यक्रम :** आजच्या डिजिटल युगात, शिक्षण विभाग वस्तुसंग्रहालयाची वेबसाइट व विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा प्रभावीपणे वापर करून माहिती व कार्यक्रमांची उपलब्धता ऑनलाइन करतो. यात संग्रहातील महत्त्वाच्या वस्तूंची माहिती, प्रदर्शनांचे आभासी (व्हर्च्युअल) दौरे, माहितीपूर्ण शैक्षणिक व्हिडिओ व मनोरंजक इंटरॅक्टिव्ह क्टिव्हिटीज यांचा समावेश असतो. यामुळे दूर असलेले लोक देखील वस्तुसंग्रहालयाशी सहजपणे जोडले जातात व ज्ञान प्राप्त करू शकतात.

**७) संग्रह व्यवस्थापन विभाग :**

वस्तुसंग्रहालयातील संग्रह व्यवस्थापन विभाग हा संग्रहातील प्रत्येक वस्तूची व्यवस्थित काळजी घेण्यासाठी व तिची अचूक नोंद ठेवण्यासाठी जबाबदार असतो. हा विभाग संग्रहाच्या दीर्घकालीन अस्तित्वासाठी व त्याच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या विभागाच्या प्रमुख भूमिका व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत -

**१) वस्तूंचे दस्तऐवजीकरण :** संग्रह व्यवस्थापन विभागाचे हे प्रमुख व महत्त्वाचे कार्य आहे. संग्रहातील प्रत्येक वस्तूची सखोल माहिती डिजिटल व भौतिक स्वरूपात नोंदवणे यात समाविष्ट आहे. वस्तूचे नाव, ओळख क्रमांक, निर्मितीचा काळ, निर्माता, तिचे भौतिक स्वरूप, तिची उत्पत्ती, ऐतिहासिक पार्श्वभूमी, सध्याचे स्थान व उच्च प्रतीची छायाचित्रे यांचा समावेश असतो. अचूक दस्तऐवजीकरणामुळे वस्तूची ओळख पटवणे, तिचा मागोवा घेणे व तिच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक माहिती सहज उपलब्ध होते. यासाठी खास संग्रह व्यवस्थापन प्रणाली (Collection Management Systems - CMS) वापरली जातात.

**२) वस्तूंचे जतन व संवर्धन :** संग्रहातील वस्तूंचे नुकसान टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व आवश्यक असल्यास त्यांचे संवर्धन करणे ही या विभागाची प्रमुख जबाबदारी आहे. यात वस्तूंचे योग्य वातावरणात (तापमान, आर्द्रता, प्रकाश) जतन करणे, त्यांची नियमित साफसफाई करणे, हाताळणीसाठी योग्य मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे यांचा समावेश होतो. नाजूक किंवा खराब झालेल्या वस्तूंसाठी व्यावसायिक संवर्धकांच्या मदतीने उपचार केले जातात, ज्यामुळे त्यांचे मूळ स्वरूप टिकून राहते व त्यांचे आयुष्य वाढते.

**३) वस्तूंची वाहतूक व व्यवस्थापन :** संग्रहातील वस्तूंना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवताना (उदाहरणार्थ, प्रदर्शनासाठी दालनात, संशोधनासाठी प्रयोगशाळेत, जतनासाठी स्टोरेजमध्ये) त्यांची सुरक्षित वाहतूक व व्यवस्थापन करणे हे संग्रह व्यवस्थापन विभागाचे कार्य आहे. यासाठी योग्य पॅकिंग साहित्य वापरणे, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या देखरेखेखाली वस्तू हलवणे व प्रत्येक हालचालीची नोंद ठेवणे आवश्यक आहे. वस्तूंच्या नुकसानीची शक्यता कमी करण्यासाठी विशेष काळजी घेतली जाते.

**४) वस्तूंचा मागोवा व भौतिक पडताळणी :** संग्रहातील सर्व वस्तूंचा नियमितपणे मागोवा घेणे व त्यांची प्रत्यक्ष पडताळणी करणे हे या विभागाचे महत्त्वाचे कार्य आहे. यामुळे संग्रहात एकूण किती वस्तू आहेत, त्या कोणत्या स्थितीत आहेत व त्यांचे अचूक स्थान काय आहे याची अद्ययावत माहिती मिळते. नियमितपणे वस्तूंची यादी तपासल्यामुळे हरवलेल्या किंवा चुकीच्या ठिकाणी असलेल्या वस्तूंचा शोध घेणे सोपे होते व संग्रहाच्या संपूर्ण व्यवस्थापनात अचूकता येते. यासाठी बारकोड स्कॅनिंग किंवा RFID (Radio-Frequency Identification) सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

**८) विकास/निधी उभारणी विभाग :**

वस्तुसंग्रहालयाचा विकास व निधी उभारणी विभाग हा संस्थेच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी व तिच्या विकासासाठी आवश्यक संसाधने जमा करण्यासाठी कार्यरत असतो. हा विभाग विविध मार्गांनी निधी मिळवतो, ज्यामुळे वस्तुसंग्रहालयाला आपले कार्य सुरळीतपणे चालवता येते व नवीन प्रकल्प हाती घेता येतात. या विभागाच्या प्रमुख भूमिका व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत–

**१) देणगीदारांशी संबंध व निधी संकलन :** विकास विभाग व्यक्ती, व्यावसायिक संस्था व धर्मादाय संस्थांकडून (फाउंडेशन) निधी जमा करण्यासाठी प्रयत्न करतो. यासाठी देणगीदारांशी चांगले संबंध प्रस्थापित करणे, त्यांना वस्तुसंग्रहालयाच्या कार्याची सखोल माहिती देणे व त्यांना उदार देणगी देण्यासाठी प्रोत्साहित

करणे महत्त्वाचे असते. वार्षिक देणगी कार्यक्रम, मोठ्या देणग्यांसाठी विशेष मोहिम व वारसा नियोजन यांसारख्या विविध पद्धतींचा वापर केला जातो. देणगीदारांना कर सवलती व इतर आवश्यक लाभ मिळविण्यात मदत केली जाते.

**२) सदस्यता कार्यक्रम :** विकास विभाग वस्तुसंग्रहालयासाठी नियमित उत्पन्न व निष्ठावान (loyal) समर्थक तयार करण्यासाठी सदस्यता कार्यक्रम चालवतो. सदस्यांना वर्षभर वस्तुसंग्रहालयात विनामूल्य किंवा सवलतीच्या दरात प्रवेश मिळतो, तसेच विशेष कार्यक्रमांना आमंत्रण व इतर आकर्षक लाभ दिले जातात. यामुळे संस्थेला एक स्थिर आर्थिक आधार मिळतो व सदस्यांच्या माध्यमातून वस्तुसंग्रहालयाचा व्यापक प्रसार होतो.

**३) अनुदान अर्ज :** विकास विभाग सरकारी व खाजगी संस्थांकडून विशिष्ट प्रकल्पांसाठी किंवा संस्थेच्या दैनंदिन कार्यांसाठी आर्थिक अनुदान मिळवण्यासाठी काळजीपूर्वक अर्ज तयार करतो व सादर करतो. यासाठी संस्थेच्या नेमक्या गरजा व प्रस्तावित प्रकल्पांचे महत्त्व प्रभावीपणे मांडणे आवश्यक असते. अनुदान मिळवण्याची प्रक्रिया अनेकदा वेळ घेणारी व स्पर्धात्मक असू शकते, त्यामुळे उच्च दर्जाचे व परिपूर्ण प्रस्ताव तयार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**४) निधी उभारणी कार्यक्रम व भेटी :** विकास विभाग निधी जमा करण्यासाठी विविध आकर्षक कार्यक्रम व विशेष भेटी आयोजित करतो. यात कला वस्तूंचे प्रदर्शन व लिलाव, विशेष स्नेहभोज (गाला डिनर), सांस्कृतिक संध्याकाळ व देणगीदारांसाठी खास भेटी यांचा समावेश असू शकतो. या कार्यक्रमांमधून जमा झालेला निधी वस्तुसंग्रहालयाच्या विकासासाठी वापरला जातो व देणगीदारांना संस्थेशी अधिक घनिष्ठपणे जोडले जाण्याची एक मौल्यवान संधी मिळते.

**९) विपणन व संवाद विभाग :**

वस्तुसंग्रहालयाचा विपणन व संवाद विभाग संस्थेची प्रतिमा लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी व अभ्यागतांना आकर्षित करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. हा विभाग विविध माध्यमांचा वापर करून वस्तुसंग्रहालयाच्या कार्यक्रमांची, प्रदर्शनांची व एकूणच संस्थेच्या कार्याची माहिती लोकांपर्यंत पोहोचवतो व सकारात्मक संवाद साधतो. या विभागाच्या प्रमुख भूमिका व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत:

**१) माध्यमांमार्म त माहितीचा प्रसार :** विपणन व संवाद विभाग वस्तुसंग्रहालयात आयोजित होणारे विविध प्रदर्शने, कार्यक्रम व नवीन उपक्रम यांची माहिती वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ व ऑनलाइन न्यूज पोर्टल्स यांसारख्या माध्यमांपर्यंत पोहोचवतो. यासाठी प्रभावी 'प्रेस रिलीज' तयार करणे, पत्रकार परिषदा आयोजित करणे व माध्यमांशी चांगले व्यावसायिक संबंध राखणे महत्त्वाचे असते. सकारात्मक प्रसिद्धीमुळे वस्तुसंग्रहालयाची चांगली प्रतिमा तयार होते व लोकांपर्यंत अचूक माहिती पोहोचते.

**२) सोशल मीडिया व्यवस्थापन :** आजकाल सोशल मीडिया हे लोकांशी संवाद साधण्याचे व त्यांना आकर्षित करण्याचे एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. हा विभाग फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, यूट्यूब व इतर लोकप्रिय सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वस्तुसंग्रहालयाचे अधिकृत प्रोफाइल तयार करतो व त्यावर नियमितपणे आकर्षक पोस्ट्स, दर्जेदार फोटो, माहितीपूर्ण व्हिडिओ व आगामी कार्यक्रमांची माहिती सामायिक करतो.

अभ्यागतांच्या प्रश्नांची त्वरित उत्तरे देणे व त्यांच्याशी सतत संवाद साधणे हे देखील या विभागाचे महत्त्वाचे कार्य आहे, ज्यामुळे ऑनलाइन समुदायासोबत एक मजबूत व जिव्हाळ्याचे नाते तयार होते.

**३) वेबसाइट व्यवस्थापन :** वस्तुसंग्रहालयाची वेबसाइट ही संस्थेची ऑनलाइन ओळख असते. या विभागाची प्रमुख जबाबदारी वेबसाइट नियमितपणे अद्ययावत ठेवणे, त्यावर संस्थेची अचूक व तपशीलवार माहिती (इतिहास, उद्देश, वेळापत्रक, संपर्क), सध्याची प्रदर्शने, आगामी कार्यक्रम व डिजिटल स्वरूपातील संग्रह उपलब्ध करणे आहे. वेबसाइट वापरण्यास सोपी व आकर्षक असावी लागते, ज्यामुळे अभ्यागतांना आवश्यक माहिती सहजपणे मिळू शकेल व ते ऑनलाइन तिकीट बुकिंग किंवा इतर सोयीस्कर सुविधांचा लाभ घेऊ शकतील.

**४) जाहिरात :** अभ्यागतांना मोठ्या संख्येने आकर्षित करण्यासाठी विपणन विभाग विविध प्रभावी माध्यमांचा वापर करून जाहिरात करतो. यात प्रमुख वर्तमानपत्रे व मासिकांमधील आकर्षक जाहिराती, प्रभावी रेडिओ स्पॉट, लक्ष्यित ऑनलाइन जाहिरात व आवश्यकतेनुसार होर्डिंग्ज किंवा माहितीपूर्ण पोस्टर्सचा वापर केला जातो. जाहिराती आकर्षक व नेमक्या लक्ष्य गटांपर्यंत पोहोचणाऱ्या असाव्यात, ज्यामुळे वस्तुसंग्रहालयाला अधिकाधिक अभ्यागत मिळू शकतील.

**५) ब्रँडिंग व प्रतिमा निर्मिती :** वस्तुसंग्रहालयाची एक सकारात्मक व विशिष्ट प्रतिमा (Brand Image) तयार करणे हे या विभागाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते. यात संस्थेचा आकर्षक लोगो, प्रभावी रंगसंगती, सुसंगत संवादशैली व एकूणच लोकांमध्ये संस्थेबद्दलची सकारात्मक भावना यांचा समावेश असतो. प्रभावी ब्रँडिंगमुळे वस्तुसंग्रहालय लोकांमध्ये सहजपणे ओळखले जाते व त्याची विश्वासार्हता वाढते. सकारात्मक ब्रँडिंग अभ्यागतांना भेट देण्यासाठी आकर्षित करण्यात व संभाव्य देणगीदारांना उदार देणगी देण्यासाठी प्रोत्साहित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

**१०) प्रशासन/वित्त विभाग :**

वस्तुसंग्रहालयाचा प्रशासन व वित्त विभाग हा संस्थेच्या दैनंदिन कामकाजाचा व आर्थिक व्यवहारांचा आधारस्तंभ असतो. हा विभाग संस्थेच्या सर्व कार्यांसाठी आवश्यक असलेल्या संसाधनांचे नियोजन करतो, त्यांचे व्यवस्थापन करतो व संस्थेने कायद्याचे योग्य पालन करावे याची काळजी घेतो. या विभागाच्या प्रमुख भूमिका व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत–

**१) आर्थिक नियोजन व व्यवस्थापन :** प्रशासन व वित्त विभाग वस्तुसंग्रहालयाच्या वार्षिक खर्चाची सविस्तर योजना तयार करतो, ज्यामध्ये संस्थेच्या सर्व विभागांच्या गरजा व अपेक्षित खर्चाचा समावेश असतो. तयार केलेल्या अर्थसंकल्पाला उच्च व्यवस्थापनाची मंजुरी मिळाल्यानंतर, त्यानुसार खर्चाचे प्रभावी व्यवस्थापन करणे व त्यावर काटेकोर नियंत्रण ठेवणे ही या विभागाची प्रमुख जबाबदारी असते. अनावश्यक खर्च टाळणे व उपलब्ध आर्थिक संसाधनांचा कार्यक्षम व योग्य वापर करणे यावर विशेष लक्ष दिले जाते.

**२) लेखा व आर्थिक अहवाल :** संस्थेच्या सर्व आर्थिक व्यवहारांची अचूक नोंद ठेवणे (लेखा) व वेळोवेळी संस्थेच्या आर्थिक स्थितीचा तपशीलवार अहवाल तयार करणे हे या विभागाचे महत्त्वाचे कार्य आहे.

यात संस्थेच्या सर्व जमा व खर्चाचे सखोल विश्लेषण करणे, संस्थेचा ताळेबंद (Balance Sheet) व नफा-तोटा खाते (Profit and Loss Account) तयार करणे यांचा समावेश असतो. तयार केलेले आर्थिक अहवाल संस्थेच्या व्यवस्थापनाला व संबंधित नियामक प्राधिकरणांना सादर केले जातात.

**३) मानव संसाधन व्यवस्थापन :** या विभागात संस्थेसाठी योग्य कर्मचाऱ्यांची भरती करणे, त्यांना आवश्यक प्रशिक्षण देणे व त्यांच्या कल्याणाची काळजी घेणे यांचा समावेश होतो. योग्य व कुशल कर्मचाऱ्यांची निवड करणे, त्यांच्यासाठी कामाचे सकारात्मक व सुरक्षित वातावरण तयार करणे, त्यांच्या वेतनाचे व इतर आवश्यक लाभांचे व्यवस्थापन करणे, तसेच त्यांच्या व्यावसायिक विकासासाठी उपयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे ही या विभागाची महत्त्वपूर्ण जबाबदारी असते. कर्मचाऱ्यांशी संबंधित सर्व कायदेशीर नियमांचे योग्य पालन करणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

**४) कायदेशीर अनुपालन :** वस्तुसंग्रहालयाने देशाच्या व संस्थेशी संबंधित सर्व कायद्यांचे व नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. हा विभाग संस्थेशी संबंधित सर्व कायदेशीर बाबींची (उदाहरणार्थ, कर नियम, कामगार कायदे, सांस्कृतिक वारसा संरक्षण कायदे) अद्ययावत माहिती ठेवतो व संस्थेने त्यांचे योग्य पालन करावे याची खात्री करतो. आवश्यक परवानग्या वेळेवर मिळवणे व सर्व कायदेशीर कागदपत्रे व्यवस्थित व अद्ययावत ठेवणे हे देखील या विभागाचे महत्त्वाचे कार्य आहे.

**५) प्रशासकीय कामकाज व पुरवठा व्यवस्थापन :** वस्तुसंग्रहालयाच्या इमारतीची नियमितपणे योग्य देखभाल करणे, परिसराच्या साफसफाईची प्रभावी व्यवस्था पाहणे, संस्थेसाठी आवश्यक वस्तू व उपकरणांची खरेदी करणे व त्यांचे योग्य व्यवस्थापन (पुरवठा व्यवस्थापन) करणे, तसेच संस्थेशी संबंधित इतर सर्व आवश्यक प्रशासकीय कार्येया विभागाद्वारे केली जातात. संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे चालावे यासाठी हा विभाग अत्यंत महत्त्वपूर्ण व आधारभूत भूमिका बजावतो.

**११) सुरक्षा विभाग :**

वस्तुसंग्रहालयाचा सुरक्षा विभाग हा संस्थेतील प्रत्येक व्यक्ती व वस्तूच्या सुरक्षिततेची महत्त्वपूर्ण जबाबदारी सांभाळतो. अभ्यागत, सर्व कर्मचारी व संग्रहातील अत्यंत मौल्यवान वस्तूंचे संरक्षण करणे हे या विभागाचे प्राथमिक व सर्वोच्च उद्दिष्ट असते. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सुरक्षा योजना तयार करणे, कुशल सुरक्षा कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन करणे व संस्थेतील आधुनिक सुरक्षा प्रणालीची नियमित देखभाल करणे यांसारख्या अनेक आवश्यक कार्यांचा समावेश होतो. या विभागाच्या प्रमुख भूमिका व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत-

**१) सुरक्षा योजना तयार करणे व तिची अंमलबजावणी :** सुरक्षा विभाग वस्तुसंग्रहालयाच्या विशिष्ट गरजा व संभाव्य धोके बारकाईने लक्षात घेऊन एक सर्वसमावेशक व प्रभावी सुरक्षा योजना तयार करतो. या योजनेत अभ्यागत, सर्व कर्मचारी व संग्रहांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रतिबंधात्मक व संरक्षणात्मक उपाययोजनांचा तपशीलवार समावेश असतो. तयार केलेल्या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी

करणे व वेळेनुसार तिचे नियमितपणे पुनरावलोकन करून आवश्यक बदल करणे हे या विभागाचे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे.

**२) सुरक्षा कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन :** सुरक्षा विभागामध्ये कर्तव्यनिष्ठ सुरक्षा रक्षकांची भरती करणे, त्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले सर्वंकष प्रशिक्षण देणे व त्यांच्या कामाचे योग्य वेळापत्रक तयार करणे ही या विभागाची प्रमुख जबाबदारी आहे. सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या स्पष्टपणे निश्चित केल्या जातात व त्यांना कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत योग्य व त्वरित प्रतिसाद देण्यासाठी कठोर प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्या कामाचे नियमित मूल्यांकन करणे व त्यांच्या कल्याणाची काळजी घेणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

**३) सुरक्षा प्रणालीची देखभाल :** वस्तुसंग्रहालयात स्थापित केलेल्या विविध आधुनिक सुरक्षा प्रणाली (उदाहरणार्थ, सीसीटीव्ही कॅमेरे, प्रगत अलार्म सिस्टीम, प्रभावी प्रवेश नियंत्रण प्रणाली) यांची नियमितपणे काटेकोर देखभाल करणे व त्या नेहमी अद्ययावत ठेवणे हे सुरक्षा विभागाचे महत्त्वाचे कार्य आहे. या सर्व प्रणाली योग्य प्रकारे व कार्यक्षमतेने काम करत आहेत की नाही याची नियमित तपासणी करणे व आवश्यक दुरुस्ती त्वरित करणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून कोणतीही सुरक्षा त्रुटी राहू नये. नवीन व अधिक प्रभावी सुरक्षा तंत्रज्ञानाचा अवलंब करणे देखील याच विभागामार्म त केले जाते.

**४) आपत्कालीन प्रतिसाद योजना :** वस्तुसंग्रहालयात आग लागल्यास, चोरी झाल्यास किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या गंभीर आपत्कालीन परिस्थितीत काय करावे यासाठी सुरक्षा विभाग एक तपशीलवार व सुव्यवस्थित मार्गदर्शन योजना तयार करतो. या योजनेत आपत्कालीन परिस्थितीत सर्व कर्मचाऱ्यांनी व अभ्यागतांनी नेमके काय करावे, कोणाशी त्वरित संपर्क साधावा व सुरक्षित ठिकाणी कसे पोहोचावे याची स्पष्ट माहिती दिलेली असते. नियमितपणे आपत्कालीन परिस्थितीत प्रतिसाद देण्याचे प्रशिक्षण (मॉक ड्रिल) आयोजित करणे देखील या विभागाचे अत्यावश्यक कार्य आहे, ज्यामुळे प्रत्यक्ष धोका निर्माण झाल्यास त्वरित व योग्य प्रतिसाद देणे शक्य होते व संभाव्य नुकसान टाळता येते.

**१२) तांत्रिक सहाय्यक व स्टाफ :**

१) वस्तुसंग्रहालयाच्या इमारतीची, उपकरणांची व इतर भौतिक सुविधांची नियमित देखभाल करणे व आवश्यक दुरुस्ती करणे.

२) प्रदर्शनातील व इतर विभागांतील तांत्रिक उपकरणांचे योग्य व्यवस्थापन करणे व त्यांची नियमित तपासणी करणे.

३) विद्युत पुरवठा, पाणी पुरवठा, स्वच्छता व इतर आवश्यक सुविधा सुरळीतपणे पुरवणे. तांत्रिक समस्यांचे निराकरण करणे.

या प्रमुख पदांव्यतिरिक्त, वस्तुसंग्रहालयाच्या गरजेनुसार इतर सहाय्यक कर्मचारी देखील कार्यरत असतात, जे संस्थेच्या दैनंदिन कार्यात महत्त्वपूर्ण योगदान देतात. प्रत्येक पदावरील व्यक्तीची जबाबदारी स्पष्टपणे परिभाषित केलेली असल्यास, वस्तुसंग्रहालयाचे कामकाज अधिक कार्यक्षम व प्रभावी होते.

**१३) विभागांची योजना :**

वस्तुसंग्रहालयातील कार्य अधिक सुलभ व विशिष्ट उद्दिष्टांवर केंद्रित करण्यासाठी वेगवेगळ्या विभागांची योजना केली जाते. काही सामान्य विभाग खालीलप्रमाणे–

**कला विभाग :** या विभागात चित्रकला, शिल्पकला, ग्राफिक्स व इतर कला प्रकारांमधील वस्तूंचे व्यवस्थापन केले जाते. या विभागाचे क्युरेटर या कला प्रकारांमधील तज्ञ असतात.

**१) ऐतिहासिक विभाग :** या विभागात ऐतिहासिक महत्त्व असलेल्या वस्तू, कागदपत्रे, शस्त्रे व इतर कलाकृती जतन केल्या जातात. येथील क्युरेटर इतिहास व पुरातत्वशास्त्र यांसारख्या विषयांतील जाणकार असतात.

**२) वैज्ञानिक विभाग :** नैसर्गिक इतिहास, भूगर्भशास्त्र, जीवशास्त्र व तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांतील वस्तू व नमुने या विभागात असतात. वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले क्युरेटर या विभागाचे कामकाज पाहतात.

**३) शिक्षण विभाग :** हा विभाग वस्तुसंग्रहालयातील ज्ञानाचा प्रसार अभ्यागतांपर्यंत विविध शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे करतो. शालेय गट, कुटुंबे व प्रौढांसाठी विशेष उपक्रम आयोजित केले जातात.

**४) सुरक्षा विभाग :** वस्तुसंग्रहालयाची व संग्रहातील वस्तूंची सुरक्षा सुनिश्चित करणे हे या विभागाचे मुख्य कार्य आहे. सुरक्षा कर्मचारी व आधुनिक सुरक्षा प्रणाली या विभागात कार्यरत असतात.

**१५) संग्रह व्यवस्थापन विभाग :**

या विभागात संग्रहातील सर्व वस्तूंची नोंदणी, जतन व त्यांची हालचाल यांचा मागोवा घेतला जातो.

**१) प्रशासन विभाग :** संस्थेचे दैनंदिन कामकाज, मनुष्यबळ व्यवस्थापन, वित्त व इतर प्रशासकीय कार्ये हा विभाग पाहतो.

**२) विपणन व जनसंपर्क विभाग :** वस्तुसंग्रहालयाची प्रसिद्धी करणे व लोकांशी चांगले संबंध राखणे हे या विभागाचे उद्दिष्ट असते.

**३) विकास विभाग :** निधी उभारणी व देणग्या मिळवण्यासाठी हा विभाग कार्यरत असतो.

वस्तुसंग्रहालयाच्या आकारानुसार व संग्रहाच्या प्रकारानुसार या विभागांमध्ये उपविभाग देखील असू शकतात. उदा. कला विभागात आधुनिक कला उपविभाग, पारंपरिक कला उपविभाग असे भाग असू शकतात. प्रभावी प्रशासकीय आराखडा वस्तुसंग्रहालयाच्या सर्व कार्यांना योग्य दिशा देतो व संस्थेच्या विकासासाठी महत्त्वाचा असतो.

**१६) स्वायत्त संस्था व सल्लागार समित्यांची भूमिका :**

अनेक वस्तुसंग्रहालये स्वायत्त संस्था म्हणून कार्यरत असतात, म्हणजेच त्यांचे व्यवस्थापन थेट सरकारी नियंत्रणाखाली नसून एका स्वतंत्र मंडळाद्वारे केले जाते. याव्यतिरिक्त, वस्तुसंग्रहालयांना त्यांच्या विशिष्ट

कार्यांमध्ये मार्गदर्शन व सल्ला देण्यासाठी विविध सल्लागार समित्या देखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. या संस्था व समित्या वस्तुसंग्रहालयाच्या धोरण निश्चिती, गुणवत्ता सुधारणा व लोकांशी असलेला संबंध अधिक दृढ करण्यात मदत करतात.

**१) स्वायत्त संस्था :**

अनेक वस्तुसंग्रहालये सरकारी अनुदान प्राप्त करत असली तरी, त्यांच्या दैनंदिन प्रशासनामध्ये स्वायत्तता राखतात. यासाठी एक गव्हर्निंग्ह बॉडी किंवा विश्वस्त मंडळ स्थापन केले जाते. या मंडळावर विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती, शिक्षणतज्ज्ञ, कला समीक्षक, उद्योगपती व समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती सदस्य म्हणून काम करतात.

१) स्वायत्त संस्थेचे मंडळ वस्तुसंग्रहालयाच्या दीर्घकालीन धोरणांची व उद्दिष्टांची रूपरेषा ठरवते.

२) संस्थेच्या अर्थसंकल्पाला मंजुरी देणे, निधी उभारणीच्या योजनांना मान्यता देणे व खर्चावर नियंत्रण ठेवणे ही मंडळाची जबाबदारी असते.

३) वस्तुसंग्रहालयाच्या संचालकाची निवड करणे व त्यांच्या कार्याचे वेळोवेळी मूल्यांकन करणे.

४) संस्थेने कायद्याचे व नैतिक मानकांचे पालन करावे यासाठी मार्गदर्शन करणे.

५) समाजातील विविध घटकांशी समन्वय साधून वस्तुसंग्रहालयाची प्रतिमा अधिक चांगली बनवणे.

**२) सल्लागार समित्या :**

वस्तुसंग्रहालयाच्या विशिष्ट कार्यांमध्ये तज्ज्ञ व संबंधित हितधारकांकडून उपयुक्त सल्ला घेण्यासाठी विविध प्रकारच्या सल्लागार समित्या स्थापन केल्या जातात. या समित्या वस्तुसंग्रहालयाच्या व्यवस्थापनाला अधिक योग्य व माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करतात. काही प्रमुख सल्लागार समित्या व त्यांची महत्त्वाची भूमिका खालीलप्रमाणे आहे-

**अ) सल्लागार मंडळ :** या समितीत विविध क्षेत्रांतील अनुभवी व प्रतिष्ठित व्यक्तींचा समावेश असतो. हे मंडळ वस्तुसंग्रहालयाच्या धोरणात्मक महत्त्वाच्या निर्णयांवर, नवीन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांवर व संस्थेच्या दीर्घकालीन विकासावर व्यापक दृष्टिकोन ठेवून मोलाचा सल्ला देते. त्यांची भूमिका केवळ तांत्रिक बाबींपुरती मर्यादित नसून, संस्थेच्या सामाजिक व सांस्कृतिक भूमिकेला अधिक प्रभावी व अर्थपूर्ण बनवण्यावर लक्ष केंद्रित करणे असते.

**ब) कला तज्ज्ञ समिती/संग्रह समिती :** या समितीत कला क्षेत्रातील जाणकार इतिहासकार, अनुभवी कला समीक्षक व विशिष्ट कला प्रकारांतील तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश असतो. त्यांची प्रमुख भूमिका संग्रहातील नवीन वस्तूंच्या संपादनाबाबत व्यवस्थापनाला योग्य सल्ला देणे, संग्रहातील विद्यमान वस्तूंचे प्रमाणीकरण करणे व त्यांच्या योग्य जतन व संरक्षणासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे असते. याव्यतिरिक्त, नवीन आकर्षक प्रदर्शनांच्या संकल्पनांवर व संग्रहाच्या शैक्षणिक मूल्यावरही ते आपले महत्त्वपूर्ण मत व्यक्त करतात.

**क) अभ्यागतांचे अभिप्राय समिती :** या समितीत वस्तुसंग्रहालयाला नियमितपणे भेट देणारे सजग अभ्यागत व समाजातील विविध स्तरांतील प्रतिनिधी यांचा समावेश असतो. त्यांची महत्त्वाची भूमिका वस्तुसंग्रहालयाच्या विविध सुविधा, आयोजित प्रदर्शने व एकूणच अभ्यागतांच्या अनुभवाबाबत त्यांचे प्रामाणिक अभिप्राय व्यवस्थापनापर्यंत पोहोचवणे व आवश्यक सुधारणांसाठी उपयुक्त सूचना देणे असते. यामुळे वस्तुसंग्रहालय अधिक अभ्यागत-केंद्रित बनण्यास मदत होते व अभ्यागतांच्या गरजा व अपेक्षा पूर्ण केल्या जातात.

**इतर विशिष्ट सल्लागार समित्या :**

याव्यतिरिक्त, वस्तुसंग्रहालयाच्या विशिष्ट गरजा व कार्यांनुसार इतर विषयांवर आधारित विशेष सल्लागार समित्या देखील स्थापन केल्या जाऊ शकतात, जसे की-

**१) शैक्षणिक सल्लागार समिती :** वस्तुसंग्रहालयातील शैक्षणिक कार्यक्रमांची प्रभावी योजना व यशस्वी अंमलबजावणी यावर तज्ज्ञांचा सल्ला देण्यासाठी.

**२) सुरक्षा सल्लागार समिती :** वस्तुसंग्रहालयातील सुरक्षा मानके व विद्यमान सुरक्षा प्रणाली अधिक मजबूत व अद्ययावत करण्यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी.

**३) तांत्रिक सल्लागार समिती :** वस्तुसंग्रहालयातील माहिती तंत्रज्ञान (IT) व इतर तांत्रिक उपकरणांचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी तज्ज्ञांचा मौल्यवान सल्ला मिळवण्यासाठी.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ :**

**बहूपर्यायी प्रश्न :**

१) वस्तुसंग्रहालयाच्या प्रशासकीय रचनेत सर्वोच्च प्रशासकीय प्रमुख कोण असतो?

अ) क्युरेटर ब) संचालक क) संग्रह व्यवस्थापक ड) शिक्षण अधिकारी

२) संचालकाचे प्रमुख कार्य काय आहे?

अ) वस्तूंचे जतन करणे ब) प्रदर्शनांची मांडणी करणे

क) धोरणे निश्चित करणे व निधी उभारणी करणे ड) अभ्यागतांना माहिती देणे

३) वस्तुसंग्रहालयातील संग्रहांचे तज्ज्ञ कोण मानले जातात, जे वस्तूंचे संशोधन, संपादन व प्रदर्शनासाठी जबाबदार असतात?

अ) उपसंचालक ब) संग्रह व्यवस्थापक

क) क्युरेटर/संग्रहपाल ड) शिक्षण अधिकारी

४) क्युरेटरचे महत्त्वाचे कार्य कोणते आहे?

अ) कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन करणे ब) आर्थिक अहवाल तयार करणे

क) प्रदर्शनांची संकल्पना व मांडणी करणे ड) सुरक्षा व्यवस्थेची देखभाल करणे

५) संग्रहातील वस्तूंच्या प्रत्यक्ष देखभाली व जतनासाठी कोण जबाबदार असतो?

अ) संचालक ब) उपसंचालक

क) संग्रह व्यवस्थापक/जतन सहाय्यक ड) शिक्षण अधिकारी

६) शैक्षणिक कार्यक्रम, कार्यशाळा व अभ्यागतांसाठी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन कोण करतो?

अ) क्युरेटर ब) संग्रह व्यवस्थापक

क) शिक्षण अधिकारी ड) जनसंपर्क अधिकारी

७) संग्रहातील प्रत्येक वस्तूची तपशीलवार नोंद ठेवणे व तिचे स्थान निश्चित करणे हे कोणत्या विभागाचे कार्य आहे?

अ) विपणन विभाग ब) प्रशासन विभाग

क) संग्रह व्यवस्थापन विभाग ड) विकास विभाग

८) वस्तुसंग्रहालयाच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी निधी उभारणीचे कार्य कोण करतो?

अ) प्रशासन विभाग ब) सुरक्षा विभाग

क) विकास/निधी उभारणी विभाग ड) लेखा विभाग

९) वस्तुसंग्रहालयाची प्रतिमा लोकांपर्यंत पोहोचवणे व अभ्यागतांना आकर्षित करणे हे कोणत्या विभागाचे कार्य आहे?

अ) संग्रह व्यवस्थापन विभाग ब) विपणन व संवाद विभाग

क) शिक्षण विभाग ड) तांत्रिक सहाय्यक विभाग

१०) वस्तुसंग्रहालयाच्या धोरणात्मक निर्णयांवर व विकासावर व्यापक दृष्टीने सल्ला देण्यासाठी कोणती समिती कार्यरत असते?

अ) कला तज्ञ समिती ब) अभ्यागतांचे अभिप्राय समिती

क) सल्लागार मंडळ ड) सुरक्षा सल्लागार समिती

## १.२.३ संग्रहालयाचे व्यवस्थापन व सुरक्षा :

वस्तुसंग्रहालयाचे प्रभावी व्यवस्थापन व सुरक्षितता हे संस्थेच्या दीर्घकालीन अस्तित्वासाठी व तिच्या ध्येयांच्या पूर्ततेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. व्यवस्थापनामध्ये संग्रहाची काळजी घेणे, आर्थिक नियोजन करणे, लोकांशी संपर्क साधणे व शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करणे यांचा समावेश होतो, तर सुरक्षा प्रणाली संस्थेच्या मालमत्तेचे व अभ्यागतांचे संरक्षण सुनिश्चित करते.

### १) संग्रहालय व्यवस्थापन :

संग्रहालय व्यवस्थापनात खालील प्रमुख क्षेत्रांचा समावेश होतो:

**१) नवीन वस्तूंचे संपादन :** वस्तुसंग्रहालयाच्या ध्येयांनुसार नवीन व महत्त्वपूर्ण वस्तू व कलाकृती जमा करणे हे महत्त्वाचे कार्य आहे. यात विविध मार्गांचा अवलंब केला जातो, जसे की खरेदी करणे, व्यक्ती किंवा संस्थांकडून देणग्या स्वीकारणे व कायदेशीर वारसा हक्काने प्राप्त झालेल्या वस्तूंचा समावेश होतो. वस्तू संपादनाची संपूर्ण प्रक्रिया नैतिक व कायदेशीर नियमांनुसार पार पाडली जाते.

**२) वस्तूंची नोंदणी व दस्तऐवजीकरण :** संग्रहातील प्रत्येक वस्तूची सखोल व तपशीलवार नोंदणी करणे अत्यंत आवश्यक आहे. या नोंदीमध्ये वस्तूचे नेमके नाव, ती कधी तयार झाली, तिचा निर्माता कोण आहे, तिचे भौतिक स्वरूप कसे आहे, तिचा ऐतिहासिक संदर्भ काय आहे, ती सध्या कोठे ठेवली आहे व तिची छायाचित्रे यांचा समावेश असतो. अचूक दस्तऐवजीकरणामुळे संग्रहालयातील प्रत्येक वस्तूचा मागोवा घेणे व तिची सर्व माहिती व्यवस्थितपणे व्यवस्थापित करणे शक्य होते. यासाठी खास तयार केलेले सॉफ्टवेअर व डेटाबेस वापरले जातात.

**३) वस्तूंचे जतन व देखभाल :** संग्रहातील वस्तूंचे दीर्घकाळ संरक्षण करणे व त्यांची नियमित देखभाल करणे हे एक महत्त्वाचे कार्य आहे. यासाठी संग्रहालयाच्या प्रदर्शन व संग्रह कक्षांमध्ये योग्य तापमान, आर्द्रता व प्रकाशाची पातळी नियंत्रित ठेवली जाते. तसेच, वस्तूंना नियमितपणे स्वच्छ केले जाते व संभाव्य नुकसान टाळण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जाते.

**४) नाजूक वस्तूंचे संरक्षण :** संग्रहातील नाजूक व अत्यंत मौल्यवान वस्तूंचे कोणत्याही प्रकारचे नुकसान किंवा ऱ्हास टाळण्यासाठी विशेष काळजी घेतली जाते. वस्तू हाताळताना घ्यायची विशेष दक्षता, त्यांची योग्य मांडणी व सुरक्षित स्टोरेजची व्यवस्था केली जाते. आवश्यकतेनुसार, व्यावसायिक संवर्धकांची मदत घेऊन या वस्तूंचे जतन केले जाते.

**२) आर्थिक व्यवस्थापन:**

**१) वार्षिक खर्च योजना :** वस्तुसंग्रहालयाच्या वर्षभराच्या खर्चाची तपशीलवार योजना तयार करणे हे आर्थिक व्यवस्थापनाचे महत्त्वाचे अंग आहे. या योजनेत कर्मचाऱ्यांचे वेतन, इमारतीची नियमित देखभाल, विविध प्रदर्शनांवर येणारा खर्च, सुरक्षा व्यवस्था, विपणन व संस्थेशी संबंधित इतर प्रशासकीय खर्चांचा समावेश असतो.

**२) निधी उभारणी :** वस्तुसंग्रहालयाची कार्ये सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आवश्यक निधी जमा करणे महत्त्वाचे आहे. यासाठी अनेक मार्ग अवलंबले जातात:

**३) सरकारी व खाजगी अर्थसहाय्य :** सरकारी व खाजगी संस्थांकडून विशिष्ट प्रकल्पांसाठी किंवा वस्तुसंग्रहालयाच्या दैनंदिन कार्यांसाठी मिळणारे आर्थिक साहाय्य महत्त्वाचे असते. यासाठी योग्य प्रस्ताव तयार करून संबंधित संस्थांकडे अर्ज सादर करणे आवश्यक असते.

**४) देणग्या :** व्यक्ती, व्यावसायिक संस्था व इतर इच्छुक घटकांकडून स्वेच्छेने मिळणारे आर्थिक योगदान

हे निधी उभारणीचे महत्त्वाचे साधन आहे. यासाठी देणगीदारांशी चांगले व विश्वासार्ह संबंध प्रस्थापित करणे व त्यांना वस्तुसंग्रहालयाच्या कार्याची सखोल माहिती देणे आवश्यक असते.

**५) प्रायोजकत्व :** विशिष्ट प्रदर्शने, विशेष कार्यक्रम किंवा वस्तुसंग्रहालयाच्या काही सुविधांसाठी व्यावसायिक संस्थांकडून आर्थिक मदत मिळवणे शक्य असते. या मदतीच्या बदल्यात प्रायोजकांना त्यांच्या गरजेनुसार जाहिरात किंवा इतर व्यावसायिक लाभ दिले जातात.

**६) खर्च नियंत्रण व आर्थिक पारदर्शकता :** तयार केलेल्या वार्षिक तरतुदीनुसार खर्चावर काटेकोर नियंत्रण ठेवणे व संस्थेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये पूर्ण पारदर्शकता राखणे अत्यंत आवश्यक आहे. नियमितपणे जमाखर्चाचा हिशोब तपासणे व त्याचे योग्य व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे.

**३) लोकसंपर्क व विपणन :**

**१) सकारात्मक प्रतिमा निर्मिती :** समाजामध्ये वस्तुसंग्रहालयाची एक चांगली व सकारात्मक प्रतिमा तयार करणे व ती टिकवून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी विविध प्रसारमाध्यमे, स्थानिक समुदाय व इतर संबंधित संस्थांशी मैत्रीपूर्ण व सहकार्याचे संबंध राखणे आवश्यक आहे.

**२) माध्यमांमार्म त माहितीचा प्रसार :** वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडिओ व विविध ऑनलाइन माध्यमांशी नियमित संपर्क साधून वस्तुसंग्रहालयात आयोजित केल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रम व प्रदर्शनांची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवणे हे विपणनाचे महत्त्वाचे कार्य आहे. यासाठी प्रभावी 'प्रेस रिलीज' तयार करणे व आवश्यकतेनुसार पत्रकार परिषदा आयोजित करणे उपयुक्त ठरते.

**३) सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर :** फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम व यूट्यूब यांसारख्या लोकप्रिय सामाजिक माध्यमांचा प्रभावीपणे वापर करणे आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचे आहे. या माध्यमांद्वारे लोकांशी थेट संवाद साधता येतो, त्यांना वस्तुसंग्रहालयाकडे आकर्षित करता येते व नियमितपणे माहितीपूर्ण पोस्ट्स, आकर्षक छायाचित्रे व माहितीपूर्ण व्हिडिओ सामायिक करता येतात.

**४) शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम :**

**१) प्रशिक्षणपर कार्यशाळा :** विशिष्ट कला प्रकारांवर किंवा महत्त्वाच्या विषयांवर आधारित प्रशिक्षण देणाऱ्या कार्यशाळांचे आयोजन करणे. या कार्यशाळांमध्ये सहभागी व्यक्तींना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याचा अनुभव मिळतो, ज्यामुळे त्यांचे ज्ञान व कौशल्ये वाढतात.

**२) माहितीपूर्ण व्याख्याने :** विविध क्षेत्रांतील तज्ञ व्यक्तींना वस्तुसंग्रहालयात आमंत्रित करून माहितीपूर्ण व्याख्याने आयोजित करणे. यामुळे अभ्यागतांना अनेक नवीन विषयांची माहिती मिळते व त्यांचे ज्ञान समृद्ध होते.

**३) प्रदर्शनांचे आयोजन :** संग्रहालयातील विविध वस्तू व कलाकृती लोकांसमोर आकर्षकपणे मांडणे. यात कायमस्वरूपी व तात्पुरत्या स्वरूपाच्या प्रदर्शनांचा समावेश असतो. प्रदर्शने अधिक आकर्षक व माहितीपूर्ण बनवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करणे महत्त्वाचे आहे.

**४) विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रम :** शालेय विद्यार्थ्यांसाठी खास शैक्षणिक कार्यक्रम व वस्तुसंग्रहालयाच्या भेटी आयोजित करणे. या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना संग्रहालयातील ज्ञान व भारतीय संस्कृतीची ओळख होते. यात मार्गदर्शित भेटी, मनोरंजक प्रश्नमंजुषा व विविध शैक्षणिक ॲक्टिव्हिटीजचा समावेश असतो.

**५) सुरक्षा व्यवस्थापन :**

वस्तुसंग्रहालयातील सुरक्षा व्यवस्थापन हे केवळ संग्रहातील अमूल्य वस्तूंचे संरक्षण करण्यासाठीच नव्हे, तर अभ्यागत व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी देखील अत्यंत महत्त्वाचे आहे. एका प्रभावी सुरक्षा व्यवस्थापनात भौतिक सुरक्षा, आग सुरक्षा, संग्रह संरक्षण व आपत्कालीन परिस्थिती व्यवस्थापन यांसारख्या अनेक घटकांचा समावेश असतो.

**१) सीसीटीव्ही पाळत:** वस्तुसंग्रहालयाच्या संपूर्ण परिसरात चोवीस तास बारीक नजर ठेवण्यासाठी उच्च प्रतीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे मजबूत जाळे तयार करणे. इमारतीचे प्रवेशमार्ग, सर्व प्रदर्शनी दालनं, जिथे वस्तूंचा संग्रह केला जातो, बाहेरील परिसर व महत्त्वाचे मार्ग यांसारख्या ठिकाणी कॅमेरे बसवणे व एका नियंत्रण कक्षातून त्यांचे सतत निरीक्षण करणे. कॅमेऱ्यात कैद होणारे दृश्य नियमितपणे रेकॉर्ड करणे व गरज पडल्यास त्याची तपासणी करणे.

**२) नियंत्रित प्रवेश प्रणाली :** वस्तुसंग्रहालयाच्या काही खास व महत्त्वाच्या भागांमध्ये (उदाहरणार्थ, संग्रह कक्ष, जिथे वस्तूंचे जतन केले जाते, संवर्धन प्रयोगशाळा व प्रशासकीय कार्यालये) फक्त ज्यांच्याकडे परवानगी आहे अशा व्यक्तींनाच प्रवेश मिळावा यासाठी एक विशिष्ट प्रणाली तयार करणे. यासाठी ओळखपत्र (आयडी कार्ड), की-कार्ड, गुप्त पिन कोड किंवा बायोमेट्रिक प्रणाली (जसे की फिंगरप्रिंट स्कॅनर, डोळ्याच्या रेटिनाचा स्कॅनर) वापरणे. अभ्यागत व कर्मचाऱ्यांसाठी प्रवेशाचे नियम स्पष्टपणे ठरवून त्यांची अंमलबजावणी करणे.

**३) अतिसुरक्षित क्षेत्रांसाठी बायोमेट्रिक प्रणाली :** अत्यंत सुरक्षित असलेल्या भागांमध्ये प्रवेशासाठी बायोमेट्रिक ओळख प्रणालीचा वापर करणे, ज्यामुळे कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला आत शिरकाव करणे पूर्णपणे अशक्य होते. मिंगरप्रिंट स्कॅनर किंवा रेटिना स्कॅनरसारख्या तंत्रज्ञानामुळे व्यक्तीची अचूक ओळख पटवूनच प्रवेश दिला जातो.

**६) आग सुरक्षा उपाययोजना :**

**१) अग्निशमन उपकरणे :** वस्तुसंग्रहालयाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये अग्निशमन यंत्रे (fire extinguishers), पाण्याचे बंब (fire hose reels) व आग विझवण्यासाठी लागणारी इतर आवश्यक उपकरणे सहजपणे उपलब्ध ठेवणे. तसेच, संग्रहालयातील सर्व कर्मचाऱ्यांसाठी या उपकरणांचा वापर कसा करायचा याचे नियमित प्रशिक्षण आयोजित करणे.

**२) धूर व उष्णता शोधक:** आग लागल्यास त्याची त्वरित माहिती मिळवण्यासाठी संपूर्ण इमारतीत स्मोक

डिटेक्टर (smoke detectors) व हीट डिटेक्टर (heat detectors) बसवणे. आग लागल्याचा अलार्म वाजल्यास त्वरित काय कार्यवाही करायची याची एक पूर्वनियोजित योजना तयार ठेवणे.

**३) स्वयंचलित अग्निशमन प्रणाली :** आग विझवण्यासाठी स्वयंचलित स्प्रिंकलर प्रणाली (automatic sprinkler system) स्थापित करणे, जी आग लागल्याबरोबर पाण्याची फवारणी करून आगीवर नियंत्रण मिळवते. ज्या वस्तू पाण्यामुळे खराब होऊ शकतात अशा संवेदनशील वस्तूंसाठी पाण्याची गरज कमी असणारी अग्निशमन प्रणाली (उदा. गॅस आधारित फायर सप्रेशन सिस्टीम) वापरणे.

**४) सुरक्षित बाहेर पडण्याची योजना :** आग लागल्यास किंवा इतर कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत (उदाहरणार्थ, भूकंप) वस्तुसंग्रहालयात असलेले अभ्यागत व कर्मचारी यांच्या सुरक्षित सुटकेसाठी एक व्यवस्थित योजना तयार करणे. इमारतीतून बाहेर पडण्याचे मार्ग स्पष्टपणे दर्शवणारे फलक लावणे व कर्मचाऱ्यांसाठी नियमितपणे मॉक ड्रिल (mock drill) आयोजित करणे, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत गोंधळ टाळता येईल व सुरक्षितपणे बाहेर पडता येईल.

**७) संग्रह संरक्षण :**

**१) पर्यावरण नियंत्रण :** संग्रहातील वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तूंसाठी योग्य तापमान व आर्द्रता पातळी कायम राखण्यासाठी प्रभावी पर्यावरण नियंत्रण प्रणाली (environmental control system) स्थापित करणे. या प्रणालीद्वारे नियमितपणे तापमान व आर्द्रता पातळीची नोंद घेणे व आवश्यकतेनुसार त्यात बदल करणे.

**२) कीटक व बुरशी नियंत्रण :** संग्रहातील वस्तूंना कीटक व बुरशीच्या प्रादुर्भावापासून वाचवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे. नियमितपणे वस्तूंची तपासणी करणे व गरज वाटल्यास सुरक्षित कीटकनाशकांचा वापर करणे. एकात्मिक कीटक व्यवस्थापन (Integrated Pest Management - IPM) पद्धतीचा अवलंब करणे, ज्यात प्रतिबंधात्मक उपायांवर अधिक भर दिला जातो.

**३) प्रकाशापासून संरक्षण :** अतिनील (Ultraviolet - UV) व अवरक्त (Infrared - IR) किरणांपासून वस्तूंचे संरक्षण करण्यासाठी प्रदर्शनी दालनं व जिथे वस्तूंचा संग्रह केला जातो अशा ठिकाणी विशेष प्रकाश व्यवस्था वापरणे. नैसर्गिक प्रकाशाचा आत येणारा मार्ग नियंत्रित करणे व कृत्रिम प्रकाशाची तीव्रता मर्यादित ठेवणे, जेणेकरून वस्तूंचे रंग व मूळ स्वरूप टिकून राहील.

**८) आपत्कालीन परिस्थिती व्यवस्थापन:**

**१) चोरी बंदोबस्त :** वस्तुसंग्रहालयात चोरीचा प्रयत्न झाल्यास किंवा प्रत्यक्षात चोरी घडल्यास त्वरित व प्रभावी कार्यवाही करण्यासाठी एक सविस्तर योजना तयार ठेवणे. यासाठी सुरक्षा कर्मचाऱ्यांचे योग्य प्रशिक्षण व स्थानिक पोलिसांशी नियमित समन्वय असणे आवश्यक आहे. चोरी झालेल्या वस्तूंची माहिती तातडीने सर्व संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचवण्यासाठी एक कार्यक्षम प्रणाली असणे गरजेचे आहे.

**२) आग व्यवस्थापन :** वस्तुसंग्रहालयात आग लागल्यास त्यावर त्वरित नियंत्रण मिळवणे, इमारतीत

असलेल्या सर्व लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढणे व संग्रहातील ऐतिहासिक व मौल्यवान वस्तूंना कमीतकमी नुकसान पोहोचवणे यासाठी प्रशिक्षित कर्मचारी व आवश्यक अग्निशमन उपकरणे नेहमी तयार ठेवणे. नियमितपणे अग्निशमन सरावांचे आयोजन करणे महत्त्वाचे आहे.

**३) नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन :** भूकंप, पूर किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी संग्रहातील वस्तूंचे व लोकांचे संरक्षण कसे करावे यासाठी एक सुनियोजित आराखडा तयार करणे. आपत्कालीन परिस्थितीत संग्रहातील महत्त्वाच्या वस्तू सुरक्षित ठिकाणी हलवण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, सर्व कर्मचाऱ्यांसाठी आपत्कालीन परिस्थितीत प्रतिसाद देण्याचे योग्य प्रशिक्षण आयोजित करणे महत्त्वाचे आहे.

**९) सुरक्षा व्यवस्थापनाचे महत्त्व :**

प्रभावी सुरक्षा व्यवस्थापनासाठी वेळोवेळी सुरक्षा मानकांचे पुनर्मूल्यांकन करणे, सर्व सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी नियमित प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे व आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा योग्य वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वस्तुसंग्रहालयाची सुरक्षा ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे व यात नेहमी सतर्क राहणे व योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

**१०) आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञान :**

आजकाल वस्तुसंग्रहालये त्यांच्या सुरक्षा व्यवस्थेला अधिक प्रभावी व अचूक बनवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात उपयोग करत आहेत. हे तंत्रज्ञान केवळ भौतिक वस्तूंचेच संरक्षण करत नाही, तर डिजिटल स्वरूपात असलेली माहिती व संग्रहांची सुरक्षा देखील सुनिश्चित करते.

**१) RFID ट्रॅकिंग (रेडिओ-फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन ट्रॅकिंग) :** RFID हे एक वायरलेस तंत्रज्ञान आहे, ज्याच्या मदतीने संग्रहालयातील प्रत्येक वस्तूला एक विशिष्ट 'टॅग' लावला जातो. या टॅगमुळे वस्तूचे अचूक स्थान व तिची हालचाल त्वरित ओळखता येते. एखादी वस्तू प्रदर्शनातून स्टोरेजमध्ये किंवा संवर्धन प्रयोगशाळेत कधी व कोणी हलवली, याची नोंद आपोआप होते.

**२) चोरी प्रतिबंधक प्रणाली :** जर कोणतीही टॅग लावलेली वस्तू परवानगीशिवाय संग्रहालयाच्या बाहेर नेण्याचा प्रयत्न केला गेला, तर मुख्य प्रवेशद्वारावर लावलेले रीडर (reader) अलार्म वाजवतात, ज्यामुळे चोरीचा प्रयत्न त्वरित हाणून पाडला जाऊ शकतो.

**३) वस्तूंची नियमित पडताळणी :** RFID प्रणाली वस्तूंची नियमित मोजणी व पडताळणी करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. यामुळे कर्मचाऱ्यांच्या वेळेची बचत होते व वस्तूंच्या नोंदीतील चुकांची शक्यता खूप कमी होते.

**११) अलार्म व सेन्सर आधारित सुरक्षा :**

**१) विविध प्रकारचे सेन्सर्स :** वस्तुसंग्रहालयातील प्रदर्शनी दालनं, संग्रह कक्ष व मुख्य प्रवेशद्वारांवर विविध प्रकारचे आधुनिक सेन्सर्स (motion detectors - हालचाल शोधणारे, infrared sensors - अवरक्त

संवेदक, pressure sensors – दाब संवेदक) स्थापित केले जातात. यामुळे कोणत्याही अनधिकृत हालचालीची किंवा वस्तूंच्या जागेत काही बदल झाल्यास त्याची त्वरित माहिती नियंत्रण कक्षाला मिळते.

**२) स्थानिक माहितीसह अलार्म :** हे अलार्म केवळ मोठ्याने वाजत नाहीत, तर धोक्याची नेमकी जागा कोणती आहे याची माहिती नियंत्रण कक्षाला पुरवतात. काही आधुनिक प्रणाली तर थेट सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या मोबाईल पवर त्वरित सूचना (alerts) पाठवतात, ज्यामुळे त्यांना घटनास्थळी तातडीने पोहोचणे शक्य होते.

**३) व्हिडिओ विश्लेषण आधारित अलार्म :** काही अत्याधुनिक अलार्म प्रणाली सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या फुटेजचे विश्लेषण करतात व त्याआधारे कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा वस्तूंची असामान्य जागाबदली ओळखू शकतात. अशा परिस्थितीत, ही प्रणाली त्वरित धोक्याचा इशारा (alert) जारी करते.

**१२) सायबर सुरक्षा : डिजिटल संग्रहांची सुरक्षितता :**

आजकाल अनेक वस्तुसंग्रहालये त्यांच्या संग्रहांचे डिजिटायझेशन करत असल्यामुळे, तो संग्रह ऑनलाइन उपलब्ध होतो. या डिजिटल संग्रहांची चोरी, हॅकिंग किंवा डेटा (data) गमावण्यापासून सुरक्षा करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी मजबूत फायरवॉल (firewall), एन्क्रिप्शन (encryption) व इंट्रूजन डिटेक्शन सिस्टीम (intrusion detection system) वापरल्या जातात.

**१) डिजिटल मालमत्तेचे संरक्षण :** ऑनलाइन उपलब्ध असलेल्या डिजिटल संग्रहांची चोरी, गैरवापर किंवा डेटा नष्ट होण्यापासून सुरक्षा करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे. यात मजबूत फायरवॉल, डेटा एन्क्रिप्ट करणे व अनधिकृत प्रवेश शोधणारी प्रणाली वापरणे समाविष्ट आहे.

**२) अंतर्गत नेटवर्क सुरक्षा :** वस्तुसंग्रहालयाच्या अंतर्गत संगणक नेटवर्कची सुरक्षा सुनिश्चित करणे, ज्यामुळे कर्मचाऱ्यांचा गोपनीय डेटा व संग्रह व्यवस्थापन प्रणाली सुरक्षित राहतील. यासाठी कडक पासवर्ड धोरणे (password policies) व नियमित सुरक्षा तपासणी (security audits) करणे आवश्यक आहे.

**३) डेटाचा बॅकअप व रिकव्हरी :** डिजिटल संग्रहांचा नियमितपणे बॅकअप घेणे व काही कारणास्तव डेटा गमावल्यास तो त्वरित परत मिळवण्यासाठी (recover) एक योजना तयार ठेवणे महत्त्वाचे आहे. यामुळे माहिती नष्ट होण्याची शक्यता कमी होते.

**४) कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण :** वस्तुसंग्रहालयातील कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षा नियमांविषयी व संभाव्य धोक्यांविषयी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांच्याकडून नकळतपणे कोणतीही सुरक्षा चूक होणार नाही.

**५) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर :** आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून वस्तुसंग्रहालये त्यांच्या भौतिक व डिजिटल मालमत्तेची अधिक प्रभावीपणे सुरक्षा करू शकतात व एक सुरक्षित वातावरण निर्माण करू शकतात. हे तंत्रज्ञान मनुष्यबळावरील कामाचा भार कमी करते व धोक्यांची शक्यता त्वरित ओळखण्यास मदत करते, ज्यामुळे आपला मौल्यवान सांस्कृतिक वारसा सुरक्षित राहतो.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ :**

**बहूपर्यायी प्रश्न :**

१) संग्रहालय व्यवस्थापनातील नवीन वस्तूंचे संपादन करताना खालीलपैकी कोणत्या मार्गाचा अवलंब केला जातो?

अ) केवळ वस्तू विकणे ब) केवळ वस्तूंची दुरुस्ती करणे

क) खरेदी करणे, देणग्या स्वीकारणे व वारसा हक्काने प्राप्त वस्तू

ड) केवळ वस्तूंचे प्रदर्शन करणे

२) संग्रहातील प्रत्येक वस्तूची सखोल नोंदणी करणे कशासाठी आवश्यक आहे?

अ) अभ्यागतांना माहिती देण्यासाठी ब) कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी

क) वस्तूंचा मागोवा घेणे व व्यवस्थापन करणे ड) केवळ वस्तूंचे प्रदर्शन करणे

३) वस्तुसंग्रहालयाच्या वर्षभराच्या खर्चाची योजना तयार करणे हे कोणत्या व्यवस्थापनाचे अंग आहे?

अ) संग्रह व्यवस्थापन ब) सुरक्षा व्यवस्थापन

क) आर्थिक व्यवस्थापन ड) शैक्षणिक व्यवस्थापन

४) वस्तुसंग्रहालयासाठी निधी उभारणीचा एक महत्त्वाचा मार्ग कोणता आहे?

अ) वस्तूंची विक्री करणे ब) कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपात करणे

क) सरकारी व खाजगी अर्थसहाय्य मिळवणे ड) अभ्यागतांकडून जास्त शुल्क घेणे

५) समाजामध्ये वस्तुसंग्रहालयाची सकारात्मक प्रतिमा तयार करणे हे कोणत्या विभागाचे कार्य आहे?

अ) सुरक्षा विभाग ब) संग्रह विभाग

क) लोकसंपर्क व विपणन विभाग ड) शैक्षणिक विभाग

६) शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करणे हे कोणत्या व्यवस्थापनाचा भाग आहे?

अ) सुरक्षा व्यवस्थापन ब) आर्थिक व्यवस्थापन

क) लोकसंपर्क व विपणन ड) शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम

७) वस्तुसंग्रहालयाच्या संपूर्ण परिसरात चोवीस तास नजर ठेवण्यासाठी कशाचा वापर केला जातो?

अ) केवळ सुरक्षा रक्षक ब) सीसीटीव्ही पाळत

क) केवळ अलार्म सिस्टीम ड) अभ्यागतांची नोंदणी

८) अतिसुरक्षित क्षेत्रांमध्ये अनधिकृत प्रवेश टाळण्यासाठी कोणती प्रणाली वापरली जाते?

अ) साधी कुलूप व्यवस्था ब) केवळ ओळखपत्र तपासणी

क) बायोमेट्रिक प्रणाली	ड) अभ्यागतांची संख्या नियंत्रण

९) संग्रहातील वस्तूंना कीटक व बुरशीच्या प्रादुर्भावापासून वाचवण्यासाठी कोणती पद्धत अवलंबली जाते?

अ) केवळ नियमित साम सफाई	ब) एकात्मिक कीटक व्यवस्थापन (IPM²)

क) जास्त प्रकाश देणे	ड) तापमान वाढवणे

१०) वस्तूंचे अचूक स्थान व हालचाल त्वरित ओळखण्यासाठी कोणते आधुनिक तंत्रज्ञान वापरले जाते?

अ) बारकोड स्कॅनिंग	ब) केवळ सीसीटीव्ही

क) RFID ट्रॅकिंग	ड) मॅन्युअल नोंदणी

## १.३ सारांश :

संग्रहालयाची पायाभूत सुविधा म्हणजे त्याच्या कामकाजासाठी आवश्यक असलेल्या भौतिक आणि तांत्रिक सोयीसुविधा. यामध्ये सर्वप्रथम, प्रदर्शन कक्षयेतात, ज्या कलाकृती आणि वस्तूंना योग्य प्रकाशात आणि वातावरणात प्रदर्शित करण्यासाठी डिझाइन केलेले असतात. या कक्षांमध्ये तापमान आणि आर्द्रता नियंत्रित करण्याची व्यवस्था असते, जी वस्तूंच्या दीर्घायुष्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. याशिवाय, संग्रहालयामध्ये साठवणूक केंद्रे असतात, जिथे प्रदर्शित नसलेल्या किंवा तात्पुरत्या स्वरूपात संग्रहित केलेल्या वस्तू सुरक्षितपणे ठेवल्या जातात. ही केंद्रे देखील विशेषतः डिझाइन केलेली असतात, जिथे वस्तूंचे संवर्धन सुनिश्चित केले जाते. केवळ प्रदर्शन आणि साठवणूकच नव्हे, तर संग्रहालय संशोधन आणि अभ्यास सुविधादेखील आवश्यक असतात. यात ग्रंथालये, अभिलेखागार आणि संशोधन प्रयोगशाळांचा समावेश होतो, जिथे अभ्यासक आणि संशोधक संग्रहातील वस्तूंचा अभ्यास करू शकतात. पर्यटकांसाठी स्वागत कक्ष, माहिती केंद्रे, कॅमे आणि स्वच्छतागृहे यांसारख्या सार्वजनिक सुविधा देखील तितक्याच महत्त्वाच्या आहेत, ज्यामुळे संग्रहालयाचा अनुभव अधिक आनंददायी होतो. आधुनिक संग्रहालये डिजिटल पायाभूत सुविधांवरभर देतात, ज्यामुळे माहिती अधिक सुलभ होते आणि प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे सोपे होते.

संग्रहालयाची प्रशासकीय रचना ही त्याच्या सुव्यवस्थित कामकाजाची गुरुकिल्ली आहे. यामध्ये विविध स्तरांवर काम करणारे व्यावसायिक असतात, ज्यांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या स्पष्टपणे परिभाषित केलेल्या असतात. सर्वात वरच्या स्तरावर संचालक असतो, जो संग्रहालयाच्या एकूण धोरणात्मक नियोजनासाठी, निधी व्यवस्थापनासाठी आणि बाह्य संबंधांसाठी जबाबदार असतो. संचालकाच्या नेतृत्वाखाली विविध विभागांचे प्रमुख काम करतात. क्यूरेटर हे संग्रहालयाच्या संग्रहाचे प्रमुख असतात. त्यांची मुख्य जबाबदारी वस्तूंचे संपादन, वर्गीकरण, संशोधन, प्रदर्शन नियोजन आणि दस्तऐवजीकरण करणे ही असते. संवर्धनकर्ता वस्तूंच्या भौतिक आणि रासायनिक संरक्षणाची काळजी घेतो, ज्यामुळे वस्तूंची मूळ स्थिती टिकून राहते. शिक्षण आणि पोहोच विभाग शाळा आणि सामान्य लोकांसाठी शैक्षणिक कार्यक्रम, कार्यशाळा आणि व्याख्याने आयोजित करतो, ज्यामुळे संग्रहालयाचा उद्देश व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो. याशिवाय, प्रशासनिक कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी, देखभाल कर्मचारी आणि मार्केटिंग विभाग यांसारख्या विभागांचीही महत्त्वाची भूमिका असते, जे संग्रहालयाच्या

दैनंदिन कामकाजाला पाठिंबा देतात. प्रत्येक भूमिकेची स्पष्ट व्याख्या आणि जबाबदाऱ्यांचे वाटप हे संग्रहालयाच्या कार्यक्षमतेसाठी आवश्यक आहे.

संग्रहालयाचे प्रभावी व्यवस्थापन सुनिश्चित करते की सर्व संसाधने योग्य प्रकारे वापरली जात आहेत आणि संग्रहालयाची उद्दिष्ट्ये साध्य केली जात आहेत. यात आर्थिक व्यवस्थापन, मानव संसाधन व्यवस्थापनसंग्रह व्यवस्थापन आणि जोखीम व्यवस्थापन यासारख्या क्षेत्रांचा समावेश होतो. आधुनिक व्यवस्थापनामध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे, जसे की डेटाबेस प्रणाली वस्तूंच्या नोंदी ठेवण्यासाठी आणि सुरक्षा प्रणालींवर लक्ष ठेवण्यासाठी. सुरक्षाहा संग्रहालयाच्या अस्तित्वाचा अविभाज्य भाग आहे. संग्रहालयात अमूल्य वस्तू असतात, त्यामुळे त्यांची चोरी, नुकसान किंवा नासधूस टाळण्यासाठी कठोर सुरक्षा उपाययोजना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामध्ये सीसीटीव्ही पाळत प्रणाली, अलार्म प्रणाली, अग्निशमन प्रणाली आणि प्रवेश नियंत्रण प्रणाली यांचा समावेश होतो. प्रशिक्षित सुरक्षा कर्मचारी चोवीस तास पाळत ठेवतात आणि कोणत्याही संशयास्पद हालचालींवर त्वरित प्रतिक्रिया देतात. संकटाकालीन व्यवस्थापन योजना तयार असणे आवश्यक आहे, ज्यात आग, पूर, भूकंप किंवा इतर आपत्त्यांच्या वेळी वस्तूंचे आणि कर्मचाऱ्यांचे संरक्षण कसे करावे, याबद्दल तपशीलवार सूचना असतात. या योजनांमध्ये नियमितपणे मॉक ड्रिल आयोजित केले जातात, जेणेकरून कर्मचारी कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी तयार राहतील.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**डिजिटल फॉरमॅट :** माहिती किंवा डेटाचे असे स्वरूप जे संगणक किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांवर वाचता येते, साठवता येते किंवा प्रक्रिया करता येते. यामध्ये मजकूर, प्रतिमा, ऑडिओ किंवा व्हिडिओ यांचा समावेश असू शकतो,जे बायनरी (० आणि १) कोडमध्ये रूपांतरित केलेले असतात.

**चिल्ड्रेन्स क्रिएटिव्ह सेंटर :** मुलांच्या कलात्मक आणि सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी डिझाइन केलेले एक केंद्र किंवा जागा. येथे मुले विविध कला प्रकारांमध्ये सहभागी होऊ शकतात, नवीन गोष्टी शिकू शकतात आणि त्यांची कल्पनाशक्ती विकसित करू शकतात.

**व्हर्च्युअल रिॲलिटी :** एक तंत्रज्ञान जे वापरकर्त्याला संगणकाद्वारे तयार केलेल्या आभासी जगात पूर्णपणे विसर्जित करते. यामध्ये विशेष हेडसेट वापरून वापरकर्ता त्या आभासी वातावरणात संवाद साधू शकतो आणि हालचाल करू शकतो, जणू काही तो तिथेच आहे. या तंत्रज्ञानाचा वापर गेमिंग, प्रशिक्षण, शिक्षण आणि मनोरंजन यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये केला जातो.

**ऑगमेंटेड रिॲलिटी :** एक तंत्रज्ञान जे वास्तविक जगातील दृश्यांमध्ये डिजिटल माहिती किंवा ग्राफिक्सचे थर (layers) जोडते. तठ च्या विपरीत, AR वापरकर्त्याला वास्तविक जगापासून पूर्णपणे वेगळे करत नाही, तर त्यावर अतिरिक्त डिजिटल घटक प्रोजेक्ट करते, ज्यामुळे वास्तविक आणि आभासी घटकांचे मिश्रण होते. उदाहरणार्थ, स्मार्टफोन प्स किंवा विशेष AR ग्लासेस वापरून हे शक्य होते.

**प्रकाशातील अतिनील किरणे :** दृश्यमान प्रकाशाच्या वर्णपटाच्या पलीकडील (जांभळ्या रंगाच्या पलीकडील) इलेक्ट्रोमॅग्नेटिक किरणे. या किरणांची तरंगलांबी (wavelength) कमी असते आणि ऊर्जा जास्त

असते. सूर्यप्रकाशात यूव्ही किरणे असतात आणि त्यांचा वापर निर्जंतुकीकरण, टॅनिंग आणि काही वैद्यकीय उपचारांमध्ये होतो.

**अवरक्त किरणे :** दृश्यमान प्रकाशाच्या वर्णपटाच्या पलीकडील (लाल रंगाच्या पलीकडील) इलेक्ट्रोमॅग्नेटिक किरणे. या किरणांची तरंग लांबी जास्त असते आणि ऊर्जा कमी असते. उष्णता उत्सर्जित करणाऱ्या वस्तूंमधून ही किरणे निघतात. त्यांचा वापर रिमोट कंट्रोल, थर्मल इमेजिंग कॅमेरा आणि रात्रीच्या दृष्टीसाठी (night vision) केला जातो.

**ऑडिओ गाईड :** संग्रहालये, ऐतिहासिक स्थळे किंवा इतर पर्यटन स्थळांवर माहिती देण्यासाठी वापरले जाणारे एक इलेक्ट्रॉनिक उपकरण किंवा प. हे उपकरण वापरकर्त्याला विशिष्ट प्रदर्शनासमोर किंवा ठिकाणी पोहोचल्यावर त्याबद्दलची माहिती ऑडिओ स्वरूपात (ऐकण्याच्या स्वरूपात) प्रदान करते.

**रेडिओ–फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन ट्रॅकिंग :** रेडिओ लहरींचा वापर करून वस्तू किंवा व्यक्तींना स्वयंचलितपणे ओळखण्यासाठी आणि त्यांचा मागोवा घेण्यासाठी वापरले जाणारे तंत्रज्ञान. यात एक RFID टॅग (एक लहान इलेक्ट्रॉनिक चिप) असतो जो रेडिओ सिग्नल पाठवतो आणि एक RFID रीडर (वाचक) त्या सिग्नलला ओळखतो. याचा वापर इन्व्हेंटरी व्यवस्थापन, पशुधन ट्रॅकिंग आणि एक्सेस कंट्रोल सिस्टीममध्ये होतो.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे :**

१) ब, २) क, ३) क, ४) ब, ५) क, ६) क, ७) क, ८) क, ९) क, १०) क

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे :**

१) ब, २) क, ३) क, ४) क, ५) क, ६) क, ७) क, ८) क, ९) ब, १०) क

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे :**

१) क, २) क, ३) क, ४) क, ५) क, ६) ड, ७) ब, ८) क, ९) ब, १०) क)

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**ब) टिपा लिहा.**

१) संग्रहालय सुरक्षा विभाग

२) संग्रहालय संचालक

३) संग्रहालय सार्वजनिक कार्यक्रम विभाग

४) संग्रहालय विपणन व संवाद विभाग

५) संग्रहालय आर्थिक व्यवस्थापन

**दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) संग्रहालयाच्या पायाभूत सुविधांची चर्चा करा.

२) संग्रहालयाची प्रशासकीय रचना अव कार्य पद्धती स्पष्ट करा.

३) संग्रहालय व्यवस्थापनाचे विविध घटक विशद करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) डॉ. बोरकर रघुनाथ, संग्रहालयशास्त्र, पिंपळापुरे बुक, नागपूर.

२) डॉ. शुक्ल जी व डॉ. पांडे वि., संग्रहालय विज्ञान, मोतीलाल बनारसीराम, नवी दिल्ली.

३) गणेशन, आर., संग्रहालाय दर्पण, पिलग्रिम पब्लिशिंग, वाराणसी, २००६

४) निगम. एम. एल., फंडामेंटल्स ऑफ म्युझिओलॉजी, देवी प्रकाशन, हैद्राराबाद, १९९५

५) जैन, संजय., म्युझियम एव म्युझिओलॉजी एक परिचय, कनिष्क प्रकाशन, बडोदा, २००१

६) अम्ब्रोस, टिमोथी व पेन, क्रिस्पिन, Museum Basics, लंडन व न्यूयॉर्क, रूटलेज, २०१२

७) लॉर्ड, गेल डेक्स्टर व लॉर्ड, बॅरी, The Manual of Museum Planning, लॅनहॅम, मेरीलँड, अल्टामिरा प्रेस, २०१३

८) कॅ, ज्युडिथ एम.; निशिमुरा, मार्गोट मॅकइलवेन व बक, रेबेक्का ए., Managing Museum Collections, लॅनहॅम, मेरीलँड, अल्टामिरा प्रेस, २०१०

९) थिसेन, जुट्टा (संपादक), Museum Buildings : - Design Manual, बासेल, बर्खांसर, २००७

१०) मॅकार्थी, कोनल (संपादक), New Museum Theory and Practice, माल्डेन, एम ए, विली–ब्लॅकवेल, २०१६

११) मॅलारो, मेरी सी., – Legal Primer on Managing Museum Collections, वॉशिंग्टन डी. सी., स्मिथसोनियन इन्स्टिट्यूशन प्रेस, १९९८


❑❑❑

घटक २

# भारतातील निवडक वस्तुसंग्रहालये

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, नवी दिल्ली

२.२.२ छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई

२.२.३ टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय, कोल्हापूर

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर, विद्यार्थी खालील गोष्टी साध्य करू शकतील–

१) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, नवी दिल्लीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमी, उद्दिष्ट्ये, संग्रहाचे स्वरूप आणि त्याच्या राष्ट्रीय महत्त्वाचे वर्णन करू शकतील.

२) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबईची स्थापना, त्याची प्रमुख संग्रहे आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक संदर्भात त्याचे योगदान सांगता येईल.

३) टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय, कोल्हापूरची स्थापना, तेथील विशेष संग्रह आणि स्थानिक इतिहासाचे जतन करण्यात त्याची भूमिका काय आहे हे सांगता येईल.

४) अभ्यासलेल्या तिन्ही संग्रहालयांमधील संग्रहांचे विषय, व्याप्ती आणि सादरीकरण पद्धती यांची तुलना करून त्यातील साम्य आणि म रक स्पष्ट करता येईल.

५) राष्ट्रीय, प्रादेशिक आणि स्थानिक स्तरावर ही निवडक वस्तुसंग्रहालये भारतीय कला, संस्कृती आणि इतिहासाच्या जतन आणि प्रसारात कसे अद्वितीय योगदान देतात, याचे विश्लेषण करता येईल.

६) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय आणि टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय यांनी वापरलेल्या प्रदर्शन पद्धती आणि प्रेक्षकांना माहिती देण्यासाठी वापरलेले दृष्टिकोनाचे मूल्यांकन करता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

भारत हा विविध संस्कृती, कला आणि इतिहासाचा समृद्ध वारसा असलेला देश आहे. या वारशाचे जतन व संवर्धन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भारतातील वस्तुसंग्रहालये करत आहेत. ही संग्रहालये केवळ ऐतिहासिक वस्तूंचे प्रदर्शन नसून, ती त्या त्या प्रदेशाची ओळख व गौरवशाली परंपरा भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवणारी जिवंत केंद्रे आहेत. भारतातील अनेक वस्तुसंग्रहालयांमध्ये ऐतिहासिक, कलात्मक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाच्या वस्तूंचा अनमोल संग्रह आहे, जो देशाच्या भूतकाळाची साक्ष देतो. या पार्श्वभूमीवर, भारतातील तीन निवडक व महत्त्वपूर्ण वस्तुसंग्रहालयांचा परिचय करून घेणे आवश्यक आहे. पहिले म्हणजे राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, नवी दिल्ली, जे देशातील सर्वात मोठ्या संग्रहालयांपैकी एक आहे. ज्यामध्ये भारतीय कला, पुरातत्त्व व मानववंशशास्त्र यांवरील विपुल संग्रह आहे. दुसरे महत्त्वाचे संग्रहालय म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई, जे पश्चिम भारतातील कला व इतिहासाचे महत्त्वपूर्ण केंद्र आहे. या संग्रहालयात विविध प्रकारच्या कलाकृती, ऐतिहासिक अवशेष व दुर्मीळ वस्तूंचा संग्रह आहे, जो महाराष्ट्राच्या समृद्ध इतिहासाची झलक दाखवतो. तिसरे महत्त्वाचे संग्रहालय म्हणजे टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय, कोल्हापूर. हे संग्रहालय दक्षिण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसाचे प्रतिनिधित्व करते. कोल्हापूरच्या समृद्ध इतिहासातील कला, वस्तू व परंपरा या संग्रहालयात जतन केल्या आहेत, ज्यामुळे या भागाची खास ओळख जपली गेली आहे. या तीनही वस्तुसंग्रहायांचे महत्त्व केवळ त्यांच्या संग्रहामुळेच नाही, तर ते शिक्षण, संशोधन व सांस्कृतिक आदानप्रदान

यांसाठीही महत्त्वाचे व्यासपीठ आहेत. ही वस्तुसंग्रहालये भूतकाळातील ज्ञान व कला आजच्या पिढीला उपलब्ध करून देतात आणि सांस्कृतिक अभ्यासाला नवी दिशा देतात. या घटकामध्ये या तीन निवडक वस्तुसंग्रहालयांची वैशिष्ट्ये, त्यांचा इतिहास व त्यांमधील महत्त्वाच्या संग्रहांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे,जेणेकरून विद्यार्थ्यांना भारतातील सांस्कृतिक वारसा जतन करणाऱ्या या महत्त्वपूर्ण संस्थांची कल्पना येईल.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, नवी दिल्ली :

**वस्तूसंग्रहालयाचा इतिहास :**

राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय इमारत नवी दिल्लीमधील जनपथ व मौलाना आझाद मार्गावर आहे. आज आपण जे राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय पाहतो, त्याची सुरुवात अत्यंत रोचक आहे. नवी दिल्लीमधील या राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाची स्थापना करण्याची योजना मे १९४६ मध्ये मॉरिस ग्वेअर समितीने तयार केली. भारत सरकार व इंग्लंड यांच्या संयुक्त प्रयत्नांतून, लंडनच्या रॉयल कॅडमीने भारतातील विविध वस्तुसंग्रहालयातील निवडक कलाकृतींचे 'भारतीय कला प्रदर्शन' आयोजित केले होते. लंडनच्या बर्लिंग्टन हाऊसच्या दालनात सन १९४७-४८ च्या हिवाळ्यात हे प्रदर्शन भरले होते. प्रदर्शनासाठी जमा केलेल्या वस्तू त्यांच्या मूळ वस्तुसंग्रहालयामध्ये परत पाठवण्यापूर्वी, त्या वस्तूंचे दिल्ली येथे प्रदर्शन आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. सन १९४९ मध्ये नवी दिल्लीमधील राष्ट्रपती भवनात या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाला प्रचंड यश मिळाले. या घटनेमुळे राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाच्या निर्मितीचा मार्ग खुला झाला. या प्रदर्शनाच्या अभूतपूर्व यशामुळे असा विचार पुढे आला की, या उत्कृष्ट संग्रहाचा उपयोग राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाच्या उभारणी करण्यासाठी करावा. प्रदर्शनात सहभागी झालेल्या राज्य सरकारांना, वस्तुसंग्रहालय प्रशासनांना व खाजगी देणगीदारांना कलाकृती भेट म्हणून देण्याची अथवा कर्जाऊ देण्याची विनंती करण्यात आली व त्यापैकी बहुतेक जणांनी उदारपणे प्रतिसाद दिला.

भारताचे तत्कालीन गव्हर्नर जनरल श्री. सी. राजगोपालाचारी यांच्या हस्ते १५ ऑगस्ट १९४९ रोजी राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाचे औपचारिक उद्घाटन झाले. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयासाठी कायमस्वरूपी इमारत उभी करे पर्यंत हे वस्तुसंग्रहालय राष्ट्रपती भवनातच कार्यरत राहील, असे त्यावेळी घोषित करण्यात आले. कालांतराने वस्तुसंग्रहालयाच्या संग्रहांमध्ये सतत भर पडत गेली व त्याला अनेक भेट वस्तू मिळाल्या. आजच्या वस्तुसंग्रहालय इमारतीचा पाया भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १२ मे १९५५ रोजी घातला व ही नवीन, आकर्षक दुमजली इमारत जून १९६० मध्ये वस्तुसंग्रहालय प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आली. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय इमारतीच्या पहिल्या टप्प्याचे औपचारिक उद्घाटन भारताचे तत्कालीन उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते १८ डिसेंबर १९६० रोजी झाले व ते जनतेसाठी खुले करण्यात आले. इमारतीचा दुसरा टप्पा १९८९ मध्ये पूर्ण झाला. सध्या या वस्तुसंग्रहालयात भारतीय तसेच परदेशी अशा विविध प्रकारच्या सुमारे २,००,००० वस्तूंचा संग्रह आहे. या संग्रहांमध्ये भारतीय सांस्कृतिक वारशाच्या पाच हजार वर्षांपेक्षा अधिक कालावधीचा समावेश आहे. सन १९५७ पर्यंत राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाची देखरेख भारतीय

पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या महासंचालकांनी केली. पुढे भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने याला एक स्वतंत्र संस्था म्हणून घोषित केले व थेट आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखाली घेतले. सध्या, राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत आहे.

**वस्तूसंग्रहालयातील विविध दालने :**

**१) प्रागैतिहास दालन :**

संग्रहालयाच्या तळमजल्यावर असलेले पहिले दालन आपल्याला मानवी इतिहासाच्या अगदी सुरुवातीच्या काळात घेऊन जाते. येथे पुराश्मयुगापासून नवपाषाण युगापर्यंतची दगडी हत्यारे व ताम्रयुगीन वस्तू मांडलेल्या आहेत. येथे तुम्हाला गूलर व सोहन खोऱ्यातील गारगोटीची दगडी हत्यारे, तामिळनाडूतील अत्तिरामपक्कम येथील कुऱ्हाडी, नर्मदा खोऱ्यातील मध्यपुराश्मयुगीन दगडी हत्यारे पाहायला मिळतील. तसेच, बिरभानपूर, कोटदिगी व लांघनाज येथील लहान दगडी हत्यारे (सूक्ष्म पाषाण हत्यारे) व दक्षिण भारतातील नवपाषाणयुगीन हत्यारे देखील इथे आहेत. एका काचपेटीत इ. स. २५०० ते १५०० या काळातील ताम्रयुगीन शस्त्रे प्रदर्शित केली आहेत. यात चांदौसी (मुरादाबाद) येथील मानवाकृती, सीतापूर येथील दोन पात्याच्या कुऱ्हाडी, भाले व इतर अनेक प्रकारच्या कुऱ्हाडी यांचा समावेश आहे.

संग्रहालयात सुमारे २०० ताम्रयुगीन शस्त्रे आहेत, जी बिहार, बंगाल व ओडिशा या पूर्वेकडील राज्यांतील आहेत. तर, पश्चिम उत्तर प्रदेश व पश्चिम भारतातील तलवार, भाले, तलवार व पश्चिम आशियातून आलेली कुऱ्हाड यांचा एक वेगळा गट आहे. हडप्पा संस्कृती व गेरू रंगाची भांडी इ.स.पू. २५०० ते १५०० दरम्यानची आहेत. प्रवेशद्वाराच्या उजवीकडील तीन काचपेटींमध्ये सिंधू संस्कृतीच्या ठिकाणांवरून मिळालेल्या दुर्मिळ कलाकृती प्रदर्शित केल्या आहेत. यात मोहेंजोदारो येथील कांस्य नर्तकी, म्हैस, पशुपती असलेल्या मुद्रा, हडप्पा येथील लाल रंगाच्या दगडाचा पुरुष धड, मातृदेवता आणि कुबड असलेला बैल यासारख्या मातीच्या वस्तूंचा समावेश आहे. हडप्पा येथील हस्तिदंत व शंखाच्या काही सुंदर वस्तूही येथे आहेत. डावीकडील भिंतीजवळ पाच काचपेटींमध्ये हडप्पा, मोहेंजोदारो व चन्हुदारो येथील कांस्य, मातीच्या वस्तू, वजने व दुर्मिळ हस्तिदंताच्या पट्ट्या दिसतात. इतर काचपेटींमध्ये हडप्पाकालीन भांडी, साठवणुकीची भांडी, तांब्याची व मातीची भांडी आहेत. सिंधू संस्कृतीतील भांडी चाकावर बनवलेली असून ती उच्च तापमानावर भाजलेली आहेत व लाल रंगाच्या पार्श्वभूमीवर काळ्या रंगाचे नक्षीकाम असलेली आहेत. हडप्पा व मोहेंजोदारो येथील तांबे व कांस्य उपकरणे जसे की कुऱ्हाडी, छिन्नी, चाकू, करवत, तलवारी व भाले येथे आहेत.

इतर काचपेटींमध्ये बैल, हत्ती, एकशिंगी प्राणी व छोटे शिलालेख असलेल्या हडप्पाकालीन मुद्रा प्रदर्शित केल्या आहेत. पाच आयताकृती भिंतीवरील काचपेटींमध्ये मातीच्या मूर्ती, अर्ध-मौल्यवान दगडांच्या वस्तू, शंखाच्या बांगड्या, वजने व हडप्पा व मोहेंजोदारो येथील भांडी मांडलेली आहेत. दालनाच्या दुसऱ्या भागात राखीव संग्रह दर्शविला आहे,

**२) पुरातत्त्व दालन :**

या दालनात भारतातील प्रमुख प्रदेश, कलाशैली व वेगवेगळ्या कालखंडांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सुमारे

नऊ हजार शिल्पकला वस्तू आहेत. या संग्रहात इ.स.पू. ३ शतकापासून ते १९ व्या शतकापर्यंत दगड, कांस्य, सोने, चांदी, हाड, हस्तिदंत, माती व स्टुकोमध्ये कोरलेल्या मूर्तींचा समावेश आहे. जगप्रसिद्ध व भव्यसूर्यदेवाची प्रतिमा, जी कोणार्कच्या सूर्यमंदिरातून आलेली आहे, ती या दालनात पर्यटकांचे स्वागत करते. मथुरा, अहिच्छत्र, भितरगाव व कौशांबी येथून मिळालेल्या मोठ्या संख्येने मातीच्या मूर्ती, गंगा व यमुनेच्या मानवी आकाराच्या प्रतिमा आणि अहिच्छत्रामधून मिळालेली मातीची पट्टी भारतीय टेराकोटा कलेत अद्वितीय आहेत. गुप्तकालीन टेराकोटा कलेचा प्रभाव गुप्त साम्राज्याबाहेरील प्रदेशांमध्येही पसरला होता, जसे की जम्मूतील अखनूर व गुजरातमधील वल्लभीचे मैत्रक शासक (६ ते ८ वे शतक) यातील काही उत्कृष्ट उदाहरणे या दालनात प्रदर्शित केली आहेत.

**३) प्रारंभिक मध्ययुगीन दालन :**

गुप्त साम्राज्याच्या पतनानंतर भारतात अनेक स्थानिक राजवटी उदयास आल्या, जसे की पूर्वेला पाल, पश्चिमेला मैत्रक, उत्तरेला वर्धन व प्रतिहार, तर दक्षिणेला पल्लव, चोळ व चालुक्य. या काळात कलेच्या अनेक प्रादेशिक शाखा विकसित झाल्या. हे दालन ७ व्या ते १० व्या शतकादरम्यान देशाच्या विविध भागांमध्ये विकसित झालेल्या कलाशैलींची उत्कृष्ट उदाहरणे दाखवते. येथे तुम्हाला मैत्रककालीन विष्णूचे विश्वरूप, चित्तोडगड येथील प्रतिहारकालीन लाकडी नवग्रहांचे तोरण, एलोरा लेण्यांमधील राष्ट्रकूट कलेचे प्रतीक असलेली मगरीवर उभी असलेली गंगेची प्रतिमा, ऐहोळे येथील उडणाऱ्या गंधर्वांच्या जोडीची दगडी पट्टी व पल्लव व चोळ काळातील भिक्षाटनमूर्ती शिव, सोमास्कंद व विष्णूच्या अप्रतिम मूर्ती पाहायला मिळतील.

**४) उत्तर मध्ययुगीन दालन :**

या काळात पूर्वेकडील पाल व त्यांचे वारसदार, दक्षिणेकडील होयसळ, चोळ, विजयनगर शासक व नायक, तसेच उत्तरेकडील गाहडवाल, परमार व चंदेल यांनी मंदिर कला व वास्तुकलेला प्रोत्साहन देणे सुरू ठेवले. या दालनात तुम्हाला कोणार्क येथील पालकालीन राजा नरसिंहदेवची चार चित्रे, खजुराहो येथील चंदेलकालीन योगासनात बसलेल्या विष्णूची सुंदर मूर्ती, परमारकालीन दुर्गाची मूर्ती व गाहडवालकालीन वज्रतारेची अर्धमूर्ती यांसारखी उत्कृष्ट उदाहरणे दिसतील. गडद बेसॉल्ट दगडात कोरलेल्या पाल व सेन शासकांच्या काही मूर्ती, ज्यात बहुतेक बौद्ध स्तूपांचे अवशेष आहेत, त्याही येथे प्रदर्शित केल्या आहेत. चहमानकालीन बिकानेर येथीलसरस्वतीची सर्वात प्रसिद्ध संगमरवरी प्रतिमाव राजस्थानमधील जैन तीर्थंकर नेमिनाथ यांच्या मूर्ती येथे आहेत. होयसळांच्या दुर्मिळ मूर्ती, एका शिकारी महिलेचे चित्र, कालियामर्दनाचा कृष्ण व इतर अनेक बारकाईने कोरलेल्या मूर्ती या काळातील सर्वोत्तम उदाहरणे आहेत. लिंगोद्भवमूर्ती शिव, जैन पार्श्वनाथ व द्वारपाल ही चोळ कलेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत, तर वारंगलच्या काकतीय कलेतील त्रिमूर्ती दर्शवणारे तोरण व विजयनगर काळातील काही शिल्पे देखील येथे प्रदर्शित केली आहेत.

**५) कांस्य दालनः**

कांस्य मूर्तींमध्ये प्रामुख्याने धार्मिक विषय होते व ही कला देशाच्या प्रत्येक भागात पसरलेली दिसते. फोपनूर येथील बुद्धाच्या दोन प्रतिमा, राजस्थान व गुजरात येथील जैन तीर्थंकर व नालंदा येथील उत्कृष्ट पालकालीन कांस्य मूर्ती येथे प्रदर्शित आहेत. इ.स.पू. दुसऱ्या शतकापासून ते इसवी सन दुसऱ्या शतकापर्यंतच्या

शुंग, कुषाण व इक्ष्वाकु काळातील अनेक मूर्ती येथे पाहायला मिळतात. पश्चिम भारतातील जैन तीर्थंकर, जे प्रामुख्याने राजस्थान व गुजरातचे आहेत, ते सहसा साचेबद्ध असले तरी त्यांचे सौंदर्य व आकर्षण वेगळे आहे. उत्तर भारताचे प्रतिनिधित्व काश्मीर व हिमाचल प्रदेशातील कांस्य मूर्ती करतात. काश्मीर कलेतीलविष्णू वैकुंठव चंबा येथील स्वच्छंद भैरवी यांचे मोठे महत्त्व आहे. या दालनात वासुदेव-कमलजा (अर्धे विष्णू व अर्धी लक्ष्मी) यांची नेपाळी कांस्य मूर्ती नेपाळी कांस्य कलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

दक्षिण भारतातील कांस्य मूर्ती इसवी सन ७ व्या ते १७ व्या शतकादरम्यान या भागातील कलेचा विकास दर्शवतात. नटराज शिवही एक अद्वितीय निर्मिती आहे, तर उमासहित, आलिंगन, चंद्रशेखर, त्रिपुरान्तक व नंदीकेश्वर इत्यादी शिवाच्या अनेक रूपांच्या पल्लव व चोळ कलाकृती प्रदर्शित केल्या आहेत. त्यांनी विष्णूच्या कृष्णावतार जसे की कालिया-मर्दन, बालगोपाल व नृत्य-गोपाल इत्यादींच्या भव्य प्रतिमा देखील येथे मांडल्या आहेत. या कांस्य मूर्तींमध्ये तरल हालचाल, मानवी आकाराचे नाजूक व तपशीलवार नमुने व जिवंत लवचिकता दिसून येते. तिरुवरंगुलम नटराज, कालिया-कृष्ण व त्रिपुरान्तक यांसारख्या विजयनगर व काही नायक कांस्य मूर्ती त्यांच्या उत्कृष्ट सौंदर्य व दुर्मिळ आकर्षणासाठी प्रसिद्ध आहेत व त्या या दालनात प्रदर्शित केल्या आहेत.

**६) बौद्ध कला दालन :**

१९९० मध्ये सुरू झालेले हे पहिले विषय-आधारित दालन आहे. यात बौद्ध धर्माच्या तीन प्रमुख शाखा हीनयान, महायान व वज्रयान यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध बौद्ध देवतांच्या मूर्ती प्रदर्शित केल्या आहेत. इ.स.पू. दुसऱ्या शतकापासून ते १२ व्या शतकापर्यंतच्या भारतीय बौद्ध कलेचा विकास या शिल्पांमधून दिसून येतो. हीनयान टप्प्याचे प्रतिनिधित्व तीन शिल्पे करतात, ज्यात त्यांच्या बुद्धापद व जातक कथांसारख्या प्रतीकांची पूजा दर्शविली आहे.महायान टप्प्यातबुद्ध व बोधिसत्वांच्या काही अतिशय सुंदर प्रतिमा साकारल्या गेल्या. फोपनूर येथील बुद्ध प्रतिमा, सारनाथ येथील बुद्ध मुखवटा व बुद्धाच्या जीवनातील दृश्ये दर्शवणारी शिळा बौद्ध कलेची विशेष व भव्य उदाहरणे आहेत. वज्रयान टप्प्यात मारिची, चुंडा, तारा, मंजुश्री, सिंहनाद, लोकेश्वर इत्यादी अनेक तांत्रिक देव व देवींच्या मूर्ती आहेत. यांच्या प्रतिमांव्यतिरिक्त, सारनाथ, नालंदा, भरहुत, नागार्जुनकोंडा यांसारख्या महत्त्वाच्या बौद्ध स्थळांचे प्रतिनिधित्व विविध शिल्पांमधून केले आहे. अरुणाचल प्रदेश व लडाख प्रदेशातील अनेक जमाती बौद्ध धर्म पाळतात व त्यांच्या दैनंदिन पूजेत वापरल्या जाणाऱ्या धार्मिक वस्तू बौद्ध मंदिरांची झलक देण्यासाठी वेदीवर ठेवल्या आहेत.

या दालनातील रेशमी चित्रे व स्टुकोचे मुखवटे आपल्याला मध्य आशियामध्ये बौद्ध धर्माच्या प्रसाराची आठवण करून देतात. दक्षिण आशियातील मैत्रेय व अवलोकितेश्वर यांच्या कांस्य प्रतिमा तसेच जावा येथील मानवी आकाराचा बुद्ध मुखवटा हा एक प्रभावी संग्रह आहे. या दालनात तिबेट व नेपाळमधील बौद्ध विषयांवरील थांका चित्रे प्रदर्शित केली आहेत. बर्मा येथील सोन्याचा मुलामा दिलेली लाकडी आधुनिक बुद्ध प्रतिमा, चक्र, अमृत इत्यादींसारख्या अनेक धार्मिक वस्तू देखील प्रदर्शित केल्या आहेत व त्या पर्यटकांसाठी एक अतिरिक्त आकर्षण आहेत. या दालनाचे मुख्य आकर्षण म्हणजे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने उत्तर प्रदेशातील बस्ती जिल्ह्यातील पिप्रहवा येथे उत्खनन केलेल्या दोन अवशेष पात्रांमध्ये बुद्धांचे अवशेष प्रदर्शन.

पिप्रहवाला गौतम बुद्धांचे जन्मस्थान कपिलवस्तू म्हणून ओळखले जाते. जगभरातील बौद्ध लोक या दालनाला भेट देतात व भगवान बुद्धांच्या अवशेषांना आदराने नमन करतात.

**७) हस्तलिखिते दालन :**

राष्ट्रीय वस्तूसंग्रहालयाने विविध भाषा व लिपींमधील सुमारे १४,००० हस्तलिखिते जमा केली आहेत. यात इतिहास, साहित्य, लघुचित्रे, अक्षरांची कला (कॅलिग्राफी), तत्त्वज्ञान, विज्ञान, चरित्र, भूगोल, वंशावळ, पुरातत्त्व, औषधे, धर्म इत्यादी अनेक विषयांचा समावेश आहे व ते विविध कला प्रकार व प्रांतांचे प्रतिनिधित्व करतात. ही सामग्री इतिहासासाठी अत्यंत मौल्यवान आहे. संग्रहातील काश्मीरमधील शारदा लिपीतील व संस्कृत भाषेतील ज्योतिषशास्त्रावरील सर्वात जुनी हस्तलिखित भोजपत्रावर लिहिलेली आहे, जी ९ व्या शतकातील आहे व लेखनकलेचा एक दुर्मिळ नमुना आहे. १२ व्या शतकातील प्रोटो-बंगाली भाषेत ताडपत्रावर लिहिलेली प्रज्ञापारमिता व दुसरी ताडपत्रावरील हस्तलिखित पंचरक्षा, जी पाल शासक रामपालदेवाच्या कारकिर्दीत ११ व्या शतकात रचली गेली, ही भारतातील सर्वात जुनी ताडपत्रावरील हस्तलिखिते आहेत. शारदा लिपीतील भोजपत्रावर लिहिलेली जगद्धर भट्टाची बालबोधिनी ही संस्कृत व्याकरण सूत्रांवर भाष्य करणारी आणखी एक दुर्मिळ हस्तलिखित आहे. कापडावर चिकटवलेल्या कागदाच्या गुंडाळीच्या स्वरूपातील भागवत पुराण, जे कमळाच्या आकारातील चित्रांमधून साकारले आहे, त्यात देवनागरी लिपीत संस्कृतमध्ये चित्रांचे संक्षिप्त वर्णन आहे.

दुवाल राणी खिझ्र खान (१५६७) हे अकबराच्या काळात सचित्र केलेले सर्वात जुने ज्ञात हस्तलिखित आहे. ते मूळतः अमीर खुसरो यांनी १३ व्या शतकात दुवाल राणी व गुजरातचा राजकुमार खिझ्र खान यांच्या प्रेमसंबंधांवर लिहिले होते. बाबरनामा (१५९८-९९) ज्यात १४५ उत्कृष्ट चित्रे आहेत, मुघल राजघराण्याचा संस्थापक बनण्यापूर्वी व नंतर त्याच्या जीवनातील घटनांची वस्तूनिष्ठ व सत्य नोंद आहे, ज्यात मध्य आशिया, अम गाणिस्तान व भारतातील ऐतिहासिक अवशेष, वनस्पती, प्राणी यांचा समावेश आहे. तुझक-ए-जहाँगीर, शिकास्ता लिपीतील आणखी एक उत्कृष्ट हस्तलिखित आहे, ज्यावर सोने शिंपडले आहे व फुलांच्या व प्राण्यांच्या नमुन्यांनी ते सजवलेले आहे. हे स्वतः जहांगीरने लिहिले असावे असे मानले जाते. यांसारखी काही दुर्मिळ हस्तलिखिते येथे प्रदर्शित केली आहेत.

वस्तुसंग्रहालयात परदेशी विद्वानांनी लिहिलेल्या, सचित्र केलेल्या व सुशोभित केलेल्या हस्तलिखितांचा व अक्षरांच्या कलेचा एक महत्त्वाचा संग्रह देखील आहे. येथे चर्मपत्र, रेशमी कागद व हाताने बनवलेल्या कागदांवर लिहिलेली, सचित्र केलेली व परदेशात सुशोभित केलेली परंतु सल्तनत व मुघल काळात विद्वान, कवी व इतरांनी भारतात आयात केलेली काही दुर्मिळ हस्तलिखिते आहेत.

**८) नाणी व शिलालेख दालन :**

या दालनात इ.स.पू. ६ व्या शतकापासून ते १९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंतची भारतीय नाणी व शिलालेखयांचा मोठा संग्रह आहे. येथे सोने, चांदी, तांबे व इतर मिश्रधातूंची मिळून एकूण १,१८,००० नाणी आहेत. ही नाणी खजिना, साठे, भेटवस्तू व खरेदीद्वारे जमा केली गेली आहेत. येथे तुम्हाला प्रसिद्ध पारुख संग्रह, झालन संग्रह, नागू संग्रह, व्यास संग्रह, देसिकाचारी संग्रह व बयाना येथील गुप्तकालीन नाण्यांचे काही

नमुने पाहायला मिळतील. या संग्रहातील निम्मी नाणी उत्तर भारतातील सर्वात प्राचीन काळापासून ते आजपर्यंतची आहेत. याशिवाय, वेगवेगळ्या काळातील शिलालेखांच्या ३१० तांब्याच्या पट्ट्यांचाही यात समावेश आहे.

दालनात सुमारे २०४ नाणी व १० तांब्याच्या पट्ट्या प्रदर्शित केल्या आहेत, ज्यात इ.स.पू.४ शतकातील पंच-मार्क केलेली नाणी व उत्तर भारतातील लहान राज्यांची जमातीची तांब्याची नाणी आहेत. इंडो-ग्रीक शासकांची नाणी, ज्यांच्या दर्शनी बाजूला राजाची अर्धप्रतिमा व मागील बाजूस देवतेची आकृती आहे, ती देखील प्रदर्शनात आहेत. कुषाणची तांब्याची नाणी, इंडो-पार्थियन, वेस्टर्न क्षत्रप, नहपान यांची काही नाणी व गौतमीपुत्र सातकर्णी यांनी पुन्हा जारी केलेली नाणी देखील प्रदर्शित केली आहेत.

प्रदर्शनातील इतर नाण्यांमध्ये मध्ययुगीन राजपूत शासकांचे वर्धनकालीन नाणी, दिल्ली सल्तनत, तुघलक यांची नाणी, जौनपूर, गुजरात, बंगाल व बहमनी येथील इतर प्रांतीय सुलतानांची नाणी, अकबर, जहांगीर, शाहजहान, औरंगजेब व इतर मुघल शासकांची नाणी यांचा समावेश आहे. म्हैसूरचे सुलतान, इंडो-ब्रिटिश मालिका, भारतीय देशी राज्यांची नाणी, विजयनगर शासक, पांड्य, चेर, चोळ, पल्लव व चालुक्य यांची दक्षिण भारतीय नाणी, ज्यांवर हिंदू देवता, बैल, डुक्कर, वाघ, मासे व कमळ इत्यादींच्या प्रतिमा आहेत, ती एका काचपेटीत प्रदर्शित केली आहेत. जहांगीरने जारी केलेली राशिचक्रांची मालिका इतर नाण्यांसोबत दुसऱ्या काचपेटीत प्रदर्शनात आहे. दोन मोठ्या काचपेटींमध्ये नागरी लिपीतील, नंदी नागरी लिपीतील, मिश्र कलिंग लिपीतील, कन्नड, तेलुगू लिपीतील व तेलुगू लिपीतील संस्कृत भाषेतील विजयनगर, गंगा, पूर्व चालुक्य, नायक इत्यादींच्या तांब्याच्या पट्ट्यांचे संच दर्शविले आहेत. एका लहान काचपेटीत एका भांड्यात गुप्तकालीन सोन्याची नाणी सादर केली आहेत.

**९) चित्र दालन :**

वस्तुसंग्रहालयात १७,००० हून अधिक भारतीय चित्रांचा समृद्ध संग्रह आहे, जो खरेदी व भेटवस्तूंद्वारे प्राप्त झाला आहे. लघुचित्रे त्यांच्या रेषा व लयामुळे अतिशय सुंदर दिसतात. सर्वात जुनी ज्ञात लघुचित्रे पूर्व भारतात १० व्या व १२ व्या शतकात ताडपत्राच्या पट्ट्यांवर रंगविली गेली. पश्चिम भारतात, जैन चित्रांचा पाच शतकांहून अधिक (११००-१६००) उल्लेखनीय विकास झाला. कागदाच्या वापरामुळे, ज्याने नंतर कापड व ताडपत्राची जागा घेतली, चित्रकलेच्या नवीन शैलींचा उदय झाला. कापडावरील सरस्वती देवीचे चित्र या शैलीचे एक दुर्मिळ उदाहरण आहे. जैन चित्रांव्यतिरिक्त, भारतीय लघुचित्रांच्या इतर महत्त्वाच्या शैली म्हणजे मुघल, राजस्थानी, पहाडी व दखखनी चित्रे. मुघल शैली मुघल सम्राटांच्या दरबाराशी संबंधित आहे, ज्यात राजे, सरदार व संत, पक्षी व प्राणी यांची चित्रे आहेत. तर राजस्थानी व पहाडी चित्रांनी महाकाव्ये व पुराणांमधील विषय घेतले आहेत व ती गीतात्मक, ज्वलंत व तीव्र भावनांनी परिपूर्ण आहेत. या शैलीतील चित्रे लोकजीवन, साहित्य, संगीत व प्रेमगीतांनी प्रेरित होऊन तीव्र भावना, चैतन्य व काव्यमय कल्पनांनी भरलेली आहेत.

तिबेटी व नेपाळी थांका, तंजोर व म्हैसूर चित्रे, गंजीफा कार्ड चित्रे, कापडी चित्रे व १६००-१९०० दरम्यानच्या गुंडाळ्यांचा चांगला संग्रह आहे. ही चित्रे तीन दालनांमध्ये प्रदर्शित केली आहेत: चित्रकला दालन (पहिला मजला), तंजोर व म्हैसूर चित्रांचे दालन (पहिला मजला) व तंत्र कला दालन (तळमजला). दखखनी

चित्रे, माळवा शैली, बासोली शैली, काश्मिरी शैली, शीख शैली, नेपाळची चित्रे चित्रकला दालनात प्रदर्शित केली आहेत, तर तंजोर व म्हैसूर शैलीतील देव व देवींची चित्रे तंजोर व म्हैसूर दालनात व तंत्र कला दालनात बौद्ध धर्म, जैन धर्म, शैव धर्म व वैष्णव धर्माची चित्रे प्रदर्शित केली आहेत.

**१०) शस्त्रांस्त्र दालन :**

वस्तुसंग्रहालयात सुमारे ७,००० भारतीय शस्त्रांचा उत्कृष्ट संग्रह आहे, जो प्रागैतिहासिक काळापासून ते १९ व्या शतकापर्यंतचा आहे. यात पाचर मारण्याची शस्त्रे, प्रक्षेपण शस्त्रे, चिरडण्याची शस्त्रे, माणसे व जनावरांसाठी चिलखते, अलंकारिक, बळीची व धार्मिक विधींची शस्त्रे, अग्निशस्त्रे व युद्धातील उपकरणांचा समावेश आहे. बांबू, धातू व हस्तिदंत तसेच सोने व चांदीने सुशोभित केलेले विविध प्रकारचे धनुष्यबाण एका स्वतंत्र दालनात प्रदर्शित केले आहेत. शेवटचा मुघल शासक बहादूर शाह जफर यांचा कोरीव धनुष्यदेखील या दालनात पाहायला मिळतो. लोखंडाच्या शोधानंतर (इ.स.पू. १०००), भारतीय तलवारी विविध आकारात दिसतात. त्यांचा प्रकार, रचना व कलात्मक सजावट त्या-त्या काळातील सामाजिक-आर्थिक परिस्थिती स्पष्टपणे दर्शवते.

भारतात सल्तनत व मुघल राजवटीच्या स्थापनेनंतर शस्त्रांमध्ये महत्त्वपूर्ण बदल झाला. या काळात काही अद्वितीय शस्त्रे सादर झाली. पर्शियन तलवार शमशेर, अरेबियन जुल्फिकार, तुर्की सैलाबा, जयपूरची मीनाकारी केलेली तलवार, मराठ्यांचा पट्टा, राजपूतांचा खंडा, आसामची दाओ व काही बळीची व औपचारिक शस्त्रे या दालनातील प्रमुख आकर्षणे आहेत. औरंगजेब, टिपू सुलतान, नानासाहेब पेशवे व हमीर सिंह यांच्या वैयक्तिक तलवारी असलेला ऐतिहासिक शस्त्रांचा संग्रह आपल्याला भूतकाळातील इतिहास व त्यांच्या कार्यांची आठवण करून देतो. खंजिरांचे आकार व प्रकारातही विविधता आढळते व त्यांना मुघलांचे जमाधर, जंबिया, खंजर, अम गाणांचा चुरा, राजपूतांचा खपवा, नेपाळींची खुकरी यांसारख्या स्वतंत्र नावांनी ओळखले जाते. सोने, चांदी व मौल्यवान रत्ने व जडजवाहिर जडवलेले तसेच हस्तिदंत, जेड, क्रिस्टल व सोपस्टोनचे मूठ असलेले व ज्यांवर अक्षरे कोरलेली आहेत, असे खंजर या दालनात प्रदर्शित केले आहेत.

शरीराच्या संरक्षणासाठी हातावर धारण केलेले ढाल हे सर्वात पहिले फिरते साधन होते. त्यानंतर डोक्यावर शिरस्त्राण, छाती व पाठीचे चिलखत, बाजुबंद व पायांचे चिलखत इत्यादी वापरले जात होते. भाले किंवा बर्च्या बांबू, लाकूड, धातू इत्यादींपासून बनवलेले असत व त्याला टोकदार लोखंडी किंवा दगडाचे पाते असे. मराठा, राजपूत, पहाडी व शीख लोकांच्या शस्त्रांनी देशासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्यांच्या शौर्याची साक्ष दिली. १४ व्या शतकाच्या सुरुवातीला दारूगोळ्याच्या शोधाने भारतीय शस्त्रांच्या इतिहासात एक नवीन पर्व सुरू झाले. सन १५२६ मध्ये बाबरने पानिपतच्या युद्धात मोठ्या आकाराच्या तोफांचा वापर केला होता. त्या बैल, घोडे व उंटांनी ओढल्या जात होत्या. कालांतराने, खांद्यावर ठेवता येणारी अग्निशस्त्रे विकसित झाली, जी व्यक्ती वापरू शकत होती व त्यामुळे मॅचलॉक, फ्लिंट-लॉक व पर्क्शन कॅप असलेली तोंडाने भरण्याची बंदूक तयार झाली. पिस्तूल, रिव्हॉल्व्हर व अनेक नळ्या असलेली लहान शस्त्रे यांसारखी अग्निशस्त्रे या दालनातील काही उल्लेखनीय नमुने आहेत. दारूगोळ्याच्या बाटल्या शोकेसेसच्या सौंदर्यात भर घालतात. भारतीय शस्त्रे बहुतेक

वेळा कोरलेली, दमस्कसची नक्षीकाम केलेली, मीनाकारी केलेली व अनेक प्रकारे सुशोभित केलेली आहेत व त्यापैकी बरीच उत्कृष्ट कलाकृती म्हणून गणल्या जाऊ शकतात.

**११) सजावटी कला दालन :**

तळमजल्यावरील या दालनात लाकूड, हस्तिदंत, जेड कोरीव काम, बिद्रीची भांडी व काचेवरील कोरीव काम यांसारख्या सजावटी कला प्रदर्शित केल्या आहेत. लाकूड कोरीव काम ही एक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये केवळ रोजच्या वापरासाठीच नव्हे, तर शिल्पकला, घरगुती व वास्तुकला वस्तूंच्या सौंदर्यासाठी कच्च्या लाकडाला आकार दिला जातो. कारागिरांनी गोल कोरीव कामासाठी सागवान, देवदार, चंदन, आबनूस, अक्रोड व काळ्या लाकडाचा वापर केला आहे. उत्तर प्रदेशातील अल्मोरा येथील सूर्यमंदिरातील सुंदर कोरीव खांब व दरवाजे, जे उत्तर मध्ययुगीन दालनात प्रदर्शित केले आहेत, ते सर्वात महत्त्वाचे संग्रह आहेत.

हडप्पा व मोहेंजोदारो येथील उत्खननात हस्तिदंताच्या अनेक पट्ट्या, कंगवे, जडणघडणीच्या वस्तू, मुद्रा, काजळ-काड्या इत्यादी सापडल्या आहेत. तक्षशिला व बेग्राम (अफगाणिस्तान) येथे सापडलेल्या विविध वस्तूंवरून कुषाण काळात हस्तिदंत कोरीव कामाची लोकप्रियता दिसून येते. हस्तिदंतातील दिल्लीच्या कारागिरीचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे मंदिराचे देवस्थान, मोठी जाळी (पर्दा), बसलेली बुद्ध मूर्ती व बुद्धाच्या जीवनातील दृश्ये दर्शवणारा हस्तिदंत हे काही अद्वितीय वस्तू प्रदर्शनात आहेत. जेड कोरीव काम, दोन हुक्का (एक शाहजहानच्या काळातील), जडवलेल्या थाळ्या, सुपारी, मसाल्याचे डबे, कप, वाट्या, पट्ट्या, पेले व घुमटाकार झाकण असलेली मोठी डेगची, ज्यावर शाहजहानचे नाव कोरलेले आहे इत्यादी काही उल्लेखनीय संग्रह आहेत. गुजरातच्या मंदिराचा एक भाग रेपौसे कामाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. बिद्रीच्या भांड्यांमध्ये हुक्का, सैलाबची, आम ताब, पेटी, मेणबत्ती स्टँड ट्रे, पलंगाचा पाय व उगल्दान यांसारख्या लोकप्रिय वस्तू आहेत. काच देखील सजावटीच्या कला माध्यमासाठी वापरली जात होती व वस्तुसंग्रहालयाच्या संग्रहात सजावटीच्या कलाकृतींची संख्या १०,००० पेक्षा जास्त आहे.

**१२) मध्य आशियाई प्राचीन वस्तू दालन :**

चीन तुर्कस्तानच्या सिंकियांग प्रांतात सर ऑरेल स्टीन यांनी त्यांच्या १९००-१९०१, १९०६-१९०८ व १९१३-१९१६ च्या तीन शोध मोहिमांमध्ये शोधलेल्या ११,००० हून अधिक वस्तूंचामध्य आशियाई प्राचीन वस्तूंचा संग्रहराष्ट्रीय वस्तूसंग्रहालयातील अत्यंत प्रतिष्ठित व दुर्मिळ मानला जातो. पहिल्या मजल्यावरील दोन दालनांमध्ये प्रदर्शित केलेल्या निवडक वस्तूंमध्ये भित्तिचित्रे, रेशीम, रॅमी, कागद व लाकडावरील चित्रे, टेराकोटा, स्टुको, लाकडी वस्तू, खरोष्ठी कागदपत्रे व वस्त्रे इत्यादींचा समावेश आहे. या वस्तू इसवी सन ३ ते १२ व्या शतकातील आहेत.

दालनात प्रवेश करताच, मिंग राजघराण्यातील बसलेल्या बुद्धाची सुंदर चीनी कांस्य प्रतिमा लक्ष वेधून घेते. दोन्ही दालनांच्या भिंतींवर बहुतेक बौद्ध चित्रे आहेत, जी आकार व रंगसंगतीच्या दृष्टीने उत्कृष्ट आहेत. ही चित्रे, जी पताका म्हणूनही ओळखली जातात, त्यावर अनेकदा देणगीदारांच्या आकृत्या व चीनी भाषेतील

शिलालेख आढळतात. मिरान (३ रे व ४ थे शतक) येथील बुद्ध व त्यांचे सहा भिक्षू दर्शवणारे चित्र तसेच बालावास्ते येथील इंद्र व वैरोचन (६ वे व ८ वे शतक) दर्शवणारे भित्तिचित्र विशेष उल्लेखनीय आहेत.

मध्य आशियातील टेराकोटा कला विविध उत्कृष्ट कारागिरी सादर करते. खोतान प्रदेशातील प्रदर्शित मानवी व प्राणी आकृत्या अत्यंत मनोरंजक कलाकृती आहेत. मध्य आशियामध्ये स्टुको हे कलात्मक अभिव्यक्तीचे लोकप्रिय माध्यम होते. अस्ताना येथील स्टुको त्यांच्या विशिष्ट शैलीसाठी ओळखले जातात, कारण ते कबरांमध्ये सापडले होते. खरोष्ठी लिपी व प्राकृत व संस्कृत भाषांच्या वापरामुळे मध्य आशियावर भारताचा मजबूत प्रभाव दिसून येतो. मध्य आशियातील इतर कला व हस्तकला वस्तूंमध्ये नाणी, दगड व काचेचे मणी, मुद्रा, चामड्याच्या वस्तू, लाकडी कोरीव काम व भांडी इत्यादींचा समावेश आहे.

**१३) कोलंबसपूर्व कला :**

श्री. हीरामनेक यांनी राष्ट्रीय वस्तूसंग्रहालयाला दिलेला कोलंबसपूर्व कलेचा संग्रह उच्च प्रतीचा असून तो कोलंबसपूर्व जगातील सर्व प्रमुख संस्कृतींचे प्रतिनिधित्व करतो. या संग्रहात मेक्सिको, पेरू, अर्जेंटिना, कोस्टा रिका, निकाराग्वा व दक्षिण अमेरिकेतील इतर देशांतील कलाकृतींचा समावेश आहे. मेक्सिकोची ओल्मेक संस्कृती, जी साधारणपणे इ.स.पू. १२०० च्या सुमारासची आहे, ती प्रचंड दगडी शिल्पे व जेड व इतर कठीण दगडांमधील लहान शिल्पांद्वारे वैशिष्ट्यीकृत आहे. पेरूच्या दक्षिण किनारपट्टीवरील प्रारंभिक पराकास संस्कृती तिच्या वस्त्रांसाठी ओळखली जाते, ज्यांच्या काही तंत्रांचे अनुसरण दक्षिण किनारपट्टी व सुमारे इसवी सन १० व्या शतकातील नाझ्का येथील लोकांनी केले. या लोकांनी सोने, चांदीचे दागिने, तांब्याची औपचारिक उपकरणे व शस्त्रे यांचाही वापर केला.

**१४) इतर गैर–भारतीय कलाकृती दालन :**

या दालनात इतर देशांमधील कलाकृती प्रदर्शित केल्या आहेत, ज्या भारताच्या संस्कृतीपासून वेगळ्या आहेत.

**१) इंडोनेशियाई कला :**

इंडोनेशियाच्या कलेवर इस्लाम, हिंदू व बौद्ध धर्माचा प्रभाव दिसून येतो व तो या दालनात प्रदर्शित केलेल्या चार शिल्पांमधून स्पष्टपणे जाणवतो. महिषासुरमर्दिनी दुर्गा, गणेश व भटारगुरु यांच्या शिल्पांमधून इंडोनेशियाई कलेवरील भारतीय प्रभाव दिसतो. सियाल्क व टेपेगियान येथील मातीच्या वस्तू तसेच लुरिस्तान येथील कांस्य वस्तूंमध्ये इराणी कला आढळते. फ्लॅमिश कला लोकर व रेशमामध्ये विणलेल्या एका बाग दृश्याच्या टेपेस्ट्रीद्वारे दर्शविली जाते. फ्रेंच कला काही शिल्पे व १६ व्या, १७ व्या शतकातील नाजूकपणे प्रकाशित केलेल्या बायबलच्या पानांद्वारे दर्शविली जाते.

**२) गोव्याची कला:**

गैर–भारतीय संग्रहांव्यतिरिक्त, या दालनात गोव्यातील कला व शिल्पे, जसे की ख्रिश्चन संतांच्या हस्तिदंती व लाकडी मूर्ती व लाल, गडद निळा व सोनेरी रंगांच्या छटांमध्ये रंगवलेल्या मेणाच्या चित्रांमधील मूर्ती प्रदर्शनात आहेत.

**१५) आभूषणे दालन :**

वस्तुसंग्रहालयात खास डिझाइन केलेल्या दालनात सत्तावीस काचपेटींमध्ये सुमारे २४३ वस्तू आहेत, जे इ.स.पू. तिसऱ्या शतकापासून ते २० व्या शतकाच्या सुरुवाती पर्यंतच्या भारतीय आभूषणांचा विहंगम दृष्टिकोन देतात. प्रत्येक शोकेस स्वतःची एक कथा सांगतो व हे नमुने त्यांचे वय, कारागिरी, आंतरिक मूल्य व प्राचीनता यांसाठी अभिमानास्पद आहेत. काचपेटींमध्ये सोने व चांदीतील गीता रथ, ५०१ हिऱ्यांनी जडवलेल्या प्लॅटिनम पट्ट्यांसह सोन्यातील अशोक स्तंभ, सोने, अर्ध-मौल्यवान दगड, स्टिएटाइट, सर्पेन्टाइन व फिएन्समध्ये सिंधू संस्कृतीतील आभूषणे आहेत. प्रदर्शनात विविध प्रकारचे नेकलेस, बांगड्या, मनगटी, कमरपट्टे, पेंडेंट, बाहुभूषणे, हेअरपिन, सुया, कानातले, फिती व ब्रोच इत्यादींचा समावेश आहे.

मुघल आभूषणे त्यांच्या ठळक रचना, परिपूर्णतेसह सूक्ष्म तपशीलांचे निष्पादन व वनस्पती व प्राणी यांचे चित्रण यांद्वारे ओळखली जातात. राजस्थान, दिल्ली, वाराणसी व हैदराबाद यांसारख्या भारतातील राजेशाही राज्यांमधील मौल्यवान व अर्ध-मौल्यवान दगडांमधील दागिने देखील येथे प्रदर्शित केले आहेत. दक्षिण भारतीय आभूषणे त्यांच्या मोठेपणा व जडत्वासाठी, माणिक व मौल्यवान दगडांचा वापर, सोन्याच्या तारा असलेल्या रुद्राक्षाच्या माळा व मोठ्या सर्पिल वेण्या (नागचोटी) इत्यादींद्वारे वैशिष्ट्यीकृत आहेत. एका मोठ्या काचपेटीत चांदीची खुर्ची आहे, ज्याचे हात सिंहाच्या आकाराचे आहेत व जी दिल्ली दरबारच्या वेळी बनारसच्या महाराजांनी (काशीनरेश) वापरली होती, ती प्रदर्शित केली आहे.

**१६) मानववंशशास्त्र दालन :**

वस्तुसंग्रहालयाच्या मानववंशशास्त्र संग्रहात सुमारे १०,००० दुर्मिळ मानववंश शास्त्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या वस्तू आहेत, ज्या विविध राज्यांकडून मिळालेल्या भेटवस्तू, आदिवासी पट्ट्या व ग्रामीण भागातील शोध मोहिमा तसेच खाजगी संग्राहकांकडून खरेदीद्वारे प्राप्त झाल्या आहेत. या संग्रहात शिरोभूषणे, पादत्राणे, कपडे, दागिने, वाद्ये, टेराकोटा, पटचित्रे, संथाळ चित्रे, मधुबनी चित्रे, लाकडी कोरीव काम, मुखवटे, शस्त्रे, धातूच्या प्रतिमा, दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या विविध वस्तूंचा समावेश आहे. उत्तर-पूर्व भारतातील आदिवासी जीवनशैलीचे पुनर्रचित दालन सांस्कृतिक वैशिष्ट्यांमध्ये प्रादेशिक एकता दर्शवते. अरुणाचल प्रदेशातील मोनपा, शेरडुकपेन, खोवा, आपतानी, मिश्मी, आदी, नोक्टे, वांचू, सिंगफो व खामती, आसाममधील कार्बी व बोडो, मणिपूरमधील थांगकुल व कुकी, मिझोराममधील मिझो, नागालँडमधील आओ, अंगामी, सेमा, लोथा व कोन्याक तसेच त्रिपुरा व रियांग यांच्या दैनंदिन जीवनाची झलक या दालनात पाहायला मिळते.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ :**

**बहूपर्यायी प्रश्न :**

१) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाची स्थापना करण्याची योजना कोणत्या समितीने तयार केली?

अ) हंटर आयोग  ब) मॉरिस ग्वेअर समिती

क) सायमन कमिशन  ड) कोठारी आयोग

२) लंडनच्या रॉयल कॅडमीने आयोजित केलेल्या ‘भारतीय कला प्रदर्शन’ कोणत्या वर्षी भरले होते?

अ) १९४५-४६ ब) १९४६-४७

क) १९४७-४८ ड) १९४८-४९

३) नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात ‘भारतीय कला प्रदर्शन’ कोणत्या वर्षी आयोजित करण्यात आले होते?

अ) १९४८ ब) १९४९

क) १९५० ड) १९५१

४) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाचे औपचारिक उद्घाटन कोणाच्या हस्ते झाले?

अ) पंडित जवाहरलाल नेहरू ब) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

क) श्री. सी. राजगोपालाचारी ड) डॉ. राजेंद्र प्रसाद

५) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय इमारतीचा पाया कोणी घातला?

अ) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन ब) श्री. सी. राजगोपालाचारी

क) पंडित जवाहरलाल नेहरू ड) इंदिरा गांधी

६) सध्या राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय कोणत्या मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत आहे?

अ) शिक्षण मंत्रालय ब) सांस्कृतिक मंत्रालय

क) पर्यटन मंत्रालय ड) गृह मंत्रालय

७) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाच्या प्रागैतिहास दालनात कोणत्या युगापासूनच्या वस्तू मांडल्या आहेत?

अ) पुराश्मयुग ते लोहयुग ब) पुराश्मयुग ते ताम्रयुग

क) मध्यपाषाणयुग ते कांस्ययुग ड) नवपाषाणयुग ते आधुनिक युग

८) मोहेंजोदारो येथील कांस्य नर्तकीची मूर्ती राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाच्या कोणत्या दालनात पाहायला मिळते?

अ) पुरातत्त्व दालन ब) कांस्य दालन

क) प्रागैतिहास दालन ड) चित्र दालन

९) जगप्रसिद्ध सूर्यदेवाची प्रतिमा, जी कोणार्कच्या सूर्यमंदिरातील आहे, ती वस्तुसंग्रहालयाच्या कोणत्या दालनात अभ्यागतांचे स्वागत करते?

अ) प्रारंभिक मध्ययुगीन दालन ब) उत्तर मध्ययुगीन दालन

क) पुरातत्त्व दालन ड) बौद्ध कला दालन

१०) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयात विविध भाषा व लिप्यांमधील सुमारे किती हस्तलिखिते जमा केली आहेत?

अ) ४,०००    ब) १०,०००

क) १४,०००    ड) २०,०००

## २.२.२ छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई :

पूर्वी 'प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय' म्हणून ओळखले जाणारे, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय हे मुंबईच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचे एक चमकते प्रतीक आहे. भारतातच नव्हे, तर जगभरातही या संग्रहालयाने आपले महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. याची स्थापना, विकास व आजचे स्वरूप अनेक ऐतिहासिक घटना व दूरदृष्टीच्या प्रयत्नांचे फळ आहे. ऐतिहासिक व कलात्मक दृष्टीने हे संग्रहालय मुंबईच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग मानले जाते.

### १) स्थापना व विकास :

छत्रपती शिवाजी महाराज वस्तूसंग्रहालयाचा पाया ब्रिटनचे प्रिन्स ऑफ वेल्स (नंतरचे राजा जॉर्ज पंचम) यांच्या हस्ते ११ नोव्हेंबर १९०५ रोजी घातला गेला. याच वेळी त्यांच्या स्वागतासाठी मुंबईच्या पश्चिम किनाऱ्यावर 'गेटवे ऑफ इंडिया' हे भव्य प्रवेशद्वारही बांधले गेले. संग्रहालयाच्या स्थापनेसाठी प्रसिद्ध वास्तुविशारद जॉर्ज विटेट यांची निवड करण्यात आली. विटेट हेइंडो-सारासेनिक स्थापत्य शैलीत निपुण होते. त्यामुळे त्यांनी हिंदू व मुस्लिम स्थापत्यशैलींचे अनोखे मिश्रण असलेली, तसेच पाश्चात्त्य वास्तुशैलीची वैशिष्ट्ये समाविष्ट करणारी एक भव्य इमारत उभी केली. हे वस्तुसंग्रहालय आजही इंडो-सारासेनिक शैलीचा उत्कृष्ट नमुना मानले जाते.

### २) वास्तूकला व रचना :

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय तीन मजली असून, त्याचा आकार आयताकृती आहे. याच्या मध्यभागी एक मोठा गोल घुमट आहे, जो संपूर्ण इमारतीचा केंद्रबिंदू आहे. या घुमटाच्या चारही बाजूंना छोटे मिनार आहेत व त्यावर सुंदर लहान गोल घुमट आहेत. संग्रहालयाच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यावर एक मोठा हॉल दिसतो, जिथे महत्त्वाच्या व दुर्मिळ कलात्मक वस्तू ठेवल्या आहेत. हे संग्रहालय आपल्या भव्य वास्तुकलेसाठीही प्रसिद्ध आहे. या इमारतीत घुमट, कमानी, जाळ्या व विस्तृत आतील रचना आहेत, ज्या आजही पाहणाऱ्यांना थक्क करतात. या शैलीत भारतीय हिंदू व इस्लामिक स्थापत्यशैलींचा प्रभाव दिसतो, तसेच पाश्चात्त्य वास्तुकलेची झलकही आढळते.

### ३) प्रारंभिक उपयोग व नामांतर :

सध्याच्या संग्रहालयाच्या इमारतीचे बांधकाम १९१४ मध्ये पूर्ण झाले. मात्र, तेव्हा पहिल्या महायुद्धाचा काळ असल्यामुळे ब्रिटिश सरकारने याचा वापर लष्करी दवाखाना व बालकल्याण केंद्र म्हणून केला. युद्धानंतर, १० जानेवारी १९२२ रोजी हे संग्रहालय सामान्य जनतेसाठी खुले करण्यात आले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, देशाच्या महान योद्ध्यांचा सन्मान म्हणून १९९८ मध्ये 'प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय' हे नाव बदलून 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय' असे करण्यात आले.

**४) वस्तूसंग्रह व दालने :**

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाची स्थापना १९०५ मध्ये झाली, तेव्हापासूनच या संग्रहालयात कलात्मक वस्तू जमा करण्याचे कार्य सुरू झाले. शेठ पुरुषोत्तम मावजी यांनी त्यांच्याकडील लघुचित्रांचा व इतर कला वस्तूंचा संग्रह या वस्तुसंग्रहालयास प्रदान केला. हा संग्रह पूर्वी नाना फडणवीस यांच्या चित्रकला संग्रहाचा भाग होता. पाकिस्तानातील मिरपुरबास येथे झालेल्या उत्खननात सापडलेल्या बौद्ध स्तूपाजवळील वस्तू हे उत्खनन करणारे हेन्री कुझेन्स यांनी या वस्तुसंग्रहालयाला दिल्या. १९२२ मध्ये सर रतनजी टाटा यांनी आपला कलासंग्रह या वस्तुसंग्रहालयास भेट म्हणून दिला. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून १९३३ मध्ये सर दोराब टाटा यांनीही आपला कलासंग्रह संग्रहालयास भेट दिला. कालांतराने, या संग्रहालयात युरोपियन तैलचित्रे व कलावस्तू, जपानी कलावस्तू, चेन्नई येथील कलावस्तू, भारतीय लघुचित्रे, शस्त्रास्त्रे, वस्त्रे, धातूच्या मूर्ती इत्यादींचा समावेश झाला. १९३४ मध्ये सर अकबर हैदरी यांच्या कलासंग्रहातील कला वस्तू या वस्तुसंग्रहालयास भेट म्हणून प्राप्त झाल्या. याव्यतिरिक्त, वस्तुसंग्रहालयाच्या प्रशासनाने अनेक प्रकारच्याकला वस्तू व चित्रे मिळवली, तसेच जागरूक व सुज्ञ नागरिकांनीही त्यांच्याकडील ऐतिहासिक वस्तू या संग्रहालयात जमा केल्या. आज या वस्तूसंग्रहालयाकडे जवळपास ५० हजार कला वस्तूंचा समृद्ध संग्रह आहे.

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या तीन मजली इमारतीत विविध दालने आहेत. संग्रहालयास मिळालेल्या विविध कला वस्तूंचे वर्गीकरण व नोंदणी करून, या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ही दालने तयार करण्यात आली आहेत. या दालनांच्या माध्यमातून भारताच्या पाच हजार वर्षांचा इतिहास उलगडतो. वस्तुसंग्रहालयास भेट देणाऱ्या व्यक्तीस ज्ञान मिळावे, त्याची उत्सुकता वाढावी व त्याचे मनोरंजन व्हावे, या उद्देशाने या कला वस्तूंचे प्रभावी प्रदर्शन केले आहे. या वस्तुसंग्रहालयात अनेक कलादालने असून, त्या दालनांचा व त्यातील वस्तूंचा संक्षिप्त आढावा खालीलप्रमाणे आहे:

१) मार्गदर्शक दालन – तळमजला, मुख्य इमारत

२) शिल्पकला दालन – तळमजला, मुख्य इमारत

३) प्रागैतिहास व पूर्व इतिहास दालन – पोट मजला

४) प्रकृती विज्ञान दालन – तळ मजला

५) लघुचित्र दालन – पहिला मजला, मुख्य इमारत/विस्तारित इमारत

६) शोभिवंत कला वस्तूंचे दालन – पहिला मजला

७) नेपाळ – तिबेट दालन – पहिला मजला, मुख्य इमारत/विस्तारित इमारत

८) कार्ल व मेहेरबाई खंडालावाला दालन – पहिला मजला

९) नाणी दालन – पहिला मजला, विस्तारित इमारत

१०) अतिपूर्वेकडील कला वस्तूंचे दालन – दुसरा मजला

११) युरोपीय चित्रांची दालने - दुसरा मजला

१२) शस्त्र दालन - दुसरा मजला, मुख्य इमारत

**१) भारतीय कला व संस्कृतीचा परिचय दालन :**

संग्रहालयाच्या तळमजल्यावर असलेले हे पहिले दालन आहे. हे दालन आपल्याला भारतीय कला व संस्कृतीची विविधता व समृद्धी दाखवते. इथे तुम्हाला टेराकोटा (मातीची भांडी व शिल्पे), कांस्य (पितळ व तांबे यांसारख्या धातूंच्या मूर्ती), लघुचित्रकला व शोभेच्या कलाकृती तसेच चीन व जपानसारख्या पूर्वेकडील देशांतील कलाकृतींचा आकर्षक संग्रह पाहायला मिळेल.या दालनाची रचना खूप खास आहे. येथील खांब राजस्थानातील प्राचीन मंदिरांच्या खांबांसारखे बनवले आहेत, जे तेथील कलात्मक परंपरेची आठवण करून देतात. तसेच, पहिल्या मजल्यावरील लाकडी काम नाशिकजवळील एका जुन्या वाड्यातून आणले आहे, जे महाराष्ट्रातील पारंपरिक वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. संग्रहालयाच्या इमारतीचा वैशिष्ट्यपूर्ण गोल घुमट विजापूरच्या प्रसिद्ध गोलघुमटासारखा दिसतो, ज्यामुळे या दालनाला एक ऐतिहासिक व भव्य स्वरूप मिळाले आहे.

या दालनात प्रदर्शित केलेल्या कलावस्तू भारतीय इतिहास व कलाशैलीच्या विविध कालखंडांचे प्रतिनिधित्व करतात. यात मध्य प्रदेशातील रेवा संस्थानातील ऐतिहासिक खंजीर (शस्त्रकला व धातूकामाची झलक), उत्तर प्रदेशातील लखनऊची आकर्षकसुरई (पाण्याचे भांडे), चिनी मातीपासून बनवलेली सुंदर फुलदाणी व काश्मीरमधील अखनूर येथे सापडलेली युवतीची मातीची मूर्ती यांचा समावेश आहे. येथे महाराष्ट्रातील खानदेशातील एक कलाकृती आहे, जीजैन धर्मातील पहिले तीर्थंकर ऋषभनाथयांच्या जीवनातील २४ महत्त्वाच्या घटना दर्शवते. कर्नाटकातील कांस्य धातूची बाहुबलीयांची मूर्ती व बंगालमधील भगवान विष्णूंचे त्रिविक्रम रूप दर्शवणारी कांस्य मूर्तीही येथे आहे. सिंध प्रांतातील एका भक्ताची श्रद्धा दर्शवणारी मातीची मूर्तीही लक्ष वेधून घेते. या दालनातील प्रत्येक वस्तूची स्वतःची ऐतिहासिक व कलात्मक ओळख आहे. हे दालन पाहिल्यावर भारतातील समृद्ध कला व संस्कृतीची कल्पना येते व पुढील दालने पाहण्याची उत्सुकता वाढते.

**२) शिल्पकला दालन :**

संग्रहालयाच्या मुख्य इमारतीच्या तळमजल्यावर असलेले हे शिल्पकला दालन प्राचीन भारतीय शिल्पकलेची समृद्ध परंपरा व विविधता दर्शवते. प्राचीन भारतीय समाजात धर्माला महत्त्वाचे स्थान होते व त्याचा प्रभाव तत्कालीन शिल्पकलेवर स्पष्टपणे दिसून येतो. त्यामुळे धार्मिकता हे प्राचीन भारतीय शिल्पकलेचे अविभाज्य अंग आहे. या दालनात महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात व काश्मीर यांसारख्या भारतातील विविध राज्यांमध्ये सापडलेल्या प्राचीन शिल्पांचा मौल्यवान संग्रह प्रदर्शित केला आहे. याशिवाय, अफगाणिस्तान व पाकिस्तानातून मिळालेली काही महत्त्वाची शिल्पे देखील या दालनाची शोभा वाढवतात, जे भारतीय कलेचा प्रभाव दूरवर पसरलेला होता हे दाखवतात.

येथे विविध प्रकारच्या दगडात व धातूंमध्ये साकारलेल्या देवता, पौराणिक कथा व सामाजिक

जीवनातील दृश्यांच्या अप्रतिम कलाकृती पाहायला मिळतात. यातील काही निवडक व उल्लेखनीय शिल्पे अशी आहेत;

**विष्णू वैकुंठ :** भगवान विष्णूंच्या चार मुखाकृती असलेले हे शिल्प त्या प्रदेशातील धार्मिक व कलात्मक परंपरेचा उत्कृष्ट नमुना आहे.

**द्वारपाल :** बेसॉल्ट दगडातील ही भव्य मूर्ती प्राचीन लोकधर्मातील यक्षांची ताकद दर्शवते.

**बुद्ध व काश्यप ब्राह्मण भेट :** गांधार शैलीतील हे शिल्प भारतीय व ग्रीक कलांच्या मिश्रणाचा प्रभाव दाखवते.

**भगवान शिव व गण :** हे शिल्प धार्मिक श्रद्धा व कलात्मक अभिव्यक्तीचा भाग आहे.

**महिषासुरमर्दिनी दुर्गा :** बेसॉल्ट दगडातील ही शक्तिशाली मूर्ती शक्ती व न्यायाचे प्रतीक आहे.

**भगवान शिवाची मूर्ती :** बेसॉल्ट दगडातील शिवाची शांत व गंभीर मुद्रा असलेली सुंदर मूर्ती.

**गरुडाची मूर्ती :** भगवान विष्णूंचे वाहन असलेल्या गरुडाची ही प्रभावी मूर्ती धार्मिक भावना व कलात्मक कौशल्याचा परिचय देते.

**गणेशाची मूर्ती :** बेसॉल्ट दगडातील ही आकर्षक मूर्ती विघ्नहर्ता गणेशाचे प्रतीक आहे.

**महेशमूर्ती शिव :** भगवान शिवाचे एक महत्त्वपूर्ण रूप दर्शवणारे शिल्प.

**ब्रह्मदेवाची शिल्पकृती :** या प्रदेशातील धार्मिक व कलात्मक महत्त्वाचा भाग.

**शांतिनाथ :** संगमरवरातील जैन धर्मातील १६ वे तीर्थंकर शांतिनाथ यांची शांत व मोहक मूर्ती.

या दालनातील प्रत्येक शिल्प त्या-त्या प्रदेशातील कलाशैली, धार्मिक श्रद्धा व सामाजिक जीवनावर प्रकाश टाकते. ही प्राचीन शिल्पे भारतीय कला व संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहेत, जे भूतकाळातील कलाकारांच्या उत्कृष्ट कौशल्याची व दूरदृष्टीची साक्ष देतात. शिल्पकला दालनाला भेट देणे हा भारतीय कलेच्या इतिहासाचा व विविधतेचा अनुभव घेण्याचा एक उत्तम मार्ग आहे.

**३) प्रागैतिहास व पूर्व इतिहास दालन :**

संग्रहालयाच्या मुख्य इमारतीच्या पोटमजल्यावर असलेले हे दालन मानवी इतिहासाच्या अगदी सुरुवातीच्या काळाची झलक दाखवते. येथे पश्चिम भारतातील प्रागैतिहासिक काळात वापरल्या गेलेल्या विविध प्रकारच्या दगडी हत्यारांचा महत्त्वाचा संग्रह आहे. या हत्यारांमुळे तत्कालीन मानवाची जीवनशैली, शिकार पद्धती व तंत्रज्ञान याची कल्पना येते.या दालनाचे आणखी एक महत्त्वाचे आकर्षण म्हणजे हडप्पा व मोहेंजोदडो यांसारख्या प्राचीन सिंधू संस्कृतीच्या उत्खननात सापडलेल्या विविध वस्तूंचा संग्रह. या संस्कृतीच्या उत्खननात दगडी शिल्पे फार कमी असली तरी, त्या काळातील लोकांनी तयार केलेली मातीची भांडी, विविध प्रकारच्या

आकर्षक मूर्ती, मुलांसाठी खेळणी, सुंदर दागिने व मुद्रिका (शिक्के) मोठ्या प्रमाणात सापडले आहेत. या वस्तू त्या संस्कृतीतील लोकांच्या कलासक्त व सर्जनशील मनाची साक्ष देतात.

या दालनाची मांडणी विशेषतः विद्यार्थ्यांसाठी केली आहे, जेणेकरून त्यांना या प्राचीन संस्कृतीची माहिती सहजपणे मिळू शकेल. येथे कलाकुसर केलेली भाजक्या मातीच्या अनेक भांडी व त्यांचे फुटलेले अवशेष प्रदर्शित केले आहेत, जे तत्कालीन मृद्भांडी कलेचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाचे आहेत. याशिवाय, मातीच्या विविध मानवी व प्राणी आकृत्या, मातीचे मुखवटे व मनोरंजक खेळणी देखील येथे पाहायला मिळतात. लहान-मोठी विविध प्रकारची मानवाच्या दैनंदिन उपयोगाची भांडी, अगदी लहान मडक्यांपासून ते धान्य साठवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मोठ्या रांजणांपर्यंतच्या वस्तू या दालनात आहेत. विशेष म्हणजे, त्या काळातील बैलगाडीचे खेळणेआजही आकर्षणाचे केंद्र आहे. या प्राचीन संस्कृतीतील स्त्री व पुरुषांचे वैशिष्ट्यपूर्ण अलंकारही येथे जतन करून ठेवले आहेत. हे अलंकार तांबे, कांस्य, शिंपले, हस्तिदंत व माती यांसारख्या विविध प्रकारच्या मण्यांपासून बनवलेले आहेत. या अलंकारांमध्ये सोने-चांदी तसेच कार्नेलियन, आगेट व जास्पर यांसारख्या मौल्यवान खनिजांचा वापरही केलेला आढळतो. येथे सापडलेले मणी गोल, चपटे, निमुळते व दंडगोलाकार अशा विविध आकर्षक आकारात आहेत. भाजक्या मातीपासून बनवलेल्या विविध प्राण्यांच्या सुंदर आकृत्या हे या दालनाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. यात बैल, म्हैस, मेंढा, टोकदार शिंगाचे हरिण, गेंडा, कुत्रा, मांजर, कासव, सुसर व विविध पक्षांच्या आकाराची खेळणी यांचा समावेश आहे. याशिवाय, चक्रव्यूहासारख्या मनोरंजक रचनाही मातीत बनवून भाजलेल्या अवस्थेत येथे पाहायला मिळतात. थोडक्यात, प्रागैतिहास व पूर्व इतिहास दालन हे सिंधू संस्कृती व त्यापूर्वीच्या मानवी जीवनाचा अभ्यास करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व माहितीपूर्ण ठिकाण आहे.

**४) प्रकृती विज्ञान दालन :**

प्रकृती विज्ञान दालन हे केवळ भारतातच नव्हे, तर जगभरात कमी होत चाललेल्या जंगलसंपत्ती व प्राणी-पक्ष्यांच्या विविध प्रजातीं विषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने तयार केले आहे. या दालनात विविध प्राणी व पक्ष्यांचे काळजीपूर्वक जतन केलेले नमुने प्रदर्शित केले आहेत. यातसस्तन प्राणी, विविध प्रकारचे पक्षी, सरपटणारे प्राणी व उभयचर प्राणीयांचा समावेश आहे, जे नैसर्गिक जगाच्या विविधतेची कल्पना देतात. या दालनात काही दुर्मिळ व वैशिष्ट्यपूर्ण प्राणी विशेषत्वाने प्रदर्शित केले आहेत, जे आज अस्तित्वासाठी संघर्ष करत आहेत. यात गिधाड कुळातील दुर्मिळ'जटायु गिधाड', सुंदर इंगूल, राजेशाही पांढरा वाघ, भारतातील मोठ्या आकाराचा माळढोक पक्षी व धनेश पक्षाच्या कुळातील आकर्षक महाधनेश यांसारख्या प्राण्यांचा समावेश आहे. या प्राण्यांचे प्रदर्शन त्यांच्या नैसर्गिक अधिवासाची व त्यांच्या संवर्धनाची गरज अधोरेखित करते.

**५) लघुचित्र दालन :**

मुख्य इमारतीच्या पहिल्या मजल्यावर लघुचित्र दालन आहे, ते भारतातील लघुचित्रकलेच्या समृद्ध व प्राचीन परंपरेचा परिचय करून देते. भारतात लघु चित्रकलेची सुरुवात प्राचीन धार्मिक ग्रंथांच्या चित्रणातून झाली. त्या काळात धार्मिक ग्रंथ ताडाच्या पानांवर लिहिले जात असत. या पानांचा आकार साधारणपणे १२

इंच लांब व तीन इंच रुंद असे. त्यामुळे या मर्यादित जागेतच चित्रे रेखाटली जात व याच चित्रांना लघुचित्रे म्हटले जाते. ही चित्रे त्या काळातील धर्म, संस्कृती व समाज यावर महत्त्वपूर्ण प्रकाश टाकतात. तत्कालीन लोकांचे पोशाख, पागोट्यांचे प्रकार, विविध अलंकार व सामाजिक चालीरीती या चित्रांमधून स्पष्टपणे दिसून येतात. या दालनात प्रदर्शित केलेली चित्रे १४ व्या शतकापासून ते १९ व्या शतकापर्यंतच्या सुमारे ६०० वर्षांच्या कालावधीतील आहेत. ही चित्रे भारतातील विविध प्रांतांतील धर्म, संस्कृती, सामाजिक व राजकीय स्थितीवर प्रकाश टाकतात. या संग्रहात अनेक महत्त्वपूर्ण चित्रांचा समावेश आहे, जसे की–

**महावीरांचे केशलोचनचे चित्र (१४ वे शतक) :** जैन धर्मातील तीर्थंकर महावीर यांच्या जीवनातील एक प्रसंग.

**महावीर आपला दैवी पोशाख ब्राह्मणाला भेट देत असलेले चित्र (१४ वे शतक) :** महावीरांच्या दानशूर वृत्तीची कल्पना देते.

**राधेच्या मनस्थितीचे वर्णन करणारी सखी (१६ वे शतक) :** राधा व कृष्ण यांच्या प्रेमळ कथांवर आधारित.

**गीतगोविंद (१२ वे शतक) :** कवी जयदेवांनी रचलेल्या या संस्कृत ग्रंथातील राधा–कृष्ण यांच्या विविध भावावस्थांवर आधारित लघुचित्रे.

**विरहामुळे राधेच्या मन:स्थितीचे वर्णन करणारी सखी :** राधेच्या विरह वेदनेचे प्रभावी चित्रण.

**सखीसह बागेत वार्तालाप करणारी चंदा :** एका शांत व सुंदर दृश्याचे चित्रण.

**माळी व अस्वलाचा संवाद :** निसर्गातील व मानवी जीवनातील परस्पर संबंधांवर आधारित.

**अजमेरच्या दर्गात खैरात वाटताना जहांगीर बादशहा :** मुघल बादशाह जहांगीरची धार्मिक सहिष्णुता दर्शवणारे ऐतिहासिक चित्र.

**काळवीट व हरिणी या जोडीचे चित्र :** निसर्गातील सौंदर्य व शांतता दर्शवते.

**राम परशुराम भेटीचे चित्र :** रामायण कथेतील एक महत्त्वपूर्ण प्रसंग.

**वणवा कळंकृत करताना कृष्ण, त्याच्यासोबत गाई व गोपिका :** कृष्णाच्या बाललीला व निसर्गावरील त्याच्या प्रभुत्वाची कथा सांगते.

**गो धुली चित्र :** सायंकाळच्या वेळी गाईंच्या धुळीने माखलेल्या वातावरणाचे सुंदर चित्रण.

**घाणेरावचे राजे पद्मसिंह व त्यांचा दरबार :** राजेशाही वैभव व दरबारी जीवनाची झलक.

**वियोग घटिका चित्र :** विरहाच्या तीव्र भावनांचे चित्रण.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र :** मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे महत्त्वपूर्ण चित्र.

**नाथपंथी योगी गोरक्षनाथ व नागांना व योग्यांना वंदन करणारी स्त्री :** धार्मिक व सामाजिक जीवनातील श्रद्धा दर्शवते.

**हुक्का ओढणारा राजा :** तत्कालीन राजेशाही जीवनातील एक दृश्य.

**राधा कृष्ण भेट :** राधा व कृष्ण यांच्या भेटीचे सुंदर व प्रेमळ चित्र.

लघुचित्र दालनातील ही चित्रे केवळ कलाकृती नाहीत, तर त्या-त्या काळातील सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचे महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहेत.

**६) शोभिवंत कलावस्तू दालन :**

मुख्य इमारतीच्या पहिल्या मजल्यावर शोभिवंत कलावस्तू दालन आहे. कलाप्रेमीच्या सौंदर्यदृष्टी व कलात्मक कौशल्याचा उत्कृष्ट नमुना आहे. या दालनात हस्तिदंत, लाकूड, धातू व दगड यांसारख्या विविध माध्यमांचा वापर करून बनवलेल्या अनेक आकर्षक व शोभिवंत कलावस्तूंचा संग्रह आहे. यासोबतच, त्या काळातील लोकांच्या रोजच्या वापरात येणाऱ्या परंतु कलात्मकता जपणारे वस्तू देखील येथे प्रदर्शित केल्या आहेत. या दालनातील काही उल्लेखनीय वस्तू खालीलप्रमाणे आहेत-

**सुंदर नक्षीकाम केलेली हस्तिदंती दागिन्यांची पेटी :** हस्तिदंतावर केलेले बारीक व आकर्षक नक्षीकाम तत्कालीन कारागिरांच्या कौशल्याची साक्ष देते.

**खास व वैशिष्ट्यपूर्ण अलंकाराचे नमुने :** विविध धातू व रत्नांचा वापर करून बनवलेले हे अलंकार त्या काळातील फॅशन व सौंदर्यदृष्टी दर्शवतात. सुदर नक्षीकाम केलेला लाकडी दरवाजा, लाकडावर केलेले क्लिष्ट नक्षीकाम भारतीय वास्तुकलेतील कलात्मकतेचा उत्कृष्ट नमुना आहे.

**सुगंधी चंदनाच्या लाकडातून बनवलेल्या विविध कलात्मक वस्तू :** चंदनाच्या लाकडाच्या सुगंधासोबतच त्यावर केलेले सुंदर कोरीव काम मन मोहून घेते. अलंकार ठेवण्यासाठी बनवलेली जाळीदार नक्षीकाम केलेली दागिन्याची पेटी. ही पेटी केवळ उपयुक्त नाही, तर तिची कलात्मकता देखील लक्ष वेधून घेते.

**लाकडी वाडगा :** साध्या वाटणाऱ्या या वस्तूवर केलेले नक्षीकाम त्यातील सौंदर्य वाढवते.

**भिरुमल नायकाची प्रतिमा :** ही प्रतिमा ऐतिहासिक व्यक्तीचे चित्रण करते व त्या काळातील शिल्पकलेचा नमुना आहे.

**दुर्मिळ व मौल्यवान वाडगा :** हा वाडगा त्याच्या दुर्मिळतेमुळे व कलात्मकतेमुळे महत्त्वाचा आहे.

**भारतातील स्त्री-पुरुष वापरत असलेले विविध प्रकारचे दागिने :** यात दैवतांचे दागिने व सौभाग्य अलंकार (उदा. जोडवे) यांचा समावेश आहे, जे तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक परंपरा दर्शवतात. एकंदरीत, हे दालन भारतीय लोकांच्या कलात्मक अभिरुची व रोजच्या जीवनातील वस्तूंनाही सौंदर्यपूर्ण बनवण्याच्या दृष्टिकोन दर्शवते.

**७) नेपाळ–तिबेट दालन :**

मुख्य इमारतीच्या पहिल्या मजल्यावर नेपाळ–तिबेट दालन आहे, ते बौद्ध धर्माच्या वज्रयान पंथातील गूढ व तांत्रिक पैलूंचे दर्शन घडवते. तिबेट हा अतिउंचावरील, जगाशी फारसा संबंध नसलेला एक रहस्यमय देश आहे. त्यांची संस्कृती हिमालयाच्या निसर्गाशी घट्टपणे जोडलेली आहे. सातव्या शतकात राजा साँग साँन ग्याम्पो यांच्या काळात येथे बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार झाला. या दालनात अनेक तिबेटी बौद्ध देवतांच्या विविध प्रतिमा पाहायला मिळतात. यात ध्यानस्थ बुद्ध, अवलोकितेश्वर (करुणेचे प्रतीक), तारा (स्त्री बुद्ध), विविध संरक्षक देवता, महासिद्ध व लामा (बौद्ध धर्मगुरु) यांच्या मूर्तींचा समावेश आहे. या मूर्ती तिबेटी कला व धार्मिक श्रद्धेची कल्पना देतात. नेपाळमध्ये हिंदू व बौद्ध धर्मीय लोक एकत्र राहतात व याचा प्रभाव येथील कला व संस्कृतीवर दिसून येतो. या दालनात नेपाळी धातू शिल्पे, मंडल चित्रे (ब्रह्मांड व देवत्व दर्शवणारी वर्तुळाकार चित्रे), विविध धार्मिक वस्तू व पटचित्रे (कपड्यावर चित्रे) यांचा समावेश आहे. येथे राजा साँग संन ग्याम्पो यांचे शिल्प आहे, ज्यांनी तिबेटमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार केला. कापडावर रेखाटलेली लक्षचैत्यांची चित्रे (अनेक स्तूपांचे चित्रण) हे तिबेटी कलेचे वैशिष्ट्य आहे. या दालनात बुद्धांचे कास्य धातूतील ध्यानस्थ शिल्प व सोन्याचा मुलामा दिलेले प्रसिद्ध कास्य शिल्प 'मैत्रेय' (भावी बुद्ध) हे विशेष आकर्षण आहेत. हे दालन हिमालयीन प्रदेशातील कला, धर्म व संस्कृतीचा अनुभव देते.

**८) कार्ल व मेहेरबाई खंडालावाला दालन :**

कार्ल खंडालावाला हे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष होते. ते एक उत्तम कलापारखी, लेखक व कला संशोधक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या व्यक्तिगत संग्रहातील अनेक चित्रे, कलाकृती, लघुचित्रे, काष्ठचित्रे व मृण्मूर्ती त्यांनी या संग्रहालयास भेट म्हणून दिल्या. त्यांच्या कलाप्रेमळ योगदानाला आदरांजली म्हणून या दालनाला त्यांचे व त्यांच्या पत्नी मेहेरबाई खंडालावाला यांचे नाव देण्यात आले आहे. या दालनात अनेक दुर्मिळ व महत्त्वपूर्ण कला वस्तूंचा समावेश आहे. यात ध्यानस्थ उभे असलेल्या संकटमोचन श्री हनुमानाचे अप्रतिम कास्य शिल्प आहे, जे भक्ती व कला यांचा सुंदर संगम दर्शवते. तसेच, राणी तोडा यांचे सुंदर लघुचित्र, राधेची प्रतीक्षा करणाऱ्या कृष्णाचे भावपूर्ण चित्र, नगरशेट येथील राहूटीतील राजा बलवंत सिंहाचे चित्र व करुणेची देवता तारा यांचे तांब्याचे पण सोन्याचा मुलामा दिलेले शिल्प या दालनातील प्रमुख आकर्षण आहेत. हे दालन खंडालावाला दांपत्याच्या कलासंग्रहाची व त्यांच्या योगदानाची आठवण करून देते.

**९) नाणे दालन :**

विस्तारित इमारतीच्या पहिल्या मजल्यावर नाणे दालन आहे, ते इ.स.पू. ७ व्या शतकापासून ते आजपर्यंतच्या नाण्यांचा एक विस्तृत व महत्त्वपूर्ण संग्रह आहे. या संग्रहालयास भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून मिळालेल्या भेटी व खरेदी केलेल्या नाण्यांचा समावेश आहे. या नाणे दालनात प्रवेश करताच संपत्ती व समृद्धीची देवता गजलक्ष्मीचे चित्र आपले लक्ष वेधून घेते. दालनात जनपद व १६ महाजनपदकालीन (प्राचीन भारतातील राज्ये) पंचमार्क नाणी (ठप्पा मारलेली नाणी) प्रदर्शित केली आहेत, जी भारतातील नाण्यांच्या इतिहासातील प्रारंभिक टप्पा दर्शवतात. यानंतर मगध साम्राज्याची नाणी, मौर्यकालीन नाणी व

इ.स.पू. चौथ्या शतकात सिकंदरच्या भारतावरील स्वारीनंतरची इंडो-ग्रीक व इंडो-बॅक्ट्रियन नाणी येथे पाहायला मिळतात, जी भारतीय व ग्रीक संस्कृतीच्या संयोगाची साक्ष देतात. सन चौथ्या शतकातील गुप्त काळातील चंद्रगुप्त दुसरा याची सुवर्ण नाणी त्या काळातील समृद्धी व कलात्मकता दर्शवतात. मुघलकालीन बादशाहंच्या काळातील नाणी, विशेषतः जहांगीर बादशहाची नाणी, त्यांच्या कलात्मकतेसाठी प्रसिद्ध आहेत. मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केलेली 'शिवराई' व 'सोन्याचा होन' ही नाणी मराठा साम्राज्याच्या इतिहासातील महत्त्वाचा भाग आहेत. पुढे भारतातील अनेक राजे व संस्थानांच्या अधिपतींची नाणी व शेरशाह सुरीने सुरू केलेल्या 'रुपया' या नाण्याचा प्रवास कसा झाला हे दर्शवणारे एक सुंदर व विशेष रुपयांचे प्रदर्शन या दालनात आहे. हे दालन भारतीय नाण्यांच्या इतिहासाचा व त्यासोबत जोडलेल्या सामाजिक, आर्थिक व राजकीय बदलांचा अभ्यास करण्यासाठी एक उत्कृष्ट स्रोत आहे.

**१०) अतिपूर्वेकडील वस्तूंचे कलादालन :**

दुसऱ्या मजल्यावर अतिपूर्वेकडील वस्तूंचे कलादालन आहे, त्यात चीन व जपानमधील हजारो कलाकृतींचा मौल्यवान संग्रह आहे. या सर्व वस्तू रतन टाटा व दोराब टाटा यांनी या संग्रहालयास उदारपणे भेट म्हणून दिल्या आहेत. या दालनात पोर्सलेन (चिनी मातीची भांडी), सिरॅमिक (पक्की मातीची भांडी), लाकरवेअर (लाखकाम), क्रिस्टल (स्म टिक), लाकडी व धातू यांसारख्या विविध माध्यमांपासून बनवलेल्या दुर्मिळ जपानी वस्तूंचा समावेश आहे. यात अमरत्वाची देवता डाँगफान्ग शुओची मूर्ती, अत्यंत दुर्मिळ असे मोर व लांडोर यांची नक्षी असलेले खुजा (सुरईसारखे भांडे), सुंदर टेबल स्क्रीन, धूप जाळण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या भांड्याच्या आकारातील लाख व धातूपासून बनवलेली कला वस्तूव तपकिरीच्या विविध आकारांच्या व रंगांच्या आकर्षक बाटल्या या दालनातील प्रमुख आकर्षण आहेत. हे दालन चीन व जपानच्या समृद्ध कला व संस्कृतीची झलक दाखवते.

**११) युरोपियन चित्रांचे दालन :**

दुसऱ्या मजल्यावर युरोपियन चित्रांचे दालन आहे, यातील सर्व चित्रे टाटा बंधूंनी या संग्रहालयास भेट म्हणून दिली आहेत. या दालनात बोहेमियातील जिप्सी लोकांचे चित्रण करणारे 'बोहिम्यान जिप्सीज', 'ॲडोरेशन', 'दि ॲडोरेशन ऑफ दि मेजाई' व 'फिडिंग डी पॅरोट' यांसारखी अप्रतिम चित्रे प्रदर्शनासाठी ठेवलेली आहेत. या दालनात इटालियन, फ्लेमिश, डच व ब्रिटिश यांसारख्या प्रसिद्ध युरोपीय चित्रकला शैल्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जागतिक चित्रकारांच्या कलाकृतींचा समावेश आहे. यासोबतच, भारतीय आदिवासी पिस्तनजी बोमनजी व मकबूल फिदा हुसेन यांसारख्या बॉम्बे स्कूलच्या महत्त्वपूर्ण चित्रकारांची चित्रे देखील येथे पाहायला मिळतात, जी भारतीय व पाश्चात्त्य चित्रकला शैल्यांचा समन्वय दर्शवतात. या दालनातील आणखी एक महत्त्वाचे आकर्षण म्हणजे जमशेदजी.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ :**

**बहूपर्यायी प्रश्न :**

१) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाची मूळ ओळख काय होती?

अ) व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम ब) प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम

क) मुंबई शहर संग्रहालय ड) ऐतिहासिक कला संग्रहालय

२) ब्रिटनच्या प्रिन्स ऑफ वेल्स (नंतरचे राजा जॉर्ज पंचम) यांच्या हस्ते या संग्रहालयाची पायाभरणी कधी झाली?

अ) ११ नोव्हेंबर १९०१ ब) ११ नोव्हेंबर १९०५

क) १० जानेवारी १९२२ ड) १५ ऑगस्ट १९४७

३) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या इमारतीचे वास्तुविशारद कोण होते?

अ) एडविन ल्युटियन्स ब) हर्बर्ट बेकर

क) जॉर्ज विटेट ड) चार्ल्स कोरिया

४) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय कोणत्या स्थापत्य शैलीचा उत्कृष्ट नमुना मानला जातो?

अ) गोथिक शैली ब) इंडो-सारासेनिक शैली

क) डेक्कन शैली ड) मराठा शैली

५) पहिल्या महायुद्धाच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या इमारतीचा उपयोग कशासाठी करण्यात आला?

अ) शाही निवासस्थान ब) लष्करी तळ

क) लष्करी दवाखाना व बालकल्याण केंद्र ड) शासकीय कार्यालय

६) 'प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय'चे नाव बदलून 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय' कधी करण्यात आले?

अ) १९४७ ब) १९६०

क) १९९८ ड) २००२

७) नाना फडणवीस यांच्या चित्रकला संग्रहाचा भाग असलेला लघुचित्रांचा संग्रह छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयास कोणी प्रदान केला?

अ) सर रतनजी टाटा ब) सर दोराब टाटा

क) शेठ पुरुषोत्तम मावजी ड) सर अकबर हैदरी

८) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या तळमजल्यावर कोणते प्रमुख दालन आहे, जे भारतीय कला व संस्कृतीची विविधता दर्शवते?

अ) शिल्पकला दालन ब) प्रागैतिहास व पूर्व इतिहास दालन

क) मार्गदर्शक दालन ड) प्रकृती विज्ञान दालन

९) औरंगाबाद येथे सापडलेली द्वारपालाची भव्य मूर्ती छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या कोणत्या दालनात पाहायला मिळते?

अ) लघुचित्र दालन　　ब) शोभिवंत कला वस्तू दालन

क) शिल्पकला दालन　　ड) शस्त्र दालन

१०) हडप्पा व मोहेंजोदडो येथील उत्खननात सापडलेल्या वस्तूंचा महत्त्वपूर्ण संग्रह छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या कोणत्या दालनात आहे?

अ) नाणी दालन　　ब) अतिपूर्वेकडील वस्तूंचे कलादालन

क) प्रागैतिहास व पूर्व इतिहास दालन　　ड) युरोपियन चित्रांचे दालन

### २.२.३ टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय, कोल्हापूर :

कोल्हापूर वस्तुसंग्रहालय हे शासकीय संग्रहालय आहे. कोल्हापूरमध्ये 'टाऊन हॉल' नावाची इमारत आहे तेथे आहे. ३० जानेवारी १९४६ रोजी याची स्थापना झाली. कोल्हापूर संस्थानांमध्ये असणाऱ्या पुरातत्त्व विभागाने पंचगंगा नदीच्या किनारी असणाऱ्या ब्रह्मपुरी येथे केलेल्या उत्खननात प्राप्त वस्तूंचे जतनकरण्यासाठी संग्रहालय निर्माण केले. सन १९४९ मध्ये सध्याच्या टाऊन हॉलमध्ये हे संग्रहालय हलविण्यात आले. पुढील चार वर्षे या संग्रहालयामध्ये पुरातत्त्व हा एकच विभाग होता. १९५३ मध्ये चित्रकला कृतींचा विभाग सुरू करण्यात आला. कोल्हापूरला कलापूर योग्य ठरेल असे येथे एकापेक्षा एक श्रेष्ठ चित्रकार होऊन गेले, बाबुराव पेंटर, आबालाल रहेमान, माधवराव बागल या चित्रकारांनी कोल्हापूरच्या चित्रविश्वाला कलेच्या क्षेत्रात मोठे स्थान मिळवून दिले आहे. हळूहळू संग्रहालयाची व्याप्ती वाढू लागली नवे विभाग सुरू झाले. सावंतवाडी, कागल इथून शस्त्रास्त्रे आणण्यात आली. त्यांचा एक स्वतंत्र विभाग करण्यात आला. सावंतवाडीहून लाकडी पुतळे, भरजरी पंखे, मातीची शोभिवंत भांडी, जुनी वस्त्रे, चंदनी मूर्ती आणल्या. सन १९५५ पासून या संग्रहालयास पुरातत्व संग्रहालय असे स्वरूप न राहता सर्वसाधारण संग्रहालयाचे स्वरूप आले. सन १९६८ मध्ये येथे चित्रकलाकृती विभाग सुरु केला.

कोल्हापूर हे पश्चिम महाराष्ट्रातील एक ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, व्यापारी व औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर आहे. दोन हजार वर्षांची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या या शहराची ब्रह्मपुरी ही आजची वसाहत मानली जाते. इ.स. १९४५-४६ मध्ये पुण्यातील 'डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिट्यूट' या संस्थेमार्म त ब्रह्मपुरी येथे उत्खनन करण्यात आले. या उत्खननामध्ये अनेक दुर्मिळ पुरातत्वीय अवशेष प्राप्त झाले. उपलब्ध पुरातत्वीय अवशेषांचे जतन व संवर्धन करून कोल्हापूरचा प्राचीन वारसा जिवंत ठेवावा या उद्देशाने इ.स. १९४६ मध्ये कोल्हापूर वस्तूसंग्रहाची स्थापना करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणामध्ये कोल्हापूर वस्तुसंग्रहालयात प्रदर्शित केलेल्या पुरातत्वीय वस्तू, दगडी शिल्पकृती, पंचधातूच्या शिल्पकृती, संकीर्ण कलाकृती व चित्रकलाकृती यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाची स्थापना व विकास :**

इ.स. १९४५-४६ मध्ये ब्रह्मपुरी येथे झालेल्या उत्खननात रोमन (इ.स.पू. ७५३ इ.स. ४७६), सातवाहन (इ.स.पू. २०० इ.स. २००), शिलाहार (इ.स.पू. ९७५-१२१०) व बहामनी (१३४७-१५५९) काळातील मातीची भांडी, खापरे, पंचधातूच्या वस्तू, दगडाच्या वस्तू, मातीच्या वस्तू, बांगड्यांचे तुकडे, मणी, धातूच्या वस्तू व नाणी इत्यादी अनेकविध वस्तू प्राप्त झाल्या. ब्रह्मपुरीमध्ये मिळालेल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक अवशेषांचे जतन व संवर्धन व्हावे व त्याद्वारे कोल्हापूरचा वारसा जिवंत राहावा या उद्देशाने कोल्हापूर संस्थानाच्या पुरातत्व खात्यामार्फत संग्रहालय स्थापन करण्याचे प्रयत्न चालू होते. संग्रहालयासाठी स्वतंत्र इमारतीची आवश्यकता होती. तथापि, स्वतंत्र इमारतीची सोय न झाल्याने हे संग्रहालय शुक्रवार पेठेतील जैन स्वामी मठात सुरू करण्यात आले. रावबहादूर के. एम. दीक्षित (भारतीय वस्तुसंग्रहालय संघटनेचे तत्कालीन अध्यक्ष) यांच्या हस्ते ३० जानेवारी, १९४६ रोजी याचे उद्घाटन झाले. हे संग्रहालय स्थापन झाले त्यावेळी कोल्हापूर संस्थानाच्या पुरातत्व खात्याचे प्रा. के. जी. कुंदनगार व श्री. बी. जी. प्रधान हे कामकाज पाहत होते.

कोल्हापूर वस्तुसंग्रहालय स्थापन झाल्यानंतर संस्थानच्या पुरातत्व खात्याने कोल्हापूर व परिसरातील पूर्वीपासून संकलित केलेल्या दगडी शिल्पकृती संग्रहालयास दिल्या. त्यामुळे संग्रहालयास जागेची गरज निर्माण झाली. परिणामी हे संग्रहालय राजारामपुरीतील संकपाल बिल्डिंग मध्ये हलवण्यात आले. मात्र नंतरच्या काळातदेखील संग्रहालयाकडे वस्तूंचा ओघ सुरूच राहिल्याने अनेक नवीन वस्तूंची भर पडत गेली. त्यामुळे या वस्तूंची पद्धतशीर व स्वतंत्रपणे मांडणी करण्याची आवश्यकता होती व संग्रहालयास स्वतःची व स्वतंत्र इमारतीची गरज असल्याने हे संग्रहालय इ.स. १९४९ मध्ये कोल्हापूर नगर मंदिर (टाऊन हॉल) या ठिकाणी कायमस्वरूपी स्थानांतरित करण्यात आले. आजतागायत हे संग्रहालय याच ठिकाणी असून 'टाऊन हॉल म्युझियमम म्हणून याची जनमाणसात ओळख आहे. भारताला स्वातंत्र्य (१९४७) मिळाल्यानंतर भारतातील संस्थानांचे विलिनीकरण झाले, यामध्ये कोल्हापूर संस्थानाचा देखील समावेश होता. त्यामुळे संस्थानाचे पुरातत्व खाते बंद झाल्याने हे संग्रहालय मुंबई सरकारच्या (Bombay Govt.) पुराभिलेखागार विभागाच्या अधिकाराखाली गेले.

इ.स. १९५० ते १९५३ या काळात संग्रहालयासाठी दगडी शिल्पकृती, वीरगळ, भारतातील वेगवेगळ्या संस्थानांची नाणी, सरकारी संस्थात तयार झालेल्या औद्योगिक वस्तू इत्यादी वस्तू संपादित करण्यात आल्या. कारण संग्रहालय स्थापनेपासून ते १९५३ पर्यंत संग्रहालयात पुरातत्वीय वस्तूंचा एकच विभाग होता. संग्रहालयाची व्याप्ती व स्वरूप वाढविण्यासाठी इ.स. १९५३ मध्ये कोल्हापूरमधील स्थानिक चित्रकारांच्या सहकार्याने एक चित्रकलाकृती विभाग सुरू करण्यात आला. मुंबईमधील पुराभिलेख व ऐतिहासिक स्मारके या विभागाच्या संचालकांनी केलेल्या सूचनेवरून सावंतवाडी व कागल येथून शस्त्रास्त्रे जमा करून त्याचा एक स्वतंत्र विभाग स्थापन केला. नंतरच्या काळात सावंतवाडीहून भांडी, जुनी वस्त्रे, चंदनी व हस्तीदंती वस्तू व कोरीवकाम, भरतकाम, जरीकाम केलेल्या वस्तू मिळवून त्यांचाही एक संकीर्ण विभाग सुरू केला व फेब्रुवारी, १९६८ मध्ये चित्रकलाकृती विभागाचे आधुनिकीकरण करण्यात आले. इ.स. १९७२ मध्ये महाराष्ट्र शासनाने पुराभिलेखागार विभागाची पुनर्रचना करून पुरातत्व व संग्रहालये हा नवीन विभाग स्वतंत्र संचालकांच्या अधिकाराखाली कार्यरत केल्याने सध्या हे संग्रहालय त्यांच्या अधिकाराखाली कार्यरत आहे. इ.स. २००९ मध्ये या वास्तूचा पुरातत्त्व

व वस्तुसंग्रहालये या विभागाच्या नियंत्रणाखाली विकास करण्यात आला. सध्या कोल्हापूर वस्तुसंग्रहालयात सात स्वतंत्र दालन आहेत. यामध्ये, पुरातत्व दालन, दगडी शिल्पकृती दालन, शस्त्रास्त्र दालन, व्यक्तिचित्र दालन, संकीर्ण चित्रकलाकृती दालन, ब्रॉन्झ दालन, संकीर्ण कलाकृती दालन इत्यादी दलनांचा समावेश आहे.

**कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाची वास्तू :**

कोल्हापूर शहराच्या मध्यवर्ती भागात असलेली ही सुंदर वास्तू इ.स. १८७२ ते १८७६ या काळात बांधण्यात आली. त्यासाठी ८०,०००/- रुपये खर्च आला. या वास्तूची रचना मेजरमंट (Royal Engineer Architect Govt. of Bombay Presidency) या ब्रिटिश वास्तुरचनाकाराने केलेली आहे. टाऊन हॉलची रचना 'गॉथिक' शैलीतील असून त्या काळातील सुंदर वास्तू म्हणून ओळखली जाते. या वास्तूच्या बांधकामासाठी सुरत, पुणे, मुंबई, रत्नागिरी या ठिकाणाहून गुजराथी, कच्छी, कोकणी इत्यादी नक्षी व सुरेख काम करणारे सुतार, मेस्त्री, नमुने तयार करणारे, पोरबंदरच्या दगडाचे नक्षीकाम करणारे कारागीर व कसबी लोक आणले होते. हे बांधकाम रा. रा. सामंत व रामचंद्र बळवंत तांबे (तत्कालीन सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी) यांच्या देखरेखीखाली झाले. या बांधकामाबरोबर टाऊन हॉल परिसरात उद्यान असावे अशी अँडरसन (Resident of Kolhapur) यांनी कल्पना मांडली व त्यांनी स्वतः लक्ष देऊन ते उद्यान तयार केले. आज टाऊन हॉलचे उद्यान कोल्हापुरातील एक वैशिष्ट्यपूर्ण उद्यान म्हणून ओळखले जाते.

टाऊन हॉल या गॉथिक शैलीतील वास्तूचे वैशिष्ट्य म्हणजे दोन उंच निमुळते मनोरे, अतिशय निमुळते छप्पर (टोकाकृती) व आडव्या अर्धगोलाकार कमानीवर वास्तूकाराने जास्त भर दिलेला दिसतो. याच्या दर्शनी भागी आकर्षक द्वार व त्यावर गच्छी असून ती सभागृह व सज्जा यांना जोडलेली आहे. सभागृहाच्या या सज्जात सध्या शस्त्रास्त्र विभाग आहे. द्वाराला लागून दोन उंच मनोरे दोन्ही बाजूस आहेत. मुख्य प्रवेशद्वाराला निमगोल कमानीयुक्त प्रवेशद्वारे आहेत, या निमगोल कमानींनी (स्क्रिच आर्च) दोन स्तंभातील अंतर साधलेले आहे. इमारतीच्या आतील भागासाठी चुन्याचा गिलावा केलेला आहे व छतरचनेसाठी लोखंडी खांब व लाकडाचा वापर केलेला असून कमानीच्या वरील भागात जाळीकाम केलेले आहे. इमारतीच्या बाह्य बाजूस काळ्या पाषाणाचा, लाल कुरदाचा व काही ठिकाणी संगमरवरी दगडाचा वापर केलेला आहे. या वास्तूच्या समोर पाण्याचा कारंजा आहे व त्याच्या समोर छत्रपती शिवाजी महाराजांची अर्धकृती शिल्पाकृती आहे. याचे उद्घाटन कर्नल सी. बी. ब्रेन (Resident of Koolhapur) यांच्या हस्ते १९२७ मध्ये झाले.

**ब्रह्मपुरी उत्खननातील पुरातत्वीय वस्तू :**

ब्रह्मपुरी उत्खननात प्राप्त झालेल्या अनेक पुरातत्वीय वस्तू कोल्हापूर वस्तुसंग्रहालयात प्रदर्शित केलेल्या आहेत. या वस्तूंना कोल्हापूरचे प्राचीनत्व सिद्ध करण्याच्या दृष्टिकोणातून महत्त्व आहे. या वस्तूंचे स्थूल मानाने तीन विभाग पाडले जातात – सातवाहन कालीन वस्तू, उत्तर सातवाहन कालीन वस्तू व शिलाहार–बहामनी कालीन वस्तू.

**१) सातवाहनकालीन कला व संस्कृतीवस्तू दालन :**

ब्रह्मपुरी येथील उत्खननात थर क्रमांक ९ व १० सातवाहनकालीन मानले जातात. या थरांतून विविध

कलात्मक व सांस्कृतिक अवशेष प्राप्त झाले आहेत. यात प्रामुख्याने चकचकीत काळी व तांबडी खापरे, पांढऱ्या शाडूची भांडी, तोटीची भांडी, भांड्यांची झाकणे व विविध आकारांच्या भांड्यांच्या गळ्यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त मणी, बांगड्या व गोलाकार वस्तूंचे अवशेषही मिळाले आहेत, ज्यापैकी काही वस्तू संग्रहालयात मांडल्या आहेत.

प्रदर्शित खापरांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा पातळपणा व चकचकीतपणा. अनेक खापरांवरील ही चमक पूर्णत्वाला पोहोचलेली दिसते. काळी व तांबडी खापरे केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात अनेक ठिकाणी सापडली आहेत. मात्र, त्यांचा पोत ताम्रपाषाणयुगीन खापरांपेक्षा वेगळा आहे. सातवाहनकालीन खापरे जाड असून त्यांच्या निर्मितीतील मिश्रण अशुद्ध आहे. महाराष्ट्रात या काळात प्रामुख्याने चार प्रकारची मातीची भांडी प्रचलित होती: काळ्या व तांबड्या मृदभांड्यांचा संच, जाड्या भरड्या तांबड्या मृदभांड्यांचा प्रकार, उत्तरेकडील काळ्या निळ्या झिलईची भांडी, व उत्कृष्ट तांबड्या झिलईची (रोमन) व रोमन मद्य कुंभाची भांडी.

संग्रहालयात चौथ्या प्रकारातील चकचकीत तांबड्या मातीचे तोटीचे भांडे प्रदर्शित केले आहे. पुरातत्ववेत्त्यांच्या मते, अशा प्रकारची तोटीची भांडी बहुधा रोममधून भारतात आली असावीत व त्यांचा उपयोग मेदिरापात्र म्हणून केला जात असावा. यासोबतच, नेहमीच्या वापरातील मातीची भांडी, जसे की वाट्या, ताट व लोटे इत्यादी देखील प्रदर्शनात आहेत. काही विशेष प्रसंगी रोमन बनावटीच्या पात्रांचा वापर केला जात असावा. यावरून भारत व रोम यांच्यातील व्यापारी संबंध दृढ असल्याचे सिद्ध होते, ज्यामुळे या वस्तू भारतात पोहोचल्या.

कोल्हापूर व रोम यांच्यातील प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष व्यापारी संबंधांचा महत्त्वाचा पुरावा म्हणजे पंचधातूची पोसायडन (समुद्रदेवता) ची शिल्पकृती. ही ग्रीक-रोमन कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. संग्रहालयातील पोसायडनची मूर्ती व ब्रिटिश म्युझियममधील झेनॉथ्युसची मूर्ती यांमध्ये आश्चर्यकारक साम्य आढळते. सदाशिव गोरक्षकार यांच्या मतानुसार, पोसायडनच्या या मूर्तीची प्रेरणा अलेक्झांडरच्या काळातील लायसिप्पसने घडवलेली प्रसिद्ध मूर्ती असावी. अलेक्झांडरच्या नाण्यांवरही पोसायडनचे चित्र आढळते. सध्या संग्रहालयात असलेल्या मूर्तीच्या हातातले त्रिशूळ हरवलेले असले तरी, तिच्या चेहऱ्यावरील भाव अनेक इतर मूर्तींपेक्षा अधिक वास्तववादी व सफाईदार आहेत. मूर्तीच्या आकार व आविर्भावावरून ती हेलेनिस्टिक काळातील मूर्तीइतकी प्रभावी व बलवान दिसत नाही, ज्यामुळे ती त्या तुलनेत अलीकडची असावी. इतिहासानुसार, अलेक्झांडरचा मृतदेह पहिल्या टॉलेमीने अलेक्झांड्रियामध्ये एका सोन्याच्या शवपेटीत ठेवला होता. या ग्रीक वसाहतवाद्यांमध्ये 'सोकोमा' बेटावर (सुखद्वीप) अनेक भारतीय राहत होते. त्यांच्यापैकी एखाद्या व्यापाऱ्याने ग्रीक पुराणातील या देवतेची मूर्ती कोल्हापूरला आणली असावी.

सदाशिव गोरक्षकार यांनी सांगितलेल्या व्यापारी संबंधांच्या आधारावर पोसायडनची मूर्ती कोल्हापुरात कशी आली असावी याचा आणखी एक तर्क असा आहे की, ग्रीक पुराणानुसार पोसायडन हा समुद्राचा देव व स्वामी आहे. तो भयानक व विध्वंसक असून समुद्रात वादळे निर्माण करू शकतो, अशी लोकांची धारणा होती. त्यामुळे लोक त्याची पूजा करत असत. नंतरच्या काळात ही पूजापद्धती सुरू राहिली असावी. भारत व रोम यांच्यात व्यापार सुरू झाल्यावर व्यापारी मुख्यतः समुद्रमार्गाने प्रवास करत असत. अनेक दिवसांच्या समुद्री

प्रवासाचा व वरील कथेचा प्रभाव तसेच पोसायडन आपल्यावर कोप करेल या भीतीमुळे ते त्याची पूजा करत असावेत किंवा त्याची प्रतिमा आपल्याजवळ ठेवत असावेत, जेणेकरून तो त्यांच्यावर प्रकोप करणार नाही. त्यामुळेच ही मूर्ती एखाद्या व्यापाऱ्यामार्म त कोल्हापुरात आली असावी.

याव्यतिरिक्त, सातवाहनकालीन तीन मुख असलेले भांडे, उंच गळ्याचे तोटीचे भांडे, लहान पेला, दोन लहान बशा, दोन करंडे, लहान व मोठे गोलाकार आरसे, दिवे व खेळण्यातील गाडी यांसारख्या वस्तू प्रदर्शित केल्या आहेत. या उत्कृष्ट कलाकृती रोमन शैलीतील असल्याने त्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विविध आकारांची ही भांडी व त्यांची कलाकुसर लक्षणीय आहे. मोठ्या भांड्याच्या कडेला असलेल्या सिंहाच्या आकृतीमधील बारीक काम खास आहे. तसेच, भांड्यांच्या तोंडावरील व्यक्तीच्या आकृतीमधील सौंदर्य व प्रमाणबद्धता प्रशंसनीय आहे. तोटीच्या भांड्याचा उपयोग पाणी शिंपडण्यासाठी, वाढण्यासाठी किंवा मेदिरापात्र म्हणून केला जात असावा. मोठ्या करंडकावर हत्ती, घोडे व पंख असलेल्या आकृत्या कोरलेल्या आढळतात. येथील आरसे गुळगुळीत व चकचकीत आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, रोम व कोल्हापूर यांच्यातील प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष व्यापारामुळे तत्कालीन सांस्कृतिक जीवनात बदल झाला होता व रोमन बनावटीच्या वस्तूंचा तत्कालीन उच्च वर्गात प्रवेश झाला होता. रोमन वस्तूंच्या उपस्थितीमुळे ब्रह्मपुरी सातवाहन काळात एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र असावे, याला दुजोरा मिळतो. कारण भारत व रोम यांच्यातील थेट व्यापाराची ठिकाणे कोकण किनारपट्टीवर असली तरी, कोकण व देशाचा अंतर्गत भाग यांना जोडणारे महत्त्वाचे ठिकाण म्हणून ब्रह्मपुरी (कोल्हापूर) ओळखले जात होते.

ब्रह्मपुरी येथील उत्खननात सातवाहनकालीन थरात उत्कृष्ट भारतीय बनावटीच्या पंचधातूच्या वस्तूही सापडल्या आहेत, ज्या संग्रहालयात प्रदर्शित केल्या आहेत. यामध्ये लहान मुलांच्या खेळण्यातील दोन रथ, सिंहाची लहान मूर्ती, हत्तीस्वाराची मूर्ती व इतर काही लहान खेळण्यांचा समावेश आहे. यातील वैशिष्ट्यपूर्ण व जागतिक स्तरावर दुर्मिळ मानली जाणारी हत्तीस्वाराची मूर्ती भारतीय धातूकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. कारण महाराष्ट्रात सातवाहनकालीन पंचधातूच्या वस्तू फार कमी प्रमाणात मिळतात. मात्र, सातवाहन काळात पंच धातू कलेच्या निर्मिती व पद्धतीमध्ये प्रगती झाली होती, हे यावरून सिद्ध होते.

संग्रहालयातील हत्तीस्वाराच्या मूर्तीमध्ये हत्ती खाली बसलेला असून त्याच्या पाठीवर चार व्यक्ती बसलेल्या आहेत. सर्वात पुढे माहूत आहे, कारण त्याच्या हातात अंकुश दाखवलेला आहे. त्याच्या मागे थोड्या अंतरावर राजा व त्याला बिलगून राणी बसलेली आहे, तर हत्तीच्या पाठीच्या अगदी टोकाला एक सेवक आहे. हत्तीचे गंडस्थळ, सोंड व पुढचे पाय व्यवस्थित जोडलेले आहेत. वर बसलेल्या व्यक्तींमधील राजा व राणीची वेशभूषा सातवाहनकालीन आहे. त्यांच्या वस्त्रांचे रेखाटन, विशेषतः कमरेपर्यंत भरलेली बाह्यकमंडले खास आहेत. हत्तीच्या अवयवांवरून तो नुकताच जमिनीवर उतरतो आहे (बसतो आहे) किंवा उठण्याच्या तयारीत आहे असे वाटते. या मूर्तीचा उद्देश काय असावा याबद्दल सदाशिव गोरक्षकर म्हणतात, ''इ.स. १८७७ मध्ये कोल्हापूरजवळ झालेल्या उत्खननात धातूच्या वस्तूंचा मोठा साठा सापडला, त्यातील बहुतेक बौद्ध वस्तू होत्या व त्यात एक स्तूप व तोरणही सापडले. हत्तीवर स्वार असणारी ही व्यक्ती म्हणजे स्तूपाच्या पूजेसाठी आलेलेल्या राजघराण्यातील लोकांची प्रतिकृती असावी. त्यासोबतच या स्वारांचे बौद्ध स्वरूप व त्यांच्या

आसपास सापडलेल्या इतर वस्तूंवरूनही तर्क काढता येतो. उदाहरणार्थ, चार दिशांना चार मुखे असणारी अंगठी, जिच्या एका बाजूला स्फिंक्सचे चित्र आहे. भरहुत व अमरावती येथे सापडलेल्या बौद्ध स्तूपांवर अशाच प्रकारची मुखे आढळतात.''

या धातू शिल्पातून तत्कालीन लोकांचा पोशाख किंवा पेहराव कसा होता, हे समजण्यास मदत होते. स्त्रियांनी कमरेपर्यंत बांगड्या घातलेल्या आहेत. पायात स्त्री-पुरुष दोघांनी जाड ओळीचे कडे घातले आहे व जाड अनेक पदरी पट्ट्या वापरल्या आहेत. या शिल्पात स्त्रीचे वस्त्र निऱ्या करून नेसलेले दिसत नाही, बहुधा ते लुगडे असावे, कारण आजही ग्रामीण भागातील स्त्रिया लुगडे निऱ्या करून नेसत नाहीत. कानात वर्तुळाकृती कर्णकुंडले घातलेली आहेत. या शिल्पकृतीमधील पुरुष देखणा व सुबक वाटतो. गोरक्षकर यांच्या मतानुसार तो राजघराण्यातील असावा. त्याने कर्णकुंडले घातलेली असून त्याचे अधोवस्त्र पायघोळ व निऱ्या केलेले नाही, बहुधा ते धोतरासारखे वस्त्र असावे, कारण आजही भारतात अनेक पुरुष धोतर निऱ्या न करता नेसतात. माहुताचा पेहराव युद्धातील सैनिकासारखा आहे. डोक्यावर शिरस्त्राण व हातात अंकुश आहे. सर्वात शेवटी बसलेला सेवक साधारण आहे, त्याच्या अंगावर कोणतेही अलंकार दिसत नाहीत. मात्र, हत्तीच्या अंगावरील अलंकार व पाठीवरील झूल स्पष्टपणे दर्शविली आहे. या शिल्पातील व्यक्तींचे कपडे व अवयवांवरून याचा काळ निश्चित करता येतो. तेथील मातीच्या रोमन बनावटीच्या मूर्तींमध्ये आढळणारी केश रचना व या शिल्पातील स्त्रीची केश रचना सारखीच आहे, तिने पाठीवर केस मोकळे सोडलेले आहेत. त्यामुळे या दोन मूर्तींमध्ये विलक्षण साम्य आढळते, यावरून या मूर्तीचा काळ इ.स.पहिले शतक असावा.

संग्रहालयात मानवी आकृत्या, मडक्यांच्या पट्ट्या, नाण्यांचे ठसे, पक्ष्यांच्या प्रतिमा, शाडूतून बनवलेली मानवी मस्तके, मातृदेवता, अर्चकनाकुंडी व दगडी शिवलिंगे इत्यादी वस्तू ब्रह्मपुरी येथे सातवाहन थरात मिळाल्या आहेत. यावरून तत्कालीन धार्मिक स्थितीवर प्रकाश पडतो. मौर्य-सातवाहन काळात महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रसार झाला होता व त्याचा प्रभाव कोल्हापूरवरही होता, हे प्रा. कुंदनगार यांना मिळालेल्या करंडकावरून दिसून येते. मात्र, तत्कालीन समाजात बौद्ध धर्मासोबत इतर धार्मिक श्रद्धांचाही प्रभाव होता. हे सातवाहनकालीन मातृदेवतांच्या प्रतिमांवरून स्पष्ट होते. ब्रह्मपुरी, नेवासे, तेर, कौंडिण्यपूर इत्यादी ठिकाणांच्या उत्खननात विविध प्रकारच्या मातृदेवतांच्या मातीच्या मूर्ती सापडल्या आहेत. तेर, ब्रह्मपुरी व नेवासे येथील मूर्तींमध्ये साम्य आढळते. या बैठ्या स्वरूपात असून त्यांचे स्त्रीदर्शक अवयव ठळकपणे दर्शविले आहेत. अशा प्रकारच्या मातृदेवतांची पूजा तत्कालीन समाजात मोठ्या प्रमाणात प्रचलित असावी. संग्रहालयात असलेली मातृदेवतेची प्रतिमा साडेचार इंच उंचीची असून ती बसलेल्या स्थितीत आहे. या प्रतिमेतील स्त्री वेगळ्या अंदाजात बसलेली असून तिच्या केशभूषेत कमरेचे वैशिष्ट्य आहे. गळ्यात दोन हार व खांद्यावर शालवजा वस्त्र परिधान केलेले दर्शविले आहे. मातृका मूर्तीची उपासना शक्तीदेवता म्हणून फार प्राचीन काळापासून जगातील सर्व सांस्कृतिक समाजांमध्ये प्रचलित होती. इजिप्तमध्ये मातृकादेवीची पूजा 'बोबो' या देवतेच्या रूपात केली जाई. डॉ. ह. धी. सांकलिया यांनी मातृका मूर्तीचा चिकित्सक अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, मानवाने स्त्रीचे महत्त्व व स्वरूप काही हजारो वर्षांपूर्वी जाणले होते. त्यामुळे स्त्रीच्या अशा स्वरूपातील आकृत्या, हाडे, हस्तिदंत, मडकी आदी भिन्न माध्यमात कोरलेल्या युरोपातील पुरातत्त्वीय संशोधनात आढळल्या आहेत. अशा प्रकारच्या या मूर्तींचा प्रसार युरोपातून सायप्रस, क्रीत, तुर्कस्तान, इराण, इराक, अफगाणिस्तान व नंतर भारत या क्रमाने झालेला दिसून

येतो. त्यामुळे भारतीय मूर्तीवर रोम व इजिप्त संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. मात्र, स्टॅला कॅमरीश या अमेरिकन विदुषीने मातृकामूर्तीचा संबंध ऋग्वेदातील अदिती देवतेशी जोडला आहे. मानवाने प्रथम देवत्व स्त्री रूपात कल्पिले, ती सर्जनशक्ती धारण करणारी देवी म्हणून आदिशक्ती (आद्यशक्ती) म्हणून संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, मातृदेवतेची उपासना फार प्राचीन काळापासून रूढ होती. प्रजोत्पादनाचे प्रतीक म्हणून तत्कालीन समाजात या स्त्री प्रतिमांची पूजा होत होती. त्याचप्रमाणे कोल्हापुरात ब्रह्मपुरी येथेही अशा प्रकारची उपासना होत असावी. कारण स्थानिक भाषेत महालक्ष्मीस अंबाबाई म्हणतात व 'अंबा' म्हणजे 'माता'. महानुभाव ग्रंथातून कोल्हापूरचा 'मातापूर' असा उल्लेख आहे. ज्याप्रमाणे मातृदेवतांची पूजा होत होती, त्याचप्रमाणे तत्कालीन समाजात लिंगपूजा देखील प्रचलित असावी, असे दिसते. कारण ब्रह्मपुरी येथील सातवाहन थरात दगडी शिवलिंग सापडलेले आहे. याशिवाय लहान आकाराची अर्चकना कुंडी देखील मिळाली आहे.

**२) सातवाहन काळातील घरांचे अवशेष दालन :**

प्रस्तुत संग्रहालयात ब्रह्मपुरी येथे सातवाहन काळातील घरांचे अवशेष सापडले आहेत. त्यांची छायाचित्रे संग्रहालयात प्रदर्शित केलेली आहेत. यावरून सातवाहन काळात घरे कशा प्रकारची होती याची कल्पना येण्यास मदत होते. डॉ. सांकलिया यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, ही घरे मजबूत पायांवर बांधली जात. गोटे व मातीचे मिश्रण यांचे एकावर एक थर घालून घराचा पाया तयार केला जाई. त्यावर भाजलेल्या विटांच्या भिंती उभारल्या जात. सातवाहन काळात या विटांचा आकार २१ इंच लांब, ११ इंच रुंद व ३इंच जाड होता. पुढे तो १५ x ७ इंच असा झाला. भिंती उभारताना विटांचे जोड एकावर एक येऊ नये याची काळजी घेतली जाई. सामान्यतः मध्यम वर्गाची घरे चार खोल्यांची असत. त्यांचा आकार सामान्यतः १२ फूट x १५ फूट किंवा १२ फूट x १३ फूट असा असे. त्यापैकी एका खोलीचा उपयोग स्वयंपाकघराकरिता केला जाई. उत्खनन केलेल्या एका खोलीत हंडा ठेवण्याकरिता तीन दगड शेजारी शेजारी ठेवून तयार केलेली दोन चूल होती, त्यातील राख खोलीभर पसरू नये म्हणून त्यांच्यापुढे काही अंतरावर खड्डा घातलेला होता. खोलीच्या कोपऱ्यात जमिनीवर बसवलेल्या पाण्याचे मोठे भांडे किंवा धान्याचे मोठे रांजण असे. स्वयंपाकघराची जमीन विटांनी बनवलेली होती. वरचे छप्पर सध्याच्या मंगलोरी कौलांसारखे पन्हळ्यांच्या कौलांनी व बांबूवर पक्की बसवलेली होती हे लक्षणीय विशेष आहे.

**३) उत्तर सातवाहन कालीन वस्तू दालन :**

ब्रह्मपुरी येथील थर क्रमांक ५ व ६ हा उत्तर सातवाहन कालीन आहे. याचा काळ साधारणतः ४ ते ९ शतक मानला जातो. या उत्तर सातवाहन कालीन थरात मातीची भांडी, खापरे, मणी, बांगड्या, निरनिराळ्या आकारांचे पेले, उंच गळ्याचे डबे, कडी असलेली भांडी अशा अनेकविध प्रकारच्या वस्तू मिळाल्या. त्यातील काही वस्तू प्रस्तुत संग्रहालयात प्रदर्शित करण्यात आलेल्या आहेत. उत्तर सातवाहन काळातील जी खापरे प्रदर्शित केलेली आहेत ती वैशिष्ट्यपूर्ण आहेत. यांच्या आकारात व रचनेत विविधता आहे व त्यांच्यावर म णसाच्या साली सारखे कोरीव काम केलेले आहे. हे कोरीव काम बहुधा भांडी ओली असताना करत असावेत व नंतर भाजून त्यात टिकाऊपणा आणत. त्यामुळे त्याचा रंग तांबडा आहे.

**४) शिलाहार–बहामनीकालीन वस्तू दालन :**

थर क्रमांक ३ ते ७ हा शिलाहार व बहामनी काळातील आहे. यामध्ये देखील विविध प्रकारची भांडी, खापरे, शेतीची व दैनंदिन जीवनातील अवजारे, नाणी, बांगड्या सापडलेल्या आहेत. त्यातील काही वस्तू प्रस्तुत संग्रहालयात प्रदर्शित केलेल्या आहेत. शिलाहार व बहामनी काळातील खापरांविषयी डॉ. सांकलिया म्हणतात, ही खापरे इ.स. १००० ते १५०० या काळातील असून ती कुंभार चाकावरच्या साच्याने बनवलेली आहेत व भांड्यांसाठी वापरलेल्या मातीत अभ्रकाचे बारीक कण मिसळलेले आहेत. या प्रकारातील बहुतेक भांडी काळ्या व करड्या रंगाची आहेत. सातवाहन व उत्तर सातवाहन काळातील खापरात दिसून येणारा नाजूकपणा, पातळपणा, अल्हाददायक रंग, कल्पक कोरीव काम इत्यादी वैशिष्ट्ये बहामनी काळातील खापरात दिसत नाही. यामध्ये एक गोष्ट महत्त्वाची वाटते की, सातवाहन काळातील मातीची भांडी चाकावर करत नसूनसुद्धा त्यामध्ये उत्कृष्टपणा होता. मात्र ती शिलाहार किंवा बहामनी काळातील चाकाच्या भांड्यांवर चकचकीत व उत्कृष्ट दिसत नाही. शिलाहार काळात शेती तंत्रात विकास झालेला दिसतो. कारण या काळातील लोखंडी कुळवाचे फाळ, लोखंडी खुर्पे व कोयता इत्यादी लोखंडाच्या वस्तू मिळालेल्या आहेत. याशिवाय बाणांची टोके मिळालेली आहेत. ही बाणांची टोके बहामनी थरातील क्र. ३ व ४ मध्ये मिळालेली आहेत. त्यापैकी फक्त एक उत्तर सातवाहन काळातील ८ व्या थरात मिळालेला आहे. याचा आकार झाडाच्या पानासारखा आहे. अशा प्रकारचे बाण इजिप्त, हंगेरी व स्वीडनमध्ये सापडतात. याचे साम्य हडप्पामध्ये सापडलेल्या बाणांसारखे आहे.

**५) शिल्पाकृती दालन :**

यामध्ये विष्णू, लक्ष्मी नारायण, नरसिंह, श्रीकृष्ण, राम, श्रीगणेश, जैनतीर्थंकर, जैनयक्ष, यक्षणी, विरघळ यांच्या मूर्ती आहेत. विष्णूची मूर्ती काळ्या चकचकी दगडाची आहे. मूर्तीच्या मागील बाजूस कीर्तीमुख आहे. विष्णूच्या हातात शंक, चक्र, पद्मवगदा आहे. विष्णूची मूर्ती केशवपंथी दिसते. मूर्तीच्या मागे जी प्रभावळ दिसते त्यामध्ये दशावतार कोरलेले आहेत. लक्ष्मीनारायण मूर्तीमध्ये नारायण ललित आसनामध्ये बसलेला आहे. त्याच्या डाव्या बाजूस लक्ष्मी आहे. नरसिंहाच्या दोन मूर्ती आहेत. त्यापैकी एक लहान आकाराची आहे. तिच्यावरील कोरीव काम उल्लेखनीय आहे. यामध्ये लक्ष्मी नरसिंह दाखवले आहेत. तज्ज्ञांच्या मते या मूर्ती अकराव्या किंवा बाराव्या शतकातील असाव्यात. श्रीकृष्णाची मूर्ती सतराव्या शतकातील असावी. या मूर्तीमध्ये श्रीकृष्ण वेणू वाजवताना दिसत आहे. पाठीमागे नागाची फणी आहे. कृष्णाच्या पायाजवळ कमळ दाखवले आहे. याशिवाय इतरही मूर्ती आहेत.

**६) शस्त्रास्त्रदालन :**

कोल्हापूर वस्तूसंग्रहालयातील शस्त्रास्त्र विभाग हा ऐतिहासिक युद्धकला व संरक्षण प्रणालीचा एक महत्त्वाचा भाग आहे. या विभागात विविध प्रकारची शस्त्रे व युद्धोपयोगी वस्तूंचे प्रदर्शन केले आहे, जे त्या–त्या काळातल्या युद्धशैली व तंत्रज्ञानाची कल्पना देतात.

**गदा व मुदगल :** हे दोन्ही हत्यारे प्राचीन काळापासून वापरली जात आहेत. गदा म्हणजे लाकडी दांड्याला जड गोल जोडलेला असतो, तर मुदगल हे व्यायामासाठी व लढाईसाठी वापरले जाणारे गदेचे एक रूप आहे.

**कट्यार, खंजीर व सुरी :** हे छोटे पण तीक्ष्ण धार असलेले शस्त्र प्रकार आहेत, जे जवळच्या लढाईत वापरले जात होते. यांची रचना व आकार विविध प्रदेशानुसार बदलत असल्याचे दिसते.

**भाला व शूल :** भाला हे मे कून मारायचे किंवा भोसकायचे शस्त्र आहे, तर शूल हे त्रिशूळासारखे टोक असलेले शस्त्र आहे. हे दोन्ही शस्त्रे प्राचीन युद्धात पायदळासाठी महत्त्वाचे होते.

**बाण व गोफण :** बाण हे धनुष्याच्या साहाय्याने वापरले जाणारे शस्त्र आहे, तर गोफण हे दगड किंवा इतर वस्तू फेकण्यासाठी वापरले जाणारे हत्यार आहे. ही शस्त्रे दूरच्या हल्ल्यांसाठी वापरली जात होती.

**तोफा :** संग्रहालयात विविध प्रकारच्या तोफा आहेत, ज्या मध्ययुगीन व आधुनिक काळात किल्ल्यांच्या संरक्षणासाठी व युद्धांमध्ये वापरल्या जात होत्या.

**तलवार :** संग्रहालयात एकंदर ३९ तलवारी आहेत, ज्या ऐतिहासिकदृष्ट्या खूप महत्त्वाच्या आहेत.

**कमळाच्या पानाप्रमाणे गोलाकार तलवार :** या तलवारीचे पाते कमळाच्या पानासारखे गोलाकार असते, जे तिला एक विशेष सौंदर्य व वेगळी ओळख देते.

**मंडलाग्र तलवार :** या प्रकारात तलवारीच्या पात्याचा आकार विशिष्ट 'मंडल' प्रकारचा असतो.

**असियष्टा :** ही तलवार सरळ पात्याची असून ती भारतीय उपखंडात मोठ्या प्रमाणात वापरली जात होती.

**भाले :** संग्रहालयात विविध प्रकारचे ४ भाले आहेत, जे वेगवेगळ्या युद्धशैलीत वापरले जात होते.

**बंदुका :** विविध प्रकारच्या २६ बंदुका आहेत, ज्या ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या आहेत व त्या-त्या काळातल्या तंत्रज्ञानाची साक्ष देतात.

**ढाल व शिरस्त्राण :** हे संरक्षणात्मक उपकरणे असून यांचा उपयोग सैनिकांना व योद्ध्यांना लढताना वाचवण्यासाठी केला जात होता.

**मशीनगन्स :** हे आधुनिक शस्त्र आहे, जे लवकर व सतत गोळीबार करण्यासाठी वापरले जाते.

**गुप्ती :** हे एक लपवलेले शस्त्र आहे, जे छोट्या वस्तूच्या रूपात दिसत असले तरी, गरज पडल्यास ते लढाईत वापरता येते.

याव्यतिरिक्त, संग्रहालयात अशी अनेक शस्त्रे आहेत जी आजकाल सहसा पाहायला मिळत नाहीत. हा विभाग केवळ शस्त्रांचे प्रदर्शन करत नाही, तर तो आपल्याला त्या काळातील सामाजिक रचना, युद्धनीती व धातूकामातील प्रगतीची माहिती देतो.

**७) चित्रकला दालन :**

या विभागामध्ये बाबुराव पेंटर, आनंदराव मिस्त्री, आबालाल रेहमान, कृष्णराव मिस्त्री, भीमा सुतार, बाबा गजबर, रवींद्र मिस्त्री, जी. आर. मिस्त्री, रा. शी. गोसावी, दत्तोबा दळवी, माधवरावबागल, गणपतराव वडणवीकर,

इत्यादींच्या चित्रकृती आहेत. त्यांची संख्या १३५ आहे. छत्रपती शिवाजी महाराज, पावनगडाचा देखावा, नळावर पाणी भरणारी स्त्री इत्यादी चित्रे अतिशय वास्तववादी आहेत. माधवराव बागलांची ३४ चित्रे या दालनात आहेत.

**बाबुराव पेंटर :** हे प्रसिद्ध चित्रकार व चित्रपट निर्माते होते. त्यांच्या चित्रांमध्ये पौराणिक व ऐतिहासिक विषयांचे प्रभावी चित्रण आढळते.

**माधवराव बागल :** कोल्हापूरच्या चित्रकलेत माधवराव बागल यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या चित्रांमध्ये ग्रामीण जीवन, निसर्ग व सामाजिक विषयांचे वास्तववादी चित्रण असते. या दालनात त्यांची ३४ चित्रे आहेत, जी त्यांच्या विविध कलाशैली व विषयांवरील प्रभुत्वाची साक्ष देतात.

**इतर चित्रकार :** या विभागातील इतर चित्रकारांनीही विविध विषयांवर व शैलींमध्ये चित्रे रेखाटली आहेत. त्यांच्या चित्रांमध्ये ऐतिहासिक घटना, व्यक्ती, निसर्ग, सामाजिक जीवन व पौराणिक कथांचे चित्रण आढळते.

**चित्रांचे विषय व शैली :** या विभागातील चित्रे विविध विषयांवर आधारित आहेत, जसे की, छत्रपती शिवाजी महाराज : छत्रपती शिवाजी महाराजांची अनेक चित्रे या विभागात आहेत, जी त्यांच्या जीवनातील विविध घटना व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रण करतात. पवनगडाचा देखावा –ऐतिहासिक स्थळे व किल्ल्यांचे चित्रण असलेली अनेक चित्रे आहेत.नळावर पाणी भरणारी स्त्री – तत्कालीन सामाजिक जीवनातील दृश्ये दर्शवणारी चित्रे आहेत, जी ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवन व संघर्ष दर्शवतात. या चित्रांमध्ये वास्तववादी शैलीचा वापर करण्यात आला आहे, ज्यामुळे ती अधिक आकर्षक व प्रभावी बनली आहेत. या विभागातील चित्रे आपल्याला तत्कालीन कला, संस्कृती व इतिहासाची माहिती देतात व कलाकारांच्या प्रतिभेची साक्ष देतात.

**८) संकीर्ण कलाकृती विभाग:**

या विभागात मातीची रंगीत भांडी, कोरीव काम केलेली मातीची भांडी, चंदनाच्या मूर्ती आहेत. अशा मूर्तींमध्ये गणेश, कृष्ण, विष्णु, शिवगौरी, महिषासुरमर्दिनी यांच्या मूर्ती आहेत. धातूच्याही काही मूर्ती आहेत.

अशा प्रकारे कोल्हापुरातील 'टाऊन हॉल' हे वस्तूसंग्रहालय महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध संग्रहालय आहे. इतिहासाचे अभ्यासासाठी प्राथमिक साधनांचा खजीनाकच आहे. विशेषतः कोल्हापूरच्या प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहासावर प्रकाश टाकणारी साधने येथे उपलब्ध आहेत.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ :**

**बहूपर्यायी प्रश्न :**

१) कोल्हापूरच्या टाऊन हॉल वस्तुसंग्रहालयाची स्थापना कधी झाली?

अ) ३० जानेवारी १९४५ ब) ३० जानेवारी १९४६

क) १५ ऑगस्ट १९४७ ड) १ मे १९६०

२) कोल्हापूर वस्तुसंग्रहालय स्थापन करण्याचा मूळ उद्देश काय होता?

अ) कोल्हापूरमधील चित्रकला जतन करणे

ब) कोल्हापूर संस्थानातील शस्त्रास्त्रे जतन करणे

क) ब्रह्मपुरी येथील उत्खननात प्राप्त वस्तूंचे जतन करणे

ड) कोल्हापूर शहराचा इतिहास जतन करणे

३) कोल्हापूर वस्तुसंग्रहालय सध्या कोणत्या इमारतीत आहे?

अ) राजारामपुरीतील संकपाल बिल्डिंग    ब) शुक्रवार पेठेतील जैन स्वामी मठ

क) कोल्हापूर नगर मंदिर (टाऊन हॉल)    ड) शासकीय विश्रामगृह

४) कोल्हापूर वस्तुसंग्रहालयात चित्रकला कृतींचा विभाग कोणत्या वर्षी सुरू करण्यात आला?

अ) १९४९    ब) १९५३

क) १९६८    ड) १९७२

५) कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाची वास्तू (टाऊन हॉल) कोणत्या स्थापत्यशैलीत बांधलेली आहे?

अ) इंडो-सारासेनिक    ब) गॉथिक

क) डेक्कन    ड) मराठा

६) कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाच्या टाऊन हॉल इमारतीचे बांधकाम कोणत्या ब्रिटिश वास्तुरचनाकाराने केले?

अ) जॉर्ज विटेट    ब) मेजरमंट

क) एडविन ल्युटियन्स    ड) हर्बर्ट बेकर

७) ब्रह्मपुरी येथील उत्खननात प्रामुख्याने कोणत्या काळातील वस्तू सापडल्या आहेत?

अ) मौर्य व गुप्त    ब) कुषाण व शुंग

क) सातवाहन व रोमन    ड) चालुक्य व राष्ट्रकूट

८) कोल्हापूर वस्तुसंग्रहालयात प्रदर्शित केलेली हत्तीस्वाराची मूर्ती कोणत्या धातूची बनलेली आहे?

अ) सोने    ब) चांदी

क) लोह    ड) पंचधातू

९) कोल्हापूर वस्तूसंग्रहालयातील चित्रकला दालनात प्रामुख्याने कोणत्या स्थानिक चित्रकारांच्या कृती आहेत?

अ) राजा रवी वर्मा    ब) सतीश गुजराल

क) बाबुराव पेंटर व माधवराव बागल    ड) एम. एम . हुसेन

१०) कोल्हापूर वस्तुसंग्रहालयात एकूण किती स्वतंत्र दालने (विभाग) आहेत?

अ) पाच — ब) सहा

क) सात — ड) आठ

## २.३ सारांश :

राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, नवी दिल्ली हे भारतातील सर्वात मोठे आणि महत्त्वाचे संग्रहालय आहे. याची स्थापना १९४९ साली झाली, आणि तेव्हापासून ते देशाच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे एक प्रमुख संरक्षक बनले आहे. या संग्रहालयात प्रागैतिहासिक काळापासून ते आधुनिक युगापर्यंतच्या वस्तूंचा विशाल संग्रह आहे. येथे हडप्पा संस्कृतीतील अवशेष, मौर्य आणि गुप्त काळातील कलाकृती, विविध राजवंशांच्या मूर्ती, लघुचित्रे, शस्त्रे, दागिने, वस्त्रे आणि हस्तकला वस्तूंचा समावेश आहे. विशेषत: बुद्धाच्या अस्थींचे अवशेष आणि हडप्पा संस्कृतीतील मनृत्य करणारी मुलगीम यांसारख्या वस्तू राष्ट्रीय संग्रहालयाच्या वैभवात भर घालतात. हे संग्रहालय केवळ प्रदर्शनासाठीच नव्हे, तर संशोधन, संवर्धन आणि शैक्षणिक कार्यक्रमांसाठीही एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे, जे भारतीय इतिहासाचे आणि कलेचे सखोल ज्ञान प्रदान करते.

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (पूर्वीचे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ऑम वेस्टर्न इंडिया), मुंबई येथे स्थित असून, १९०५ मध्ये याची स्थापना झाली. इंडो-सारासेनिक शैलीतील हे भव्य संग्रहालय मुंबईच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक जडणघडणीचा एक महत्त्वाचा भाग आहे. या संग्रहालयाचा संग्रह अत्यंत वैविध्यपूर्ण असून, त्यात कला, पुरातत्वशास्त्र आणि नैसर्गिक इतिहास या तीन मुख्य विभागांचा समावेश आहे. कला विभागात भारतीय लघुचित्रे, युरोपीय चित्रे आणि पूर्वेकडील कलाकृतींचा मोठा संग्रह आहे. पुरातत्वशास्त्र विभागात हडप्पा, मौर्य, गुप्त आणि इतर भारतीय राजवंशांच्या काळातील मूर्ती आणि वस्तू आहेत. नैसर्गिक इतिहास विभागात भारतीय प्राणी आणि पक्ष्यांचे नमुने, तसेच भूगर्भीय नमुने प्रदर्शित केले आहेत. हे संग्रहालय महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे आणि भारताच्या व्यापक इतिहासाचे दर्शन घडवते. विविध शैक्षणिक कार्यक्रम आणि प्रदर्शनांद्वारे हे संग्रहालय मुंबईकरांना आणि पर्यटकांना ज्ञानाचा आणि सौंदर्याचा अनुभव देते.

टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय, कोल्हापूर हे महाराष्ट्राच्या स्थानिक इतिहासाचे आणि कलेचे एक महत्त्वाचे प्रतीक आहे. कोल्हापूरच्या जुन्या टाऊन हॉल इमारतीत स्थित हे संग्रहालय, कोल्हापूरच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक समृद्धीवर लक्ष केंद्रित करते. या संग्रहालयात कोल्हापूरच्या शाही घराण्याचा इतिहास, मराठा साम्राज्यातील महत्त्वाच्या घटना, स्थानिक कला प्रकार, शस्त्रे, नाणी आणि वस्त्रांचे महत्त्वपूर्ण संग्रह आहेत. विशेषतः कोल्हापूरच्या ऐतिहासिक काळात वापरल्या गेलेल्या वस्तू, स्थानिक हस्तकला आणि पारंपरिक वेशभूषा यांचे प्रदर्शन येथे केले जाते. टाऊन हॉल म्युझियम हे कोल्हापूरच्या स्थानिक संस्कृतीचे आणि परंपरांचे जतन करण्यात आणि त्यांचे प्रदर्शन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. हे संग्रहालय कोल्हापूरच्या समृद्ध भूतकाळाची आणि स्थानिक कलेची ओळख करून देते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना प्रादेशिक संग्रहालयांचे महत्त्व आणि त्यांचे स्थानिक समुदायासाठी असलेले योगदान समजून घेता येते.

या तिन्ही संग्रहालयांचा अभ्यास केल्याने भारताच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैविध्याची कल्पना येते. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय देशाच्या व्यापक इतिहासाला सादर करते, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय महाराष्ट्राच्या आणि भारताच्या कलेला व नैसर्गिक इतिहासाला प्रतिबिंबित करते, तर टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय स्थानिक कोल्हापूरच्या इतिहासाचे आणि संस्कृतीचे प्रतिनिधित्व करते. ही संग्रहालये केवळ भूतकाळातील वस्तूंचे रक्षक नाहीत, तर ती शैक्षणिक केंद्रे, संशोधन संस्था आणि सांस्कृतिक संवादाची ठिकाणे देखील आहेत, जी आपल्या समृद्ध वारशाची जाणीव करून देतात.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**पुराश्मयुग** (Paleolithic Age) **:** मानवी इतिहासातील सर्वात प्राचीन कालखंड, ज्यात मानव दगडांच्या हत्यारांचा वापर करत असे आणि शिकारी व अन्न गोळा करून जीवन जगत असे. हा काळ सुमारे २५ लाख वर्षांपूर्वी सुरू होऊन १०,००० वर्षांपूर्वी संपला.

**नवपाषाणयुग** (Neolithic Age) **:** सुमारे १०,००० वर्षांपूर्वी सुरू झालेला आणि मानवी इतिहासात शेती, पशुपालन आणि स्थिर वस्त्यांचा विकास झालेला कालखंड. या काळात दगडांची हत्यारे अधिक विकसित झाली. (या शब्दाची पुनरावृत्ती झाली आहे, कृपया लक्षात घ्या.)

**ताम्रयुग** (Chalcolithic Age) **:** हा काळ नवपाषाणयुगानंतर येतो, ज्यात मानवाने दगडांच्या हत्यारांसोबत तांब्याचा वापर करण्यास सुरुवात केली. यामुळे शेती आणि वस्त्यांच्या विकासाला गती मिळाली.

**मध्यपुराश्मयुग** (Mesolithic Age) **:** पुराश्मयुग आणि नवपाषाणयुग यांच्या दरम्यानचा संक्रमणकाळ. या काळात मानवाने लहान आणि अधिक सुबक दगडांची हत्यारे वापरण्यास सुरुवात केली, तसेच शिकार आणि मासेमारीच्या तंत्रात सुधारणा झाली.

स्टुकोमध्ये कोरलेल्या मूर्ती (Stucco Carved Sculptures) : स्टुको हे प्लास्टर, चुनखडी, वाळू आणि पाणी यांच्या मिश्रणातून बनवलेले एक प्रकारचे बांधकाम साहित्य आहे. या मिश्रणाचा वापर करून भिंती किंवा इतर पृष्ठभागांवर कोरलेल्या किंवा तयार केलेल्या मूर्तींना मस्टुकोमध्ये कोरलेल्या मूर्तीम म्हणतात.

**गंजीटा :** भारतामध्ये मुघल काळापासून प्रचलित असलेला एक पारंपरिक पत्त्यांचा खेळ आणि त्याचे विशिष्ट वर्तुळाकार पत्ते. हे पत्ते सहसा हाताने रंगवलेले असतात आणि त्यावर पौराणिक किंवा ऐतिहासिक चित्रे असतात.

**दख्खनी चित्रे** (Deccani Paintings) **:** दख्खनच्या सल्तनतींच्या आश्रयाखाली विकसित झालेली चित्रकला शैली. यामध्ये पर्शियन, विजापूर आणि स्थानिक भारतीय शैलींचा मिलाम दिसतो.

**माळवा शैली** (Malwa Style) **:** मध्य भारतातील माळवा प्रदेशात विकसित झालेली चित्रकला शैली, जी तिच्या साध्या आणि स्पष्ट रेषा, तेजस्वी रंग आणि लोककलेच्या प्रभावासाठी ओळखली जाते.

**बासोली शैली** (Basohli Style) **:** १७ व्या शतकात पंजाबमध्ये विकसित झालेली एक विशिष्ट

चित्रकला शैली. या शैलीत गडद रंग, मोठ्या डोळ्यांची आकृती आणि एक विशिष्ट भावनिक अभिव्यक्ती असते.

**काश्मिरी शैली** (Kashmiri Style) **:** काश्मीर प्रदेशात विकसित झालेली कला शैली, ज्यात परशियन आणि भारतीय कलांचा संगम दिसतो. विशेषतः हस्तलिखिते आणि मिनिएचर पेंटिंगमध्ये ही शैली आढळते.

**शीख शैली** (Sikh Style) **:** १८ व्या आणि १९ व्या शतकात पंजाबमध्ये विकसित झालेली चित्रकला शैली, जी शीख गुरु, ऐतिहासिक घटना आणि शीख धर्माच्या तत्त्वांवर आधारित असते.

**इंडो–सारासेनिक स्थापत्यशैली** (Indo-Saracenic Architecture) **:** ब्रिटिश राजवटीत भारतात विकसित झालेली एक संकरित स्थापत्यशैली, ज्यात भारतीय, इस्लामिक (सारासेनिक) आणि युरोपियन वास्तुकलेचे घटक एकत्र आले. उदा. मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया.

**लघुचित्रकला** (Miniature Painting) **:** लहान आकारातील चित्रे, जी सहसा पुस्तके, हस्तलिखिते किंवा स्वतंत्रपणे काढली जातात. या शैलीत बारीक तपशील आणि चमकदार रंगांचा वापर केला जातो.

**पंचमार्क नाणी** (Punch-Marked Coins) **:** भारतातील सर्वात प्राचीन नाणी, जी विशिष्ट धातूच्या तुकड्यांवर ठोकून (punching) विविध प्रतीके किंवा खुणा कोरून तयार केली जात असत. ही नाणी साधारणपणे इ.स.पू. ६ व्या शतकापासून प्रचलित होती.

**गोथिक शैली :** ही मध्ययुगीन युरोपमधील, विशेषतः १२ व्या ते १६ व्या शतकांदरम्यान, प्रचलित असलेली एक कला आणि स्थापत्यशैली आहे. ही शैली मुख्यत्वे उत्तर फ्रान्समध्ये रोमनेस्क वास्तुकलेमधून विकसित झाली.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे :**

१) ब, २) क, ३) ब, ४) क, ५) क, ६) ब, ७) ब, ८) क, ९) क, १०) क

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे :**

१) ब, २) क, ३) क, ४) ब, ५) ब, ६) ब, ७) क, ८) ड, ९) क, ३०) क

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे :**

१) ब, २) ब, ३) क, ४) ब, ५) क, ६) क, ७) क, ८) क, ९) क, १०) क

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**ब) टिपा लिहा.**

१) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयामधील हस्तलिखित दालन

२) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयामधील नाणे व ताम्रपट दालन

३) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयामधील लघुचित्र दालन

४) टाऊन हॉल वस्तुसंग्रहालयामधील शस्त्रास्त्र दालन

**दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय नवी दिल्लीमधील विविध दालनांची सविस्तर माहिती द्या.

२) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय मुंबईमधील विविध दालनांची  माहिती द्या.

३) टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय कोल्हापूर मुंबईमधील विविध दालनांची माहिती द्या.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) डॉ. बोरकर रघुनाथ, संग्रहालयशास्त्र, पिंपळापुरे बुक, नागपूर.

२) डॉ. शुक्लजी व डॉ. पांडे वि., संग्रहालयविज्ञान, मोतीलाल बनारसीराम, नवी दिल्ली.

३) गणेशन आर., संग्रहालाय दर्पण, पिलग्रिम पब्लिशिंग, वाराणसी, २००६

४) National Museum Collection : An Introduction, नवी दिल्ली

५) संकेतस्थळ : https://nationalmuseumindia.gov.in/
https://csmvs.in/

❑❑❑